म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. नं. ४२६५

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
संग्रहालय शाखा.

अनुक्रम नं.
विभाग १४.
क्रमांक ६32.

पुस्तकाचें नांव लेनिन वादाची मूलतत्वें.
लेखक अनुवादक :- श्री. वा. देशपांडे.

सूचना—पुस्तक आठ दिवसांवर ठेवूं नका. पुस्तकाची खराबी करूं नका.

REFBK-0006487

निबंध

१८०

# लेनिनवादाचीं मूलतत्त्वें

★ जोसेफ स्तालिन

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थल प्रत ८३२
ठाणें.
REFBK-0006487

अनुवादक

शं. वा. देशपांडे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणें
क्र. ६४८६
मुंबई शाखा (स्थल प्रत)

जून १९४४ ] लोक-प्रकाशन, मुंबई [ किंमत रु. १-१२-०

# लेनिनवादाचीं मूलतत्त्वें

★ जोसेफ स्तालिन

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
... 822
ठाणे.

REFBK-0006487

अनुवादक
शं. बा. देशपांडे

ग्रंथ... ठाणे
क्र. नं. 6886
... शाखा (स्थळ प्रत)

जून १९४४ ] लोक-प्रकाशन, मुंबई [ किंमत रु. १-१२-०

# अनुक्रमणिका


विषय-प्रवेश . . . . . १

१. लेनिनवादाची ऐतिहासिक पूर्वपीठिका ५

२. कार्यपद्धति . . . . १४

३. तत्त्वविचार . . . . २५

४. कामगार हुकुमशाही . . ४७

५. शेतकऱ्यांचा प्रश्न . . . ६५

६. राष्ट्रीय प्रश्न . . . ८४

७. व्यूहरचना आणि डावपेंच . . ९८

८. पार्टी . . . . . १२१

९. कामांतील शैली . . . १४१

# लेनिनवादाचीं मूलतत्त्वें

[ १९२४ एप्रिलच्या सुरवातीस स्वेर्दलोव युनिव्हर्सिटींत दिलेलीं व्याख्यानें ]

'लेनिन–नोंदणी'च्या प्रसंगीं पार्टींत दाखल झालेल्या नव्या सभासदांना समर्पण

—जोसेफ स्तालिन

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.

★

## विषय–प्रवेश

लेनिनवादाचीं मूलतत्त्वें हा विषय मोठा आहे. त्याचें संपूर्ण विवेचन करावयाचें म्हटलें तर एक जाडा ग्रंथच लिहावा लागेल. किंबहुना अनेक ग्रंथ लिहावे लागतील. म्हणून या व्याख्यानांत लेनिनवादाच्या संपूर्ण विवेचनाची अपेक्षा करणें अर्थात्‌च शक्य नाहीं; फार तर लेनिनवादाच्या मूलतत्त्वांची त्रोटक रूपरेषाच या व्याख्यानांत मांडतां येईल. तरीपण लेनिनवादाचा चांगला अभ्यास करण्यासाठीं कांहीं मूलभूत मुद्दे आरंभीं लक्षांत घेणें जरूर आहे व हे मुद्दे मांडण्याच्या हेतूनें ही रूपरेषा उपयुक्त होईल असें मला वाटतें.

लेनिनवादाच्या मूलतत्त्वांचें विवेचन करावयाचें म्हणजे लेनिनच्या जगद्विषयक दृष्टिकोणाच्या पायाचें विवेचन केलें पाहिजे, असें मुळींच नाहीं. लेनिनचा जगद्विषयक दृष्टिकोण, आणि लेनिनवादाचीं मूलतत्त्वें, या दोन

गोष्टींची व्याप्ति सारखी नाहीं. लेनिन मार्क्सवादी होता, आणि अर्थात् मार्क्सवाद हाच त्याच्या जगद्विषयक दृष्टिकोणाचा पाया आहे. परंतु लेनिन-वादाचें विवेचन करावयाचें तर आरंभीं मार्क्सवादाच्या मूलतत्त्वांचें विवेचन केलें पाहिजे असें यावरून मुळींच म्हणतां येत नाहीं. मार्क्सवादाच्या सर्व-साधारण भांडारांत लेनिननें कांही वैशिष्ठ्यपूर्ण व नवीन मुद्यांची भर घातली व हे मुद्दे लेनिनच्या नांवाशीं साहजिकपणेंच निगडित झाले आहेत; लेनिनच्या ग्रंथांतील या मुद्यांचें विवेचन करणें म्हणजेच लेनिनवादाच्या मूलतत्त्वांचें विवेचन करणें होय. या अर्थानेंच मी या व्याख्यानांत लेनिनवादाच्या मूल-तत्त्वांविषयीं बोलणार आहें.

तर मग, लेनिनवाद म्हणजे काय?

कांहींजण म्हणतात कीं लेनिनवाद म्हणजे रशियांतील विशिष्ट परिस्थितीला मार्क्सवाद लागू करणें. या व्याख्येंत सत्याचा अंश आहे खरा, पण तिच्यांत संपूर्ण सत्य व्यक्त झालें आहे असें मात्र मुळींच म्हणतां येत नाहीं. लेनिननें रशियांतील परिस्थितीला मार्क्सवाद लागू केला व हें कार्य त्यानें अभिजात कौशल्यानें पार पाडलें हें निर्विवाद आहे. पण रशियांतील विशिष्ट परि-स्थितीला मार्क्सवाद लागू करणें एवढाच जर लेनिनवादाचा अर्थ असता तर त्याचें स्वरूप शुद्ध राष्ट्रीय—केवळ राष्ट्रीयच—आहे असें म्हणावें लागलें असतें, त्याला शुद्ध रशियन—केवळ रशियनच—स्वरूप प्राप्त झालें असतें. परंतु लेनिनवाद केवळ रशियापुरता मर्यादित नसून आंतरराष्ट्रीय स्वरूपाचा आहे व समग्र आंतरराष्ट्रीय घडामोडींच्या इतिहासांत त्याचीं पाळेंमुळें आहेत, ही गोष्ट आपणांला ठाऊक आहेच. वरील व्याख्येंत एकांगीपणाचा दोष आहे असें मला वाटतें, याचें कारण हेंच होय.

दुसरे कांहीं लोक म्हणतात कीं लेनिनवाद म्हणजे १९ व्या शतकाच्या पांचव्या दशकांतील मार्क्सवादाच्या क्रांतिकारक तत्त्वांचें पुनरुज्जीवन. त्या काळांतील मार्क्सवाद व त्यानंतरच्या काळांतील मार्क्सवाद यांत भेद आहे असें हे लोक समजतात, व मागाहूनच्या काळांत मार्क्सवाद मवाळ बनला, त्याचा क्रांति-

कारकपणा नाहींसा झाला, असा या लोकांचा आरोप आहे. अशा रीतीनें मार्क्सच्या शिकवणुकीचे क्रांतिकारक व मवाळ असे दोन भाग पाडणें मूर्खपणाचें लक्षण आहे; तथापि हा मुद्दा बाजूला ठेवल्यास आपणांला एवढें कबूल करावें लागेल कीं या अत्यंत अपुऱ्या व असमाधानकारक व्याख्येंतसुद्धां सत्याचा कांहीं अंश आहेच. हा सत्याचा भाग असा :—सेकंड इंटरनॅशनलच्या संधिसाधूंनीं दडपून ठेवलेलें मार्क्सवादाचें क्रांतिकारक अंतरंग लेनिननें खरोखरीच पुनः जगापुढें मांडलें. तथापि हा सत्याचा केवळ एक अंश झाला. लेनिनवादाविषयीं संपूर्ण सत्य सांगावयाचें तर असें म्हटलें पाहिजे कीं मार्क्सवादाची पुन:स्थापना तर त्यानें केलीच, पण त्याखेरीज त्यानें आणखी एक पाऊल पुढें जाऊन भांडवलशाही व कामगारवर्गाचा वर्गलढा यांच्या नव्या परिस्थितीच्या आधारें मार्क्सवादाला अधिक विकसित स्वरूप दिलें.

मग सांगोपांग विचार करतां लेनिनवादाची खरी व्याख्या कोणती ?

लेनिनवाद म्हणजे साम्राज्यशाहीच्या व कामगार-क्रांतीच्या युगांतील मार्क्सवाद. जास्त कांटेकोरपणानें सांगायचें तर लेनिनवाद म्हणजे सर्वसाधारणपणें कामगार-क्रांतीचा सिद्धांत व डावपेंच, व विशेषत: कामगार हुकुमशाहीचा सिद्धांत व डावपेंच. मार्क्स व एंगल्स यांचें जीवनकार्य क्रांतिपूर्व काळांत (म्हणजे कामगार-क्रांतीच्या पूर्वीच्या काळांत) झालें; त्या काळांत विकसित स्वरूपांतील साम्राज्यशाही अजून अस्तित्वांत आलेली नव्हती, कामगारवर्गानें क्रांतीसाठीं चालविलेल्या तयारीचा तो काळ होता, त्यावेळीं कामगार-क्रांति ताबडतोब कृतींत आणावयाची अनिवार्य गोष्ट झाली नव्हती. उलटपक्षीं मार्क्स व एंगल्स यांचा शिष्य लेनिन याचें जीवनकार्य विकसित साम्राज्यशाहीच्या काळांत झालें; त्या काळांत कामगार-क्रांतीचा विकास होऊं लागला होता, एका देशांत कामगार-क्रांतीचा विजय होऊन चुकला होता, कामगार-क्रांतीनें भांडवलदारी लोकशाहीचा नि:पात करून कामगार-लोकशाहीच्या युगाची—सोविएतांच्या युगाची—सुरवात केली होती.

याच कारणास्तव लेनिनवाद म्हणजे मार्क्सवादाचें अधिक विकसित स्वरूप अशी व्याख्या करणें योग्य होईल.

लेनिनवादाच्या असामान्य लढाऊपणाचा व असामान्य क्रांतिकारकपणाचा नेहमीं उल्लेख करण्यांत येत असतो, व तें अगदीं बरोबर आहे. पण लेनिनवादाला हें वैशिष्ठ्य कशामुळें प्राप्त झालें ? दोन कारणांमुळें. पहिलें कारण असें कीं कामगार-क्रांतींतून लेनिनवादाचा जन्म झाला व त्याच्यावर या क्रांतीचा ठसा उमटणें साहजिकच आहे. दुसरें कारण असें कीं सेकंड इंटरनॅशनलच्या संधिसाधुवादाशीं झुंजतां झुंजतांच लेनिनवादाची वाढ झाली व त्याला सामर्थ्य प्राप्त झालें. भांडवलशाहीविरुद्ध यशस्वी लढा करावयाचा तर अगोदर सेकंड इंटरनॅशनलच्या संधिसाधुवादाविरुद्ध लढणें अत्यंत आवश्यक होतें, व अजूनही आहे. मार्क्स-एंगल्सचा काळ व लेनिनचा काळ या दोहोंच्या दरम्यान एक समग्र कालखंड असा होऊन गेला कीं त्यावेळीं सेकंड इंटरनॅशनलच्या संधिसाधुवादाचें संपूर्ण वर्चस्व होतें, ही गोष्ट विसरून चालणार नाहीं. या संधिसाधुवादाविरुद्ध निर्दयपणें लढणें लेनिनवादाचें एक अत्यंत महत्वाचें कर्तव्य बनावें हें क्रमप्राप्तच होतें.

★

[१]

# लेनिनवादाची ऐतिहासिक पूर्वपीठिका

साम्राज्यशाहीच्या परिस्थितींतच लेनिनवाद उदयास आला व त्याला निश्चित स्वरूप प्राप्त झालें. त्यावेळीं भांडवलशाहीचे अंतर्गत विरोध पराकोटीला जाऊन पोहोंचले होते, कामगार-क्रांति तावडतोब अमलांत आणावयाची गोष्ट झाली होती, क्रांतीसाठीं कामगारवर्गाची तयारी करण्याचा जुना कालखंड संपून त्याचें पर्यवसान भांडवलशाहीवर सरळ हल्ला चढविण्याच्या नव्या कालखंडांत झालें होतें.

लेनिननें साम्राज्यशाहीला 'मरणोन्मुख भांडवलशाही' असें नांव दिलें. कां? कारण साम्राज्यशाहीमुळें भांडवलशाहीचे अंतर्गत विरोध अगदीं शेवटच्या थराला जाऊन पोहोंचतात, अगदीं अखेरची मर्यादा गांठतात, व तेथून पुढें क्रांतीची सुरवात होते. या अंतर्गत विरोधांपैकीं तीन विरोध सर्वांत जास्त महत्वाचे समजले पाहिजेत.

**पहिला विरोध** म्हणजे कामगारवर्ग व भांडवलदारवर्ग यांमधील विरोध. औद्योगिक देशांतील अजस्र मक्तेदारी कंपन्या––ट्रस्ट्स् व सिंडिकेट्स्, बँका व मूठभर बँक-भांडवलदारांचा गट, यांच्या हातीं सर्व सत्ता असणें याचेंच नांव साम्राज्यशाही. या अनिर्बंध शक्तीविरुद्ध झगडण्याच्या कामीं कामगार-वर्गाचीं परंपरागत साधनें––ट्रेड युनियन्स, सहकारी संस्था, पार्लमेंटरी पक्ष, व पार्लमेंटरी लढा––अगदीं अपुरीं ठरलीं आहेत. साम्राज्यशाहीच्या काळांत कामगारवर्गाच्या प्रचंड जनसमुदायापुढें दोनच मार्ग असतात:––एकतर आपली मान भांडवलदारांच्या हातीं देऊन टाकावी, पूर्वीप्रमाणेंच हाल-अपेष्टांच्या भोंवऱ्यांत गिरक्या खात रहावें, आणि दिवसेंदिवस जास्त जास्त खोल बुडत जावें; नाहींतर लढ्यांचीं नवीं शस्त्रें हातांत घ्यावीं. साम्राज्य-शाहीमुळें कामगारवर्ग क्रांतीचा टप्पा गांठतो.

**दुसरा विरोध** म्हणजे कच्च्या मालाच्या उत्पत्तिस्थानांसाठीं व परकीय मुलुखासाठीं धडपडणाऱ्या निरनिराळ्या बँक-भांडवलदार गटांचा व साम्राज्यवादी सत्तांचा आपापसांतील विरोध. कच्च्या मालाचीं उत्पत्तिस्थानें असलेल्या देशांत भांडवल निर्यात करणें, या उत्पत्तिस्थानांचा मक्तेदारी ताबा मिळविण्यासाठीं बेफामपणें झगडणें, अगोदरच वांटणी होऊन चुकलेल्या जगाची फेरवांटणी करण्यासाठीं धडपडणें, हें साम्राज्यशाहीचें लक्षण आहे. आपण अगोदरच वळकावलेल्या प्रदेशांना जुने गट व जुनीं राज्यें गोचिडीप्रमाणें चिकटून बसतात, आणि 'सूर्यप्रकाशांतली जागा' मिळविण्यासाठीं धडपडणारे नवे गट व नवीं राज्यें या जुन्या गटांविरूद्ध व या जुन्या राज्यांविरुद्ध विशेषच त्वेषानें लढत असतात. भांडवलदारांच्या निरनिराळ्या गटांमधील या बेफाम झगड्याकडे विशेष लक्ष देण्याचें कारण असें कीं साम्राज्यशाही युद्धें, परकीय मुलुख लुबाडण्यासाठीं युद्धें, हा या झगड्याचा एक अपरिहार्य भाग असतो. आणि या मुद्याकडेही विशेष लक्ष देण्याचें कारण असें कीं या युद्धांच्या योगें साम्राज्यवादी एकमेकांचें सामर्थ्य क्षीण करतात, एकंदर भांडवलशाहीचें आसन कमजोर होतें, कामगार-क्रांतीचा आरंभ अधिक वेगानें जवळ येऊन ठेपतो, व ही क्रांति प्रत्यक्ष घडून येणें अपरिहार्य होऊन बसतें.

**तिसरा विरोध** म्हणजे एकीकडे मूठभर सत्ताधारी 'सुधारलेलीं' राष्ट्रें व दुसरीकडे जगांतील वसाहतदेशांची व परतंत्र राष्ट्रांची कोट्यवधि जनता यांमधील विरोध. अफाट वसाहतदेशांत व परतंत्र देशांत वस्ती करणाऱ्या करोडों लोकांची अत्यंत निर्लज्जपणें पिळणूक करणें व त्यांच्यावर अत्यंत अमानुष जुलूम करणें हें साम्राज्यशाहीचें लक्षण आहे. या पिळणुकीचा व जुलुमशाहीचा उद्देश गडगंज नफा (सुपर-प्रॉफिट्स्) उकळणें हाच असतो. पण या देशांची पिळणूक करतांना साम्राज्यशाहीला तेथें रेल्वे बांधणें, गिरण्या कारखाने उभारणें, उद्योगधंद्यांचीं व व्यापाराचीं केंद्रें अस्तित्वांत आणणें, भाग पडतें. कामगारांचा वर्ग निर्माण होणें, तद्देशीय बुद्धिजीवी वर्ग उदयास येणें, राष्ट्रीय भावना जागृत होणें, दास्यविमोचनाची चळवळ वाढत जाणें, —हे या 'धोरणा'चे अपरिहार्य परिणाम असतात. एकूणएक वसाहत-

देशांत व परतंत्र देशांत क्रांतिकारक चळवळीची जी वाढ झाली आहे तिच्यावरून या गोष्टीचा स्पष्ट पुरावा मिळतो. कामगारवर्गाच्या दृष्टीनें ही गोष्ट महत्वाची आहे, कारण साम्राज्यशाहीची राखीव शक्ति असलेले वसाहतदेश व परतंत्र देश या गोष्टीमुळे कामगार-क्रांतीची राखीव शक्ति बनतात व अशा रीतीनें भांडवलशाहीचा पायाच कोसळून पडतो.

सर्वसाधारणपणें पहातां साम्राज्यशाहीचे मुख्य अंतर्गत विरोध हे आहेत व या विरोधांमुळेंच पूर्वीच्या 'उत्कर्षोन्मुख' भांडवलशाहीचें मरणोन्मुख भांडवलशाहींत रूपांतर होतें.

दहा वर्षांपूर्वीं सुरू झालेल्या साम्राज्यशाही युद्धाचें एक महत्व असें आहे कीं त्यामुळें या सर्व विरोधांची युति जुळून येऊन एकाच वेळीं त्यांचा परिणाम व्यक्त होऊं लागला व अशा रीतीनें कामगारवर्गाच्या क्रांतिकारक संग्रामांना अधिक वेगानें चालना मिळाली व अधिक अनुकूलता प्राप्त झाली.

हेंच दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे साम्राज्यशाहीमुळें क्रांति प्रत्यक्ष कृतींत आणावयाची अनिवार्य गोष्ट बनली आहेच आणि त्याखेरीज भांडवलशाहीच्या किल्ल्यांवर सरळ हल्ला करण्याला अनुकूल परिस्थितिदेखील निर्माण झाली आहे.

असल्या आंतरराष्ट्रीय परिस्थितींतच लेनिनवादाचा जन्म झाला.

कांहींजण म्हणतील :—" हें सारें ठीक आहे, पण रशियाशीं याचा काय संबंध ? रशिया तर साम्राज्यशाहीचीं खास लक्षणें असलेला देश नव्हता, आणि तो तसा देश असणें शक्यही नव्हतें. लेनिनशीं याचा काय संबंध ? लेनिन तर मुख्यत्वेंकरून रशियांत व रशियासाठीं कार्य करीत होता. इतर कोणत्याही देशाऐवजीं रशियाच लेनिनवादाचें जन्मस्थान कां बनला ? कामगार-क्रांतीच्या सिद्धांताचा व डावपेंचांचा उगम रशियांतच कां झाला ?"

कारण हेंच कीं साम्राज्यशाहीचे हे सर्व अंतर्गत विरोध रशियामध्यें केन्द्रित झाले होते.

कारण हेंच कीं इतर कोणत्याही देशापेक्षां रशियांतीलच परिस्थिति क्रांतीचा स्फोट होण्यास जास्त अनुकूल झाली होती व म्हणून हे विरोध क्रांतिकारक मार्गानें सोडविणें एकट्या रशियालाच शक्य होतें.

पहिली गोष्ट अशी कीं झारशाही रशिया प्रत्येक तऱ्हेच्या जुलुमाचें-- भांडवलदारी जुलुमाचें, वसाहतींवरील जुलुमाचें व लष्करी जुलुमाचें-- माहेरघरच बनला होता, व तेथें या सर्व जुलुमांना अत्यंत अमानुष व रानटी स्वरूप प्राप्त झालें होतें. रशियामध्यें भांडवलाची सर्वसत्ता व झारशाहीची अनियंत्रित राजवट यांची युति जमली होती, रशियन राष्ट्रवादाचें आक्रमणशील स्वरूप व रशियनेतर राष्ट्रांच्या बाबतींत झारशाहीनें स्वीकारलेली मारेकऱ्याची भूमिका या दोहोंचा संयोग जुळून आला होता, टर्की, पर्शिया, चीन, या प्रचंड प्रदेशांची पिळणूक करणें व मुलुखगिरीचीं युद्धें करून झारशाहीनें हे देश बळकावणें या दोन गोष्टींची एकमेकींना सांथ मिळाली होती, हें ठाऊक नाहीं असा कोण आहे? झारशाही म्हणजे "लष्करी-सरंजामी साम्राज्यशाही," असें लेनिननें म्हटलें आहे व तें बरोबर आहे. साम्राज्यशाहीचीं सर्वांत वाईट लक्षणें अत्यंत तीव्र स्वरूपांत झारशाहीमध्यें केन्द्रित झालीं होतीं.

दुसरी गोष्ट अशी कीं झारशाही रशिया पाश्चिमात्य साम्राज्यशाहीची अमर्याद राखीव शक्ति होता. कारण एकतर रशियामध्यें परकीय भांडवलाला मुक्तद्वार होतें व तेल, धातू, वगैरे रशियाच्या राष्ट्रीय अर्थव्यवस्थेंतील मूलभूत धंदे परकीय भांडवलाच्या नियंत्रणाखालीं होते. शिवाय पाश्चिमात्य साम्राज्यवाद्यांना लाखों शिपाई पुरविणें रशियाला शक्य होतें. ब्रिटिश व फ्रेंच भांडवलदारांच्या अगणित नफेबाजीचें रक्षण करण्यासाठीं साम्राज्यवादी युद्धाच्या रणभूमीवर एक कोट वीस लक्ष रशियन सैनिकांनीं आपलें रक्त ओतलें, या गोष्टीची आठवण ठेवा.

तिसरी गोष्ट अशी कीं यूरपच्या पूर्व भागांत साम्राज्यशाहीची राखणदारी करणाऱ्या कुत्र्याचें काम तर झारशाही बजावीत होतीच, पण त्याखेरीज

पॅरिस, लंडन, बर्लिन, ब्रुसेल्स, येथें उभारलेल्या कर्जावरील व्याजाच्या रूपानें जनतेकडून करोडों रुपये वळजबरीनें वसूल करण्याच्या कामीं पाश्चिमात्य साम्राज्यशाहीच्या गुमास्त्याची भूमिकाही झारशाही पार पाडीत होती.

शेवटची गोष्ट अशी कीं टर्की, पर्शिया, चीन, वगैरे देशांची फाळणी करण्याच्या कामीं झारशाही पाश्चिमात्य साम्राज्यशाहीबरोबर अत्यंत इमानें इतबारें सहकार्य करीत होती. साम्राज्यशाही युद्धांत झारशाहीनें दोस्त राष्ट्रांच्या साम्राज्यवाद्यांशीं सहकार्य केलें व या युद्धांत रशिया हा एक अत्यंत आवश्यक घटक होता, हें सर्वांना ठाऊकच आहे.

म्हणूनच झारशाहीचे हितसंबंध व पाश्चिमात्य साम्राज्यशाहीचे हितसंबंध एकमेकांशीं निगडित झाले व अखेरीस ते एकमेकांत विलीन होऊन साम्राज्यवादी हितसंबंधांचें एकजिनसी स्वरूप त्यांना प्राप्त झालें. झारशाहीचा व भांडवलशाहीचा जुना रशिया म्हणजे पाश्चिमात्य साम्राज्यशाहीचा पूर्वेकडील जबरदस्त आधारस्तंभ, तिच्या सामर्थ्याचें आणि साधनसामुग्रीचें अजस्र कोठार; मग असा रशिया सहजासहजीं हातचा गमावणें, झारशाहीच्या रक्षणासाठीं व ती टिकवून धरण्यासाठीं रशियन क्रांतीविरुद्ध आमरणान्त लढा चालविण्याच्या कामीं आपली सर्व शक्ति खर्चीं न घालणें, पाश्चिमात्य साम्राज्यशाहीला शक्य होतें का? मुळींच शक्य नव्हतें.

पण यावरून असा निष्कर्ष निघतो कीं झारशाहीवर हल्ला करूं पाहणाऱ्या प्रत्येक माणसाला साम्राज्यशाहीविरुद्ध शस्त्र उपसणें क्रमप्राप्तच होतें, झारशाहीविरुद्ध उठाव करणाऱ्या प्रत्येकजणाला साम्राज्यशाहीविरुद्धही उठाव करणें भाग होतें; कारण झारशाहीचें उच्चाटन करण्याचा कुणी निर्धार केला असेल, व झारशाहीचा नुसता पाडाव करून समाधान न मानतां झारशाही अजिबात नामशेष करण्याचें त्यानें ठरविलें असेल, तर साम्राज्यशाहीचेंही उच्चाटन केल्याशिवाय त्याला गत्यंतर नाहीं, हें उघडच होतें. म्हणून झारशाही-विरोधी क्रांतीची साम्राज्यशाही-विरोधी क्रांतीशीं—कामगार-क्रांतीशीं—सांगड बांधली गेली, व झारशाही-विरोधी क्रांतीचें साम्राज्यशाहीविरोधी क्रांतींत—कामगार-क्रांतींत—पर्यवसान होणें आवश्यक झालें.

इकडे रशियामध्यें एक प्रचंड लोक-क्रांतीचा डोंब उठत होता,या क्रांतीच्या अग्रभागीं जगांतील अत्यंत क्रांतिकारक कामगारवर्ग होता, व या कामगार वर्गाला रशियांतील क्रांतिकारक शेतकरीवर्गासारखा महत्वाचा दोस्त लाभला होता. अशी क्रांति अर्ध्या रस्त्यांत थांबणें शक्यच नव्हतें, ती विजयी झाल्यास तिचें पाऊल आणखी पुढें पडणें व तिनें साम्राज्यशाहीविरोधी बंडाचा झेंडा उभारणें अपरिहार्यच होतें, ही गोष्ट काय प्रमाणें देऊन सिद्ध करायला हवी ?

साम्राज्यशाहीचे अंतर्गत विरोध रशियामध्यें केन्द्रित होणें क्रमप्राप्त होतें, याचें कारण हेंच होय. एकतर रशियांतच हे विरोध अत्यंत स्पष्टपणें व्यक्त झाले होते, कारण तेथें त्यांना विशेष किळसवाणें व विशेष असह्य स्वरूप प्राप्त झालें होतें. दुसरी गोष्ट म्हणजे रशिया हा पाश्चिमात्य साम्राज्यशाहीचा अत्यंत महत्वाचा आधारस्तंभ होता, पाश्चिमात्य बँक-भांडवल व पौर्वात्य वसाहती यांना जोडणारा तो दुव्वा होता. शिवाय तिसरी गोष्ट अशी कीं साम्राज्यशाहीचें अंतर्गत विरोध क्रांतिकारक मार्गानें सोडविण्यास समर्थ असलेली खरीखुरी शक्ति एकट्या रशियांतच अस्तित्वांत होती, दुसऱ्या कोणत्याही देशांत नव्हती.

पण यावरून असा निष्कर्ष निघतो कीं रशियांतील क्रांतीला कामगार-क्रांतीचें स्वरूप येणें अपरिहार्यच होतें, तिला आरंभापासूनच आंतरराष्ट्रीय स्वरूप धारण केल्याशिवाय गत्यंतर नव्हतें, व म्हणून तिच्यामुळें जागतिक साम्राज्यशाहीचा पायाच हादरून जाणें अगदीं निश्चित होतें.

अशा परिस्थितींत रशियन कम्युनिस्टांनीं आपल्या कार्याला रशियांतील क्रांतीच्या संकुचित राष्ट्रीय मर्यादेचें बंधन घालावें, ही गोष्ट शक्य तरी होती का ? मुळींच नव्हती. उलट एकंदर परिस्थितीमुळें——देशांतील अंतर्गत परिस्थितीमुळें (म्हणजे तीव्र क्रांतिकारक अरिष्टामुळें) व परदेशांतील परिस्थितीमुळें (म्हणजे महायुद्धामुळें)——त्यांना आपलें कार्य करतांना या मर्यादेच्या पलीकडे जाण्यास चालना मिळाली; आंतरराष्ट्रीय क्षेत्रांत लढ्याचा मोर्चा नेऊन भिडविणें भाग पडलें; साम्राज्यशाहीच्या शरीरांतील सडके

भाग उघड करून दाखविणें आवश्यक झालें; भांडवलशाही कोलमडून पडणें अपरिहार्य आहे हें सिद्ध करणें प्राप्त झालें; समाजसत्तावादाच्या बुरख्या-खालीं वावरणाऱ्या राष्ट्रीय दुरभिमानाचा (सोशल-शोव्हिनिझम) व शांतता-वादाचा ('सोशल-पॅसिफिझम) संपूर्ण नायनाट करणें जरूर पडलें; व शेवटीं स्वतःच्या देशांतील भांडवलशाहीचें उच्चाटन करणें, आणि सर्व देशांतील कामगारांना भांडवलशाहीचें उच्चाटन करण्याच्या कामीं मदत करण्यासाठीं कामगारवर्गाचें नवें लढाऊ शस्त्र—कामगार-क्रांतीचा सिद्धांत व डावपेंच—घडविणें, त्यांना क्रमप्राप्त झालें. रशियन कम्युनिस्टांना हें सर्व केल्याखेरीज गत्यंतर नव्हतें, कारण रशियामध्यें पुनः भांडवलदारी समाजव्यवस्थेची स्थापना होण्याचें संकट टाळण्यासाठीं आंतरराष्ट्रीय परिस्थितींत जे फेरबदल घडवून आणणें जरूर होतें ते या मार्गानेंच आणण्याचा संभव होता, दुसरा कोणताही मार्ग शक्य नव्हता.

रशिया लेनिनवादाचें जन्मस्थान बनला याचें कारण हेंच होय. रशियन कम्युनिस्टांचा पुढारी लेनिन लेनिनवादाचा जन्मदाता बनला याचें कारण हेंच होय.

एकोणिसाव्या शतकाच्या पांचव्या दशकांत जर्मनी व मार्क्स-एंगल्स यांच्या बाबतींत जें 'घडून' आलें, तेंच आतां रशिया व लेनिन यांच्या बाबतींत घडून आलें असें म्हणण्यास हरकत नाहीं. विसाव्या शतकाच्या आरंभीं ज्याप्रमाणें रशियांत भांडवलदारी क्रांतीचा स्फोट होण्याची वेळ आली होती, त्याचप्रमाणें त्याकाळीं जर्मनींत भांडवलदारी क्रांतीच्या प्रसूतिवेदना सुरू झाल्या होत्या. 'कम्युनिस्ट जाहीरनाम्यां'त मार्क्सनें पुढील उद्गार काढले आहेत :

> "कम्युनिस्ट मुख्यतः जर्मनीकडे लक्ष पुरवीत आहेत, याचें एक कारण असें कीं त्या देशांत भांडवलदारी क्रांतीची वेळ येऊन ठेपली आहे व ही क्रांति युरोपियन संस्कृतीच्या अधिक परिणत अवस्थेंत आणि १७ व्या शतकांतील इंग्लंडच्या कामगारवर्गापेक्षां व १८ व्या

> शतकांतील फरान्सच्या कामगारवर्गापेक्षां पुष्कळच अधिक विकास पावलेला कामगारवर्ग अस्तित्वांत असतांना घडून येणार हें निश्चित आहे. दुसरें कारण असें कीं जर्मनींतील भांडवलदारी क्रांति तिच्या मागोमाग तावडतोब येणाऱ्या कामगार-क्रांतीची केवळ नांदीच ठरेल."

हेंच दुसऱ्या शब्दांत सांगायचें म्हणजे, त्यावेळीं क्रांतिकारक चळवळीचा मध्यबिंदु जर्मनीकडे सरकत होता.

जर्मनीच शास्त्रशुद्ध समाजसत्तावादाचें जन्मस्थान बनला व जर्मन कामगार-वर्गाचे पुढारी मार्क्स-एंगल्स शास्त्रशुद्ध समाजसत्तावादाचे जन्मदाते बनले, याचें कारण मार्क्सनें वरील उताऱ्यांत निदर्शनास आणलेल्या परिस्थितींतच बहुधा आढळेल याविषयीं कोणालाही शंका वाटण्याचें कारण नाहीं.

विसाव्या शतकाच्या आरंभींच्या रशियालाही हें विधान लागू पडतें, एवढेंच नव्हे तर तें जास्तच प्रमाणांत लागू पडतें. त्यावेळीं रशियांत भांडवल-दारी क्रांतीची वेळ येऊन ठेपली होती; त्यावेळीं यूरपमधील परिस्थिति अधिक परिणत अवस्थेला पोहोंचली होती व (इंग्लंड व फरान्सच्याच नव्हे तर) जर्मनीच्यापेक्षांही रशियन कामगारवर्गाचा अधिक विकास झालेला होता, आणि अशा वातावरणांत रशियाला ही भांडवलदारी क्रांति पार पाडा-वयाची होती. शिवाय या क्रांतीमुळें कामगार-क्रांतीला चालना मिळणार, ही क्रांति कामगार-क्रांतीची नांदी ठरणार, याचा भरपूर पुरावा नजरेस पडत होता. १९०२ सालींच, म्हणजे रशियन क्रांति अद्यापि गर्भावस्थेंत होती अशा वेळींच, लेनिननें आपल्या **'काय केलें पाहिजे ?'** या ग्रंथांत पुढील भविष्यवाणी नमूद करून ठेवली, हा कांहीं नुसता योगायोग समजतां कामा नये :—

> "इतर कोणत्याही देशांतील कामगारवर्गापुढें जीं तात्कालिक कार्यें आहेत त्यांपेक्षां **अधिक क्रांतिकारक** स्वरूपाचें तात्कालिक कार्य इतिहासानें सध्यां आमच्यावर [म्हणजे रशियन मार्क्सवाद्यांवर] सोंपविलें आहे. यूरपमधीलच नव्हे तर आशियांतीलही प्रतिगामी

शक्तींचा अत्यंत भक्कम आधारस्तंभ नष्ट करण्याचें हें कार्य जर आम्हीं पार पाडलें, तर रशियन कामगारवर्गाला आंतरराष्ट्रीय क्रांतिकारक कामगारवर्गाचें अग्रदल होण्याचा मान मिळेल."

हेंच दुसऱ्या शब्दांत सांगायचें म्हणजे, त्यावेळीं क्रांतिकारक चळवळीचा मध्यबिंदु रशियाकडे सरकणें अपरिहार्य होतें.

लेनिनचें हें भाकित पूर्णपणें खरें ठरलें हें रशियांतील क्रांतीच्या इतिहासावरून आपणांला माहित आहेच.

अशा प्रकारची क्रांति ज्या देशानें घडवून आणली, अशा प्रकारचा कामगार-वर्ग ज्या देशांत होता, तोच देश कामगार-क्रांतीच्या सिद्धांताचें व डावपेंचांचें जन्मस्थान बनावा, याबद्दल आश्चर्य वाटण्याचें आतां कांहीं कारण आहे का ?

या कामगारवर्गाचा पुढारी लेनिन या सिद्धांताचा व डावपेंचांचा जन्मदाता बनला, तो आंतरराष्ट्रीय कामगारवर्गाचा पुढारी बनला, यांत नवल कसलें ?

★

[ २ ]

# कार्यपद्धति

मार्क्स-एंगल्सचा काळ व लेनिनचा काळ या दोहोंच्या दरम्यान एक समग्र कालखंड असा होऊन गेला कीं त्या वेळीं सेकंड इंटरनॅशनलच्या संधिसाधुवादाचें संपूर्ण वर्चस्व होतें, हें मी यापूर्वी सांगितलें आहेच. अगदीं कांटेकोरपणानें बोलावयाचें तर आणखी असें म्हटलें पाहिजे कीं हें विधान करतांना मी औपचारिक देखाव्याचा विचार करीत नसून प्रत्यक्ष वस्तुस्थितीचाच विचार करीत आहें. औपचारिक दृष्टया पाहिलें तर त्यावेळीं सेकंड इंटरनॅशनलचें पुढारीपण कौट्स्की प्रभृति 'निष्ठावंत' मार्क्सवाद्यांच्या—'परंपराभिमानी' (ऑर्थाडॉक्स) मार्क्सवाद्यांच्या—हातीं होतें. मात्र प्रत्यक्ष परिस्थिति पाहिली तर इंटरनॅशनलचें कार्य मुख्यत्वेंकरून संधिसाधुवादाच्या मार्गानेंच चाललें होतें. भांडवलदारवर्गाला सोईची पडणारी भूमिका संधिसाधूंनीं स्वीकारली, कारण हे संधिसाधु मध्यमवर्गीय मनोवृत्तीचे व म्हणून सोईप्रमाणें आपला पवित्रा बदलण्यास तयार होणारे होते. आणि या संधिसाधूंशीं 'एकजूट' कायम ठेवण्यासाठीं, 'पक्षांतील एकोपा' कायम ठेवण्यासाठीं, या संधिसाधूंना सोईची पडणारी भूमिका 'परंपराभिमानी' मार्क्सवाद्यांनीं स्वीकारली. परिणाम काय झाला ? संधिसाधुवादाचें संपूर्ण वर्चस्व स्थापन झालें, कारण भांडवलदारवर्गाचें धोरण व 'परंपराभिमानी' मार्क्सवाद्यांचें धोरण यांना जोडणारा एक दुव्वा अस्तित्वांत असल्याचें नेहमीं प्रत्ययास आलें.

त्या काळांत भांडवलशाहीचा विकास तुलनात्मकदृष्टया पाहतां शांततेनें होत होता. त्या काळाला युद्धपूर्व काळ म्हणण्यास हरकत नाहीं. साम्राज्यशाहींत अंतर्भूत असलेले विध्वंसक स्वरूपाचे विरोध त्यावेळीं स्पष्ट स्वरूपांत उघड झाले नव्हते. कामगारांचे आर्थिक संप व ट्रेड युनियन चळवळ यांचा

विकास बऱ्याचशा ' स्वाभाविक ' (नॉर्मल) रीतीनेंच होत होता. निवडणुकींच्या मोहिमांना व पार्लमेंटरी पक्षांना ' दणदणीत ' यश मिळत होतें. लढ्याच्या कायदेशीर मार्गांचें भरमसाट स्तोम माजण्वियांत येत होतें, व कायदेशीर उपायांनीं भांडवलशाहीला ' ठार ' करतां येईल असें मानण्यांत येत होतें. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे सेकंड इंटरनॅशनलला जोडलेले पक्ष त्यावेळीं निष्क्रिय होऊन बसले होते, आणि क्रांतीविषयीं, कामगार–हुकुमशाहीविषयीं, किंवा बहुजनसमाजाला क्रांतिकारक शिक्षण देण्याविषयीं, गंभीरपणें विचार करण्यास कुणीही तयार नव्हता.

एकजिनसी क्रांतिकारक तत्त्वज्ञानाऐवजीं परस्परविरोधी सिद्धांतांची व अर्धवट प्रमेयांची बजबजपुरी माजून राहिली. बहुजनसमाजाच्या प्रत्यक्ष क्रांतिकारक लढ्याशीं या सिद्धांतांचा काडीइतकाही संबंध नव्हता. त्यांना जीर्ण मंत्रांचें विकृत स्वरूप प्राप्त झालें होतें. बतावणीसाठीं मार्क्सच्या तत्त्वज्ञानाचा उल्लेख करण्यांत येई हें खरें, पण त्याच वेळीं त्यांतील जिवंत क्रांतिकारक सत्त्व मात्र काढून टाकण्यांत येई.

क्रांतिकारक धोरणाऐवजीं उथळ मध्यमवर्गीय (फिलिस्टाइन) मनोवृत्तीच्या निःसत्त्व कार्यपद्धतीचें स्तोम माजलें. थंड डोक्यानें देवाणघेवाण करून राजकीय सौदे पटविणें, पार्लमेंटरी पद्धतीनें हिकमती लढविणें व कारस्थानें करणें, हेंच जीवितकार्य होऊन बसलें. बतावणीसाठीं ' क्रांतिकारक ' ठराव व घोषणा मान्य करण्यांत येत हें खरें, पण हे ठराव व या घोषणा लगेच दप्तरांत गुंडाळूना ठेवण्याचीही खबरदारी घेण्यांत येई.

पार्टीला शिक्षण देण्याऐवजीं, स्वतःच्या चुकांपासून धडे शिकण्यास तिल मदत करून बिनचूक क्रांतिकारक डावपेंचांची तिला माहिती करून देण्याऐवजीं, सेकंड इंटरनॅशनलचे पुढारी कठीण प्रश्नांना जाणूनबुजन बगल देत, या प्रश्नांच्या बाबतींत उडवाउडवी करीत, त्यांच्यावर पांघरूण घालीत. बतावणीसाठीं असल्या प्रश्नांवर मधून मधून चर्चा करण्याला त्यांची हरकत

नसे हें खरें, पण कसला तरी ‘ लवचीक ’ ठराव पास करून ही चर्चा संपविण्यास मात्र ते चुकत नसत.

सेकंड इंटरनॅशनलची चेहरेपट्टी अशी होती. हीच तिची कार्यपद्धति, हीच तिची शस्त्रसामुग्री.

पण याच सुमारास साम्राज्यशाही युद्धांचा व कामगारवर्गाच्या क्रांतिकारक संग्रामांचा नवा कालखंड जवळ येत चालला होता. बँक-भांडवलाच्या अनिर्बद्ध शक्तीला तोंड देण्यास लढ्याचीं जुनीं हत्यारें अपुरीं व कुचकामाचीं ठरूं लागल्याचें दिसून येत होतें.

सेकंड इंटरनॅशनलच्या कार्यांत आमूलाग्र फरक करणें, तिची कार्यपद्धति पूर्णपणें बदलणें, आवश्यक झालें. उथळ मनोवृत्ति, संकुचित दृष्टिकोण, राजकीय कारस्थानबाजी, तत्त्वभ्रष्टपणा, समाजसत्तावादाच्या बुरख्याखालीं राष्ट्रीय दुरभिमानाचा व शांततावादाचा पुरस्कार,—या सर्वांची हकालपट्टी करणें जरूर झालें. सेकंड इंटरनॅशनलच्या समग्र शस्त्रागाराची तपासणी करून त्यांतील जुनाट व गंजलेलीं हत्यारें फेंकून देणें व नवीं हत्यारें तयार करणें आवश्यक झालें. हें प्रास्ताविक कार्य पार पाडल्याशिवाय भांडवलशाहीविरुद्ध युद्ध सुरू करण्यांत कांहींच अर्थ नव्हता. हें कार्य जर पार पाडलें नाहीं, तर भावी क्रांतिकारक संग्रामांत कामगारवर्गाला आपल्या हातीं पुरेशीं शस्त्रास्त्रें नसल्याचें—किंबहुना आपण सर्वस्वी निःशस्त्र असल्याचें—आढळून येईल, असा धोका होता.

सेकंड इंटरनॅशनलमध्यें सांचलेले घाणीचे अजस्र डोंगर साफ करण्याचा व तिच्या कार्यांत आमूलाग्र फेरबदल घडवून आणण्याचा मान लेनिनवादाच्या वांट्यास आला.

लेनिनवादाची कार्यपद्धति ज्या परिस्थितीत जन्मास आली व विकास पावली, ती परिस्थिति अशी होती.

या कार्यपद्धतीमध्यें कोणत्या गोष्टी आवश्यक असतात ?

पहिली गोष्ट म्हणजे सेकंड इंटरनॅशनलच्या सांप्रदायिक सिद्धांतांची **पारख** केली पाहिजे व त्यासाठीं त्यांना बहुजनसमाजाच्या क्रांतिकारक लढ्याची कसोटी लावली पाहिजे, जिवंत कृतीच्या अग्निपरीक्षेंत ते सिद्धांत कितपत उतरतात हें पाहिलें पाहिजे,—म्हणजे तत्त्व व व्यवहार यांच्यांत जी फारकत करण्यांत आली होती ती नाहींशी करून त्या दोहोंची एकात्मता पुनः प्रस्थापित केली पाहिजे; कारण, क्रांतिकारक तत्त्वज्ञानाचें शस्त्र हातांत धारण करणारी खरीखुरी कामगारवर्गीय पार्टी अस्तित्वांत आणण्याचा एकमेव मार्ग हाच होय.

दुसरी गोष्ट म्हणजे सेकंड इंटरनॅशनलमधील पक्षांच्या धोरणाची **पारख** केली पाहिजे व त्यासाठीं त्याला त्यांच्या कृतीची––प्रत्यक्ष कार्याची–– कसोटी लावली पाहिजे, केवळ त्यांच्या घोषणा व ठराव पाहून चालणार नाहीं. (या घोषणांवर व ठरावांवर विश्वास ठेवतां येत नाहीं); कारण कामगार जनतेचा विश्वास संपादन करण्याचा आणि त्या विश्वासाला लायक होण्याचा एकमेव मार्ग प्रत्यक्ष कार्य हाच होय.

तिसरी गोष्ट म्हणजे क्रांतिकारक लढ्यासाठीं बहुजनसमाजाला शिक्षण देऊन तयार करतां यावें म्हणून नव्या क्रांतिकारक दिशेनें पार्टीच्या सर्व कार्याची **पुनर्घटना** केली पाहिजे; कारण कामगार-क्रांतीसाठीं जनतेला तयार करण्याचा एकमेव मार्ग हाच होय.

चौथी गोष्ट म्हणजे कामगारवर्गीय पक्षांनीं **आत्मटीका** केली पाहिजे, स्वतःच्या चुकांपासून धडे घेऊन स्वतःला शिक्षण दिलें पाहिजे; कारण पार्टीचे खरेखुरे कार्यकर्ते व खरेखुरे पुढारी शिकवून तयार करण्याचा एकमेव मार्ग हाच होय.

लेनिनवादाच्या कार्यपद्धतीचीं मूलभूत तत्त्वें हींच होत.

ही कार्यपद्धति आचरणांत कशी आणली गेली ?

सेकंड इंटरनॅशनलच्या संधिसाधूंच्या पोतडींत अनेक सांप्रदायिक सिद्धांत (डॉगमा) असतात व कोणत्याही मुद्याच्या चर्चेच्या वेळी ते या सिद्धांतांचा आधार घेत असतात. यांपैकीं कांहींचा आपण विचार करूं.

पहिला सांप्रदायिक सिद्धांत :—कोणत्या परिस्थितींत कामगारवर्गानें सत्ता काबीज करावी, या प्रश्नाच्या बाबतींत संधिसाधूंचें म्हणणें असें आहे कीं कामगारवर्ग जर आपल्या देशांतील बहुसंख्य वर्ग झाला नसेल तर त्याला सत्ता काबीज करतां येणार नाहीं व त्यानें सत्ता काबीज करतां कामा नये. या सिद्धांताच्या समर्थनार्थ कोणतींही प्रमाणें देण्यांत येत नाहींत, कारण या विक्षिप्त सिद्धांताचें समर्थन करूं शकणारीं प्रमाणें—तात्त्विक प्रमाणें म्हणा, किंवा व्यावहारिक प्रमाणें म्हणा—मुळीं अस्तित्वांतच नाहींत! सेकंड इंटरनॅशनलच्या या लब्धप्रतिष्ठितांना लेनिन उत्तर देतो :—तुमचें म्हणणें खरें आहे असें क्षणभर धरून चालूं या; पण अशी कल्पना करा कीं देशांत अल्पसंख्य असलेल्या कामगारवर्गाला एकाद्या विशिष्ट ऐतिहासिक परिस्थितींत (उदाहरणार्थ युद्ध, शेतीचें अरिष्ट, वगैरेमुळें) राबणाऱ्या जनतेच्या प्रचंड बहुसंख्येचा पाठिंबा मिळविण्याची संधि प्राप्त झाली आहे, मग अशा वेळीं त्या कामगारवर्गानें सत्ता कां काबीज करूं नये? भांडवलशाहीच्या मोर्च्यात खिंडार पाडण्यासाठीं व प्रश्न कायमचा मिटविण्याची वेळ जवळ आणण्यासाठीं कामगारवर्गानें देशांतील व आंतरराष्ट्रीय क्षेत्रांतील अनुकूल परिस्थितीचा फायदा कां घेऊं नये? जर्मनींतील कामगार-क्रांतीला 'शेतकरी-युद्धाच्या द्वितीयावृत्तीची' कोणत्या तरी प्रकारें साथ मिळवून देणें जर शक्य झालें असतें तर त्या कामगार-क्रांतीचा रथ फारच 'वैभवशाली' रीतीनें पुढें सरसावूं शकला असता, असें मार्क्सनें गेल्या शतकाच्या सहाव्या दशकांतच म्हणून ठेवलेलें आहे ना? त्या काळांत जर्मनींतील कामगारांचें प्रमाण १९१७ सालांतील रशियांतील कामगारांच्या प्रमाणापेक्षांही कमी होतें, हें सर्वांनाच ठाऊक आहे ना? सेकंड इंटरनॅशनलच्या बहाद्दर पुढाऱ्यांच्या या आवडत्या सिद्धांताला कामगारवर्गाच्या दृष्टीनें कांहींच अर्थ नाहीं, हें रशियन कामगार-क्रांतीच्या प्रत्यक्ष अनुभवानें निदर्शनास आणलें आहे ना? बहुजनसमाजाच्या क्रांतिकारक लढ्याचा अनुभव या जीर्ण सिद्धांताचा खोटेपणा सिद्ध करीत आहे, हें उघड नाहीं का?

दुसरा सांप्रदायिक सिद्धांत :–देशाच्या राज्यकारभाराची संघटना करण्यास समर्थ असलेले शिक्षण व राज्यकारभार या विषयांतील तज्ज्ञ कामगारवर्गांत जर पुरेशा संख्येंत निर्माण झालेले नसतील तर कामगारवर्गाला आपली सत्ता टिकवून धरतां येणार नाहीं; भांडवलशाहीच्या परिस्थितींतच हे तज्ज्ञ शिकवून तयार केले पाहिजेत, आणि त्यानंतरच कामगारवर्ग सत्ता काबीज करूं शकेल, ––असें सेकंड इंटरनॅशनलच्या संधिसाधूंचें म्हणणें आहे. लेनिन त्यांना उत्तर देतो :––तुमचें म्हणणें खरें आहे असें क्षणभर धरून चालूं या; पण त्यावरून निराळें अनुमान काढण्यास हरकत कोणती? प्रथम सत्ता काबीज करा, कामगारवर्गाच्या विकासासाठीं अनुकूल परिस्थिति निर्माण करा, आणि मग विद्युत्-वेगानें प्रगति करून राबणाऱ्या जनतेचा सांस्कृतिक दर्जा वाढवा व कामगारांतूनच अनेक पुढारी व राज्यकारभार चालविणारे शिकवून तयार करा. भांडवलदारी राजवटीपेक्षां कामगारांच्या राजवटींत कामगारांतून उदयास येणाऱ्या पुढाऱ्यांचें प्रमाण शेंकडों पट वेगानें व परिणामकारक रीतीनें वाढत जातें, हें रशियांतील अनुभवानें सिद्ध केलें आहे ना? बहुजनसमाजाच्या क्रांतिकारक लढ्याचा अनुभव संधिसाधूंच्या या सांप्रदायिक सिद्धांताच्याही निर्दयपणानें चिंधड्या उडवून देत आहे, हें उघड नाहीं का?

तिसरा सांप्रदायिक सिद्धांत :––संधिसाधूंचें असें म्हणणें आहे कीं राजकीय सार्वत्रिक संपाचा मार्ग कामगारवर्ग स्वीकारूं शकत नाहीं, कारण तात्त्विकदृष्ट्या हा मार्ग सदोष आहे (एंगल्सनें केलेली टीका पहा), आणि व्यावहारिकदृष्ट्या तो धोक्याचा आहे (त्यामुळें कदाचित् देशाच्या आर्थिक जीवनांत गोंधळ माजेल, ट्रेड युनियन्सची तिजोरी रिकामी होईल); लढ्याच्या पार्लमेंटरी प्रकारांऐवजीं राजकीय सार्वत्रिक संपाचा उपयोग करणें शक्य नाहीं, लढ्याचे पार्लमेंटरी स्वरूपाचे प्रकार हेच कामगारवर्गाच्या वर्गलढ्याचे मुख्य प्रकार होत. यावर लेनिनवाद्यांचें उत्तर असें आहे :––ठीक; पण पहिली गोष्ट म्हणजे एंगल्सनें सरसकट सर्व प्रकारच्या सार्वत्रिक संपांवर मुळींच टीका केली नाहीं, त्यानें फक्त एका विशिष्ट प्रकारच्या सार्वत्रिक संपावरच टीका केली, अराजकवादी लोक कामगारवर्गाच्या राजकीय **लढ्याऐवजीं आर्थिक** सार्वत्रिक संपाचा

पुरस्कार करीत होते व त्यावरच एंगल्सनें टीका केली. **राजकीय** सार्वत्रिक संपाच्या मार्गाशीं या टीकेचा काडीइतकाही संबंध नाहीं. दुसरी गोष्ट म्हणजे पार्लमेंटरी लढा हाच कामगारवर्गाच्या लढ्याचा मुख्य प्रकार आहे हें कुणी व कुठें सिद्ध करून दाखविलें आहे? पार्लमेंटरी लढा म्हणजे कामगारवर्गाच्या पार्लमेंटबाहेरील लढ्याची शाळाच होय, या पार्लमेंटबाहेरील लढ्याला मदत करणें हेंच पार्लमेंटरी लढ्याचें कार्य आहे, ही गोष्ट क्रांतिकारक चळवळीच्या इतिहासावरून स्पष्ट होत नाहीं का? भांडवलशाहीच्या अमदानींत कामगार-वर्गाच्या चळवळीचे मूलभूत प्रश्न जबरदस्तीच्या (फोर्स) मार्गानें, कामगार जनतेच्या प्रत्यक्ष लढ्याच्या मार्गानें, त्यांच्या सार्वत्रिक संपाच्या मार्गानें, त्यांच्या बंडाच्या मार्गानें सोडविले जातात, असेंच क्रांतिकारक चळवळीचा इतिहास सांगत नाहीं का? तिसरी गोष्ट म्हणजे, पार्लमेंटरी लढ्याच्या ऐवजीं राजकीय सार्वत्रिक संपाचा मार्ग स्वीकारावा असें कुणी सुचविलें आहे? राजकीय सार्वत्रिक संपाच्या पुरस्कर्त्यांनीं पार्लमेंटरी स्वरूपाच्या लढ्यांच्या ऐवजीं पार्लमेंटबाहेरील लढ्यांचे प्रकार अंमलांत आणण्याचा केव्हां व कुठें प्रयत्न केला? चौथी गोष्ट म्हणजे, राजकीय सार्वत्रिक संप ही कामगार-क्रांतीची तयारी करण्याची सर्वांत महत्वाची शाळा आहे व भांडवलशाहीच्या किल्ल्यावर हल्ला चढविण्याची वेळ येऊन ठेपली असतांना कामगारवर्गाच्या प्रचंड समुदायाला एकत्रित आणून चालना देण्याचें व संघटित करण्याचें तें एक आवश्यक साधन आहे, ही गोष्ट रशियांतील क्रांतीनें दाखवून दिली आहे ना? तर मग आर्थिक जीवनांत गोंधळ माजेल व ट्रेड युनियन्सच्या तिजोऱ्या रिकाम्या होतील असलीं उथळ वृत्तीच्या लोकांना शोभणारीं रडगाणीं गाण्याचें कारण काय? क्रांतिकारक लढ्याचा अनुभव संधिसाधूंच्या या सांप्रदायिक सिद्धांताच्याही चिंधड्या उडवून देत आहे, हें स्पष्ट नाहीं का?

वगैरे, वगैरे.

"क्रांतिकारक तत्त्वज्ञान म्हणजे सांप्रदायिक सिद्धांत नव्हे," "खऱ्याखुऱ्या बहुजनसमाजाच्या चळवळीशीं व खऱ्याखुऱ्या क्रांतिकारक चळवळीशीं त्याचा

जेव्हां निकट संबंध जोडण्यांत येतो तेव्हांच त्याला निश्चित स्वरूप प्राप्त होतें," असें लेनिननें म्हटलें आहे याचें कारण हेंच होय, (' **जहाल साम्यवाद—बाल्यावस्थेंतील रोग** '); कारण व्यवहाराला मदत करणें हेंच तत्त्वज्ञानाचें कार्य असतें, "व्यवहारांत जे प्रश्न उपस्थित होतात त्यांचें उत्तर देणें-हेंच तत्त्वज्ञानाचें कार्य आहे" (लेनिन, ' **जनतेच्या मित्रांचें स्वरूप कोणतें ?** '). व्यवहारांतील अनुभवाची कसोटी लावूनच तत्वज्ञानाच्या खरेपणाची पारख केली पाहिजे.

सेकंड इंटरनॅशनलला जोडलेल्या पक्षांच्या राजकीय घोषणा व राजकीय ठराव यांच्याविषयीं बोलावयाचें तर, 'युद्धाविरुद्ध युद्ध' या घोषणेच्या इतिहासाची आठवण केली म्हणजे पुरे; या पक्षांच्या राजकीय कृतींत किती कमालीचा लबाडपणा व गलिच्छपणा भरलेला आहे हें यावरून दिसून येईल, स्वतःच्या क्रांतिविरोधी कृत्यांवर पांघरूण घालण्यासाठींच हे पक्ष भपकेबाज क्रांतिकारक घोषणांचा व ठरावांचा उपयोग करीत असतात. बाझल् येथील कॉंग्रेसमध्यें सेकंड इंटरनॅशनलनें केलेल्या भपकेबाज निदर्शनाची आपणां सर्वांना आठवण आहेच; साम्राज्यवाद्यांनीं युद्ध सुरू करण्याचें साहस केल्यास त्यांना सशस्त्र बंडाच्या आगींत भाजून काढूं, अशी या कॉंग्रेसमध्यें सेकंड इंटरनॅशनलनें धमकी दिली व 'युद्धाविरुद्ध युद्ध' ही भयंकर घोषणा पुकारली. पण त्यानंतर कांहीं दिवसांनीं, म्हणजे युद्ध सुरू होण्याचा क्षण जवळ येऊन ठेपतांच, बाझल्चा ठराव दप्तरांत गुंडाळून ठेवण्यांत आला, व आपल्या भांडवलदारी मायभूमीचें वैभव वाढविण्यासाठीं एकमेकांची कत्तल करा अशी नवी घोषणा कामगारांना देण्यांत आली, ही गोष्ट कुणाला आठवत नाहीं? क्रांतिकारक घोषणा व ठराव जर कृतींत आणल्या नाहींत तर त्यांना कवडीइतकीसुद्धां किंमत नसते, हें स्पष्ट नाहीं का? याच्या उलट लेनिनवादाचें धोरण पहा. साम्राज्यशाही युद्धाचें स्वकीय युद्धांत रुपांतर करण्याचें लेनिनवादी धोरण आणि युद्धकाळांतील सेकंड इंटरनॅशनलचें दगलबाज धोरण यांची तुलना केल्यास संधिसाधु राजकीय पुढाऱ्यांचा कमालीचा नीचपणा समजून येईल व त्याचवेळी

पुरस्कार करीत होते व त्यावरच एंगल्सनें टीका केली. **राजकीय** सार्वत्रिक संपाच्या मार्गाशीं या टीकेचा काडीइतकाही संबंध नाहीं. दुसरी गोष्ट म्हणजे पार्लमेंटरी लढा हाच कामगारवर्गाच्या लढ्याचा मुख्य प्रकार आहे हें कुणी व कुठें सिद्ध करून दाखविलें आहे? पार्लमेंटरी लढा म्हणजे कामगारवर्गाच्या पार्लमेंटबाहेरील लढ्याची शाळाच होय, या पार्लमेंटबाहेरील लढ्याला मदत करणें हेंच पार्लमेंटरी लढ्याचें कार्य आहे, ही गोष्ट क्रांतिकारक चळवळीच्या इतिहासावरून स्पष्ट होत नाहीं का? भांडवलशाहीच्या अमदानींत कामगार-वर्गाच्या चळवळीचे मूलभूत प्रश्न जबरदस्तीच्या (फोर्स) मार्गानें, कामगार जनतेच्या प्रत्यक्ष लढ्याच्या मार्गानें, त्यांच्या सार्वत्रिक संपाच्या मार्गानें, त्यांच्या बंडाच्या मार्गानें सोडविले जातात, असेंच क्रांतिकारक चळवळीचा इतिहास सांगत नाहीं का? तिसरी गोष्ट म्हणजे, पार्लमेंटरी लढ्याच्या ऐवजीं राजकीय सार्वत्रिक संपाचा मार्ग स्वीकारावा असें कुणी सुचविलें आहे? राजकीय सार्वत्रिक संपाच्या पुरस्कर्त्यांनीं पार्लमेंटरी स्वरूपाच्या लढ्यांच्या ऐवजीं पार्लमेंटबाहेरील लढ्यांचे प्रकार अंमलांत आणण्याचा केव्हां व कुठें प्रयत्न केला? चौथी गोष्ट म्हणजे, राजकीय सार्वत्रिक संप ही कामगार-क्रांतीची तयारी करण्याची सर्वांत महत्वाची शाळा आहे व भांडवलशाहीच्या किल्ल्यावर हल्ला चढविण्याची वेळ येऊन ठेपली असतांना कामगारवर्गाच्या प्रचंड समुदायाला एकत्रित आणून चालना देण्याचें व संघटित करण्याचें तें एक आवश्यक साधन आहे, ही गोष्ट रशियांतील क्रांतीनें दाखवून दिली आहे ना? तर मग आर्थिक जीवनांत गोंधळ माजेल व ट्रेड युनियन्सच्या तिजोऱ्या रिकाम्या होतील असलीं उथळ वृत्तीच्या लोकांना शोभणारीं रडगाणीं गाण्याचें कारण काय? क्रांतिकारक लढ्याचा अनुभव संधिसाधूंच्या या सांप्रदायिक सिद्धांताच्याही चिंधड्या उडवून देत आहे, हें स्पष्ट नाहीं का?

वगैरे, वगैरे.

"क्रांतिकारक तत्त्वज्ञान म्हणजे सांप्रदायिक सिद्धांत नव्हे," "खऱ्याखुऱ्या बहुजनसमाजाच्या चळवळीशीं व खऱ्याखुऱ्या क्रांतिकारक चळवळीशीं त्याचा

जेव्हां निकट संबंध जोडण्यांत येतो तेव्हांच त्याला निश्चित स्वरूप प्राप्त होतें," असें लेनिननें म्हटलें आहे याचें कारण हेंच होय, (**'जहाल साम्यवाद—बाल्यावस्थेंतील रोग'**); कारण व्यवहाराला मदत करणें हेंच तत्त्वज्ञानाचें कार्य असतें, "व्यवहारांत जे प्रश्न उपस्थित होतात त्यांचें उत्तर देणें हेंच तत्त्वज्ञानाचें कार्य आहे" (लेनिन, **'जनतेच्या मित्रांचें स्वरूप कोणतें ?'**). व्यवहारांतील अनुभवाची कसोटी लावूनच तत्वज्ञानाच्या खरेपणाची पारख केली पाहिजे.

सेकंड इंटरनॅशनलला जोडलेल्या पक्षांच्या राजकीय घोषणा व राजकीय ठराव यांच्याविषयीं बोलावयाचें तर, 'युद्धाविरुद्ध युद्ध' या घोषणेच्या इतिहासाची आठवण केली म्हणजे पुरे; या पक्षांच्या राजकीय कृतींत किती कमालीचा लबाडपणा व गलिच्छपणा भरलेला आहे हें यावरून दिसून येईल, स्वतःच्या क्रांतिविरोधी कृत्यांवर पांघरूण घालण्यासाठींच हे पक्ष भपकेबाज क्रांतिकारक घोषणांचा व ठरावांचा उपयोग करीत असतात. बाझल् येथील कॉंग्रेसमध्यें सेकंड इंटरनॅशनलनें केलेल्या भपकेबाज निदर्शनाची आपणां सर्वांना आठवण आहेच; साम्राज्यवाद्यांनीं युद्ध सुरू करण्याचें साहस केल्यास त्यांना सशस्त्र बंडाच्या आगींत भाजून काढूं, अशी या कॉंग्रेसमध्यें सेकंड इंटरनॅशनलनें धमकी दिली व 'युद्धाविरुद्ध युद्ध' ही भयंकर घोषणा पुकारली. पण त्यानंतर कांहीं दिवसांनीं, म्हणजे युद्ध सुरू होण्याचा क्षण जवळ येऊन ठेपतांच, बाझल्चा ठराव दप्तरांत गुंडाळून ठेवण्यांत आला, व आपल्या भांडवलदारी मायभूमीचें वैभव वाढविण्यासाठीं एकमेकांची कत्तल करा अशी नवी घोषणा कामगारांना देण्यांत आली, ही गोष्ट कुणाला आठवत नाहीं? क्रांतिकारक घोषणा व ठराव जर कृतींत आणल्या नाहींत तर त्यांना कवडीइतकीसुद्धां किंमत नसते, हें स्पष्ट नाहीं का ? याच्या उलट लेनिनवादाचें धोरण पहा. साम्राज्यशाही युद्धाचें स्वकीय युद्धांत रूपांतर करण्याचें लेनिनवादी धोरण आणि युद्धकाळांतील सेकंड इंटरनॅशनलचें दगलबाज धोरण यांची तुलना केल्यास संधिसाधु राजकीय पुढाऱ्यांचा कमालीचा नीचपणा समजून येईल व त्याचवेळीं

लेनिनवादाच्या कार्यपद्धतीची भव्यता पूर्णपणें लक्षांत येईल. '**कामगारक्रांति व तत्त्वभ्रष्ट कौट्स्की**' या लेनिनच्या ग्रंथांतील एक उतारा येथें दिल्यावांचून मला रहावत नाहीं. सेकंट इंटरनॅशनलचा पुढारी कौट्स्की यानें निरनिराळ्या पक्षांची पारख त्यांच्या कृतीच्या आधारें न करतां त्यांच्या कागदी घोषणांच्या व ठरावांच्या आधारें करण्याचा संधिसाधु प्रयत्न केला व त्याबद्दल या उताऱ्यांत लेनिननें त्याच्यावर चांगलेच कोरडे ओढले आहेत.

> "एखादी घोषणा मांडली कीं तेवढ्यानेंच पक्षाचें स्वरूप भिन्न होतें अशी बतावणी करून कौट्स्की खास मध्यमवर्गाला साजेसें उथळपणाचें धोरण अंमलांत आणीत आहे. हा केवळ भ्रम आहे, हें भांडवलदारी लोकशाहीच्या समग्र इतिहासावरून दिसून येतें. भांडवलदारी लोकशाहीच्या पुरस्कर्त्यांनीं जनतेला फसविण्यासाठीं नाना प्रकारच्या घोषणा पुकारल्या व अजूनही ते पुकारीत आहेत. पण मुद्याची गोष्ट ही कीं त्यांचा प्रामाणिकपणा **कसोटीला** लावून पाहिला पाहिजे, त्यांच्या शब्दांचा **कृतीशीं** कितपत मेळ बसतो हें शोधलें पाहिजे, ध्येयवादी किंवा बाष्कळ **बडबडीवर** समाधान मानून घेतां कामा नये, **वर्गहिताच्या दृष्टीने** त्यांच्या शब्दांचा खराखुरा अर्थ काय हें नेमकें हुडकून काढलें पाहिजे."

सेकंड इंटरनॅशनलच्या पक्षांना आत्मटीकेची भीति वाटते. स्वतःच्या चुका लपवून ठेवण्याची त्यांना संवय असते. कठीण प्रश्नांची टाळाटाळ करण्याकडे त्यांची प्रवृत्ति असते. सर्व कांहीं ठीक आहे असा आव आणून स्वतःच्या वैगुण्यावर ते पांघरूण घालीत असतात, या त्यांच्या संवयीमुळें विचारशक्ति बोथट होते व स्वतःच्या चुकांपासून धडे घेऊन क्रांतिकारक शिक्षण मिळविण्याच्या कामीं पार्टीला अडथळा येतो. लेनिननें या संवयीची थट्टा केली आहे व तिच्यावर चांगलेच कोरडे ओढले आहेत. पण या विषयीं मी विशेष सांगण्याचें कारण नाहीं. '**जहाल साम्यवाद—बाल्यावस्थेंतील रोग**' या पुस्तकांत लेनिननें कामगार पक्षांच्या आत्मटीकेविषयीं पुढील उद्गार आढले आहेत :—

> "पार्टीला किती कळकळ आहे, स्वतःच्या वर्गाविषयीं व राबणाऱ्या जनतेविषयीं आपलीं कर्तव्यें **प्रत्यक्ष व्यवहारांत** ती कशी पार पाडते, हें ठरविण्याचा एक अत्यंत महत्वाचा व खात्रीलायक मार्ग म्हणजे त्या राजकीय पार्टीचा स्वतःच्या चुकांकडे पाहण्याचा दृष्टिकोण होय. चूक मोकळेपणानें कबूल करणें, तिचीं कारणें शोधुन काढणें, कोणत्या परिस्थितींत ती चूक झाली हें पहाणें, व ती कशी दुरुस्त करतां येईल याची पूर्ण चर्चा करणें,—हें गंभीरपणें कार्य करणाऱ्या पार्टीचें लक्षण आहे; याच पद्धतीनें तिनें आपल्या **वर्गाला** व त्यानंतर **जनतेला** शिक्षण दिलें पाहिजे."

कांहींजण म्हणतात कीं पार्टीनें स्वतःच्या चुका जाहीर करणें व आत्मटीका करणें हें तिच्या हिताच्या दृष्टीनें धोक्याचें असतें, कारण शत्रूकडून याचा कामगारपक्षाविरुद्ध उपयोग केला जाण्याचा संभव असतो. असल्या आक्षेपांत कांहींच राम नाहीं, ते साफ चुकीचे आहेत, असें लेनिनचें मत होतें. १९०४ सालीं—म्हणजे आपली पार्टी अजून लहान व कमजोर होती अशा वेळींसुद्धां—लेनिननें '**एक पाऊल पुढें, दोन पावले मागें**' या पुस्तकांत यासंबंधीं पुढील उद्‌गार काढले आहेत :—

> "आमच्यांतले वाद पाहून त्यांना (म्हणजे मार्क्सवाद्यांच्या विरोधकांना) आनंदाच्या उकळ्या फुटतात; माझ्या पुस्तकांतून आपल्या पार्टीच्या दोषांविषयीं व उणीवांविषयीं अलग अलग उतारे निवडून काढून स्वतःच्या उद्देशांसाठीं त्यांचा उपयोग करण्याची ते खटपट करतील यांत शंका नाहीं. पण लढयाच्या भट्टींत रशियांतील मार्क्सवादी इतके तावून सुलाखून कणखर बनले आहेत कीं असल्या कोंपरखळ्यांचा त्यांच्यावर किंचितही परिणाम होऊं शकणार नाहीं, त्यांची पर्वा न करतां ते आपलें आत्मटीकेचें कार्य चालूच ठेवतील व स्वतःच्या उणीवा निर्दयपणें जाहीर करतील. कामगारवर्गाची चळवळ जसजशी

वाढत जाईल तसतशा या सर्व उणीवा दूर होतील याची पूर्ण खात्री आहे व हें अपरिहार्यच आहे."

लेनिनवादाच्या कार्यपद्धतीचीं खास लक्षणें सर्वसाधारणपणें पाहतां हीं आहेत.

लेनिनच्या कार्यपद्धतींत जें वैशिष्ठ्य आढळून येतें तें मुख्यांशानें मार्क्सच्या शिकवणुकींतही होतें. स्वतः मार्क्सनेंच आपली पद्धति वस्तुतः "चिकित्सक व क्रांतिकारक" असल्याचें सांगितलें आहे. हाच चिकित्सक व क्रांतिकारक बाणा लेनिनच्या पद्धतींत अथपासून इतिपर्यंत प्रत्ययास येतो. परंतु लेनिननें मार्क्सच्या पद्धतीचें पुनरुज्जीवन करण्यापलीकडे कांहीं केलें नाहीं, असें मानणें मात्र चुकीचें होईल. खरी गोष्ट अशी आहे कीं लेनिननें मार्क्सच्या चिकित्सक व क्रांतिकारक पद्धतीचें—त्याच्या भौतिकवादात्मक गतिवादाचें—पुनरुज्जीवन तर केलेंच, पण त्याखेरीज त्यानें तिला विशष्ट परिस्थितीस अनुरूप असें स्पष्ट स्वरूप देऊन तिचा विकासही केला.

★

[ ३ ]

# तत्त्वविचार

या विषयावर बोलतांना मी तीन प्रश्नांची चर्चा करणार आहे:-- (१) कामगार चळवळीच्या दृष्टीनें तत्त्वविचाराचें महत्त्व ; (२) स्वयंस्फूर्तपणाच्या 'सिद्धांता'ची चिकित्सा ; (३) कामगार क्रांतीचा सिद्धांत.

(१) **तत्त्वविचाराचें महत्त्व**:--कांहींजणांचा असा समज आहे कीं लेनिन-वाद तत्त्वविचारापेक्षां (थिअरी) व्यवहाराला (प्रॅक्टिस) अधिक महत्व देतो, कारण मार्क्सवादाचे सिद्धांत कृतींत उतरविणें--'अमलांत' आणणें--हाच लेनिनवादाचा मुख्य मुद्दा आहे. लेनिनवादाला तत्त्वविचाराचें फारसें महत्व वाटत नाहीं, असा या लोकांचा आरोप आहे. तत्त्वविचाराचें व विशेषत: तत्त्वज्ञानाचें (फिलॉसफी) लेनिनला मुळींच महत्त्व वाटत नाहीं, अशी कुत्सित टीका प्लेखानोव मधूनमधून करीत असे, हें आपणांला ठाऊकच आहे. प्रत्यक्ष कार्य करण्यांत गुंतलेले आजकालचे कैक लेनिनवादीसुद्धां तत्त्वविचाराचें नांव घेतांच नाकें मुरडतात, हेंही आपणांला ठाऊक आहे; आजच्या परिस्थतींत त्यांच्यावर प्रत्यक्ष कार्याचा फारच प्रचंड बोजा येऊन पडला आहे व विशेषत: यामुळेंच त्यांची अशी वृत्ति बनली आहे. पण मला स्पष्टपणें जाहीर केलें पाहिजे कीं लेनिन व लेनिनवाद यांविषयींचें हें विक्षिप्त मत साफ चुकीचें आहे, वस्तुस्थितीशीं त्याचा काडीइतकाही संबंध नाहीं, प्रत्यक्ष कार्य करणाऱ्या लोकांची तत्त्वविचाराकडे दुर्लक्ष करण्याची प्रवृत्ति लेनिनवादाच्या बाण्याशीं पूर्णपणें विसंगत आहे व या प्रवृत्तीमुळें आपल्या कार्याला फारच मोठा धोका पोंचणार आहे.

तात्विक सिद्धांत (थिअरी) म्हणजे सर्व देशांतील कामगार-चळवळीच्या अनुभवाचें सारसर्वस्व. अर्थात् जर तात्त्विक सिद्धांताची क्रांतिकारक व्यव-

हाराशीं सांगड घातली नाहीं तर तें तत्त्वज्ञान निरर्थकच ठरेल. त्याचप्रमाणें जर व्यवहाराला क्रांतिकारक तत्त्वज्ञानाच्या प्रकाशाची जोड दिली नाहीं तर तो व्यवहार अंधारांत चांचपडण्यासारखा होईल. परंतु क्रांतिकारक व्यवहाराशीं अविच्छेद्य संबंध जोडून तात्त्विक सिद्धांताची उभारणी केल्यास हें तत्त्वज्ञान कामगार-चळवळींतील प्रचंड शक्ति बनूं शकेल; कारण त्याच्या-योगें—आणि केवळ त्याच्यायोगेंच—कामगारचळवळींत आत्मविश्वास निर्माण होऊं शकेल, योग्य दिशेला आपलें सुकाणूं फिरविण्याची शक्ति तिला प्राप्त होईल, आणि भोंवतालच्या विविध घटनांच्या सूत्रबद्धतेचें तिला आकलन होईल. निरनिराळे वर्ग आज कोणत्या दिशेनें व कसे हालचाल करीत आहेत, एवढेंच नव्हे तर ते नजीकच्या भविष्यकाळांत कोणत्या दिशेनें व कसे हालचाल करणार, हें समजून घेण्याच्या कामीं व्यवहाराला तत्त्वज्ञान—व केवळ तत्त्व-ज्ञानच—मदत करूं शकेल. "**क्रांतिकारक तत्त्वज्ञानाच्या अभावीं क्रांतिकारक चळवळ शक्य नाहीं**", हा सुप्रसिद्ध सिद्धांत प्रत्यक्ष लेनिननेंच जाहीर केला व त्यानें कैक वेळां त्याचा पुनरुच्चार केला.

तत्त्वविचाराचें महत्त्व केवढें आहे, विशेषतः आपल्यासारख्या पार्टीच्या दृष्टीनें तत्त्वविचाराला केवढें प्रचंड महत्त्व आहे, याची दुसऱ्या कुणाहीपेक्षां लेनिनला जास्त जाणीव होती. आंतरराष्ट्रीय कामगारवर्गाचें अग्रदल म्हणून लढण्याची जबाबदारी आपल्या पार्टीवर येऊन पडली असल्यामुळें, व तिच्या-पुढील आजची अंतर्गत व आंतरराष्ट्रीय परिस्थिति गुंतागुंतीची असल्यामुळें, तिच्या दृष्टीनें तत्त्वविचाराचें महत्त्व फारच आहे. आपल्या पार्टीची ही खास भूमिका १९०२ सालींच लेनिनच्या लक्षांत आली होती, व म्हणून त्यावेळींसुद्धां त्याला पुढील इषारा देणें आवश्यक वाटलें :—

> "**...जी पार्टी उच्चतम तत्त्वज्ञानाच्या आधारें आपल्या कार्याची दिशा ठरविते तीच पार्टी अग्रदलाची भूमिका पार पाडण्यास लायक होऊं शकते.**"

आपल्या पार्टीच्या भूमिकेविषयीं लेनिननें केलेलें भाकित आज खरें ठरलें आहे. अर्थात् लेनिनच्या या सिद्धांताला आज विशेष महत्व व सामर्थ्य प्राप्त झालें आहे, हें मुद्दाम सिद्ध करण्याची कांहींच आवश्यकता नाहीं.

तत्त्वविचाराला लेनिन केवढें महत्त्व देत असे याचें सर्वांत ठळकपणें नजरेंत भरण्यासारखें प्रत्यंतर म्हणजे, एंगल्सच्या काळापासून लेनिनच्या काळापर्यंत विज्ञानाच्या क्षेत्रांत जे अत्यंत महत्वाचे शोध लागले त्यांचीं भौतिकवादी तत्त्वज्ञानास अनुसरून उपपत्ति लावण्याचें फारच गंभीर कार्य एकटचा लेनिननेंच हातीं घेतलें, दुसऱ्या कुणीही घेतलें नाहीं; तसेंच मार्क्सवाद्यांमध्यें प्रचलित असलेल्या भौतिकवादविरोधी प्रवृत्तींची सांगोपांग चिकित्सा करण्याचें कार्यही एकटचा लेनिननेंच हातीं घेतलें, दुसऱ्या कुणींही घेतलें नाहीं. "कोणताही महत्त्वाचा नवा शोध लागला कीं त्याच्या आधारें भौतिकवादाला नवें स्वरूप धारण करणें प्राप्त होतें," असें एंगल्सनें म्हटलें आहे. लेनिनच्या काळांत हें कार्य केवळ त्यानेंच "**भौतिकवाद व इंद्रियानुभव-परीक्षणवाद**" या ग्रंथांत पार पाडलें, दुसऱ्या कुणीही तें केलें नाहीं, हें सुप्रसिद्धच आहे. लेनिनला तत्त्वज्ञानाचें महत्त्व वाटत नाहीं अशी कुत्सित टीका करण्याची प्लेखानोवला फार खोड होती; परंतु असलें कार्य हातीं घेण्याचा मनःपूर्वक प्रयत्न करण्याची त्या प्लेखानोवला छातीच झाली नाहीं.

(२) **स्वयंस्फूर्तपणाच्या 'सिद्धांता'ची चिकित्सा, चळवळींत अग्रदलाची भूमिका** :—स्वयंस्फूर्तपणाचा सिद्धांत हा संधिसाधुवाद्यांचा सिद्धांत आहे. कामगार चळवळींच्या स्वयंस्फूर्तपणाचें स्तोम माजविणें हें या सिद्धांताचें स्वरूप आहे. कामगारवर्गाच्या अग्रदलाकडे—कामगारवर्गाच्या पार्टीकडे—पुढारीपणाची भूमिका असते, ही गोष्ट हा सिद्धांत अमान्यच करतो.

स्वयंस्फूर्तपणाचें स्तोम माजविण्याचा सिद्धांत कामगार चळवळीच्या क्रांतिकारक स्वरूपाशीं अगदीं विसंगत आहे. भांडवलशाहीचा पाया उखडून टाकण्याचा मार्ग कामगार-चळवळीनें स्वीकारतां कामा नये, असें हा सिद्धांत सांगतो. फक्त 'व्यवहार्य' मागण्याच—भांडवलशाहीला 'मान्य' होण्या-

सारख्या मागण्याच—कामगार चळवळीनें मांडाव्या, दुसरा कोणताही मार्ग पत्करूं नये, असें या सिद्धांताचें म्हणणें आहे. ' किमान प्रतिकाराच्या मार्गा 'चाच अवलंब करा, असें हा सिद्धांत बजावतो. स्वयंस्फूर्तपणाचा सिद्धांत म्हणजे ट्रेड-युनियन-वादाची विचारसरणी होय.

स्वयंस्फूर्त चळवळीला तात्त्विक जाणिवेची व पद्धतशीर संघटनेची जोड देण्यास हा स्वयंस्फूर्तपणाचें स्तोम माजविणारा सिद्धांत निकरानें विरोध करतो. कामगारवर्गाच्या अग्रभागीं पार्टी असावी व तिच्या पाठोपाठ त्यानें आगेकूच करावें, पार्टीनें कामगार बहुजनसमाजांत वर्गजागृति निर्माण करून त्याला वरच्या दर्जास आणावें, पार्टीनें चळवळीचें नेतृत्व करावें,—या सर्व गोष्टींना या सिद्धांताचा विरोध आहे. चळवळ आपोआप जिकडे वाहात जाईल तिकडे वाहूं द्यावी, चळवळींतील वर्गजागृत लोकांनीं याला अडथळा करतां कामा नये, असें हा सिद्धांत सांगतो. पार्टीनें स्वयंस्फूर्त चळवळीकडे नजर रोखावी व तिचा मागोसा घेत जावें, दुसरें कांहीं करूं नये, असा या सिद्धांताचा अर्थ आहे. चळवळींतील जागृत विभागाच्या भूमिकेला मुळींच महत्त्व न देणें हें या स्वयंस्फूर्तपणाच्या सिद्धांताचें सार आहे. ही '**पुच्छवादा**'ची विचारसरणी आहे. **सर्व प्रकारच्या** संधिसाधुवादाचा हा तात्त्विक पाया आहे.

रशियांतील पहिल्या क्रांतीच्या (१९०५ च्या क्रांतीच्या) अगोदरच हा स्वयंस्फूर्तपणाचा सिद्धांत उदयास आला. या सिद्धांताच्या पुरस्कर्त्यांना ' आर्थिकवादी ' म्हणत असत. या सिद्धांतास अनुसरून त्यांनीं असें जाहीर केलें कीं रशियामध्यें कामगारांचा स्वतंत्र पक्ष स्थापन करण्याची कांहींच आवश्यकता नाहीं; झारशाही उलथून पाडण्यासाठीं कामगारवर्गानें चालविलेल्या क्रांतिकारक लढ्याला त्यांनीं विरोध केला; कामगार चळवळींत निर्भेळ ट्रेड-युनियनवादी धोरणाचाच त्यांनीं प्रचार केला, आणि एकंदरीनें त्यांनी कामगार चळवळीला उदारमतवादी भांडवलदारांची बटीक बनविलें.

जुन्या '**इस्क्रा**' पत्रानें चालविलेला लढा व '**काय केलें पाहिजे**' या लेनिनच्या पुस्तकांत 'पुच्छवादा'च्या सिद्धांतावर करण्यांत आलेली मार्मिक टीका,

यामुळें ‘आर्थिकवाद’ तर जमीनदोस्त झालाच, पण त्याखेरीज रशियन कामगारवर्गाच्या खऱ्याखुऱ्या क्रांतिकारक चळवळीचा तात्त्विक पायाही रचला गेला.

हा लढा जर केला नसता तर रशियामध्यें कामगारांची स्वतंत्र पार्टी अस्तित्वात आणण्याची व तिच्या हातून क्रांतींत पुढारीपणाची भूमिका पार पडण्याची कल्पनासुद्धां मनांत आणणें अगदीं निरर्थक ठरलें असतें.

स्वयंस्फूर्तपणाचें स्तोम माजविण्याचा सिद्धांत केवळ रशियांतच उदयास आला असें मुळींच नाहीं. सेकंड इंटरनॅशनलच्या एकूणएक पार्ट्यांत तो फारच मोठ्या प्रमाणांमध्यें——थोड्याशा निराळ्या स्वरूपांत कां होईना——बोकळला आहे. उदाहरणार्थ ‘उत्पादनशक्तींचा सिद्धांत’ या नांवानें ओळखला जाणारा सिद्धांत पहा. सेकंड इंटरनॅशनलच्या पुढाऱ्यांनीं या सिद्धांताला ग्राम्य स्वरूप देऊन टाकलें आहे. प्रत्येक गोष्टीचें समर्थन करावयाचें, प्रत्येकजणाला संतुष्ट करावयाचें, घडलेल्या गोष्टी नमूद करावयाच्या व त्यांचा खुलासा करावयाचा, आणि तें सुद्धां केव्हां——तर प्रत्येक माणसाला त्यांचा अगदीं वीट आल्यानंतर;——हेंच या सिद्धांताचें कार्य ! भौतिकवादी तत्त्वज्ञानानें जगाचें विवरण करण्यांतच संतोष मानून चालणार नाहीं, त्यानें जगांत परिवर्तनही घडवून आणलें पाहिजे. पण कौट्स्की कंपूला याची कांहींच पर्वा नाहीं, मार्क्सच्या सूत्रांतील पूर्वार्धावरच समाधान मानणें त्याला सोईचें वाटतें. या ‘सिद्धांता’च्या अंमलबजावणीची अगणित उदाहरणें आहेत, त्यांपैकीं एक इथें देतों. साम्राज्यवाद्यांनीं युद्ध सुरू केल्यास आम्हीं ‘युद्धाविरुद्ध युद्ध’ पुकारूं अशी सेकंड इंटरनॅशनलच्या पार्ट्यांनीं साम्राज्यवादी महायुद्धापूर्वीं धमकी दिली होती, असें ऐकिवांत आहे. पण युद्ध सुरू होण्याचा क्षण येऊन ठेपतांच या पार्ट्यांनीं ‘युद्धाविरुद्ध युद्ध’ ही घोषणा गुंडाळून ठेवली व अगदीं उलट घोषणा—— ‘साम्राज्यवादी पितृभूमीसाठीं युद्ध’ ही घोषणा——अमलांत आणली, असें सांगतात. अशा रीतीनें घोषणा बदलल्यामुळें करोडों कामगार मृत्यूच्या खाईत लोटले गेले, अशी बातमी आहे. पण याबद्दल कोणतीं तरी माणसें

दोषी आहेत असें समजणें मात्र चुकीचें होईल ! कुणीतरी कामगारवर्गाशीं बेइमान झाला किंवा कामगारवर्गाचा विश्वासघात केला असें समजणें गैर होईल ! छे, छे, असला कांहीं प्रकार मुळींच झाला नाहीं ! जें व्हायला पाहिजे होतें तेंच झालें. कारण पहिली गोष्ट म्हणजे, इंटरनॅशनल हें ' शांततेचें साधन ' आहे, युद्धाचें नव्हे. दुसरी गोष्ट म्हणजे, त्यावेळची ' उत्पादनशक्तींची विकासावस्था ' लक्षांत घेतां दुसरी कोणतीही गोष्ट करणें शक्यच नव्हतें. ' दोष ' द्यावयाचा तर तो ' उत्पादनशक्तीं 'नाच द्या ! मि. कौट्स्कीचा ' उत्पादन शक्तींचा सिद्धांत ' या घटनेवर जो प्रकाश पाडतो तो हाच. आणि हा ' सिद्धांत ' जो मान्य करीत नाहीं तो मार्क्सवादीच नव्हे ! कुणी विचारतील :––पार्टीची भूमिका कोणती ? चळवळींत पार्टीनें कोणतें कार्य पार पाडावयाचें ? पण यावर उत्तर असें कीं, ' उत्पादनशक्तींच्या विकासावस्थे 'वरच ज्याअर्थीं सर्व कांहीं अवलंबून आहे, त्याअर्थीं पार्टी तरी त्याविरुद्ध काय करूं शकणार ?

मार्क्सवादाच्या विपर्यासाचे असलेच आणखी किती तरी नमुने दाखवून देतां येतील.

संधिसाधुवादाचा नंगेपणा झांकून ठेवण्यासाठीं मुद्दाम बनविलेलें हें नकली मार्क्सवादाचें सोंग म्हणजे पहिल्या (१९०५ च्या) रशियन क्रांतीच्या अगोदरच लेनिननें ज्याच्याविरुद्ध लढा केला होता त्या ' पुच्छवादा 'च्या सिद्धांताचीच युरोपियन आवृत्ति होय, दुसरें कांहीं नाहीं, हें मुद्दाम सिद्ध करण्याची कांहींच जरूरी नाहीं.

पश्चिम यूरपमध्यें खऱ्याखुऱ्या क्रांतिकारक पार्ट्या जर अस्तित्वांत आणावयाच्या असतील तर हा तात्त्विक विपर्यास अगोदर जमीनदोस्त केला पाहिजे, हें मुद्दाम सिद्ध करण्याची कांहींच आवश्यकता नाहीं.

(३) **कामगार-क्रांतीचा सिद्धांत** :––कामगार-क्रांतीचा लेनिनवादी सिद्धांत पुढील तीन मूलभूत प्रमेयांवर आधारलेला आहे.

**पहिलें प्रमेय**––पुढारलेल्या भांडवलदारी देशांत बँक-भांडवलाचें वर्चस्व असतें; कर्जरोखे व शेअर विकणें ही बँक-भांडवलाची मुख्य कार्यपद्धति असते;

कच्च्या मालाचीं उत्पत्तिस्थानें असलेल्या प्रदेशांत भांडवल निर्यात करण्यांत येतें व हा साम्राज्यशाहीचा एक आधारस्तंभ असतो; मूठभर बँक-भांडवल-दारांच्या गटाच्या हातीं सर्व सत्ता असते व तिचें मूळ बँक-भांडवलाच्या वर्चस्वांत असतें;—या सर्व गोष्टींवरून मक्तेदारी भांडवलशाहीचा किळसवाणा परोपजीवीपणा उघड होतो, भांडवलदारी ट्रस्ट्स् व सिंडिकेट्स्चें जोखड शतपटीनें असह्य होऊन बसतें, भांडवलशाहीचा पाया उखडून काढण्यासाठीं बंड सुरू करण्यास कामगारवर्गाला चालना मिळते, आणि आपल्या उद्धाराचा एकमेव मार्ग म्हणून जनता कामगार-क्रांतीचा अवलंब करते. (लेनिनचें '**साम्राज्यशाही—भांडवलशाहीची उच्चतम अवस्था**' हें पुस्तक पहा.)

यावरून पहिला निष्कर्ष निघतो तो असा :—भांडवलदारी देशांत क्रांति-कारक अरिष्ट अधिक तीव्र होतें व साम्राज्यशाहीच्या 'मायदेशां'त अंतर्गत कामगार-आघाडीवर स्फोट होण्याची पूर्वतयारी पूर्ण होऊं लागते.

**दुसरें प्रमेय**—वसाहतींत व परतंत्र देशांत भांडवलाची निर्यात वाढत जाते; 'वर्चस्वक्षेत्रां'चा व अंकित वसाहतींचा विस्तार वाढत जाऊन शेवटीं सारें जग व्यापण्यांत येतें; भांडवलशाही नवें रूप धारण करते, ती **जागतिक संघटना** बनते व मूठभर 'पुढारलेल्या' देशांनीं जगांतील जनतेच्या प्रचंड बहुसंख्येला बँक-भांडवलाच्या योगें गुलाम बनविणें व तिच्यावर वसाहती राजवटीचा जुलूम करणें हीं तिचीं लक्षणें असतात :—या सर्व गोष्टींमुळें दोन परिणाम घडून आले आहेत :—एकतर निरनिराळे राष्ट्रीय टापू व निर-निराळ्या राष्ट्रांच्या अर्थव्यवस्था एकमेकांशीं निगडित झाल्या व जागतिक अर्थव्यवस्थेच्या एकाच सांखळीचे दुवे बनल्या; आणि दुसरें म्हणजे जगांतील एकंदर जनतेचे दोन तट पडले : एकीकडे प्रचंड वसाहतींची व परतंत्र देशांची पिळणूक व गांजणूक करणारे मूठभर 'पुढारलेले' भांडवलदारी देश, आणि दुसरीकडे साम्राज्यशाहीच्या जोखडांतून मुक्त होण्यासाठीं लढणें ज्यांना भाग पडतें असे बहुसंख्य वसाहत देश व परतंत्र देश. (लेनिनचें '**साम्राज्यशाही**' हें पुस्तक पहा.)

यावरून दुसरा निष्कर्ष निघतो तो असा :—वसाहतदेशांत क्रांतिकारक अरिष्ट अधिक तीव्र होतें व बाह्य आघाडीवर—वसाहतींच्या आघाडीवर—बंडाचा भडका उठण्याची पूर्वतयारी पूर्ण होऊं लागते.

**तिसरें प्रमेय**—'वर्चस्वक्षेत्रां'चा व वसाहतींचा मक्तेदारी ताबा मिळविण्यांत येतो; निरनिराळ्या भांडवलदारी देशांचा विकास विषम प्रमाणांत होत असतो, व त्यामुळें ज्यांनीं अगोदरच निरनिराळे प्रदेश बळकावले आहेत असे देश व आपणांलाही 'वांटा' मिळाला पाहिजे अशी मागणी करणारे देश यांच्यांत जगाच्या फेरवांटणीसाठीं बेफाम झगडा सुरू होतो; 'समतोलपणां'त बिघाड झालेला दुरुस्त करण्याचा एकमेव मार्ग साम्राज्यशाही युद्धें हाच असतो; —या सर्व गोष्टींमुळें तिसऱ्या आघाडीवरील—म्हणजे भांडवलदारांच्या परस्परसंबंधांच्या क्षेत्रांतील—परिस्थिति जास्त गंभीर होते, त्यायोगें साम्राज्यशाही कमजोर होते व तिच्याविरुद्ध पहिल्या दोन आघाड्यांची—म्हणजे क्रांतिकारक कामगारवर्गाची आघाडी व वसाहतींच्या दास्यविमोचनाची आघाडी या दोहोंची—एकजूट घडवून आणणें सोपें होतें. (**'साम्राज्यशाही'** हें पुस्तक पहा.)

यावरून तिसरा निष्कर्ष निघतो तो असा:—साम्राज्यशाहीच्या अमदानींत युद्धें टाळतांच येत नाहींत, व यूरपमधील कामगार क्रांति आणि पौर्वात्य देशांतील वसाहतींची क्रांति यांची युति होऊन साम्राज्यशाहीच्या जागतिक आघाडीविरुद्ध क्रांतीची संयुक्त जागतिक आघाडी अस्तित्वांत येणें अपरिहार्यच आहे.

या सर्व निष्कर्षांचें सार लेनिननें पुढील सर्वसामान्य सूत्रांत मांडलें :—

> **"साम्राज्यशाही म्हणजे समाजसत्तावादी क्रांतीच्या आसन्नतेचा काळ होय."**

कामगार क्रांति, क्रांतीचें स्वरूप, तिची व्याप्ति, तिची तीव्रता, तिचा सर्वसाधारण आराखडा, यांविषयींच्या प्रश्नाकडे पाहण्याची पद्धतच यामुळें बदलून जाते.

पूर्वी कामगार-क्रांतीच्या परिस्थितीचें परीक्षण करतांना बहुधा प्रत्येक देशाच्या आर्थिक परिस्थितीचा अलग अलगपणें विचार करण्यांत येत असे. आतां सर्व किंवा बहुसंख्य देशांच्या आर्थिक परिस्थितीच्या दृष्टीनें--जागतिक अर्थव्यवस्थेच्या परिस्थितीच्या दृष्टीनें--या प्रश्नाचें परीक्षण करणें जरूर झालें आहे. याचें कारण असें कीं एकेक अलग देश आतां स्वयंपूर्ण राहिलेला नाहीं, कोणत्याही देशाची अर्थव्यवस्था आतां स्वयंपूर्ण राहिलेली नाहीं, जागतिक अर्थव्यवस्थेच्या एकाच सांखळीचे ते दुव्वे बनले आहेत; कारण जुन्या 'सुसंस्कृत' भांडवलशाहीचें साम्राज्यशाहींत रूपांतर झालें आहे व साम्राज्यशाही ही एक जागतिक संघटना असून मूठभर 'पुढारलेल्या' देशांनीं जगांतील जनतेच्या प्रचंड बहुसंख्येला बँक-भांडवलाच्या योगें गुलाम बनविणें व तिच्यावर वसाहती राजवटीचा जुलूम लादणें हीं तिचीं लक्षणें आहेत.

पूर्वी कामगारक्रांतीसाठीं प्रत्येक अलग अलग देशांत--अधिक कांटेकोरपणें बोलावयाचें म्हणजे कोणत्यातरी विशेष विकसित झालेल्या देशांत--अनुकूल वास्तविक परिस्थिति अस्तित्वांत आहे कीं नाहीं याचाच विचार करण्याचा प्रघात होता. पण आतां एवढाच विचार करून भागण्यासारखें नाहीं. जागतिक साम्राज्यशाही अर्थव्यवस्था ही एक अखंड (इंटीग्रल) जागतिक संघटना आहे हें लक्षांत घेणें व क्रांतीसाठीं या जागतिक अर्थव्यवस्थेंत अनुकूल वास्तविक परिस्थिति आहे कीं नाहीं याचा विचार करणें आतां आपणांला आवश्यक झालें आहे. एकंदरीनें पहातां या जागतिक अर्थव्यवस्थेंतील परिस्थिति क्रांती-साठीं परिपक्व झाली असल्यास--अधिक बरोबर शब्दांत सांगावयाचें म्हणजे, ती परिपक्व झाली **असल्यामुळें**--जरी तिच्यांतील कांहीं देश औद्योगिकदृष्टया पुरेसे विकसित झालेले नसतील तरी त्यायोगें क्रांतीच्या मार्गांत दुर्लघ्य अडथळा मुळींच उत्पन्न होऊं शकणार नाहीं.

पूर्वी या ना त्या विकसित देशांतील कामगार-क्रांतीचा विचार करतांना ती विभक्त व स्वयंपूर्ण आहे असें मानण्यांत येत असे, तिला त्या त्या देशांतील भांडवलाच्या विभक्त आघाडीशीं सामना द्यावयाचा आहे असें मानण्यांत

येत असे. पण आतां एवढेंच म्हणून भागण्यासारखें नाहीं. आतां आपणांला जागतिक कामगार-क्रांतीविषयीं बोललें पाहिजे; याचें कारण असें कीं निर-निराळ्या देशांतील भांडवलाच्या आघाड्या आतां एकमेकींशीं निगडित झाल्या आहेत व साम्राज्यशाहीच्या जागतिक आघाडीच्या एकाच सांखळींतील दुव्वे बनल्या आहेत, व साम्राज्यशाहीच्या या जागतिक आघाडीशीं सामना द्यावयाचा तर सर्व देशांतील क्रांतिकारक चळवळींची संयुक्त आघाडी अस्तित्वांत आणणें क्रमप्राप्तच आहे.

पूर्वी एकाद्या विशिष्ट देशाच्या अंतर्गत विकासांतूनच कामगार-क्रांतीचा उदय होईल असें मानण्यांत येत असे. पण आतां एवढेंच म्हणून भागण्यासारखें नाहीं. मुख्यतः साम्राज्यशाहीच्या जागतिक संघटनेंतील परस्परविरोधांच्या विकासांतून कामगार-क्रांति उदयास येते, साम्राज्यशाहीच्या जागतिक आघाडीच्या सांखळीचा एक दुव्वा या ना त्या देशांत तुटून पडल्यामुळें कामगार-क्रांति घडून येते, असेंच आपणांला आतां समजलें पाहिजे.

क्रांतीची सुरवात कुठे होईल? भांडवलाच्या तटबंदींत कुठें—कोणत्या देशांत—पहिल्यांदा खिंडार पाडतां येईल?

या प्रश्नाला पूर्वी बहुधा असें उत्तर देण्यांत येत असे कीं ज्या देशांत उद्योग-धंद्यांचा विकास जास्त प्रमाणांत झाला आहे, कामगारवर्ग जनतेचा बहुसंख्य विभाग बनला आहे, संस्कृतीचें प्रमाण अधिक आहे, लोकशाही जास्त आहे, अशा देशांतच क्रांतीची सुरवात होईल.

पण क्रांतीचा लेनिनवादी सिद्धांत यावर आक्षेप घेतो व असें सांगतो कीं, **उद्योगधंद्यांचा अधिक विकास इत्यादि परिस्थिति जेथें असेल तेथेंच** क्रांतीची सुरवात होईल हें खरें नाहीं. साम्राज्यशाहीची सांखळी जेथें सर्वांत कमजोर असेल तेथेंच भांडवलाच्या तटबंदींत खिंडार पाडतां येईल, कारण जागतिक साम्राज्यशाहीच्या सांखळीचा सर्वांत कमजोर दुव्वा तोडूनच कामगार-क्रांति घडून येत असते. क्रांतीची सुरवात करणारा देश, भांडवलाच्या तटबंदींत खिंडार पाडणारा देश, भांडवलदारी विकासाच्या बाबतींत इतर देशांच्या

मानानें—पुढारलेल्या, पण भांडवलशाहीच्या चौकटींतच अडकून देशाच्या मानानें—मागासलेला असेल हें संभवनीय आहे.

१९१७ सालीं साम्राज्यशाहीच्या जागतिक आघाडीची सांखळी इतर देशांपेक्षां रशियांत जास्त कमजोर ठरली. तेथेंच ही सांखळी तुटली व कामगार-क्रांतीला पुढें घुसण्यास वाव मिळाला. याचें कारण काय ? याचें कारण हेंच कीं रशियामध्यें एक प्रचंड लोकक्रांति विकसित होत होती, तिच्या अग्रभागीं क्रांतिकारक कामगारवर्ग कूच करीत होता, व जमीनदारांकडून पिळल्या व गांजल्या जाणाऱ्या प्रचंड शेतकरीवर्गासारखा महत्वाचा दोस्त या कामगार-वर्गाला लाभला होता, तसेंच झारशाहीसारखा साम्राज्यशाहीचा अत्यंत रौद्र प्रतिनिधि तेथील क्रांतीचा विरोध करण्यास उभा होता, या झारशाहीला नैतिक प्रतिष्ठेचें यत्किंचितही पाठबळ नव्हतें, एकजात सारी जनता तिचा द्वेष करीत होती व तें अगदीं योग्यच होतें. भांडवलदारी दृष्टीनें रशिया देश फ्रान्स-जर्मनीपेक्षां किंवा इंग्लंड-अमेरिकेपेक्षां जरी कमी विकास पावलेला होता, तरी तेथेंच जागतिक साम्राज्यशाहीची सांखळी जास्त कमजोर ठरली.

नजीकच्या भविष्यकाळांत ही सांखळी कुठें तुटेल ? अर्थात् जेथें ती सर्वांत कमजोर आहे तेथेंच. उदाहरणार्थ हिंदुस्थानांत ही सांखळी तुटेल हें अशक्य म्हणतां येत नाहीं. कारण काय ? कारण हेंच कीं हिंदुस्थानांत नवोदित लढाऊ व क्रांतिकारक कामगारवर्ग अस्तित्वांत आहे व राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या चळ-वळीसारखा महत्वाचा दोस्त या कामगार वर्गाला लाभला आहे. हा दोस्त सामर्थ्यवान व महत्वाचा आहे यांत मुळींच शंका नाहीं. तसेंच परकीय साम्राज्य-शाहीसारखा अत्यंत प्रख्यात शत्रु तेथील क्रांतीचा विरोध करण्यास उभा आहे, त्याला यत्किंचितही नैतिक पत नाहीं, हिंदुस्थानांतील सारी गांजली व पिळली जाणारी जनता त्याचा द्वेष करते व तें अगदीं योग्यच आहे.

ही सांखळी जर्मनींत तुटेल हेंदेखील अगदीं शक्य आहे. कारण काय ? कारण हेंच कीं हिंदुस्थानसारख्या देशांत ज्या परिस्थितीचे परिणाम प्रत्ययास येत आहेत त्याच परिस्थितीचे परिणाम जर्मनींतसुद्धां प्रत्ययास येऊं लागले

आहेत; मात्र हिंदुस्थान व जर्मनी यांच्या विकासावस्थेंत फारच मोठी तफावत आहे व तिचा ठसा जर्मनींतील क्रांतीच्या प्रगतीवर व निष्पत्तीवर उमटणें अपरिहार्यच आहे.

याच कारणास्तव लेनिननें पुढील उद्‌गार काढले आहेत :—

> "पश्चिम यूरोपमधील भांडवलदारी देश समाजसत्तावादाच्या रोंखानें आपला विकास करण्याचें कार्य कोणत्या रीतीनें पार पाडीत आहेत? क्रमशः व सम गतीनें समाजसत्तावादाचा 'परि-पोष' करून नव्हे, तर कांहीं देशांनीं इतर देशांची पिळणूक करण्याच्या मार्गानें, साम्राज्यशाही युद्धांत प्रथम पराभूत झालेल्या देशाची व साऱ्या पौर्वात्य देशांची पिळवणूक करण्याच्या मार्गानें. उलटपक्षीं पहिल्या साम्राज्यशाही युद्धाचाच नेमका असा परिणाम घडून आला आहे कीं पौर्वात्य दुनिया क्रांतिकारक चळवळीच्या आखाड्यांत कायमची खेंचली गेली आहे, जागतिक क्रांतिकारक चळवळीच्या प्रचंड भोंवऱ्यांत ती ओढली गेली आहे."

थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे साम्राज्यशाहीच्या आघाडीची सांखळी जेथील दुव्वे कमजोर असतील तेथेंच तुटून पडेल अशी सामान्यतः अपेक्षा केली पाहिजे. जेथें भांडवलशाहीचा अधिक विकास झालेला असेल, कामगारांचें शेंकडा प्रमाण अमुक इतकें असेल व शेतकऱ्यांचें शेंकडा प्रमाण अमुक इतकें असेल, तेथेंच ती तुटून पडेल असें तरी निदान मुळींच म्हणतां येत नाहीं.

म्हणूनच कामगार-क्रांतीच्या प्रश्नाचा निर्णय घेतांना एकाद्या देशाच्या एकंदर लोकसंख्येंत कामगारांचें शेंकडा प्रमाण किती आहे असल्या गोष्टीला फाजील महत्त्व देण्याची कांहींच जरूरी उरत नाहीं. सेकंड इंटरनॅशनलच्या पंडितब्रुवांनीं असल्या आंकडेबाजीचें स्तोम माजविण्यांत भलताच उत्साह दाखविला आहे. साम्राज्यशाही म्हणजे काय हें त्यांना मुळीं उमजलेलेंच नाहीं. क्रांतीची तर त्यांना प्लेगाप्रमाणें भीति वाटते.

आतां पुढील मुद्दा घेऊं. सेकंड इंटरनॅशनलच्या बहाद्दर पुढाऱ्यांनीं असा सिद्धांत मांडला (व अजूनही ते मांडत आहेत) कीं भांडवलदारी-लोकसत्तावादी क्रांति आणि कामगार-क्रांति या दोन क्रांत्यांच्यां दरम्यान दीर्घ कालावधीची अफाट दरी आ वासून उभी असते, निदान या दोन क्रांत्यांच्या दरम्यान एक प्रचंड 'चीनची भिंत' खडी असते, त्यामुळें या दोन क्रांत्या एकमेकींपासून अगदीं अलग व तुटक असतात, या दोन क्रांत्यांच्या दरम्यानच्या लांबलचक काळांत भांडवलदारवर्ग सत्तारूढ होऊन भांडवलशाहीचा विकास करीत असतो व कामगार वर्ग आपलें सामर्थ्य वाढवीत राहून भांडवलशाहीविरुद्ध 'निर्णायिक लढा' सुरू करण्याची तयारी करीत असतो. दोन क्रांत्यांच्या दरम्यानचा हा काळ कैक दशकांचा असेल, किंबहुना त्याहूनही जास्त टिकेल, असा साधारणत: या लोकांचा अंदाज आहे. साम्राज्यशाहीच्या परिस्थितींत 'चिनी भिंती'चा 'सिद्धांत' शास्त्रीयदृष्टया अगदीं अर्थहीन आहे, हा सिद्धांत म्हणजे भांडवलदार-वर्गाच्या प्रतिक्रांतिकारक आकांक्षांवर पांघरूण घालण्याचें व त्यांच्यावर मुलामा चढविण्याचें एक साधनच आहे व एवढेंच कार्य त्यांच्याद्वारें होऊं शकतें, हें मुद्दाम सिद्ध करण्याची मुळींच जरूरी नाहीं. साम्राज्यशाहीच्या परिस्थितींत नानाप्रकारच्या संघर्षांचा व युद्धांचा केव्हां स्फोट होईल याचा नेम नसतो; हा "समाजसत्तावादी क्रांतीच्या आसन्नतेचा काळ" असतो; या काळांत "उत्कर्षोन्मुख" भांडवलशाहीचें "मरणोन्मुख" भांडवलशाहींत रूपांतर होत असतें, व जगांतील सर्व देशांत क्रांतिकारक चळवळ फोफावत असते. या काळांत साम्राज्यशाही एकूणएक प्रतिगामी शक्तींशीं गट्टी करते, झारशाही व सरंजामदारी गुलामगिरी (सर्फडम) यांच्याशींसुद्धां ती गट्टी करते, व त्यामुळें पाश्चिमात्य देशांतील कामगार चळवळीपासून पौर्वात्य देशांतील राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या चळवळीपर्यंत साऱ्या क्रांतिकारक शक्तींची एकजूट घडवून आणणें आवश्यक होऊन बसतें; या काळांत सरंजामी गुलाम-गिरीच्या राजवटीचे अवशेष उखडून टाकण्याचें कार्य साम्राज्यशाहीविरुद्ध क्रांतिकारक लढा केल्याशिवाय पार पाडतां येत नाहीं.—अशा या काळांत जर एकाद्या थोडयाबहुत विकसित झालेल्या देशांत भांडवलदारी–लोकसत्ता-

येत असे. पण आतां एवढेंच म्हणून भागण्यासारखें नाहीं. आतां आपणांला जागतिक कामगार-क्रांतीविषयीं बोललें पाहिजे; याचें कारण असें कीं निर-निराळ्या देशांतील भांडवलाच्या आघाड्या आतां एकमेकींशीं निगडित झाल्या आहेत व साम्राज्यशाहीच्या जागतिक आघाडीच्या एकाच सांखळींतील दुव्वे बनल्या आहेत, व साम्राज्यशाहीच्या या जागतिक आघाडीशीं सामना द्यावयाचा तर सर्व देशांतील क्रांतिकारक चळवळींची संयुक्त आघाडी अस्तित्वांत आणणें क्रमप्राप्तच आहे.

पूर्वी एकाद्या विशिष्ट देशाच्या अंतर्गत विकासांतूनच कामगार-क्रांतीचा उदय होईल असें मानण्यांत येत असे. पण आतां एवढेंच म्हणून भागण्यासारखें नाहीं. मुख्यतः साम्राज्यशाहीच्या जागतिक संघटनेंतील परस्परविरोधांच्या विकासांतून कामगार-क्रांति उदयास येते, साम्राज्यशाहीच्या जागतिक आघाडीच्या सांखळीचा एक दुव्वा या ना त्या देशांत तुटून पडल्यामुळें कामगार-क्रांति घडून येते, असेंच आपणांला आतां समजलें पाहिजे.

क्रांतीची सुरवात कुठे होईल? भांडवलाच्या तटबंदींत कुठें—कोणत्या देशांत—पहिल्यांदा खिंडार पाडतां येईल?

या प्रश्नाला पूर्वीं बहुधा असें उत्तर देण्यांत येत असे कीं ज्या देशांत उद्योग-धंद्यांचा विकास जास्त प्रमाणांत झाला आहे, कामगारवर्ग जनतेचा बहुसंख्य विभाग बनला आहे, संस्कृतीचें प्रमाण अधिक आहे, लोकशाही जास्त आहे, अशा देशांतच क्रांतीची सुरवात होईल.

पण क्रांतीचा लेनिनवादी सिद्धांत यावर आक्षेप घेतो व असें सांगतो कीं, **उद्योगधंद्यांचा अधिक विकास इत्यादि परिस्थिति जेथें असेल तेथेंच** क्रांतीची सुरवात होईल हें खरें नाही. साम्राज्यशाहीची सांखळी जेथें सर्वांत कमज़ोर असेल तेथेंच भांडवलाच्या तटबंदींत खिंडार पाडतां येईल, कारण जागतिक साम्राज्यशाहीच्या सांखळीचा सर्वांत कमजोर दुव्वा तोडूनच कामगार-क्रांति घडून येत असते. क्रांतीची सुरवात करणारा देश, भांडवलाच्या तटबंदीत खिंडार पाडणारा देश, भांडवलदारी विकासाच्या बाबतींत इतर देशांच्या

मानानें--पुढारलेल्या, पण भांडवलशाहीच्या चौकटींतच अडकून राहिलेल्या, देशाच्या मानानें--मागासलेला असेल हें संभवनीय आहे.

१९१७ सालीं साम्राज्यशाहीच्या जागतिक आघाडीची सांखळी इतर देशांपेक्षां रशियांत जास्त कमजोर ठरली. तेथेंच ही सांखळी तुटली व कामगार-क्रांतीला पुढें घुसण्यास वाव मिळाला. याचें कारण काय ? याचें कारण हेंच कीं रशियामध्यें एक प्रचंड लोकक्रांति विकसित होत होती, तिच्या अग्रभागीं क्रांतिकारक कामगारवर्ग कूच करीत होता, व जमीनदारांकडून पिळल्या व गांजल्या जाणाऱ्या प्रचंड शेतकरीवर्गासारखा महत्वाचा दोस्त या कामगार-वर्गाला लाभला होता; तसेंच झारशाहीसारखा साम्राज्यशाहीचा अत्यंत रौद्र प्रतिनिधि तेथील क्रांतीचा विरोध करण्यास उभा होता, या झारशाहीला नैतिक प्रतिष्ठेचें यत्किंचितही पाठबळ नव्हतें, एकजात सारी जनता तिचा द्वेष करीत होती व तें अगदीं योग्यच होतें. भांडवलदारी दृष्टीनें रशिया देश फ्रान्स-जर्मनीपेक्षां किंवा इंग्लंड-अमेरिकेपेक्षां जरी कमी विकास पावलेला होता, तरी तेथेंच जागतिक साम्राज्यशाहीची सांखळी जास्त कमजोर ठरली.

नजीकच्या भविष्यकाळांत ही सांखळी कुठें तुटेल ? अर्थात् जेथें ती सर्वांत कमजोर आहे तेथेंच. उदाहरणार्थ हिंदुस्थानांत ही सांखळी तुटेल हें अशक्य म्हणतां येत नाहीं. कारण काय ? कारण हेंच कीं हिंदुस्थानांत नवोदित लढाऊ व क्रांतिकारक कामगारवर्ग अस्तित्वांत आहे व राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या चळवळीसारखा महत्वाचा दोस्त या कामगार वर्गाला लाभला आहे. हा दोस्त सामर्थ्यवान व महत्वाचा आहे यांत मुळींच शंका नाहीं. तसेंच परकीय साम्राज्य-शाहीसारखा अत्यंत प्रख्यात शत्रु तेथील क्रांतीचा विरोध करण्यास उभा आहे, त्याला यत्किंचितही नैतिक पत नाहीं, हिंदुस्थानांतील सारी गांजली व पिळली जाणारी जनता त्याचा द्वेष करते व तें अगदीं योग्यच आहे.

ही सांखळी जर्मनींत तुटेल हेंदेखील अगदीं शक्य आहे. कारण काय ? कारण हेंच की हिंदुस्थानसारख्या देशांत ज्या परिस्थितीचे परिणाम प्रत्ययास येत आहेत त्याच परिस्थितीचे परिणाम जर्मनींतसुद्धां प्रत्ययास येऊं लागले

आहेत; मात्र हिंदुस्थान व जर्मनी यांच्या विकासावस्थेंत फारच मोठी तफावत आहे व तिचा ठसा जर्मनींतील क्रांतीच्या प्रगतीवर व निष्पत्तीवर उमटणें अपरिहार्यच आहे.

याच कारणास्तव लेनिननें पुढील उद्‌गार काढले आहेत :--

"पश्चिम यूरोपमधील भांडवलदारी देश समाजसत्तावादाच्या रोंखानें आपला विकास करण्याचें कार्य कोणत्या रीतीनें पार पाडीत आहेत? क्रमशः व सम गतीनें समाजसत्तावादाचा 'परिपोष' करून नव्हे, तर कांहीं देशांनीं इतर देशांची पिळणूक करण्याच्या मार्गानें, साम्राज्यशाही युद्धांत प्रथम पराभूत झालेल्या देशाची व साऱ्या पौर्वात्य देशांची पिळवणूक करण्याच्या मार्गानें. उलटपक्षीं पहिल्या साम्राज्यशाही युद्धाचाच नेमका असा परिणाम घडून आला आहे कीं पौर्वात्य दुनिया क्रांतिकारक चळवळीच्या आखाड्यांत कायमची खेंचली गेली आहे, जागतिक क्रांतिकारक चळवळीच्या प्रचंड भोंवऱ्यांत ती ओढली गेली आहे."

थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे साम्राज्यशाहीच्या आघाडीची सांखळी जेथील दुव्वे कमजोर असतील तेथेंच तुटून पडेल अशी सामान्यतः अपेक्षा केली पाहिजे. जेथें भांडवलशाहीचा अधिक विकास झालेला असेल, कामगारांचें शेंकडा प्रमाण अमुक इतकें असेल व शेतकऱ्यांचें शेंकडा प्रमाण अमुक इतकें असेल, तेथेंच ती तुटून पडेल असें तरी निदान मुळींच म्हणतां येत नाहीं.

म्हणूनच कामगार-क्रांतीच्या प्रश्नाचा निर्णय घेतांना एकाद्या देशाच्या एकंदर लोकसंख्येंत कामगारांचें शेंकडा प्रमाण किती आहे असल्या गोष्टीला फाजील महत्त्व देण्याची कांहींच जरूरी उरत नाहीं. सेकंड इंटरनॅशनलच्या पंडितब्रुवांनीं असल्या आंकडेबाजीचें स्तोम माजविण्यांत भलताच उत्साह दाखविला आहे. साम्राज्यशाही म्हणजे काय हें त्यांना मुळीं उमजलेलेंच नाहीं. क्रांतीची तर त्यांना प्लेगाप्रमाणें भीति वाटते.

आतां पुढील मुद्दा घेऊं. सेकंड इंटरनॅशनलच्या बहाद्दर पुढाऱ्यांनीं असा सिद्धांत मांडला (व अजूनही ते मांडत आहेत) कीं भांडवलदारी-लोकसत्तावादी क्रांति आणि कामगार-क्रांति या दोन क्रांत्यांच्या दरम्यान दीर्घ कालावधीची अफाट दरी आ वासून उभी असते, निदान या दोन क्रांत्यांच्या दरम्यान एक प्रचंड 'चीनची भिंत' खडी असते, त्यामुळें या दोन क्रांत्या एकमेकींपासून अगदीं अलग व तुटक असतात, या दोन क्रांत्यांच्या दरम्यानच्या लांबलचक काळांत भांडवलदारवर्ग सत्तारूढ होऊन भांडवलशाहीचा विकास करीत असतो व कामगार वर्ग आपलें सामर्थ्य वाढवीत राहून भांडवलशाहीविरुद्ध 'निर्णायक लढा' सुरू करण्याची तयारी करीत असतो. दोन क्रांत्यांच्या दरम्यानचा हा काळ कैक दशकांचा असेल, किंबहुना त्याहूनही जास्त टिकेल, असा साधारणतः या लोकांचा अंदाज आहे. साम्राज्यशाहीच्या परिस्थितींत 'चिनी भिंती'चा 'सिद्धांत' शास्त्रीयदृष्टया अगदीं अर्थहीन आहे, हा सिद्धांत म्हणजे भांडवलदार-वर्गाच्या प्रतिक्रांतिकारक आकांक्षांवर पांघरूण घालण्याचें व त्यांच्यावर मुलामा चढविण्याचें एक साधनच आहे व एवढेंच कार्य त्यांच्याद्वारें होऊं शकतें, हें मुद्दाम सिद्ध करण्याची मुळींच जरूरी नाहीं. साम्राज्यशाहीच्या परिस्थितींत नानाप्रकारच्या संघर्षांचा व युद्धांचा केव्हां स्फोट होईल याचा नेम नसतो; हा "समाजसत्तावादी क्रांतीच्या आसन्नतेचा काळ" असतो; या काळांत "उत्कर्षोन्मुख" भांडवलशाहीचें "मरणोन्मुख" भांडवलशाहींत रूपांतर होत असतें, व जगांतील सर्व देशांत क्रांतिकारक चळवळ फोंफावत असते. या काळांत साम्राज्यशाही एकूणएक प्रतिगामी शक्तींशीं गट्टी करते, झारशाही व सरंजामदारी गुलामगिरी (सर्फडम) यांच्याशींसुद्धां ती गट्टी करते, व त्यामुळें पाश्चिमात्य देशांतील कामगार चळवळीपासून पौर्वात्य देशांतील राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या चळवळीपर्यंत साऱ्या क्रांतिकारक शक्तींची एकजूट घडवून आणणें आवश्यक होऊन बसतें; या काळांत सरंजामी गुलाम-गिरीच्या राजवटीचे अवशेष उखडून टाकण्याचें कार्य साम्राज्यशाहीविरुद्ध क्रांतिकारक लढा केल्याशिवाय पार पाडतां येत नाहीं.—अशा या काळांत जर एकाद्या थोडयाबहुत विकसित झालेल्या देशांत भांडवलदारी-लोकसत्ता-

वादी क्रांति घडून आली तर ती या परिस्थितीमुळें कामगार-क्रांतीच्या मर्यादेपर्यंत जाऊन भिडणार व कामगार-क्रांतींत विलीन होणार हें क्रमप्राप्तच आहे. या सिद्धांताच्या सत्यतेचा व निर्विवादपणाचा प्रत्यक्ष पुरावा रशियांतील क्रांतीच्या इतिहासानें उपलब्ध करून दिला आहे. भांडवलदारी—लोकसत्तावादी क्रांति व समाजसत्तावादी क्रांति हे एकाच सांखळीचे दोन दुव्वे आहेत, या दोन क्रांत्या मिळून रशियन क्रांतीच्या अफाट विस्ताराचें एकजिनसी व अखंड चित्र तयार होतें, ही गोष्ट लेनिननें १९०५ सालींच—पहिली रशियन क्रांति जवळ येऊन ठेपली होती त्यावेळींच—'**दोन डावपेंच**' या पुस्तकांत नमूद केली होती. लेनिननें पुढील उद्‌गार काढले ते कांहीं निराधार नव्हते :—

> "एकतंत्री सत्तेचा प्रतिकार बळजबरीनें हाणून पाडण्यासाठीं व भांडवलदारवर्गाचा अस्थिरपणा निष्फळ करण्यासाठीं कामगारवर्गानें शेतकरी बहुजनसमाजाशीं दोस्ती करून **लोकसत्तावादी क्रांतीचें कार्य** पूर्ण केलें पाहिजे. भांडवलदारवर्गाचा प्रतिकार बळजबरीनें हाणून पाडण्यासाठीं व शेतकरी वर्गाचा आणि मध्यमवर्गाचा अस्थिरपणा निष्फळ करण्यासाठीं कामगारवर्गानें अर्ध-मजूर जनतेशीं दोस्ती करून **समाजसत्तावादी क्रांति** घडवून आणली पाहिजे. कामगारवर्गापुढें हीं कार्यें आहेत. क्रांतीच्या व्याप्तीच्या बाबतींत नवे 'इस्क्रा'वाले (म्हणजे मेन्शेविक) जे युक्तिवाद मांडीत आहेत व जे ठराव करीत आहेत त्यांमध्यें हीं कार्यें नेहमींच अत्यंत संकुचित स्वरूपांत दिग्दर्शित करण्यांत येत असतात."

भांडवलदारी क्रांतीचें कामगार-क्रांतींत संक्रमण होण्याची कल्पना क्रांतीच्या लेनिनवादी सिद्धांताची एक कोनशिलाच आहे. मागाहूनच्या ग्रंथांत लेनिननें ही कल्पना '**दोन डावपेच**' या पुस्तकापेक्षांही अधिक उठावदार रीतीनें मांडली आहे. त्या ग्रंथांचा मी इथें उल्लेखही करीत नाहीं.

कांहीं लोकांचा असा समज असल्याचें आढळून येतें, कीं लेनिनला ही कल्पना १९१६ सालींच सुचली, तोंपर्यंत लेनिनला रशियांतील क्रांति भांडवल-

शाहीच्या चौकटींत राहील असें वाटत होतें, व म्हणून कामगार व शेतकरी-वर्गाच्या हुकूमशाहीचें साधन असलेल्या संस्थेच्या हातून कामगारवर्गाच्या हातीं सत्ता न जातां भांडवलदारवर्गाच्याच हातीं जाईल असें तोंपर्यंत लेनिनचें मत होतें. आपल्या कम्युनिस्ट वृत्तपत्रांतही हेंच विधान करण्यांत येऊं लागलें आहे असें म्हणतात. हें विधान साफ़ चुकीचें आहे, तें वस्तुस्थितीशीं पूर्णपणें विसंगत आहे, ही गोष्ट ठांसून सांगितली पाहिजे.

१९०५ सालीं पार्टीच्या तिसऱ्या कॉंग्रेसमध्यें लेनिननें केलेल्या सुप्रसिद्ध भाषणाचा इथें उल्लेख करतां येईल. कामगार व शेतकरीवर्गाची हुकुमशाही स्थापन करणें याचा अर्थ 'सुव्यवस्थेची संघटना' करणें असा नसून 'युद्धाची संघटना' करणें असाच आहे, असें या भाषणांत म्हटलें आहे.

तसेंच १९०५ सालीं लेनिननें लिहिलेल्या '**हंगामी सरकाराविषयीं**' या सुप्रसिद्ध लेखाचा इथें उल्लेख करतां येईल. या लेखांत त्यानें विकसित होणाऱ्या रशियन क्रांतीच्या भवितव्याचें चित्र रंगविलें आहे, व "रशियन क्रांति ही कांहीं महिने चालणारी चळवळ न राहतां अनेक वर्षें चालणारी चळवळ बनेल व अशा रीतीनें तिच्यामुळें सत्ताधाऱ्यांकडून किरकोळ सवलती मिळविण्याचेंच कार्य न साधतां त्या सत्ताधाऱ्यांचें संपूर्ण उच्चाटन करण्याचें कार्य सिद्धीस जाईल" असा प्रयत्न करण्यास लेनिननें या लेखांत पार्टीला आदेश दिला आहे. क्रांतीच्या या भावी विकासाची अधिक सविस्तर चर्चा करून व यूरपमधील क्रांतीशीं त्याची सांगड घालून लेनिन पुढें म्हणतो :—

> "हें करण्यांत आपणांला यश आल्यास . . . . . क्रांतीचा वणवा साऱ्या यूरपभर पसरेल; भांडवलशाहीच्या प्रतिगामी राजवटींत कुजत पडलेला यूरपचा कामगारसुद्धां खडबडून उठेल व 'काम कसें साधावयाचें' याचा आम्हांला प्रत्यक्ष धडा घालून देईल; त्यानंतर यूरपमधील क्रांतीची लाट पुन: रशियांत येऊन आदळेल व त्यामुळें कांहीं वर्षें टिकणाऱ्या क्रांतियुगाचें कैक दशकें टिकणाऱ्या क्रांतियुगांत रूपांतर होईल."

नोव्हेंबर १९१५ मध्यें लेनिननें प्रसिद्ध केलेल्या एका सुप्रसिद्ध लेखाचाही इथें उल्लेख करतां येईल. या लेखांत तो म्हणतो :—

"सत्ता काबीज करण्यासाठीं, लोकराज्य स्थापन करण्यासाठीं, जमीन जप्त करण्यासाठीं, ..... **भांडवलदारी** रशियाला लष्करी-सरंजामदारी 'साम्राज्यशाही'च्या (म्हणजे झारशाहीच्या) पाशांतून मुक्त करण्याच्या कार्यांत 'कामगारेतर जनतेला' भाग घेण्यास लावण्या-साठीं, कामगारवर्ग लढत आहे व शौर्यानें लढत राहील. आणि झार-शाहीच्या पाशांतून, जमीनदारांच्या सत्तेंतून, भांडवलदारी रशियाची अशा रीतीनें मुक्तता झाल्यानंतर तिचा कामगारवर्ग **तावडतोब** फायदा घेईल. कशासाठीं? श्रीमंत शेतकऱ्यांना खेड्यांतील कामगारां-विरुद्ध लढण्याच्या कामीं मदत करण्यासाठीं नव्हे, तर यूरपच्या कामगा-रांशीं दोस्ती करून समाजसत्तावादी क्रांति घडवून आणण्यासाठीं."

'**कामगार क्रांति व तत्त्वभ्रष्ट कौट्स्की**' या लेनिनच्या पुस्तकांतील सुप्रसिद्ध उताऱ्याचा मी आतां शेवटीं उल्लेख करतों. रशियन क्रांतीच्या व्याप्तीविषयीं '**दोन डावपेच**' या पुस्तकांतील वर उद्धृत केलेल्या उताऱ्याचा उल्लेख करून लेनिननें पुढील निष्कर्ष काढला आहे:—

"आम्हीं भाकीत केलें होतें त्याबरहुकूमच सारें कांहीं घडून आलें आहे. आमची विचारसरणी बिनचूक होती हें क्रांतीच्या विकासाच्या दिशेवरून प्रत्ययास आलें आहे. **प्रथम** राजेशाहीविरुद्ध, जमिनदारां-विरुद्ध, मध्ययुगीन राजवटीविरुद्ध, 'समग्र' शेतकरीवर्गाशीं दोस्ती. (त्या अंगानें क्रांतीचें स्वरूप भांडवलदारीच, भांडवलदारी-लोकसत्ता-वादीच, राहतें.) **त्यानंतर भांडवलशाहीविरुद्ध**—यांतच खेड्यांतील धनिकवर्ग, कुलक, नफेबाज, यांचा समावेश होतो—अत्यंत गरीब शेतकऱ्यांशीं, अर्धमजुरांशीं, सर्व पिळल्या जाणाऱ्या जनतेशीं, दोस्ती. त्या अंशानें ही क्रांति **समाजसत्तावादी** बनते. पहिल्या व दुसऱ्या क्रांतीच्या दरम्यान कृत्रिम 'चिनी भिंत' उभारण्याचा प्रयत्न

करणें, कामगारवर्ग कितपत तयार आहे व गरीब शेतकऱ्यांशीं त्याची कितपत एकजूट झाली आहे या मुद्याव्यतिरिक्त **दुसऱ्या कोणत्याही** मुद्याच्या आधारें या दोन क्रांत्या एकमेकींपासून अलग पाडणें, म्हणजे मार्क्सवादाचा भयंकर विपर्यास करणें, त्याला ग्राम्य स्वरूप देणें व त्याच्याऐवजीं उदारमतवादाची स्थापना करणेंच होय."

एवढी चर्चा पुरें झाली.

पण कांहींजण आक्षेप घेतील : ठीक, ठीक, पण तुम्हीं म्हणतां तें खरें असेल तर लेनिननें 'चिरकालिक (अप्रतिहत) क्रांती'च्या कल्पनेला विरोध कां केला ?

त्याचें कारण असें कीं शेतकरीवर्गाच्या क्रांतिकारक कार्यक्षमतेचा 'जास्तींत जास्त' उपयोग करून घ्यावा असें लेनिनचें मत होतें, झारशाहीचें संपूर्ण उच्चाटन करण्यासाठीं व कामगार क्रांतीच्या अवस्थेंत संक्रमण घडवून आणण्यासाठीं शेतकरीवर्गाच्या क्रांतिकारक कार्यशक्तीचा संपूर्ण उपयोग करावा अशी लेनिनची सूचना होती; उलटपक्षीं 'चिरकालिक क्रांती'च्या पुरस्कर्त्यांना शेतकरीवर्गाची महत्वाची भूमिका उमजली नाहीं, शेतकरीवर्गाची क्रांतिकारक कार्यशक्ति त्यांनीं वाजवीपेक्षां कमी लेखली, शेतकरीवर्गाचें नेतृत्व करण्याची रशियन कामगारवर्गाची लायकी त्यांनीं वाजवीपेक्षां कमी लेखली, व शेतकरीवर्गावरील भांडवलदारांचें वजन नाहींसें करण्याच्या कामांत त्यांनीं अशा रीतीनें व्यत्यय आणला, कामगारवर्गाभोंवतीं शेतकरीवर्गाला गोळा करण्याच्या कामांत त्यांनीं अशा रीतीनें अडथळा निर्माण केला.

दुसरें कारण असें कीं कामगारवर्गाच्या हातीं सत्ता येणें हें क्रांतीच्या कार्याचें **पर्यवसान** असलें पाहिजे असें लेनिनचें मत होतें; उलटपक्षीं 'चिरकालिक क्रांती'च्या पुरस्कर्त्यांना **आरंभापासूनच** कामगारवर्गाची सत्ता ताबडतोब स्थापन करावयाची होती, तसें करण्यांत सरंजामशाहीच्या अवशेषांसारख्या 'क्षुल्लक तपशिलाकडे' डोळेझांक केली जात आहे ही गोष्ट त्यांना उमजली नाहीं; रशियन शेतकरीवर्गासारख्या महत्वाच्या शक्तीकडे आपण दुर्लक्ष

करीत आहोंत हें त्यांना कळलें नाहीं, शेतकरीवर्गाला कामगारवर्गाच्या बाजूला आकर्षून घेण्याच्या कार्यांत असल्या धोरणामुळें खोळंबाच होणार हें त्यांच्या लक्षांत आलें नाहीं.

या कारणास्तव लेनिननें 'चिरकालिक' क्रांतीच्या पुरस्कर्त्यांविरुद्ध जो लढा केला तो 'अप्रतिहतपणा'च्या मुद्यावर नव्हता, कारण अप्रतिहत क्रांतीचा दृष्टिकोण स्वत: लेनिनच प्रतिपादन करीत होता; लेनिनचा विरोध शेतकरीवर्गाच्या भूमिकेच्या मुद्यावर होता, कारण कामगारवर्गाची प्रचंड राखीव फौज असलेल्या शेतकरीवर्गाच्या भूमिकेला त्या लोकांनीं वाजवीपेक्षां कमी महत्त्व दिलें, कामगारवर्गाच्या पुढारीपणाची कल्पना त्यांना मुळीं समजलीच नाहीं.

'चिरकालिक' क्रांतीची कल्पना ही कांहीं आजकालची कल्पना नाहीं. मार्क्सनें १८५० सालींच **'कम्युनिस्ट लीगला निवेदन'** या सुप्रसिद्ध लेखांत ही कल्पना प्रथम मांडली. आमच्या 'चिरकालिकवाद्यां'नीं अप्रतिहत क्रांतीची कल्पना याच लेखांतून उचलली. मात्र एक गोष्ट लक्षांत घेतली पाहिजे व ती ही कीं मार्क्सच्या ग्रंथांतून ही कल्पना उचलतांना आमच्या 'चिरकालिकवाद्यां'नीं तिच्यांत थोडासा फेरफार केला, व अशा रीतीनें फेरफार करून ती बिघडवून टाकली आणि व्यवहारांत उपयोग करण्यासाठीं कुचकामाची बनविली. ही चूक दुरुस्त करण्यासाठीं, मार्क्सची अप्रतिहत क्रांतीची कल्पना शुद्ध स्वरूपांत उचलून घेऊन तिला आपल्या क्रांति-सिद्धांताची कोनशिला बनविण्यासाठीं, लेनिनसारखा अनुभवी कार्यकर्ताच आवश्यक होता.

मार्क्सनें आपल्या 'निवेदनां'त क्रांतिकारक-लोकसत्तावादी मागण्यांची यादी दिली आहे, या मागण्या मिळविण्यासाठीं झटण्याचा कम्युनिस्टांना आदेश दिला आहे, व त्यानंतर अप्रतिहत क्रांतीविषयीं पुढील उद्गार काढले आहेत :—

> "शक्य तितक्या जलद, व फारतर वर नमूद केलेल्या मागण्या मिळाल्याबरोबर, क्रांति समाप्त करावी अशी लोकसत्तावादी मध्यमवर्गाची इच्छा असते; उलटपक्षीं कमीजास्त मालमत्ता असलेल्या सर्व वर्गांचें वर्चस्व नष्ट करीपर्यंत, कामगारवर्ग राज्यसत्ता काबीज करी-

पर्यंत, व एकाच देशांतील नव्हे तर जगांतील सर्व प्रमुख देशांतील कामगारांच्या सहकार्याची अत्यंत प्रगति होऊन या देशांतील कामगारांची आपापसांतील स्पर्धा बंद होईपर्यन्त व निदान निर्णायक उत्पादन-शक्ति कामगारांच्या हातीं एकवटल्या जाईपर्यंत, क्रांति चिरकाल चालू ठेवणें आपल्या हिताचें आहे व तें आपलें कर्तव्य आहे."

हेंच दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे—

(१) एकोणिसाव्या शतकाच्या सहाव्या दशकांतील जर्मनींतील क्रांतीचा **आरंभ** तावडतोब कामगारांची सत्ता स्थापन करून करावा असें मार्क्सनें मुळींच सुचविलेलें नाहीं; आमच्या रशियन 'चिरकालिकवाद्यां'च्या योजना मार्क्सच्या मताच्या अगदीं **विरुद्ध** आहेत.

(२) मार्क्सनें एवढेंच सुचविलें कीं क्रांतिकार्याचें **पर्यवसान** कामगार राज्यसत्तेच्या स्थापनेंत व्हावें, त्यासाठीं भांडवलवर्गाच्या एकामागून एक निरनिराळ्या विभागांना सत्तेच्या उच्चासनावरून क्रमशः ढकलून द्यावें, व याचा उद्देश कामगारवर्गाच्या हातीं सत्ता आल्यावर प्रत्येक देशांत क्रांतीचा वणवा पेटविणें हा असावा; लेनिननें आपणांला जें जें शिकविलें व साम्राज्य-शाहीच्या परिस्थितींतील कामगार क्रांतीच्या स्वतःच्या सिद्धांतास अनुसरून आपल्या क्रांतीच्या विकासाच्या काळांत त्यानें जें जें अंमलांत आणलें, तें सारें मार्क्सच्या मताला **पूर्णपणें धरूनच** आहे.

यावरून असा निष्कर्ष निघतो कीं आमच्या रशियन 'चिरकालिकवाद्यां'नी रशियन क्रांतींतील शेतकरीवर्गाची भूमिका कमी लेखली आहे व कामगार-वर्गाच्या पुढारीपणाची कल्पना किती महत्वाची आहे हें त्यांना पुरेसें कळलेलें नाहीं, एवढेंच नव्हे तर मार्क्सच्या 'चिरकालिक' क्रांतीच्या कल्पनेंत फेरफार केला आहे (ती बिघडवून टाकली आहे) व व्यवहारांत उपयोग करण्यासाठी ती कुचकामाची बनविली आहे.

याच कारणास्तव लेनिननें आमच्या 'चिरकालिकवाद्यां'च्या सिद्धांताची टर उडविली, "मौलिक" व "छानदार" अशीं विशेषणें त्याला लावलीं,

व "दहा वर्षे झालीं तरी या छानदार सिद्धांताचें प्रत्यक्ष जीवनांत प्रत्यंतर नजरेस पडलें नाहीं याचें कारण काय, याचा विचार करण्यासाठीं क्षणभर डोकें खाजविण्याससुद्धां" हे लोक तयार नाहींत असा लेनिननें त्यांच्यावर आरोप केला. (लेनिनचा लेख १९१५ सालीं—म्हणजे रशियांतील 'चिरकालिकवाद्यां'चा सिद्धांत पुढें आल्यानंतर दहा वर्षांनीं—लिहिण्यांत आला होता.)

यांच कारणास्तव हा सिद्धांत अर्ध-मेन्शेविक स्वरूपाचा आहे असें लेनिनचें मत होतें, व या सिद्धांतानें "निर्णायक क्रांतिकारक लढा चालविण्याची व कामगारवर्गानें राज्यसत्ता काबीज करण्याची घोषणा बोल्शेविकांकडून उसनी घेतली आहे, आणि शेतकरीवर्गाची भूमिका 'अमान्य' करण्याचा मुद्दा मेन्शे-विकांकडून उसना घेतला आहे" असें लेनिननें लिहून ठेवलें.

भांडवलदारी-लोकसत्तावादी क्रांतीचें कामगार-क्रांतींत संक्रमण होणें, कामगार-क्रांतीच्या अवस्थेंत 'तावडतोब' संक्रमण करण्यासाठीं भांडवलदारी क्रांतीचा उपयोग करणें,—या संबंधींच्या लेनिनच्या कल्पनेचें स्वरूप असें आहे.

आतां पुढें विचार करूं. पूर्वी असें समजण्यांत येत असे कीं एका देशांत क्रांतीचा विजय होणें अशक्य आहे. भांडवलदारवर्गावर विजय संपादन करण्यासाठीं सर्व देशांतील किंवा निदान बहुसंख्य पुढारलेल्या देशांतील कामगारांनीं एकत्रित रीतीनें लढणें आवश्यक होईल, असें धरून चालण्यांत येत असे. पण आतां हा दृष्टिकोण वस्तुस्थितीशीं जुळत नाहीं. आतां आपण एका देशांत क्रांतीचा विजय होण्याची शक्यता गृहीत धरूनच विचार केला पाहिजे; कारण साम्राज्यशाहीच्या काळांत निरनिराळ्या भांडवलदारी देशांचा विकास विषम वेगानें व उत्पातयुक्त (स्पॅझ्मॉडिक) रीतीनें होत असतो, साम्राज्यशाहीच्या पोटांतच अनर्थकारक परस्परविरोधांची वाढ होऊन त्यामुळें अपरिहार्य युद्धें उद्भवतात, जगांतील सर्व देशांत क्रांतिकारक चळवळ फोंफावत जाते,—व या सर्व परिस्थितीमुळें एकेका अलग अलग देशांत कामगार-वर्गाचा विजय होणें केवळ संभवनीयच नव्हे तर आवश्यकसुद्धां होऊन बसतें.

रशियन क्रांतीचा इतिहास म्हणजे या विधानाचा प्रत्यक्ष पुरावाच होय. तथापि त्याच वेळीं एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे ती ही कीं कांहीं विशिष्ट व अत्यंत आवश्यक परिस्थिति जेव्हां अस्तित्वांत असेल तेव्हांच भांडवलदारवर्गाचें उच्चाटन करण्याचें कार्य यशस्वी होऊं शकेल व ही परिस्थिति जर अस्तित्वांत नसेल तर कामगारवर्गानें हातीं सत्ता घेण्याचा प्रश्नसुद्धां उपस्थित होऊं शकणार नाहीं.

या आवश्यक परिस्थितीविषयीं लेनिननें '**जहाल साम्यवाद—बाल्यावस्थेंतील रोग**' या पुस्तकांत पुढील उद्‌गार काढले आहेत :—

> "क्रांतीचा मूलभूत नियम पुढें दिल्याप्रमाणें आहे व सर्व क्रांत्यांत आणि विशेषतः विसाव्या शतकामध्यें रशियांत घडून आलेल्या तिन्ही क्रांत्यांत या नियमाची सत्यता सिद्ध झाली आहे :—जुन्या पद्धतीनें जगणें अशक्य आहे याची पिळल्या व गांजल्या जाणाऱ्या जनतेला जाणीव होणें व तिनें फेरबदलांची मागणी करणें, एवढीच गोष्ट क्रांति घडवून येण्यास पुरेशी नाहीं; पिळणाऱ्या वर्गांना जुन्या पद्धतीनें जगणें व राज्य करणें अशक्य व्हावें, ही गोष्ट क्रांति घडून येण्यास आवश्यक असते. '**खालच्या वर्गांना**' **जुनी पद्धत जेव्हां नकोशी होते व 'वरच्या वर्गांना' जुनी पद्धत चालू ठेवणें जेव्हां अशक्य होतें, तेव्हांच** क्रांति विजयी होऊं शकते. हेंच सत्य दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे—**राष्ट्रव्यापी अरिष्टप्रसंग निर्माण झाल्याशिवाय (पिळणारे व पिळले जाणारे दोघेही या अरिष्टांत सांपडल्याशिवाय)** क्रांति शक्य नाहीं. यावरून असें अनुमान निघतें कीं क्रांतीसाठीं पुढील परिस्थिति आवश्यक आहे :—(१) बहुसंख्य कामगारांना (किंवा निदान वर्गजागृत, विचारशील व राजकीयदृष्ट्या कार्यप्रवण कामगारांच्या बहुसंख्येला) क्रांतीची आवश्यकता पूर्णपणें समजली असावी, व क्रांतीसाठीं आपल्या प्राणाचें बलिदान करण्यास ते सज्ज असावेत; (२) राज्यकर्त्या वर्गांवर राज्यकारभार चालविण्याच्या बाबतींत असा आणीबाणीचा प्रसंग

> ओढवलेला असावा कीं त्यामुळें अत्यंत मागासलेली जनतासुद्धां राजकारणाच्या आखाड्यांत खेंचली जाईल, ......सरकार कमजोर होईल व त्याचें त्वरित उच्चाटन करणें क्रांतिकारकांना शक्य होईल."

परंतु जरी एका देशांत भांडवलदारांच्या सत्तेचें उच्चाटन करण्यांत आलें व कामगारवर्गाची सत्ता स्थापन करण्यांत आली तरी तेवढ्यानें समाजसत्तावादाच्या संपूर्ण विजयाची खात्री झाली असें मात्र म्हणतां येणार नाहीं. विजयी देशांतील कामगारवर्गानें आपल्या सत्तेचा पाया मजबूत केल्यानंतर व शेतकरीवर्गाला आपल्या पाठोपाठ पुढें नेल्यानंतर समाजसत्तावादी समाजाची रचना केली पाहिजे, व हें त्याला शक्य आहे. पण त्यायोगें त्याला समाजसत्तावादाचा संपूर्ण व कायम विजय साध्य होईल असें समजावयाचें काय ? म्हणजे, एकाच देशांतील साधनसामुग्रीच्या आधारें त्याला समाजसत्तावादाचा पाया कायमचा मजबूत करतां येईल, त्या देशांत परकीयांचा हस्तक्षेप होण्याची शक्यता पूर्णपणें नाहींशी करतां येईल, व अशा रीतीनें तेथें भांडवलशाहीची पुन:स्थापना होण्याची शक्यता पूर्णपणें नष्ट करतां येईल, असें यावरून समजायचें काय ? मुळीच नाहीं. हें उद्दिष्ट साध्य करण्यासाठीं निदान बऱ्याचशा देशांत क्रांतीचा विजय होणें जरूरीचें असतें. म्हणून इतर देशांत क्रांतीचा विकास करणें व तिला पाठिंबा देणें हें विजयी क्रांतीचें एक आवश्यक कर्तव्य आहे. म्हणून विजयी देशांतील क्रांतीनें आपण एक स्वयंपूर्ण व अलग घटना असल्याचें समजतां कामा नये, इतर देशांत कामगारवर्गाचा विजय त्वरित घडवून आणण्याचें आपण एक साधन आहोंत असेंच तिनें समजलें पाहिजे.

हा मुद्दा लेनिननें अगदीं मोजक्या शब्दांत मांडला आहे. तो म्हणतो कीं "**सर्व देशांत** क्रांतीचा विकास करण्यासाठीं, तिला पाठिंबा देण्यासाठीं, व तिला जागृत करण्यासाठीं, एका देशांत शक्य ती सारी कामगिरी पार पाडणें" हें विजयी क्रांतीचें कर्तव्य आहे.

लेनिनच्या कामगार-क्रांतीच्या सिद्धांताचीं विशेष लक्षणें सर्वसाधारणपणें पाहतां हीं आहेत.

★

[ ४ ]

# कामगार हुकुमशाही

या विषयावर बोलतांना मी तीन मुख्य प्रश्नांची चर्चा करणार आहें :—
(१) कामगार हुकुमशाही म्हणजे कामगार-क्रांतीचें साधन; (२) कामगार हुकुमशाही म्हणजे भांडवलदारवर्गावर कामगारवर्गाचें वर्चस्व; (३) सोविएत राज्य म्हणजे कामगार हुकुमशाहीच्या राज्यसत्तेचें मूर्त स्वरूप.

**(१) कामगार हुकुमशाही म्हणजे कामगार-क्रांतीचें साधन**—कामगार हुकुमशाहीचा प्रश्न हा विशेषेंकरून कामगार-क्रांतीच्या मूलभूत रहस्याचा प्रश्न आहे. कामगार-क्रांति, तिचा विकास, तिचा व्याप, तिनें साधलेलीं कार्यें, यांना कामगार हुकुमशाहीच्या द्वारेंच मूर्त स्वरूप प्राप्त होतें. कामगार हुकुमशाही हें कामगार क्रांतीचें साधन आहे, कामगार हुकुमशाहीच्या द्वारेंच कामगार-क्रांति आपलें कार्य पार पाडते, कामगार हुकुमशाही म्हणजे कामगार-क्रांतीचा सर्वांत महत्वाचा आधारस्तंभ होय. कामगार हुकुमशाही दोन उद्देश तडीस नेण्यासाठीं स्थापन करण्यांत येते :—पहिला उद्देश, सत्ताभ्रष्ट झालेल्या पिळणाऱ्या वर्गाचा प्रतिकार चिरडून टाकणें व कामगार क्रांतीनें मिळविलेल्या यशाचा पाया मजबूत करणें; आणि दुसरा उद्देश, कामगार-क्रांतीची परिपूर्तता करणें, कामगार-क्रांतीचा मोर्चा पुढें नेऊन समाजसत्तावादाचा संपूर्ण विजय होण्याची मजल गांठणें. कामगार हुकुमशाहीच्या अभावीं कामगार-क्रांतीला भांडवलदारवर्गाचा पराभव करणें व त्याची सत्ता उलथून पाडणें शक्य होईल; पण कामगार-क्रांतीनें आपल्या विकासक्रमाच्या एका विशिष्ट अवस्थेंत कामगार हुकुमशाही हें आपलें खास साधन जर अस्तित्वांत आणलें नाहीं, आपला हा मुख्य आधारस्तंभ जर निर्माण केला नाहीं, तर तिला भांडवलदारवर्गाचा प्रतिकार हाणून पाडतां येणार नाहीं, आपला विजय टिकवून धरतां येणार नाहीं, आपला मोर्चा पुढें सरसावून समाजसत्तावादाच्या अंतिम विजयाची मजल गांठणें शक्य होणार नाही.

"सत्तेचा प्रश्न हाच क्रांतीचा मूलभूत प्रश्न होय," असें लेनिननें म्हटलें आहे. सत्ता काबीज केली म्हणजे झालें, आणखी कांहीं करावयास नको, असाच या विधानाचा अर्थ आहे काय ? मुळींच नाहीं. सत्ता काबीज करणें हा नुसता आरंभ होय. एका देशांत कामगारवर्गानें भांडवलदारवर्गाची सत्ता उलथून पाडल्यानंतरही बराच काळपर्यंत तो भांडवलदारवर्ग त्या कामगार-वर्गापेक्षां जास्त प्रबळ असतो. याची अनेक कारणें आहेत. म्हणून सत्ता टिकवून धरणें, तिचा पाया भक्कम करणें, ती अजिक्य बनविणें, हें आवश्यक कार्य होऊन बसतें. हें कार्य तडीस नेण्यासाठीं काय केलें पाहिजे ? हें कार्य तडीस नेण्यासाठीं निदान तीन मुख्य गोष्टी केल्या पाहिजेत. विजयप्राप्तीच्या क्षणापासून कामगार-हुकुमशाहीपुढें पुढील तीन प्रश्न उपस्थित होतात :—

(अ) क्रांतीनें ज्यांची सत्ता उलथून पाडली व मालमत्ता हिसकावून घेतली त्या जमीनदारांकडून व भांडवलदारांकडून होणारा प्रतिकार चिरडून टाकणें, भांडवलाची सत्ता पुनः प्रस्थापित करण्याचे त्यांचे सारे प्रयत्न धुळीस मिळविणें ;

(आ) सर्व श्रमिक जनता कामगारवर्गाच्या झेंड्याखालीं एकत्र होईल अशा रीतीनें रचनात्मक कार्याची संघटना करणें, वर्गभेद नष्ट करण्याची तयारी करण्याच्या दिशेनें हें कार्य चालू ठेवणें ;

(इ) क्रांतीला शस्त्रास्त्रांचा पुरवठा करणें, परकीय शत्रूविरुद्ध लढण्यासाठीं—साम्राज्यशाहीविरुद्ध लढण्यासाठीं—क्रांतिसेनेची संघटना करणें.

या तीन गोष्टी पार पाडण्यासाठीं कामगार हुकूमशाही आवश्यक असते.

लेनिन म्हणतो :—

> "भांडवलशाहीच्या अवस्थेंतून कम्युनिझमच्या अवस्थेंत संक्रमण करण्यासाठीं इतिहासाचा एक समग्र कालखंड लोटावा लागतो. हा कालखंड समाप्त होईपर्यंत पिळणारे वर्ग फिरून आपली सत्ता प्रस्थापित होण्याची आशा उराशीं बाळगतील व हें अपरिहार्यच आहे. आणि

ही नुसती **आशा** न राहतां तिच्या आधारें ते आपली सत्ता पुनः प्रस्थापित करण्याचे **प्रत्यक्ष प्रयत्नही** करतील. आपली सत्ता कधींकाळीं उलथून पडेल अशी कल्पनापुढां या पिळणाऱ्या वर्गाच्या मनाला शिवलेली नसते, ही गोष्ट त्यांना शक्यच वाटत नसते, तिचा विचार करण्यासही ते तयार नसतात, आणि म्हणून पराभवाचा पहिला जबरदस्त तडाखा बसतांक्षणींच ते आपलें गमाविलेलें नंदनवन पुनः प्राप्त करून घेण्यासाठीं दसपट आवेशानें लढूं लागतील, त्यांच्या क्षोभाला पारावार उरणार नाहीं, त्यांचा द्वेषाग्नि शतपट जोरानें पेट घेईल. त्यांच्या कुटुंबांतील माणसांचें जीवन पूर्वी किती आरामशीर व रम्य होतें! आतां या आपल्या लाडक्यांना 'हलक्या' दर्जाचे 'कुणबट' लोक कंगाल बनविणार (किंवा 'हलक्या' माणसांप्रमाणें मेहनत करावयास लावणार), ही गोष्ट त्यांना कशी सहन होईल? पिळणूक करणाऱ्या या भांडवलदारांच्या मागोमाग मध्यम वर्गातील बहुसंख्य लोकही जातील. प्रत्येक देशाच्या अनेक वर्षांच्या इतिहासावरून ही गोष्ट अनुभवसिद्ध आहे कीं मध्यमवर्गाचे लोक नेहमीं डळमळीत वृत्तीचे असतात, त्यांची भूमिका कधींच निश्चित नसते; आज ते कामगारवर्गाच्या बरोबर जातील, तर उद्यां क्रांतीच्या अडचणी पाहून त्यांची गाळण उडेल, कामगारांचा पराभव झाल्याचें किंवा कामगारांना कांहींशी माघार घ्यावी लागल्याचें त्यांना दिसतांक्षणींच त्यांची घाबरगुंडी वळते, काय करावें तें त्यांना सुचेनासें होतें, ते ऊर बडवूं लागतात, आणि एका गोटांतून दुसऱ्या गोटाकडे धांवपळ करूं लागतात."

कामगारवर्गानें भांडवलदारवर्गाची सत्ता उलथून पाडल्यानंतरही बराच काळपावेतों हा भांडवलदारवर्ग कामगारवर्गापेक्षां जास्त प्रबळ असतो, व म्हणून आपली गमावलेली सत्ता पुनः हस्तगत करण्याची धडपड करण्यास त्याला पुरेसें कारण असतें. या बाबत लेनिन म्हणतो :—

"अनेक देशांत एकाच वेळीं क्रांति घडून येणें ही अपवादात्मक गोष्ट असते, साधारणपणें एका वेळीं एकाच देशांत क्रांति घडून

येतें, आणि एकाच देशांत पिळणाऱ्या वर्गाचा पराभव झाल्यास पराभवानंतरही तो पिळल्या जाणाऱ्या वर्गापेक्षां जास्त प्रबळ असतो."

सत्ताभ्रष्ट झाल्यानंतरही भांडवलदारवर्ग प्रबळ असतो याचें कारण काय ?

याचें पहिलें कारण म्हणजे "आंतरराष्ट्रीय भांडवलाचें सामर्थ्य फार असतें, निरनिराळ्या देशांतील भांडवलदारांना एकमेकांशीं जोडणारे धागेदोरे भक्कम व टिकाऊ असतात." (लेनिन)

दुसरें कारण म्हणजे "व्यवहाराच्या दृष्टीनें उपयुक्त असलेल्या अनेक महत्वाच्या गोष्टी पिळणाऱ्या वर्गाच्या लोकांना क्रांतीनंतरही बराच काळपावेतों उपभोगावयास मिळतात. त्यांच्याजवळ अजून पैसा असतो (कारण पैसा एकाएकीं रद्द करणें शक्य नाहीं), थोडीबहुत जंगम मालमत्ता असते (पुष्कळांकडे ती बऱ्याच मोठ्या प्रमाणांत असते), अनेकांशीं त्यांचे अजून लागेबांधे असतात, संघटना व उद्योगधंद्यांची व्यवस्था यांचा त्यांना सराव झालेला असतो, धंद्याच्या व्यवस्थेंतील सर्व 'गुपितें' (चालीरीति, कार्यपद्धति, साधनें, शक्याशक्यता) त्यांना ठाऊक असतात, त्यांना जास्त वरच्या दर्जाचें शिक्षण मिळालेलें असतें, वरिष्ठ तंत्रज्ञांशीं (इंजिनियर्स वगैरेशीं) त्यांचा निकट संबंध असतो (या वरिष्ठ तंत्रज्ञांची राहणी व विचारसरणी भांडवलदारांसारखीच असते), युद्धकलेचा त्यांना कितीतरी जास्त अनुभव असतो (हा मुद्दा फार महत्वाचा आहे)," वगैरे, वगैरे. (लेनिन).

तिसरें कारण "**संवयीचें प्राबल्य, लहान प्रमाणावरील उत्पादनाचें सामर्थ्य**" हें होय.

> "दुर्दैवाची गोष्ट अशी कीं लहान प्रमाणावरील उत्पादन अजून जगामध्यें फारच मोठ्या अंशानें अस्तित्वांत आहे. या लहान प्रमाणावरील उत्पादनांतून दररोज, दरघडीला, भांडवलशाहीचा व भांडवलदारवर्गाचा **जन्म** होत असतो. ही क्रिया आपसूकपणें होते व तिचा विस्तार फार मोठा असतो."..... "वर्गभेद नष्ट करावयाचे

६३५६०

तर नुसती जमीनदारांची व भांडवलदारांची हकालपट्टी करून चाल-णार नाहीं. जमीनदार-भांडवलदारांना हांकून लावण्याचें कार्य आपण पार पाडलें आहे व तुलनात्मकदृष्टया पाहतां तें फारसें अवघड गेलें नाहीं. वर्गभेद नष्ट करावयाचे म्हटलें तर **लहान प्रमाणावर क्रयवस्तूंचें उत्पादन करणारा वर्गही नाहींसा केला पाहिजे**, आणि या लोकांची **हकालपट्टी करणें तर शक्य नाहीं**, त्यांना चिरडून टाकणें शक्य नाहीं, त्यांच्याशीं **एकोप्यानें** राहणेंच आपणांला भाग आहे; त्यांच्या मनाची घडण बदलली पाहिजे, त्यांना नव्या तऱ्हेनें विचार करण्यास शिकविलें पाहिजे, आणि अत्यंत दीर्घ काळपावेतों धिमेपणानें व सावधगिरीनें संघटनात्मक कार्य करूनच ही गोष्ट साध्य होईल.". (लेनिन).

म्हणूनच लेनिननें पुढील उद्‌गार काढले आहेत :--

" भांडवलदारवर्गाची सत्ता उलथून पाडण्यांत आल्यामुळें तो **दसपट** निकरानें प्रतिकार करूं लागतो, व या भांडवलदारवर्गाविरुद्ध-- **अधिक प्रबळ** असलेल्या शत्रूविरुद्ध--नव्या वर्गानें अत्यंत निर्धारानें व निर्दयपणें युद्ध चालविणें हाच कामगार हुकुमशाहीचा अर्थ आहे.' ..... ." जुन्या समाजाच्या शक्तींविरुद्ध व परंपरागत रूढींविरुद्ध अव्याहतपणें लढणें हाच कामगार हुकुमशाहीचा अर्थ होय. हा लढा कधीं रक्तमय तर कधीं रक्तहीन असतो. कधीं हिंसात्मक तर कधीं शांततायुक्त असतो, कधीं लष्करी स्वरूपाचा तर कधीं आर्थिक स्वरूपाचा असतो, शिक्षणाच्या क्षेत्रांत व राज्यकारभाराच्या क्षेत्रांतही हा लढा चालवावा लागतो."

हीं कार्यें अल्प अवधींत पार पाडण्याची मुळींच शक्यता नाहीं हें कांहीं मुद्दाम सिद्ध करावयास नको. चार दोन वर्षांत हें सर्व कार्य संपविणें शक्य नाहीं. म्हणून कामगार हुकुमशाहीचा कालखंड, भांडवलशाहीच्या अवस्थेंतून कम्युनिझमच्या अवस्थेंत संक्रमण करण्याचा कालखंड, हा एक झटपट निघून जाणारा तात्पुरता कालखंड आहे असें समजतां कामा नये, 'अति-क्रांतिकारक'

स्वरूपाचीं कृत्यें करणें व फर्मानें काढणें एवढेंच या कालखंडाचें वैशिष्टच मानतां कामा नये. हा एक स्वतंत्र ऐतिहासिक कालखंड असतो, या काळांत अनेक स्वकीय युद्धें व परकीयांशीं झगडे उद्भवतात, या काळांत संघटनेचें व आर्थिक रचनेचें कार्य अखंडपणें चालू असतें, या काळांत कैकदां मोर्चा पुढें सरसावतो तर कैकदां माघारही घ्यावी लागते, कैकदां विजय मिळतात तर कैकदां पराभवही पदरीं येतात. समाजसत्तावादाच्या संपूर्ण विजयासाठीं आवश्यक असलेली आर्थिक व सांस्कृतिक पूर्वपरिस्थिति निर्माण करतां यावी म्हणून हा ऐतिहासिक कालखंड जरूरीचा असतोच, पण त्याखेरीज (१) कामगारवर्गाला देशाचा राज्यकारभार चालविण्यास समर्थ होण्यासाठीं जरूर तें शिक्षण मिळविण्याची व स्वतःचा कणखरपणा वाढविण्याची संधि देणें, आणि (२) समाजसत्तावादी उत्पादनाची संघटना करणें खात्रीनें शक्य होईल अशा रीतीनें मध्यमवर्गीय जनतेच्या मनाची घडण बदलणें व तिला नव्या तऱ्हेनें विचार करण्यास शिकविणें, हीं कार्यें पार पाडतां यावीं म्हणूनही हा ऐतिहासिक कालखंड जरूरीचा असतो.

मार्क्सनें कामगारांना पुढील इषारा दिला :—

> "विद्यमान परिस्थितींत बदल करण्यासाठीं, एवढेंच नव्हे तर स्वतःमध्यें बदल घडवून आणण्यासाठीं आणि राज्यसत्ता चालविण्यास स्वतःला समर्थ बनविण्यासाठीं, तुम्हांला पंधरा, वीस, किंवा पन्नास वर्षेंपर्यंत स्वकीय युद्धांच्या व आंतरराष्ट्रीय झगड्यांच्या अग्निदिव्यांतून जावें लागेल."

मार्क्सच्या विचाराच्या आधारें व त्याला अधिक विकसित स्वरूप देऊन लेनिन म्हणतो :—

> "करोडों शेतकऱ्यांना व छोट्या मालकांना आणि कचेऱ्यांत काम करणाऱ्या लाखों कारकुनांना, अधिकाऱ्यांना, व भांडवलदारवर्गांतील बुद्धिजीवी लोकांना नव्या तऱ्हेनें विचार करण्याचें शिक्षण देणें, या सर्वांना कामगार राज्यसत्तेच्या वर्चस्वाखालीं व कामगारवर्गाच्या

पुढारीपणाखालीं आणणें, त्यांच्या भांडवलदारी संवयींचें व परंपरेचें निर्मूलन करणें,––ह्या गोष्टी कामगारहुकुमशाहीच्या काळांत पार पाडाव्या लागतील......त्याचप्रमाणें खुद्द कामगारांनांही नव्या तऱ्हेनें विचार करण्याचें शिक्षण देणें जरूरीचें होईल, व हें कार्य कामगार हुकुमशाहीच्या आधारें व दीर्घ काळ लढा चालवूनच पार पाडतां येईल. कामगारसुद्धां आपले मध्यमवर्गीय पूर्वग्रह एकाएकीं सोडून देत नसतात. एकादा चमत्कार घडवून आणून आजन्म–कुमारी मेरीच्या आदेशास अनुसरून, किंवा एकाद्या घोषवाक्याची, ठरावाची किंवा फर्मानाची अंमलबजावणी करून कामगारांना आपले मध्यमवर्गीय पूर्वग्रह सोडून देण्यास लावतां येईल हें शक्य नाहीं. सार्वत्रिक प्रमाणावर फैलावलेल्या मध्यमवर्गीय विचारप्रवाहांविरुद्ध दीर्घ कालपर्यंत लढा चालवूनच ही गोष्ट शक्य होईल."

**(१) कामगार हुकुमशाही म्हणजे भांडवलदार वर्गावर कामगारवर्गाचें वर्चस्व**:––आतांपर्यंतच्या विवेचनावरून स्पष्टपणें दिसून येतें कीं कामगार हुकुमशाही म्हणजे केवळ नव्या व्यक्तींचें सरकार नव्हे, नुसतें 'मंत्रिमंडळ' बदलावयाचें आणि जुनी आर्थिक व राजकीय व्यवस्था तशीच कायम ठेवावयाची हा कांही कामगार हुकुमशाहीचा अर्थ नव्हे. मेन्शेविक व सर्व देशांतील संधिसाधू हुकुमशाहीला आगीप्रमाणें घाबरतात आणि म्हणून 'कामगार हुकुमशाही' या कल्पनेएवजीं 'सत्ता काबीज करणें' ही कल्पना घुसडून देतात, व 'सत्ता काबीज करणें' याचा अर्थसुद्धां 'मंत्रिमंडळ' बदलणें आणि शायडेमान–नॉस्के, मॅकडोनाल्ड–हेंडरसन, यांच्यासारख्या माणसांचें नवें मंत्रिमंडळ अधिकारारूढ होणें एवढाच करतात. हे आणि असले मंत्रिमंडळांतील फेरबदल, आणि कामगार हुकुमशाही किंवा खऱ्याखुऱ्या कामगारवर्गानें खरीखुरी सत्ता काबीज करणें, या दोहोंचा अर्थात् काडीइतकाही संबंध नाहीं. मॅकडोनाल्ड, शायडेमान, वगैरेंचें मंत्रिमंडळ स्थापन झालें असेल व त्याचवेळीं जुनी भांडवलदारी समाजव्यवस्था मात्र तशीच कायम राहूं दिली असेल, तर त्यांचें हें नामधारी सरकार भांडवलदारवर्गाला उपयोगीं पडणारें साधनच होईल,

साम्राज्यशाहीचें व्रण झांकून ठेवण्यासाठीं घेतलेला बुरखा म्हणूनच त्याचा उपयोग होईल, गांजलेल्या व पिळल्या जाणाऱ्या जनतेच्या क्रांतिकारक चळवळीवर घाव घालण्यासाठीं भांडवलदारवर्गाच्या हातांतील शस्त्र म्हणूनच त्याचा उपयोग होईल, दुसरें कोणतेंही कार्य त्याच्याकडून होऊं शकणार नाहीं. कसलातरी बुरखा घेतल्याशिवाय उघड उघडपणें जनतेची गांजणूक व पिळणूक करणें भांडवलदारवर्गाला कधीं कधीं गैरसोईचें, तोटयाचें, व मुष्किलीचें वाटतें, आणि अशा वेळी बुरखा म्हणून असल्या सरकारांचा उपयोग करणें त्याला आवश्यक होतें. अर्थात् असें सरकार अस्तित्वांत येणें हें भांडवलदारांच्या गोटांत आणीबाणीची परिस्थिति उत्पन्न झाल्याचेंच लक्षण असतें, तथापि अशा प्रकारचें सरकार म्हणजे वेषांतर केलेलें भांडवलदारी सरकारच असतें व तें क्रमप्राप्तच समजलें पाहिजे. मॅकडोनाल्ड-शायडेमानचें सरकार स्थापन होणें आणि कामगार वर्गानें सत्ता काबीज करणें, यांत जमीनअस्मानाचें अंतर आहे. कामगार-हुकुमशाही म्हणजे नुसतें नवें मंत्रिमंडळ नव्हे; कामगार हुकुमशाही म्हणजे नवी राज्यसत्ता, कामगारवर्गाची राज्यसत्ता, या नव्या राज्यसत्तेच्या मध्यवर्ती व स्थानिक राज्यकारभार चालविणाऱ्या संस्थाही नव्या असतात. जुन्या राज्यसत्तेच्या––भांडवलदारवर्गाच्या राज्यसत्तेच्या–राखरांगोळींतूनच ही नवी राज्यसत्ता उदयास येते.

कामगार हुकुमशाही भांडवलदारी समाजव्यवस्थेच्या पायावर उभारली जात नाहीं; भांडवलदारवर्गाची सत्ता उलथून पाडल्यानंतर भांडवलदारी समाजव्यवस्था कोलमडून पडत असतांनाच कामगार हुकुमशाही अस्तित्वांत येते, जमीनदारांची व भांडवलदारांची मालमत्ता हिरावून घेण्याच्या क्रियेंतच कामगार हुकुमशाही उदयास येते, प्रमुख उत्पादन साधनें सामाजिक मालकीचीं करण्याची क्रिया चालू असतांनाच कामगार हुकुमशाही जन्म पावते, बाहुबलावर आधारलेल्या कामगारक्रांतीच्या ओघांतच तिची उत्पत्ति होते. कामगार हुकुमशाही ही एक क्रांतिकारक सत्ता असते व भांडवलदार वर्गाविरुद्ध बाहुबलाचा उपयोग करणें हा तिचा पाया असतो.

राज्यसत्ता म्हणजे आपल्या वर्गशत्रूंचा प्रतिकार चिरडून टाकण्यासाठीं राज्यकर्त्या वर्गानें हातीं घेतलेलें शस्त्रच होय. **या बाबतींत** कामगारवर्गाची हुकुमशाही व दुसऱ्या कोणत्याही वर्गाची हुकुमशाही यांत तत्त्वतः फरक नाही, कारण कामगारवर्गाची राज्यसत्ता म्हणजे भांडवलदारवर्गाला चिरडून टाकण्याचें शस्त्रच होय. पण एक **मूलगामी** फरक मात्र जरूर आहे व तो म्हणजे--यापूर्वीची प्रत्येक वर्गीय राज्यसत्ता पिळणूक करणाऱ्या अल्पसंख्य वर्गानें पिळल्या जाणाऱ्या बहुसंख्य जनतेवर लादलेली हुकुमशाही असे, परंतु कामगार हुकुमशाही ही पिळल्या जाणाऱ्या बहुसंख्य जनतेनें पिळणूक करणाऱ्या अल्पसंख्य वर्गावर लादलेली हुकुमशाही असते.

सारांश, **कामगार हुकुमशाही म्हणजे भांडवलदारवर्गावर कामगारवर्गाचें राज्य होय; या राज्याला कायद्यानें कोणतीहि मर्यादा घातलेली नसते, तें बाहुबलावर आधारलेलें असतें, त्याला श्रम करणाऱ्या व पिळल्या जाणाऱ्या जनसमुदायाची सहानुभूति व पाठिंबा असतो.** (**'राज्यसत्ता व क्रांति'** हें पुस्तक पहा. )

यावरून दोन मुख्य निष्कर्ष निघतात.

**पहिला निष्कर्ष**--कामगार हुकुमशाही ही 'सपूर्ण' लोकशाही असू शकत नाही, सर्वांची-गरीबांप्रमाणेंच श्रीमंतांचीसुद्धां--लोकशाही असू शकत नाही. लेनिनच्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे कामगार हुकुमशाही ही "**नव्या प्रकारची** लोकशाही असली पाहिजे--कामगारवर्ग व एकंदर मालमत्ताहीन जनता **यांच्यासाठीं** ती असली पाहिजे," आणि ती "**नव्या प्रकारची** हुकुमशाही असली पाहिजे--भांडवलदारांच्या **विरुद्ध** ती असली पाहिजे." 'सर्वांचा' समान दर्जा, 'निर्भेळ' लोकशाही, 'संपूर्ण' लोकशाही, वगैरेंविषयीं कौट्स्की कंपूनें चालविलेली बडबड म्हणजे पिळणारे व पिळले जाणारे यांचा समान दर्जा असू शकत नाहीं हें निर्विवाद सत्य लपवून ठेवण्यासाठीं भांडवलदार-वर्गानें तयार केलेला धुराचा पडदाच होय. 'निर्भेळ' लोकशाहीचा सिद्धांत

हा कामगारवर्गातील वरच्या थराचा सिद्धांत आहे; या मूठभर कामगारांना साम्राज्यवादी दरवडेखोरांनीं त्यांच्या नाकांत वेसण घालून वश करून घेतलें आहे व या दरवडेखोरांकडूनच त्यांना चंदी मिळत असते. भांडवलशाहीचे व्रण झांकून ठेवणें, साम्राज्यशाहीला सफेता चढविणें, पिळल्या जाणाऱ्या जनतेविरुद्ध तिनें चालविलेल्या लढ्यांत तिला नैतिक बळ प्राप्त करून देणें,—हे उद्देश साधण्यासाठींच हा सिद्धांत तयार करण्यांत आला. भांडवलशाहीच्या अमदानींत पिळल्या जाणाऱ्या जनतेला खरेखुरे 'स्वातंत्र्याचे हक्क' मुळींच नसतात, तें शक्यच नसतें, 'स्वातंत्र्याच्या हक्कां'चा प्रत्यक्ष उपभोग घेण्यासाठी इमारती, छापखाने, कागदाचा पुरवठा, वगैरे ज्या गोष्टी अगदीं आवश्यक असतात त्या सर्व केवळ पिळणाऱ्या वर्गाच्याच मालकीच्या असतात, ही एकच गोष्ट हें सिद्ध करण्यास पुरेशी आहे. भांडवलशाहीच्या अमदानींत पिळली जाणारी जनता देशाच्या राज्यकारभारांत खरोखरीं मुळींच भाग घेत नाहीं, व घेऊं शकतच नाहीं; अत्यंत लोकसत्तावादी राजवटींतसुद्धां भांडवलशाहींतील सरकारें जनतेनें स्थापन केलेलीं नसतात, रॉथशील्ड, स्टिन्स, रॉकफेलर, मॉर्गन यांच्यासारख्यांनीच स्थापन केलेलीं असतात, ही एकच गोष्ट हें सिद्ध करण्यास पुरेशी होईल. भांडवलशाहीच्या अमदानींतील लोकशाही ही **भांडवलदारी** लोकशाही असते, पिळणूक करणाऱ्या अल्पसंख्यकांची लोकशाही असते, पिळल्या जाणाऱ्या बहुसंख्य जनतेचे हक्क मर्यादित करणें हा तिचा पाया असतो, या बहुसंख्य जनतेविरुद्धच तिचा उपयोग करण्यांत येतो. फक्त कामगार हुकुमशाहीच्या अमदानींतच पिळल्या जाणाऱ्या जनतेला खरेखुरे 'स्वातंत्र्याचे हक्क' मिळूं शकतात व देशाच्या राज्यकारभारांत खरोखरी भाग घेणें कामगारांना आणि शेतकऱ्यांना शक्य होतें. कामगार हुकुमशाहीच्या अमदानींतील लोकशाही ही कामगारांची लोकशाही असते, ती पिळल्या जाणाऱ्या बहुसंख्य जनतेची लोकशाही असते, पिळणूक करणाऱ्या अल्पसंख्य वर्गाचे हक्क मर्यादित करणें हा तिचा पाया असतो, या अल्पसंख्य वर्गाविरुद्धच तिचा उपयोग करण्यांत येतो.

**दुसरा निष्कर्ष**:––भांडवलदारी समाजपद्धति व भांडवलदारी लोकशाही यांच्या शांततामय विकासाचें फळ म्हणून कामगार हुकुमशाही अस्तित्वांत येणें शक्यच नाहीं; भांडवलदारी राज्यसत्तेचें यंत्र, भांडवलदारी सैन्य, भांडवलदारी नोकरशाहीचें यंत्र, भांडवलदारी पोलिस खातें, हें सर्व मोडून टाकल्यानंतरच त्यांतून कामगार हुकुमशाही जन्मास येऊं शकेल.

'कम्युनिस्ट जाहीरनाम्या'च्या प्रस्तावनेंत मार्क्स व एंगल्स यांनीं पुढील उद्‌गार काढले आहेत :—

> " विद्यमान राज्यसत्तेचें यंत्र जसेंच्या तसें नुसतें हस्तगत करावयाचें आणि स्वतःच्या उद्देशांसाठीं तें वापरावयाचें, ही गोष्ट कामगारवर्गाला शक्यच होणार नाही."

१८७१ सालीं कुगेलमानला लिहिलेल्या पत्रांत मार्क्स म्हणतो कीं कामगार–क्रांतीचें कार्य

> " नोकरशाहीचें व सैन्यव्यवस्थेचें यंत्र एकाच्या हातांतून काढून घेऊन दुसऱ्याच्या हातीं देणें एवढेंच आहे असा पूर्वी समज होता, पण आतां तसें समजून चालणार नाही; त्या यंत्राचा **चक्काचूर करणें** हेंच कामगार–क्रांतीचें कार्य आहे आणि यूरपखंडांत कोणतीही खरीखुरी लोकक्रांति घडून येण्यासाठीं ही एक आवश्यक अट आहे."
> ( ता. १२-४-१८७१ चें पत्र.)

या विधानांत मार्क्सनें 'यूरपखंडांत' असा जो शब्द वापरला आहे त्यामुळें सर्व देशांतील संधिसाधूंना व मेन्शेविकांना अशी ओरड करण्याची संधि मिळाली कीं निदान यूरपखंडाबाहेरील कांहीं देशांत (इंग्लंड, अमेरिका, येथें) भांडवलदार लोकशाहीचें कामगार लोकशाहींत शांततामय विकासक्रमानें रूपांतर होण्याची शक्यता मार्क्सनें कबूल केली आहे. मार्क्सला ही शक्यता मान्य होती यांत शंका नाहीं, व एकोणिसाव्या शतकाच्या आठव्या दशकांत त्याला इंग्लंड व अमेरिकेच्या बाबतींत ही शक्यता मान्य करण्यास सबळ

कारणेंही होतीं. त्यावेळीं मक्तेदारी भांडवलशाही व साम्राज्यशाही अजून अस्तित्वांत आली नव्हती. ह्या देशांचा विकास कांहीं विशिष्ट परिस्थितींत झाला असल्यामुळें तेथें त्यावेळीं पुरेशा विकसित स्वरूपांत लष्करशाही व नोकरशाही अजून अस्तित्वांत आली नव्हती. विकसित स्वरूपांत साम्राज्यशाही अस्तित्वांत येण्यापूर्वीची परिस्थिति अशी होती, परंतु मागाहूनच्या काळांत, तीस-चाळीस वर्षांच्या अवधींत, ह्या देशांतील परिस्थितीत आमूलाग्र बदल झाला; साम्राज्यशाहीचा विकास होऊन एकूणएक भांडवलदारी देशांत तिचें वर्चस्व स्थापन झालें, इंग्लंड व अमेरिका या देशांतसुद्धां लष्करशाही व नोकरशाही अस्तित्वांत आली, इंग्लंड व अमेरिका या देशांत शांततामय विकासाला अनुकूल असलेली खास परिस्थिति नाहींशी झाली,—आणि त्यानंतर मात्र या देशांना अपवाद समजणें अर्थात् अशक्य झालें.

१९१७ सालीं लेनिननें पुढील उद्‌गार काढले आहेत :—

"मार्क्सनें ('यूरपखंडांत' हा शब्द वापरून) घातलेली ही मर्यादा आज १९१७ सालीं, पहिल्या साम्राज्यवादी महायुद्धाच्या काळांत, मुळीच लागू पडत नाहीं. इंग्लंड व अमेरिका हे देश अँग्लो-सॅक्सन 'स्वातंत्र्या'चे जगांतील सर्वांत मोठे व अखेरचे प्रतिनिधि होते, कारण तेथें लष्करशाही व नोकरशाही अस्तित्वांत आली नव्हती; पण हे देशसुद्धां आतां घसरत जाऊन लष्करशाहीच्या व नोकरशाहीच्या किळसवाण्या रक्तमय चिखलांत लोळण घेऊं लागले आहेत. सर्व यूरपभर पसरलेल्या या लष्करशाही-नोकरशाहीच्या संस्थांची हुकमत प्रत्येक गोष्टीवर चालते व त्यांच्या टांचेखालीं प्रत्येक गोष्ट चिरडली जाते. 'राज्यसत्तेच्या 'विद्यमान्' (रेडी-मेड) यंत्राचा' चक्काचूर करणें, **नायनाट** करणें, हीच 'कोणतीही खरीखरी लोक-क्रांति घडून येण्यासाठी आवश्यक अट' होय, हें विधान आज इंग्लंड व अमेरिका या दोन्ही देशांना लागू पडतें. (१९१४ ते १९१७ च्या काळांत या देशांतील

राज्यसत्तेचें यंत्र 'यूरपखंडां'तील सर्व देशांइतकेंच साम्राज्यवादी पूर्णावस्थेस जाऊन पोहोंचलें आहे.)"

हेंच दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे, कामगार-क्रांति बाहुबलानेंच घडून येते व ती घडून येण्यासाठीं अगोदर भांडवलदारी राज्यसत्तेचा चक्काचूर करणें ही एक आवश्यक अट असते हा जगांतील सर्व साम्राज्यवादी देशांतल्या क्रांतिकारक चळवळीचा अपरिहार्य नियम आहे.

फार दूरच्या भविष्यकाळीं, जर अत्यंत महत्वाच्या भांडवलदारी देशांत कामगारवर्ग विजयी झाला असेल व (समाजसत्तावादी जगाभोंवतालचा) सध्यांचा भांडवलशाहीचा गराडा उठून त्याऐवजीं (भांडवलदारी जगाभोंवती) जर समाजसत्तावादाचा गराडा पडलेला असेल, तर मात्र कांहीं विशिष्ट भांडवलदारी देशांत 'शांततामय' मार्गानें विकास होणें अर्थात् अगदीं शक्य आहे. आंतरराष्ट्रीय परिस्थिति 'प्रतिकूल' असलेली पाहून त्या देशांतील भांडवलदारांना 'स्वेच्छेनें' कामगारवर्गाला पुष्कळशा सवलती देणें सोईचें वाटेल. परंतु ही गोष्ट फार तर अत्यंत दूरच्याच भविष्यकाळांत घडून येईल, व त्यावेळीसुद्धां जरूर ती परिस्थिति अस्तित्वांत असेल हा नुसता एक संभव आहे. आजउद्यांचा विचार करावयाचा तर असें कांहीं घडून येण्याची अपेक्षा करण्यास काडी-इतकाही आधार नाहीं.

म्हणूनच लेनिननें काढलेले पुढील उद्गार अगदीं बरोबर आहेत :—

"भांडवलदारी राज्यसत्तेचें यंत्र जबरदस्तीनें नष्ट केल्याशिवाय व त्याच्या ऐवजीं नवीन राज्ययंत्र अस्तित्वांत आणल्याशिवाय कामगारक्रांति शक्यच नाहीं."

(३) **सोविएत राज्य म्हणजे कामगार हुकुमशाहीच्या राज्यसत्तेचें मूर्तस्वरूप**—भांडवलदारवर्गाला चिरडून टाकणें, भांडवलदारी राज्यसत्तेच्या यंत्राचा चक्काचूर करणें, आणि भांडवलदारी लोकशाहीऐवजीं कामगार

लोकशाही अस्तित्वांत आणणें, हाच कामगार हुकुमशाहीच्या विजयाचा अर्थ होय. एवढी गोष्ट अगदीं स्पष्ट आहे. परंतु हें प्रचंड कार्य कोणत्या संघटनच्या द्वारें पार पाडतां येईल ? भांडवलदारी पार्लमेंटरी विचारसरणीच्या पायावर उभारलेले कामगार-संघटनेचे जुने प्रकार हें कार्य पार पाडण्यास अपुरे आहेत, यांत शंका नाहीं. तर मग भांडवलदारी राज्यसत्तेच्या यंत्राची चिता रचण्यास जे समर्थ होतील, या यंत्राचा चक्काचूर करण्यास, भांडवल-दारी लोकशाहीऐवजीं कामगार लोकशाही अस्तित्वांत आणण्यास, एवढेंच नव्हे तर कामगारवर्गाच्या राज्यसत्तेचे आधारस्तंभ बनण्यास जे समर्थ होतील, असे कामगार-संघटनेचे नवे प्रकार कोणते ?

कामगार-संघटनेचा हा नवा प्रकार सोविएत हा होय.

जुन्या प्रकारच्या संघटनेशीं तुलना करतां सोविएतें जास्त सामर्थ्यवान असतात, याचें रहस्य काय ?

पहिली गोष्ट--सोविएतें म्हणजे अत्यंत **व्यापक** स्वरूपाच्या कामगार संघटना होत, कारण त्यांच्यांत--आणि फक्त त्यांच्यांतच--एकूणएक, कामगारांचा समावेश होतो.

दुसरी गोष्ट--गांजलेल्या व पिळल्या जाणाऱ्या सर्व जनतेचा, कामगारांचा व शेतकऱ्यांचा, शिपायांचा व खलाश्यांचा, ज्यांच्यांत समावेश होतो, आणि म्हणून बहुजनसमाजाचें अग्रदल असलेला कामगारवर्ग जनतेच्या लढ्यांतील आपलें राजकीय नेतृत्व ज्यांच्यांत अत्यंत सुलभतेनें व पूर्णांशानें अमलांत आणूं शकतो, अशा जनसामुदायिक संघटना **फक्त** सोविएतेंच होत.

तिसरी गोष्ट--सोविएतें म्हणजे बहुजनसमाजाच्या क्रांतिकारक लढ्याचीं, बहुजनसमाजाच्या राजकीय उठावांचीं, जनतेच्या बंडाची, **अत्यंत प्रभावी साधनें होत.** बँक-भांडवल व त्याचे राजकीय उपग्रह यांची सर्व सत्ता हाणून पाडण्यास सोविएतें समर्थ असतात.

चौथी गोष्ट--सोविएतें म्हणजे प्रत्यक्ष जनतेशीं **अत्यंत निकट** संबंध अस-लेल्या संस्था होत. त्या अत्यंत लोकशाही स्वरूपाच्या संघटना असतात व

म्हणून जनतेतर्फे बोलण्याचा त्यांना सर्वांत जास्त अधिकार असतो. नव्या राज्यसत्तेची उभारणी करण्याच्या कार्यांत व राज्यकारभार चालविण्याच्या कार्यांत प्रत्यक्ष भाग घेण्यास एकंदर जनतेला सोविएतें प्रोत्साहन देतात. जुनी समाजव्यवस्था नष्ट करण्याच्या लढ्यांत आणि नवी कामगारवर्गीय व्यवस्था अस्तित्वांत आणण्याच्या लढ्यांत बहुजनसमाजाच्या क्रांतिकारक कर्तृत्वाचा, पुढारीपणाचें कार्य करण्याच्या वृत्तीचा व विधायक कार्यक्षमतेचा पूर्ण उपयोग करून घेणाऱ्या संस्था ह्याच होत.

सोविएत सत्ता म्हणजे स्थानिक सोविएतांचें एकीकरण करून बनविलेली संयुक्त राज्यसत्तांची संघटना, गांजलेल्या व पिळल्या जाणाऱ्या जनतेचें अग्रदल या नात्यानें व राज्यकर्ता वर्ग या नात्यानें कामगारवर्गाच्या राज्यसत्तेची संघटना. या स्थानिक सोविएतांचें एकीकरण करून सोविएत लोकराज्य अस्तित्वांत येतें.

या (सोविएत) संघटना अत्यंत स्पष्टपणें जनसामुदायिक स्वरूपाच्या असतात, भांडवलदारांकडून व जमीनदारांकडून जे वर्ग पूर्वी गांजले जात होते त्याच वर्गाच्या या अत्यंत क्रांतिकारक संघटना असतात, आणि ह्याच संघटना आतां "राज्यसंस्थेच्या समग्र सत्तेचा, राज्यसत्तेच्या समग्र यंत्राचा, **चिरकालिक व एकमेव** पाया" बनतात. "अत्यंत लोकसत्तावादी भांडवलदारी राज्यांतसुद्धां बहुजनसमाजाला कायद्याच्या दृष्टीनें समान दर्जा असला तरी वस्तुतः राजकीय जीवनांत भाग घेण्यास व लोकशाही हक्कांचा आणि स्वातंत्र्याचा उपभोग घेण्यास हजारों क्लृप्त्यांच्या साहाय्यानें मज्जाव करण्यांत येत असतो, आणि नेमकें ह्याच बहुजनसमाजाला आतां राज्यसंस्थेचा लोकशाही कारभार चालविण्याच्या कार्यांत **सतत** व विशेषतः **निर्णायक रीतीनें** भाग घेण्यास अचूकपणें प्रवृत्त करण्यांत येतें." सोविएत सत्तेचें सार हेंच होय.

म्हणूनच सोविएत सत्ता म्हणजे राज्यसंस्थेच्या संघटनेचा एक **नवा प्रकार** होय. पूर्वीच्या भांडवलदारी-लोकसत्तावादी व पार्लमेंटरी प्रकारांहून तो तत्त्वतः भिन्न आहे. सोविएत सत्ता म्हणजे राज्यसंस्थेचा एक **नवा नमुना**

होय. श्रमिक जनतेची पिळणूक व गांजणूक करण्यास तो उपयोगीं पडूं शकत नहीं, पिळणुकीपासून व गांजणुकीपासून तिला पूर्णपणें मुक्त करण्याच्या कामींच --कामगार-हुकुमशाहीपुढील कार्यं पार पाडण्यालाच--तो उपयोगी पडूं शकतो.

सोविएत सत्तेचा उदय होतांच "भांडवलदारी-लोकसत्तावादी पार्लमेंटरी पद्धतीचें युग समाप्त झालें आहे व जगाच्या इतिहासांतील नवें प्रकरण --कामगार हुकुमशाहीचें युग--सुरू झालें आहे," असें लेनिननें म्हटलें आहे व तें अगदीं बरोबर आहे.

सोविएत सत्तेचीं खास वैशिष्ट्यें कोणतीं ?

सोविएत सत्तेला अत्यंत स्पष्ट जनसामुदायिक स्वरूप असतें. जोंपर्यंत वर्गभेद अस्तित्वांत आहेत तोंपर्यंत अस्तित्वांत असलेल्या इतर कोणत्याही राज्यसंस्थेच्या संघटनेपेक्षां सोविएत राज्यसंघटनेचें स्वरूप अधिक लोकसत्तावादी असतें. याचें कारण असें कीं पिळणूक करणाऱ्यांविरुद्ध कामगारांनीं व पिळल्या जाणाऱ्या शेतकऱ्यांनीं चालविलेल्या लढ्यांत या दोन वर्गांत जो स्नेहसंबंध स्थापन होतो व जें सहकार्य अस्तित्वांत येतें त्याला सोविएत सत्तेच्या क्षेत्रांतच व्यक्त स्वरूप प्राप्त होत असतें व सोविएत सत्तेचें सर्व कार्य या स्नेहसंबंधावर व सहकार्यावरच आधारलेलें असतें, आणि म्हणून सोविएत सत्ता म्हणजे जनतेच्या बहुसंख्य विभागानें अल्पसंख्य विभागावर चालविलेली सत्ता असते, ती बहुसंख्य जनतेची राज्यसत्ता, ती बहुसंख्य जनतेच्या हुकुमशाहीचें मूर्तस्वरूप असते.

सोविएत सत्तेला वर्गभेदयुक्त समाजांतील इतर कोणत्याही राज्यसंस्थेच्या संघटनेपेक्षां अधिक आंतरराष्ट्रीयवादी स्वरूप असतें. याचें कारण असें कीं सोविएत सत्ता सर्व प्रकारच्या राष्ट्रीय जुलुमशाहीचा नायनाट करते व निरनिराळ्या राष्ट्रगटांच्या श्रमिक जनतेच्या सहकार्यावरच ती आधारलेली असते, व अशा रीतीनें या निरनिराळ्या राष्ट्रगटांच्या जनतेचें एकीकरण करून त्यांचें एक संयुक्त संघराज्य बनविण्यास ती मदत करते.

सोविएत सत्तेची रचनाच अशी असते कीं त्यामुळें गांजलेल्या व पिळल्या जाणाऱ्या जनतेचें अग्रदल असलेल्या कामगारवर्गाला आपली नेतृत्वाची भूमिका पार पाडणें सोपें जातें. कामगारवर्ग हा सोविएतांचा अत्यंत संघटित व अत्यंत वर्गजागृत गाभा असतो.

लेनिन म्हणतो :—

> "सर्व क्रांत्यांचा व गांजलेल्या जनतेच्या सर्व चळवळींचा अनुभव पाहिल्यास, जागतिक समाजसत्तावादी चळवळीचा अनुभव पाहिल्यास, आपणांला असा धडा मिळतो कीं श्रम करणाऱ्या व पिळल्या जाणाऱ्या जनतेच्या विखुरलेल्या व मागासलेल्या विभागांना एकत्रित करण्याचें व पुढें नेण्याचें कार्य पार पाडण्यास फक्त कामगारवर्गच समर्थ आहे."

हा अनुभवसिद्ध धडा प्रत्यक्ष व्यवहारांत अंमलांत आणणें सोविएत सत्तेच्या विशिष्ट रचनेमुळें सुकर होतें.

सोविएत सत्तेमध्यें कायदे करणें व अंमलबजावणी करणें हीं दोन्हीं कार्यें एकाच संस्थेच्या हातीं केंद्रित केलेलीं असतात, आणि प्रादेशिक मतदारसंघाऐवजीं उद्योगधंद्यांवर—गिरण्याकारखान्यांवर—आधारलेले मतदारसंघ असतात. त्यामुळें राज्यकारभाराशीं कामगारांचा व एकंदर श्रमिक जनतेचा प्रत्यक्ष संबंध जोडला जातो व देशाचा राज्यकारभार कसा चालवावा याचें त्यांना शिक्षण मिळतें.

सैन्याला भांडवलदारांच्या हुकमतीपासून सोडविणें सोविएत सत्तेलाच शक्य असतें. भांडवलदारी समाजव्यवस्थेंत सैन्य हें जनतेची गांजणूक करण्याचें साधन असतें; त्याचें हें स्वरूप बदलून त्याला देशी व परदेशी भांडवलदारांपासून जनतेची मुक्तता करण्याचें साधन बनविणें सोविएत सत्तेलाच शक्य होतें.

> "पूर्वीचें—म्हणजे भांडवलदारवर्गाचें—नोकरशाहीचें आणि न्यायव्यवस्थेचें यंत्र ताबडतोब कायमचें मोडून टाकण्यास राज्यसंस्थेची सोविएत स्वरूपाची संघटनाच समर्थ असते." (लेनिन).

सोविएत प्रकारची राज्यसंस्था श्रम करणाऱ्या व पिळल्या जाणाऱ्या जनतेच्या सामुदायिक संघटनांना राज्यकारभारांत सतत व अनिर्बंध भाग घेण्यास प्रवृत्त करते, व म्हणून राज्यसंस्थेचा लय (' विदरिंग अवे ') होण्याला अनुकूल परिस्थिति निर्माण करणें फक्त सोविएत राज्यसत्तेलाच शक्य होतें. भविष्यकाळांतील राज्यसंस्थाविहीन कम्युनिस्ट समाज अस्तित्वांत आणण्यांतील हें एक मूलभूत कार्य आहे.

कामगारवर्गाचें आर्थिक दास्यविमोचन, समाजसत्तावादाचा संपूर्ण विजय, साध्य करण्यासाठीं राजकीय संघटनेचा कोणता प्रकार आवश्यक आहे, हें शोधून काढण्याचा प्रयत्न दीर्घकाल चालू होता. अखेरीस त्याचा शोध लागला आहे. सोविएत राज्य हाच तो प्रकार होय.

पॅरिस कम्यून हें या प्रकाराचें बीजस्वरूप होतें; सोविएत सत्ता हें त्याचें विकसित व अंतिम स्वरूप आहे.

> " कामगार, सैनिक व शेतकरी यांच्या प्रतिनिधींच्या सोविएतांचें लोकराज्य म्हणजे लोकसत्तावादी संस्थेचा अधिक उच्च नमुना होय, एवढेंच नव्हे तर समाजसत्तावादाची मजल गांठण्याचें कार्य अगदीं क्लेशाशिवाय पार पाडण्यास समर्थ असलेला हा एकमेव राजसंस्थेचा प्रकार आहे." (लेनिन.)

★

# [५]

# शेतकऱ्यांचा प्रश्न

या विषयावर बोलतांना मी चार मुद्यांची चर्चा करणार आहें:— (१) या प्रश्नाचें स्वरूप; (२) भांडवलदारी-लोकसत्तावादी क्रांतीच्या काळांत शेतकरीवर्गाची भूमिका; (३) कामगार-क्रांतीच्या काळांत शेतकरीवर्गाची भूमिका; (४) सोविएत सत्तेचा पाया मजबूत झाल्यानंतरच्या काळांत शेतकरी वर्गाची भूमिका.

**(१) या प्रश्नाचें स्वरूप**:—शेतकऱ्यांचा प्रश्न हाच लेनिनवादांतील मूलभूत मुद्दा होय, शेतकरीवर्गाचा प्रश्न—शेतकरीवर्गाची भूमिका व त्याचें तौलनिक महत्व—याच्या चर्चेपासूनच लेनिनवादाची सुरवात होते, असें कांहीजणांचें मत आहे. हें मत अजिबात चुकीचें आहे. लेनिनवादाचा मूलभूत प्रश्न, त्याचा आरंभबिंदु, शेतकऱ्यांचा प्रश्न हा नसून कामगार हुकुमशाही हाच आहे, कामगार हुकुमशाही कोणत्या परिस्थितींत स्थापन करतां येईल व तिचा पाया कोणत्या परिस्थितींत मजबूत करतां येईल हाच आहे. शेतकऱ्यांचा प्रश्न हा त्यांतून उत्पन्न होणारा गौण प्रश्न आहे, सत्ता काबीज करण्याच्या लढ्यांत कामगारवर्गाला साथ देणाऱ्या दोस्तांचा प्रश्न या नात्यानेंच त्याला महत्त्व आहे.

तथापि शेतकऱ्यांचा प्रश्न कमी महत्वाचा आहे असें यावरून मुळींच सिद्ध होत नाही, कामगार-क्रांतीच्या दृष्टीनें शेतकऱ्यांचा प्रश्न फारच महत्वाचा व जिव्हाळ्याचा आहे हें निर्विवाद होय. रशियन मार्क्सवाद्यांनीं शेतकरी प्रश्नाचा गंभीरपणें अभ्यास करण्यास पहिली (१९०५ ची) क्रांति जवळ येऊन ठेपली होती अशा वेळींच सुरवात केली, हें सर्वांना ठाऊक आहेच. झारशाहीचें उच्चाटन करण्याचा व कामगारवर्गाचें पुढारीपण स्थापन करण्याचा प्रश्न त्यावेळी अत्यंत व्यापक स्वरूपांत पार्टीपुढें उपस्थित झाला होता.

आगामी भांडवलदारी क्रांतींत कामगारवर्गाचा दोस्त कोण असणार, हा त्यावेळीं निकडीचा व जिव्हाळ्याचा प्रश्न होऊन बसला होता. कामगार-क्रांतीच्या काळांत तर रशियांतील शेतकरी प्रश्नाला याहूनही अधिक निकडीचें स्वरूप आलें, ही गोष्टसुद्धां सर्वांना ठाऊक आहेच. कामगार हुकुमशाही कशी स्थापन करावयाची व कशी टिकवावयाची हा त्यावेळचा प्रश्न होता, व आगामी कामगार-क्रांतींत कामगारवर्गाचा दोस्त कोण असणार हा प्रश्न त्यांतूनच उपस्थित झाला. हें साहजिकच होतें. सत्ता काबीज करण्यासाठीं ज तयारी करीत असतात व पुढें सरसावत असतात त्यांनीं आपले खरे दोस्त कोण हा प्रश्न महत्वाचा समजणें अपरिहार्यच होय.

या अर्थानें शेतकऱ्यांचा प्रश्न हा कामगार-हुकुमशाहीच्या सर्वसाधारण प्रश्नाचाच एक भाग आहे, आणि या दृष्टीनें तो लेनिनवादांतील एक अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे.

शेतकरी प्रश्नाच्या बाबतींत सेकंड इंटरनॅशनलमधील पक्षांची वृत्ति उपेक्षेची व कधीं कधीं तर प्रत्यक्ष हेटाळणीची असते. पाश्चिमात्य देशांचा विकास विशिष्ट परिस्थितींत होत आहे, एवढेंच कांहीं या वृत्तीचें कारण नव्हे. या वृत्तीचें मुख्य कारण असें कीं सेकंड इंटरनॅशनलमधील पक्षांना कामगार-हुकुमशाही मान्य नाहीं, त्यांना क्रांतीची भीति वाटते, कामगारवर्गाला सत्ता काबीज करण्याचा टप्पा गांठीपर्यंत पुढें न्यावयाचें हा विचारच त्यांच्या मनांत नाहीं. ज्यांना क्रांतीचें भय वाटतें, कामगारवर्गाला पुढें नेऊन सत्ताधारी बनवावयाचें ही गोष्टच ज्यांच्या मनाला शिवत नाहीं, अशा लोकांना क्रांतींत कामगारवर्गाचे दोस्त कोण असणार या प्रश्नाचें महत्व वाटणें मुळींच शक्य नाहीं, कामगारवर्गाच्या दोस्तांचा प्रश्न त्यांना उपेक्षा करण्याच्या योग्यतेचाच वाटतो, हा प्रश्न त्यांना निकडीचा वाटत नाही. शेतकरी प्रश्नाची कुचेष्टा करणें हें सेकंड इंटरनॅशनलच्या लब्धप्रतिष्ठितांना सभ्यपणाचें लक्षण वाटतें, 'अस्सल' मार्क्सवादाचें चिन्ह हेंच होय असा त्यांचा समज आहे. पण वस्तुत:

यांत मार्क्सवादाचा लवलेशही आढळणार नाहीं, कारण कामगार-क्रांतीच्या आसन्नतेच्या काळांत शेतकरी प्रश्नासारख्या महत्वाच्या प्रश्नाची उपेक्षा करणें म्हणजे कामगार हुकुमशाहीचा सिद्धांत अमान्य करणेंच होय, मार्क्स-वादाशीं उघडउघडपणें बेइमानी करण्याचेंच हें स्पष्ट लक्षण होय.

शेतकऱ्यांचा प्रश्न पुढील स्वरूपांत आपणांपुढें आज उभा आहे:––शेतकरी-वर्गाच्या जीवनाच्या विशिष्ट परिस्थितीमुळें क्रांतीला पोषक होण्याची जी शक्यता त्याच्यांत निर्माण झाली होती ती आतां **समाप्त** होऊन चुकली आहे काय ? आणि ती जर समाप्त झाली नसेल, तर कामगार-क्रांतीसाठीं तिचा उपयोग करून घेण्याची कांहीं **आशा** आहे काय ? कामगार-क्रांतीसाठीं तिचा उपयोग करून घेण्यास कांहीं **आधार** आहे काय ? पाश्चिमात्य देशांत भांडवलदारी क्रांत्यांच्या वेळीं शेतकरीवर्ग भांडवलदारवर्गाची राखीव फौज होता व अजूनही आहे; त्याऐवजीं शेतकरीवर्गाला––पिळल्या जाणाऱ्या बहुसंख्य शेतकऱ्यांना–कामगारवर्गाची राखीव फौज बनविण्याची, कामगार-वर्गाचा दोस्त बनविण्याची, कांहीं आशा आहे काय ? तसें करण्यास कांहीं आधार आहे काय ?

या प्रश्नाला लेनिनवादाचें उत्तर ' होय ' असेंच आहे. शेतकरीवर्गाच्या बहुसंख्य विभागांत क्रांतीला पोषक होण्याची शक्यता अजूनही आहे, व कामगार हुकुमशाहीच्या हितासाठीं तिचा उपयोग करतां येईल, ही गोष्ट लेनिनवाद मान्य करतो. या बाबतींत लेनिनवादानें दिलेले निर्णय बिनचूक असल्याचें रशियांतील तीन क्रांत्यांच्या इतिहासानें पूर्णपणें सिद्ध केलें आहे.

यावरून प्रत्यक्ष व्यवहाराच्या बाबतींत निष्कर्ष काढावयाचा तो हा कीं, श्रम करणाऱ्या शेतकरी जनसमुदायाला त्यानें गुलामगिरीविरुद्ध व पिळणुकी-विरुद्ध चालविलेल्या लढ्यांत, जुलुमशाहीचें व दारिद्र्याचें जोखड झुगारून देण्यासाठीं चालविलेल्या लढ्यांत, पाठिंबा दिला पाहिजे, त्याला पाठिंबा देण्यास मुळींच चुकतां कामा नये. शेतकऱ्यांच्या **प्रत्येक** चळवळीला पाठिंबा दिला पाहिजे असा मात्र याचा अर्थ नव्हे, हें सांगावयास नकोच. शेतकरी-

वर्गाच्या ज्या चळवळी व जे लढे कामगारवर्गाच्या दास्यविमोचन चळवळीला प्रत्यक्षपणें किंवा अप्रत्यक्षपणें मदत करतात, कोणत्या ना कोणत्या प्रकारे कामगार-क्रांतीला पोषक होतात, शेतकरीवर्गाला कामगारवर्गाचा दोस्त व राखीव फौज बनविण्याच्या कामीं उपयोगी पडतात, अशा चळवळींना व लढ्यांना पाठिंबा दिला पाहिजे हेंच आपणांला म्हणावयाचें आहे.

(२) **भांडवलदारी-लोकसत्तावादी क्रांतीच्या काळांत शेतकरीवर्गाची भूमिका** :—१९०५ च्या पहिल्या रशियन क्रांतीपासून मार्च १९१७ च्या दुसऱ्या क्रांतीपर्यंतचा काळ हा भांडवलदारी-लोकसत्तावादी क्रांतीचा काळ होता. या काळाचें खास वैशिष्ट्य म्हणजे शेतकरीवर्गावरील उदारमतवादी भांडवलदारांचें वजन नाहींसें झालें, शेतकरीवर्ग 'कॅडेट' पक्षांतून (कॉन्स्टिट्यूशनल-डेमोक्रॅट पक्षांतून) **फुटून निघाला**, शेतकरीवर्ग कामगारवर्गाकडे व बोल्शेविक पार्टीकडे **झुकूं लागला**. या काळाचा इतिहास म्हणजे शेतकरी-वर्गाचा पाठिंबा मिळविण्यासाठी कॅडेट पक्ष (उदारमतवादी भांडवलदार) आणि बोल्शेविक पक्ष (कामगारवर्ग) यांच्या दरम्यान चाललेल्या लढ्याचाच इतिहास होय. डूमा-सभांच्या काळांतील घडामोडींमुळें या लढ्याचा निर्णय लागला, कारण चार डूमा-सभांच्या काळांत शेतकरीवर्गाला प्रत्यक्ष अनुभवानें असा धडा शिकावयास मिळाला कीं कॅडेटपक्षाच्या हातून आपणांला जमीन मिळणें शक्य नाहीं व स्वातंत्र्यही मिळणें शक्य नाहीं, जमीनदारांना झारचा पूर्ण पाठिंबा आहे व झारला कॅडेटपक्ष पाठिंबा देत आहे, आपणांला मदत करूं शकणारी एकच शक्ति आहे व ती म्हणजे शहरांतील कामगारवर्ग. डूमा-सभांच्या काळांतील घडामोडींनीं शेतकरीवर्गाच्या मनावर ठसविलेले हे धडे साम्राज्यशाही युद्धानें तर जास्तच पक्के केले, शेतकरीवर्ग भांडवलदारवर्गाच्या गोटांतून फुटून निघण्याची क्रिया पूर्ण झाली, उदारमतवादी भांडवलदार पूर्णपणें अलग पडले. कारण असें कीं झार व त्याचे भांडवलदारी दोस्त यांच्या-कडून युद्धसमाप्तीची आशा करणें अगदीं व्यर्थ आहे, अशी आशा करणें म्हणजे स्वतःची पूर्ण फसवणूक करून घेणेंच होय, ही गोष्ट युद्धाच्या काळांत स्पष्टपणें निदर्शनास आली. डूमा-सभांच्या काळांतील घडामोडींनीं प्रत्यक्ष अनुभवाच्या

आधारें हा धडा जर शिकविला नसता, तर कामगारवर्गाचें पुढारीपण प्रस्थापित करणे अशक्य झालें असतें.

भांडवलदारी-लोकसत्तावादी क्रांतीच्या काळांत कामगार व शेतकरी यांची दोस्ती घडून आली ती या रीतीनेंच. झारशाहीचें उच्चाटन करण्याच्या संयुक्त लढयांत कामगारवर्गाचे पुढारीपण प्रस्थापित झालें तें या रीतीनेच. या पुढारीपणामुळें १९१७ च्या फेब्रुवारी क्रांतीचा टप्पा गांठणें शक्य झालें.

पाश्चिमात्य देशांतील (इंग्लंड, फरान्स, जर्मनी व ऑस्ट्रिया या देशांतील) भांडवलदारी क्रांत्या निराळ्या मार्गानें झाल्या, हें सुप्रसिद्धच आहे. त्या देशांत क्रांतीचें पुढारीपण कामगारवर्गाच्या हातीं नव्हतें, उदारमतवादी भांडवलदारवर्गाच्या हातींच होतें, कारण कामगारवर्ग कमकुवत होता व तो स्वतंत्र राजकीय शक्ति बनूं शकला नव्हता. त्या देशांत कामगारवर्गानें नव्हे, तर उदारमतवादी भांडवलदारवर्गानें शेतकऱ्यांना सरंजामदारी रूढींच्या जोखडापासून मुक्तता मिळवून दिली, कारण तेथील कामगारवर्ग संख्येनें लहान होता व असंघटित होता. त्या देशांत शेतकरीवर्गानें उदारमतवादी भांडवलदारांच्या खांद्याशी खांदा भिडवून जुन्या समाजपद्धतीवर हल्ला चढविला. त्या देशांत शेतकरीवर्ग भांडवलदारवर्गाची राखीव फौज बनला. याचा परिणाम असा झाला कीं त्या देशान क्रांतीमुळे भांडवलदारवर्गाचें राजकीय वजन अतोनात वाढलें.

उलटपक्षीं रशियांत भांडवलदारी क्रांतीमुळे अगदीं विरुद्ध प्रकारचे परिणाम घडून आले. रशियांतील क्रांतीमुळें राजकीय शक्ति या नात्यानें भांडवलदारवर्गाचें वजन वाढलें नाहीं, उलट कमीच झालें, भांडवलदारवर्गाच्या राजकीय राखींव फौजांत भर पडली नाहीं, उलट तो आपली मुख्य राखींव फौज——शेतकरीवर्ग——गमावून बसला. रशियांतील भांडवलदारी क्रांतीमुळें उदारमतवादी भांडवलदारवर्ग अग्रेसर बनला नाही, उलट क्रांतिकारक कामगारवर्गच अग्रेसर बनला व त्याच्या झेंड्याभोंवतीं करोडों शेतकरी जमा झाले.

आगामी भांडवलदारी क्रांतींत कामगारवर्गाचा दोस्त कोण असणार, हा त्यावेळीं निकडीचा व जिव्हाळ्याचा प्रश्न होऊन बसला होता. कामगार-क्रांतीच्या काळांत तर रशियांतील शेतकरी प्रश्नाला याहूनही अधिक निकडीचें स्वरूप आलें, ही गोष्टसुद्धां सर्वांना ठाऊक आहेच. कामगार हुकुमशाही कशी स्थापन करावयाची व कशी टिकवावयाची हा त्यावेळचा प्रश्न होता, व आगामी कामगार-क्रांतींत कामगारवर्गाचा दोस्त कोण असणार हा प्रश्न त्यांतूनच उपस्थित झाला. हें साहजिकच होतें. सत्ता काबीज करण्यासाठीं ज तयारी करीत असतात व पुढें सरसावत असतात त्यांनीं आपले खरे दोस्त कोण हा प्रश्न महत्वाचा समजणें अपरिहार्यच होय.

या अर्थानें शेतकऱ्यांचा प्रश्न हा कामगार-हुकुमशाहीच्या सर्वसाधारण प्रश्नाचाच एक भाग आहे, आणि या दृष्टीनें तो लेनिनवादांतील एक अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे.

शेतकरी प्रश्नाच्या बाबतींत सेकंड इंटरनॅशनलमधील पक्षांची वृत्ति उपेक्षेची व कधीं कधीं तर प्रत्यक्ष हेटाळणीची असते. पाश्चिमात्य देशांचा विकास विशिष्ट परिस्थितींत होत आहे, एवढेंच कांहीं या वृत्तीचें कारण नव्हे. या वृत्तीचें मुख्य कारण असें कीं सेकंड इंटरनॅशनलमधील पक्षांना कामगार-हुकुमशाही मान्य नाहीं, त्यांना क्रांतीची भीति वाटते, कामगारवर्गाला सत्ता काबीज करण्याचा टप्पा गांठीपर्यंत पुढें न्यावयाचें हा विचारच त्यांच्या मनांत नाहीं. ज्यांना क्रांतीचें भय वाटतें, कामगारवर्गाला पुढें नेऊन सत्ताधारी बनवावयाचें ही गोष्टच ज्यांच्या मनाला शिवत नाहीं, अशा लोकांना क्रांतींत कामगारवर्गाचे दोस्त कोण असणार या प्रश्नाचें महत्व वाटणें मुळींच शक्य नाहीं, कामगारवर्गाच्या दोस्तांचा प्रश्न त्यांना उपेक्षा करण्याच्या योग्यतेचाच वाटतो, हा प्रश्न त्यांना निकडीचा वाटत नाहीं. शेतकरी प्रश्नाची कुचेष्टा करणें हें सेकंड इंटरनॅशनलच्या लब्धप्रतिष्ठितांना सभ्यपणाचें लक्षण वाटतें, 'अस्सल' मार्क्सवादाचें चिन्ह हेंच होय असा त्यांचा समज आहे. पण वस्तुतः

यांत मार्क्सवादाचा लवलेशही आढळणार नाहीं, कारण कामगार-क्रांतीच्या आसन्नतेच्या काळांत शेतकरी प्रश्नासारख्या महत्वाच्या प्रश्नाची उपेक्षा करणें म्हणजे कामगार हुकुमशाहीचा सिद्धांत अमान्य करणेंच होय, मार्क्स-वादाशीं उघडउघडपणें बेइमानी करण्याचेंच हें स्पष्ट लक्षण होय.

शेतकऱ्यांचा प्रश्न पुढील स्वरूपांत आपणांपुढें आज उभा आहे :--शेतकरी-वर्गाच्या जीवनाच्या विशिष्ट परिस्थितीमुळें क्रांतीला पोषक होण्याची जी शक्यता त्याच्यांत निर्माण झाली होती ती आतां **समाप्त** होऊन चुकली आहे काय ? आणि ती जर समाप्त झाली नसेल, तर कामगार-क्रांतीसाठीं तिचा उपयोग करून घेण्याची कांहीं **आशा** आहे काय ? कामगार-क्रांतीसाठीं तिचा उपयोग करून घेण्यास कांहीं **आधार** आहे काय ? पाश्चिमात्य देशांत भांडवलदारी क्रांत्यांच्या वेळीं शेतकरीवर्ग भांडवलदारवर्गाची राखीव फौज होता व अजूनही आहे; त्याऐवजीं शेतकरीवर्गाला---पिळल्या जाणाऱ्या बहुसंख्य शेतकऱ्यांना--कामगारवर्गाची राखीव फौज बनविण्याची, कामगार-वर्गाचा दोस्त बनविण्याची, कांहीं आशा आहे काय ? तसें करण्यास कांहीं आधार आहे काय ?

या प्रश्नाला लेनिनवादाचें उत्तर 'होय' असेंच आहे. शेतकरीवर्गाच्या बहुसंख्य विभागांत क्रांतीला पोषक होण्याची शक्यता अजूनही आहे, व कामगार हुकुमशाहीच्या हितासाठीं तिचा उपयोग करतां येईल, ही गोष्ट लेनिनवाद मान्य करतो. या बाबतींत लेनिनवादानें दिलेले निर्णय बिनचूक असल्याचें रशियांतील तीन क्रांत्यांच्या इतिहासानें पूर्णपणें सिद्ध केलें आहे.

यावरून प्रत्यक्ष व्यवहाराच्या बाबतींत निष्कर्ष काढावयाचा तो हा कीं, श्रम करणाऱ्या शेतकरी जनसमुदायाला त्यानें गुलामगिरीविरुद्ध व पिळणुकी-विरुद्ध चालविलेल्या लढ्यांत, जुलुमशाहीचें व दारिद्र्याचें जोखड झुगारून देण्यासाठीं चालविलेल्या लढ्यांत, पाठिंबा दिला पाहिजे, त्याला पाठिंबा देण्यास मुळीच चुकतां कामा नये. शेतकऱ्यांच्या **प्रत्येक** चळवळीला पाठिंबा दिला पाहिजे असा मात्र याचा अर्थ नव्हे, हें सांगावयास नकोच. शेतकरी-

वर्गाच्या ज्या चळवळी व जे लढे कामगारवर्गाच्या दास्यविमोचन चळवळीला प्रत्यक्षपणें किंवा अप्रत्यक्षपणें मदत करतात, कोणत्या ना कोणत्या प्रकारें कामगार-क्रांतीला पोषक होतात, शेतकरीवर्गाला कामगारवर्गाचा दोस्त व राखीव फौज बनविण्याच्या कामीं उपयोगी पडतात, अशा चळवळींना व लढ्यांना पाठिंबा दिला पाहिजे हेंच आपणांला म्हणावयाचें आहे.

**(२) भांडवलदारी-लोकसत्तावादी क्रांतीच्या काळांत शेतकरीवर्गाची भूमिका** :—१९०५ च्या पहिल्या रशियन क्रांतीपासून मार्च १९१७ च्या दुसऱ्या क्रांतीपर्यंतचा काळ हा भांडवलदारी-लोकसत्तावादी क्रांतीचा काळ होता. या काळाचें खास वैशिष्टच म्हणजे शेतकरीवर्गावरील उदारमतवादी भांडवलदारांचें वजन नाहींसें झालें, शेतकरीवर्ग 'कॅडेट' पक्षांतून (कॉन्स्टि-ट्यूशनल-डेमोक्रॅट पक्षांतून) **फुटून निघाला,** शेतकरीवर्ग कामगारवर्गाकडे व बोल्शेविक पार्टीकडे **झुकूं लागला.** या काळाचा इतिहास म्हणजे शेतकरी-वर्गाचा पाठिंबा मिळविण्यासाठीं कॅडेट पक्ष (उदारमतवादी भांडवलदार) आणि बोल्शेविक पक्ष (कामगारवर्ग) यांच्या दरम्यान चाललेल्या लढ्याचाच इतिहास होय. दूमा-सभांच्या काळांतील घडामोडींमुळे या लढ्याचा निर्णय लागला, कारण चार दूमा-सभांच्या काळांत शेतकरीवर्गाला प्रत्यक्ष अनुभवानें असा धडा शिकावयास मिळाला कीं कॅडेटपक्षाच्या हातून आपणांला जमीन मिळणें शक्य नाहीं व स्वातंत्र्यही मिळणें शक्य नाहीं, जमीनदारांना झारचा पूर्ण पाठिंबा आहे व झारला कॅडेटपक्ष पाठिंबा देत आहे, आपणांला मदत करू शकणारी एकच शक्ति आहे व ती म्हणजे शहरांतील कामगारवर्ग. दूमा-सभांच्या काळातील घडामोडींनीं शेतकरीवर्गाच्या मनावर ठसविलेले हे धडे साम्राज्यशाही युद्धानें तर जास्तच पक्के केले, शेतकरीवर्ग भांडवलदारवर्गाच्या गोटांतून फुटून निघण्याची क्रिया पूर्ण झाली, उदारमतवादी भांडवलदार पूर्णपणें अलग पडले. कारण असें की झार व त्याचे भांडवलदारी दोस्त यांच्या-कडून युद्धसमाप्तीची आशा करणें अगदी व्यर्थ आहे, अशी आशा करणें म्हणजे स्वतःची पूर्ण फसवणूक करून घेणेंच होय, ही गोष्ट युद्धाच्या काळांत स्पष्टपणें निदर्शनास आली. दूमा-सभांच्या काळांतील घडामोडींनी प्रत्यक्ष अनुभवाच्या

आधारें हा धडा जर शिकविला नसता, तर कामगारवर्गाचें पुढारीपण प्रस्थापित करणें अशक्य झालें असतें.

भांडवलदारी-लोकसत्तावादी क्रांतीच्या काळांत कामगार व शेतकरी यांची दोस्ती घडून आली ती या रीतीनेंच. झारशाहीचें उच्चाटन करण्याच्या संयुक्त लढयांत कामगारवर्गाचें पुढारीपण प्रस्थापित झालें तें या रीतीनेंच. या पुढारीपणामुळें १९१७ च्या फेब्रुवारी क्रांतीचा टप्पा गांठणें शक्य झालें.

पाश्चिमात्य देशांतील (इंग्लंड, फरान्स, जर्मनी व ऑस्ट्रिया या देशांतील) भांडवलदारी क्रांत्या निराळ्या मार्गानें झाल्या, हें सुप्रसिद्धच आहे. त्या देशांत क्रांतीचें पुढारीपण कामगारवर्गाच्या हातीं नव्हतें, उदारमतवादी भांडवलदारवर्गाच्या हातींच होतें, कारण कामगारवर्ग कमकुवत होता व तो स्वतंत्र राजकीय शक्ति बनूं शकला नव्हता. त्या देशांत कामगारवर्गानें नव्हे, तर उदारमतवादी भांडवलदारवर्गानें शेतकऱ्यांना सरंजामदारी रूढीच्या जोखडापासून मुक्तता मिळवून दिली, कारण तेथील कामगारवर्ग संख्येनें लहान होता व असंघटित होता. त्या देशांत शेतकरीवर्गानें उदारमतवादी भांडवलदारांच्या खांद्याशीं खांदा भिडवून जुन्या समाजपद्धतीवर हल्ला चढविला. त्या देशांत शेतकरीवर्ग भांडवलदारवर्गाची राखीव फौज बनला. याचा परिणाम असा झाला की त्या देशात क्रांतीमुळे भांडवलदारवर्गाचें राजकीय वजन अतोनात वाढलें.

उलटपक्षीं रशियांत भांडवलदारी क्रांतीमुळे अगदीं विरुद्ध प्रकारचे परिणाम घडून आले. रशियांतील क्रांतीमुळें राजकीय शक्ति या नात्यानें भांडवलदारवर्गाचें वजन वाढलें नाहीं, उलट कमीच झालें, भांडवलदारवर्गाच्या राजकीय राखींव फौजांत भर पडली नाहीं, उलट तो आपली मुख्य राखींव फौज—शेतकरीवर्ग—गमावून बसला. रशियांतील भांडवलदारी क्रांतीमुळें उदारमतवादी भांडवलदारवर्ग अग्रेसर बनला नाही, उलट क्रांतिकारक कामगारवर्गच अग्रेसर बनला व त्याच्या झेंड्याभोंवती करोडों शेतकरी जमा झाले.

जातांजातां येथें एक मुद्दा नमूद करण्यास हरकत नाहीं व तो हा कीं तुलनात्मकदृष्टचा अत्यंत थोडया अवधींत रशियांतील भांडवलदारी क्रांतीचें कामगारक्रांतींत संक्रमण कां झालें याची उपपत्ति हीच होय. कामगारवर्गाचें पुढारीपण कामगार हुकुमशाहीचें बीजरूप होतें, कामगार हुकुमशाहीचा टप्पा गांठण्याची ती संक्रमणावस्था होती.

रशियन क्रांतीच्या या वैशिष्ठचाला पूर्वीच्या काळांतील पाश्चिमात्य देशांच्या भांडवलदारी क्रांत्यांच्या इतिहासांत तुलना नाहीं. या वैशिष्ठचाची उपपत्ति कोणती ? त्याचें मूळ कशांत आहे ?

त्याचा खुलासा असा कीं वर्गलढचाच्या ज्या परिस्थितींत रशियामध्यें भांडवलदारी क्रांतीचा विकास झाला ती पाश्चिमात्य देशांपेक्षां अधिक पुढारलेली होती. त्यावेळीं रशियन कामगारवर्ग स्वतंत्र राजकीय शक्ति होऊन बसला होता; उलटपक्षीं उदारमतवादी भांडवलदारवर्ग कामगारांची राजकीय तडफ पाहून घाबरून गेला होता, क्रांतिकारक धोरणाचें कोंणतेंही बाह्यचिन्हसुद्धां (विशेषत: १९०५ च्या धडचानंतर) त्याच्यांत दिसेनासें झालें होतें, व क्रांतीला विरोध करण्यासाठीं, कामगारांना व शेतकऱ्यांना विरोध करण्यासाठीं, त्यानें झारशीं व जमीनदारांशीं दोस्ती केली होती.

रशियन भांडवलदारी क्रांतीचें विशेष स्वरूप निश्चित करणारी पुढील परिस्थिति आपण लक्षांत ठेवली पाहिजे :—

(१) क्रांतीचा क्षण जवळ येऊन ठेपला होता अशा काळांत रशियन उद्योगधंद्यांमध्यें अपूर्व केन्द्रीकरण घडून आलें होतें. उदाहरणार्थ रशियामध्यें प्रत्येकीं ५०० हून अधिक कामगार कामावर असलेल्या कारखान्यांत एकूण कामगारांपैकीं शेंकडा ५४ हून अधिक कामगार होते, हें प्रसिद्धच आहे; उलटपक्षीं युनायटेड स्टेटस्‌सारख्या अत्यंत पुढारलेल्या देशामध्येंसुद्धां अशा कारखान्यांत एकूण कामगारांपैकीं शेंकडा ३३ हून अधिक कामगार नव्हते. ही एकच गोष्ट रशियांतील कामगारवर्गाला देशाच्या राजकीय जीवनांतील एक प्रचंड

शक्ति वनविण्यास--विशेषतः बोल्शेविक पार्टीसारखा क्रांतिकारक पक्ष अस्तित्वांत असल्यामुळें--कारणीभूत झाली, हें अगदी स्पष्ट आहे.

(२) कारखान्यांतील पिळणुकीचे प्रकार अगदी शहारे आणणारे होते, व त्याच वेळीं झारशाही मारेकऱ्यांची असह्य पोलिसशाही धुमाकूळ घालीत होती. या गोष्टीमुळें कामगारांच्या प्रत्येक महत्वाच्या संपाला भव्य राजकीय लढ्याचें स्वरूप प्राप्त झालें व अखेरपर्यंत क्रांतीशीं एकनिष्ठ राहाणारी शक्ति या नात्यानें कामगारवर्ग तावून सुलाखून कणखर बनला.

(३) रशियन भांडवलदारवर्ग राजकीयदृष्ट्या अगदींच पोंचट होता. १९०५ च्या क्रांतीनंतर त्यानें झारशाहीची थुंकी झेलण्याचें व उघड उघड प्रतिक्रांतीला पाठिंबा देण्याचें धोरण स्वीकारलें. याचें एक कारण रशियन कामगारवर्गाची क्रांतिकारक तडफ हेंच होय; यामुळें रशियन भांडवलदार-वर्गास झारशाहीच्या गळ्यांत मिठी घालणें आवश्यक वाटलें. पण याचें दुसरेंही कारण आहे व तें हें कीं हा भांडवलदारवर्ग सरकारी कंत्राटांवर प्रत्यक्षपणें अवलंबून होता.

(४) खेड्यांपाड्यांमध्ये अत्यंत शहारे आणणारे व असह्य वाटणारे भूदासपद्धतीचे अवशेष अस्तित्वांत होते, व त्याचवेळीं जमीनदारांचें संपूर्ण वर्चस्व होतें. या परिस्थितीमुळें शेतकरीवर्गाला क्रांतीची कांस धरणें आवश्यक झालें.

(५) जें जें जिवंत असेल तें सर्व गुदमरून टाकावयाचें हें झारशाहीचें धोरण होतें. झारशाहीच्या जुलुमामुळें भांडवलदारांनीं व जमीनदारांनीं चालविलेल्या जुलुमांची तीव्रता अधिकच वाढली. या गोष्टीमुळें कामगारांचा लढा व शेत-कऱ्यांचा लढा या दोहोंचा संगम होऊन क्रांतीचा प्रचंड संयुक्त प्रवाह लोंढ्या-सारखा वेगानें सरसावूं लागला.

(६) त्यावेळीं साम्राज्यशाही युद्ध चालू होतें. रशियाच्या राजकीय जीवनांतील हे सर्व परस्परविरोध साम्राज्यशाही युद्धामुळें एकवटून त्यांतून

एक सर्वव्यापी व तीव्र क्रांतिकारक अरिष्ट निर्माण झालें, व क्रांतीची प्रहार-शक्ति अचाट बनली.

अशा परिस्थितींत शेतकरीवर्गाला कुणीकडे झुकणें शक्य होतें? जमीन-दारांच्या वर्चस्वाविरुद्ध, झारच्या जुलुमशाहीविरुद्ध, आपला सर्वनाश करणाऱ्या विध्वंसक युद्धाविरुद्ध, त्यांनीं कुणाचा पाठिंबा मिळवू पाहणें शक्य होतें? उदारमतवादी भांडवलदारवर्गाचा? पण हा वर्ग तर शत्रु होता, चारही दूमा-सभांच्या दीर्घ अनुभवानें ही गोष्ट प्रत्ययास आणली होती. सोशालिस्ट-रेव्होल्युशनरी पक्षाचा? पण सोशालिस्ट-रेव्होल्युशनरी पक्ष कॅडेटपक्षापेक्षां निःसंशय 'वरा' होता व त्याचा कार्यक्रम अधिक 'सोईचा'––जवळ जवळ शेतकरीवर्गाचाच––होता हें खरें असलें तरी, या सोशालिस्ट-रेव्होल्युशनरी पक्षाकडून काय मिळण्यासारखें होतें? फक्त शेतकऱ्यांवरच या सोशालिस्ट-रेव्होल्युशनरींची भिस्त होती, त्याखेरीज दुसरा उपाय त्यांना सुचत नव्हता, शहरांत त्यांना फारसें कुणी विचारत नव्हतें, शत्रु तर स्वतःच्या सैन्याची जमवा-जमव करण्यासाठीं मुख्यतः शहरांवरच भर देत होता. शहरांत म्हणा किंवा खेड्यांत म्हणा, कुठेंच कुणाचीही जो पर्वा करणार नाहीं, झार व जमीनदार यांच्याविरुद्ध लढण्यासाठीं पुढच्या रांगेंत उभा राहून जो धैर्यानें पुढें सरसावेल, गुलामगिरी, जमिनीची टंचाई, जुलुमशाही, युद्धाची धुमश्चक्री, यांपासून मुक्त होण्यास जो शेतकरीवर्गाला मदत करील, असा नवा वर्ग कोणता होता? रशियामध्यें अशी शक्ति अस्तित्वांत तरी होती का? हो, होती. रशियन कामगारवर्ग हीच ती शक्ति होय. रशियन कामगारवर्गानें आपली ताकत, अखेरपर्यंत लढण्याची आपली लायकी, आपली धिटाई व क्रांतिकारक तडफ, १९०५ सालींच सिद्ध करून दाखविली होती.

निदान अशी दुसरी कोणतीही शक्ति नव्हती एवढें तरी खरें. आणि अशी दुसरी शक्ति कुठेंही आढळणें शक्यच नव्हतें.

शेतकरीवर्गानें कॅडेटपक्षाचा नाद सोडून जेव्हां सोसालिस्ट-रेव्होल्युशनरी पक्षाशीं संबंध जोडला, तेव्हांच त्याला रशियन कामगारवर्गासारख्या धैर्यशाली

क्रांतिनेत्याचें पुढारीपण मान्य करण्याची आवश्यकताही पटली, याचें कारण हेंच होय.

रशियन भांडवलदारी क्रांतीचें विशेष स्वरूप निश्चित करणारी परिस्थिति हीच होय.

**( ३ ) कामगार-क्रांतीच्या काळांत शेतकरीवर्गाची भूमिका:—** १९१७ च्या फेब्रुवारी क्रांतीपासून १९१७ च्या ऑक्टोबर क्रांती-पर्यंतचा काळ हा कामगार क्रांतीचा काळ होता. तुलनात्मकदृष्ट्या हा काळ लहान होता, एकूण आठ महिन्यांचाच होता, पण जनतेंत राजकीय जागृति निर्माण करण्याच्या दृष्टीनें जनतेला क्रांतिकारक शिक्षण देण्याच्या दृष्टीनें, हे आठ महिने सामान्य सनदशीर विकासाच्या कैक दशकांच्या बरोबरीचे होते असें म्हणण्यास हरकत नाही, कारण हे **क्रांतीचे** आठ महिने होते. या काळाचें खास वैशिष्ठ्य म्हणजे शेतकरी-वर्ग आणखी क्रांतिकारक बनला, सोशालिस्ट-रेव्होल्युशनरी पक्षाच्या बाबतीत त्याचा भ्रमनिरास झाला, शेतकरीवर्ग सोशालिस्ट-रेव्होल्युशनरी पक्षांतून **फुटून निघाला**, देशाला युद्धसमाप्तीच्या दिशेनें पुढें नेऊं शकणारी एकमेव सुसंगत क्रांतिकारक शक्ति कोणती असेल तर ती कामगारवर्गच होय हें लक्षांत घेऊन त्या कामगारवर्गाच्या झेंड्याभोंवती **प्रत्यक्षपणें** जमा होण्याची **नवी प्रवृत्ति** शेतकरीवर्गात उदयास आली. या काळाचा इतिहास म्हणजे शेतकरी-वर्गाचा पाठिंबा मिळविण्यासाठी, शेतकरीवर्गाचा बहुसंख्य विभाग आपल्या बाजूला वळवून घेण्यासाठीं, सोशालिस्ट-रेव्होल्युशनरी पक्ष (मध्यमवर्गीय लोकशाही) व बोल्शेविक पक्ष (कामगार लोकशाही) यांच्या दरम्यान चाललेल्या लढ्याचाच इतिहास होय. संमिश्र सरकारच्या काळांतील घडा-मोडींमुळें—केरेन्स्की काळांतील घडामोडीमुळें—या लढ्याचा निर्णय लागला. जमीनदारांच्या जमिनी जप्त करण्यास सोशालिस्ट-रेव्होल्युशनरींचा व मेन्शे-

विकांचा नकार, युद्ध चालू ठेवण्यासाठीं सोशालिस्ट-रेव्होल्युशनरींचा व मेन्शेविकांचा लढा, रणांगणावरील जूनची चढाई, सैनिकांना देहांत शासन देण्याचा नियम, कोर्निलोव्हचें बंड,——या घडामोडींमुळें वरील लढ्याचा निर्णय ठरून चुकला.

या पूर्वीच्या काळांत क्रांतीचा मूलभूत प्रश्न झारशाहीचें व जमीनदारांच्या सत्तेचें उच्चाटन करणें हा होता, पण आतां फेब्रुआरी क्रांतीनंतरच्या काळांत युद्धसमाप्तीचा प्रश्न हाच क्रांतीचा मुख्य प्रश्न झाला. आतां झारचें उच्चाटन होऊन चुकलें होतें, आणि सतत लांबत जाणाऱ्या युद्धामुळें देशाचें आर्थिक सामर्थ्य संपुष्टांत आलें होतें, शेतकरीवर्गाचा सर्वनाश होऊन चुकला होता. केवळ अंतर्गत प्रश्नाऐवजीं युद्धाच्या मुख्य प्रश्नाकडेच सर्वांचें लक्ष केंद्रित झालेलें स्पष्ट दिसत होतें. "हें युद्ध बंद करा", "या युद्धांतून बाहेर पडूं या" अशा घोषणा युद्धाला कंटाळलेल्या देशाच्या कोनाकोपऱ्यांतून व मुख्यत: शेतकरीवर्गामधून ऐकूं येऊं लागल्या.

पण युद्धांतून बाहेर पडावयाचें तर अगोदर हंगामी सरकार उलथून पाडलें पाहिजे, भांडवलदारवर्गाची सत्ता उलथून पाडली पाहिजे, सोशालिस्ट-रेव्होल्युशनरींची व मेन्शेविकांची सत्ता उलथून पाडली पाहिजे. याचें कारण असें कीं 'अंतिम विजय' मिळेपर्यंत युद्ध चालू ठेवलें पाहिजे असें हे लोक म्हणत होते व युद्ध लांबण्याबद्दल तेच जबाबदार होते. प्रत्यक्ष व्यवहाराच्या दृष्टीनें पाहिलें तर भांडवलदारवर्गाचें उच्चाटन करण्याव्यतिरिक्त युद्धसमाप्तीचा दुसरा कोणताही मार्ग नव्हता.

ही नव्या प्रकारची क्रांति होती, ही कामगार-क्रांति होती, कारण नवी कामगारवर्गीय सत्ता स्थापन करण्यासाठीं, सोविएतांची सत्ता स्थापन करण्यासाठीं, क्रांतिकारक कामगारवर्गाच्या पार्टीच्या हातीं——बोल्शेविक पार्टीच्या हातीं——सत्ता देण्यासाठीं, साम्राज्यशाही युद्धाविरुद्ध आणि लोकशाहीच्या तत्त्वानुसार युद्धसमाप्ति घडवून आणण्यासाठीं क्रांतिकारक लढा चालविणाऱ्या पार्टीला सत्ताधारी बनविण्यासाठीं, या क्रांतीनें साम्राज्यवादी भांडवलदार-

वर्गाच्या अत्यंत ' जहाल ' गटाची (लेफ्ट-विंग)—सोशालिस्ट-रेव्होल्युशनरी व मेन्शेविकांची—सत्ता उलथन पाडली. युद्धसमाप्तीसाठीं व सोविएतांची सत्ता स्थापन करण्यासाठीं कामगारांनीं चालविलेल्या लढ्याला शेतकरी-वर्गाच्या बहुसंख्येनें पाठिंबा दिला.

शेतकरीवर्गाला दुसरा मार्गच उरला नव्हता. दुसरा मार्ग सांपडणें शक्यच नव्हतें.

मेहनत करणाऱ्या शेतकरी जनतेला अशा रीतीनें केरेन्स्कीच्या काळांत प्रत्यक्ष अनुभवानें अत्यंत महत्वाचा धडा शिकावयास मिळाला. या काळांत एक गोष्ट स्पष्ट झाली व ती ही कीं जोंपर्यंत सोशालिस्ट-रेव्होल्युशनरीच्या व मेन्शेविकांच्या हातीं सत्ता आहे तोंपर्यंत युद्धाच्या खाईंतून देशाची सुटका होणें शक्य नाहीं व शेतकऱ्यांना जमीन मिळू शकणार नाहीं आणि स्वातंत्र्यही मिळू शकणार नाहीं; मेन्शेविक व सोशालिस्ट-रेव्होल्युशनरी पक्ष गोड गोड शब्द वापरीत व खोटीं अभिवचनें देत, त्यांच्यांत आणि कॅडेटपक्षांत फरक होता तो एवढाच, एरव्हीं त्यांचें प्रत्यक्ष धोरण म्हणजे कॅडेटपक्षाचें साम्राज्यवादी धोरणच होतें; देशाला योग्य मार्गावर आणून सोडणें एकाच सत्तेला शक्य होतें व ती म्हणजे सोविएतांची सत्ता. युद्ध जसजसें लांबत गेलें तसतसें या धड्याचें जास्तच प्रत्यंतर येऊं लागलें, क्रांतीला वेगानें चालना मिळाली, आणि करोडों शेतकऱ्यांना व सैनिकांना कामगार-क्रांतीच्या झेंड्याभोंवतीं **प्रत्यक्षपणें जमा होण्यास** प्रोत्साहन मिळालें. सोशालिस्ट-रेव्होल्युशनरी व मेन्शेविक पक्ष निर्विवादपणें अलग पडले. संमिश्र सरकारच्या काळांतील घडामोडींनीं हा वस्तुपाठ जर शिकविला नसता तर कामगार हुकुमशाही अशक्य झाली असती.

भांडवलदारी क्रांतीचें कामगार-क्रांतीत संक्रमण होण्याची क्रिया सुकर करणारी परिस्थिति अशी होती.

रशियांत कामगार हुकुमशाहीला मूर्त स्वरूप प्राप्त झालें तें याच मार्गानें होय.

( ४ ) **सोविएत सत्तेचा पाया मजबूत झाल्यानंतरच्या काळांत शेत-करीवर्गाची भूमिका**:–पूर्वी, म्हणजे क्रांतीच्या पहिल्या काळांत, झारशाही उलथून पाडणें हें मुख्य उद्दिष्ट होतें. त्यानंतर, म्हणजे फेब्रुआरी क्रांतीनंतरच्या काळांत, भांडवलदारवर्गाचें उच्चाटन करून साम्राज्यशाही युद्धाच्या भोंवऱ्यांतून बाहेर पडणें हें मुख्य उद्दिष्ट होतें. आतां, म्हणजे स्वकीय युद्ध समाप्त होऊन सोविएत सत्तेचा पाया बळकट झाल्यानंतरच्या काळांत, आर्थिक रचनेचे प्रश्न प्रामुख्यानें पुढें आले आहेत. समाजसत्तावादी अर्थव्यवस्थेचा पाया घालण्यासाठीं आर्थिक रचनेचीं कोणती कार्यें तावडतोब पार पाडलीं पाहिजेत याचें लेनिननें पुढीलप्रमाणें वर्णन केलें :—राष्ट्रीय मालकीचे झालेले उद्योगधंदे अधिक भक्कम करा व त्यांची वाढ करा; यासाठीं सरकार-नियंत्रित व्यापाराच्या द्वारें शेतीशीं उद्योगधंद्यांची सांगड घाला; 'वरकड जप्ती'ची (सरप्लस अ‍ॅप्रोप्रिएशन) पद्धत रद्द करून तिच्याऐवजीं ऐनजिनसी कराची पद्धत सुरू करा, मागाहून हा ऐनजिनसी कर क्रमशः कमी करून त्याचें प्रमाण कारखान्यांत तयार होणारा माल व शेतकऱ्यांनी तयार केलेला माल यांची अदलाबदल होण्याइतकें खालीं आणतां येईल; व्यापाराचें पुनरुज्जीवन करा व सहकारी संस्थांची वाढ करा, प्रचंड शेतकरी जनतेला या संस्थांत सामील करून घ्या.

कांहींजण म्हणतात कीं हें कार्य कदाचित् रशियासारख्या शेतकरी देशाच्या आवांक्याबाहेरचें ठरेल. कांहीं संशयात्मे तर असें जाहीर करतात कीं हें नुसतें स्वप्नरंजन (युटोपियन) आहे, हें अंमलांत आणणें शक्यच नाहीं, कारण शेतकरी तो शेतकरीच, शेतकरीवर्ग म्हणजे लहान प्रमाणावर उत्पादन करणारांचा वर्ग, समाजसत्तावादी उत्पादनाचा पाया रचण्याच्या कामीं असला वर्ग उपयोगी पडूं शकणार नाहीं.

पण संशयात्म्यांचें हें म्हणणें चुकीचें आहे. प्रस्तुत प्रश्नाच्या बाबतींत ज्यांना निर्णायक महत्व आहे अशा कांहीं गोष्टी या संशयात्म्यांनीं जमेसच

धरल्या नाहीत. यापैकीं विशेष महत्वाच्या गोष्टींचा आपण येथें विचार करूं या.

**पहिली गोष्ट** :—सोविएत यूनियनमधील शेतकरीवर्ग आणि पाश्चिमात्य देशांतील शेतकरीवर्ग सारखेच आहेत असा गैरसमज करून घेतां कामा नये. सोविएत यूनियनमधील शेतकरीवर्ग तीन क्रांत्यांच्या अनुभवानें तावून सुलाखून निघाला आहे, कामगारवर्गाच्या खांद्याशीं खांदा भिडवून व कामगारवर्गाच्या पुढारीपणाखालीं तो झारविरुद्ध आणि भांडवलदारवर्गाच्या सत्तेविरुद्ध लढला, त्याला कामगार-क्रांतीनें जमीन मिळवून दिली आहे व युद्धसमाप्तीचा लाभ करून दिला आहे आणि या कारणास्तव तो कामगारवर्गाची राखींव फौज बनला आहे. उलटपक्षीं पाश्चिमात्य देशांतील शेतकरीवर्ग भांडवलदारी क्रांतीच्या काळांत उदारमतवादी भांडवलदारवर्गाच्या पुढारीपणाखाली लढला, त्याला भांडवलदारवर्गानें जमीन मिळवून दिली, आणि या कारणास्तव तो भांडवलदारवर्गाची राखींव फौज बनला. म्हणून हे दोन शेतकरीवर्ग अगदी भिन्न प्रकारचे असणें स्वाभाविकच आहे. सोविएत शेतकरीवर्गाला कामगारवर्गाबरोबर राजकीय दोस्ती व राजकीय सहकार्य करण्याचें महत्व पटलें असल्यामुळें व ही दोस्ती आणि हें सहकार्य त्याला स्वातंत्र्य मिळवून देण्यास कारणीभूत झालें असल्यामुळें कामगारवर्गाबरोबर आर्थिक सहकार्य करण्यास तो अत्यंत राजीखुशीनें तयार झाल्याशिवाय राहाणार नाहीं, हें मुद्दाम सिद्ध करावयास नकोच.

एंगल्सनें असें म्हटलें आहे की "सोशालिस्ट पक्षानें राजकीय सत्ता काबीज करण्याचा प्रश्न जवळच्या भविष्यकाळाचा प्रश्न होऊन बसला आहे," आणि 'सत्ता काबीज करण्यासाठीं या पक्षानें प्रथम शहरांतून खेड्याकडे मोर्चा वळविला पाहिजे व खेड्यापाड्यांत आपलें वजन स्थापन केलें पाहिजे." (एंगल्स, '**शेतकऱ्यांचा प्रश्न** ) गेल्या शतकाच्या दहाव्या दशकांत त्यानें हे उद्गार

काढले. पाश्चिमात्य शेतकरीवर्गाचा विचारच त्याच्या मनांत त्यावेळीं होता. रशियन कम्युनिस्टांनी तीन क्रांत्यांच्या क्रमांत या क्षेत्रांमध्यें प्रचंड कार्य पार पाडून खेड्यापाड्यांमध्यें इतकें वजन स्थापन केलें आहे व इतका पाठिबा मिळविला आहे कीं आपल्या पाश्चिमात्य दोस्तांना त्याची कल्पनासुद्धां येणार नाहीं, हें सिद्ध करावयास पाहिजे का ? या परिस्थितीमुळें रशियांतील कामगार-वर्ग व शेतकरीवर्ग यांचें आर्थिक सहकार्य घडवून आणणें खात्रीनें सोपें होणार, ही गोष्ट कशी नाकबूल करतां येईल ?

लहान प्रमाणावर उत्पादन करणाऱ्या शेतकरीवर्गाचें अस्तित्व समाज-सत्तावादी रचनेला मानवण्यासारखें नाहीं, असें संशयात्म्यांकडून आग्रहानें बजावण्यांत येतें.

पण पाश्चिमात्य देशांतील छोट्या शेतकऱ्यांविषयीं एंगल्स काय म्हणतो तें ऐका :—

> "आणि खरोखरींच आम्हीं छोट्या शेतकऱ्याला निश्चितपणें पाठिंबा देतों, त्याची परिस्थिति अधिक सुसह्य करण्यासाठीं आम्हीं शक्य ती सारी खटपट करूं, त्यानें सहकारी पद्धतीचा स्वीकार करण्याचें ठरविल्यास त्याला ही गोष्ट सुकर व्हावी म्हणून आम्हीं शक्य तो सारा प्रयत्न करूं; त्याला हें ठरविणें अजून शक्य होत नसल्यास आपल्या लहान जमिनीच्या तुकड्याला चिकटून यावर पुरेसा विचार करण्यास आम्हीं त्याला भरपूर वेळ देऊं. आम्हीं हें करूं याचें एक कारण असें कीं स्वतःचें काम स्वतः करणारा छोटा शेतकरी आमच्या बाजूला येऊं शकेल असें आम्हांला वाटतें; शिवाय याचें दुसरें कारण असें कीं हें आमच्या पार्टीच्या हिताला प्रत्यक्षपणें पोषक आहे. निर्धन कामगार-वर्गाच्या स्थितींत जाऊन पडण्यापासून आम्हीं जितक्या शेतकऱ्यांना वांचवूं शकूं व ते शेतकऱ्याच्या अवस्थेंत असतांनाच त्यांना आम्हीं जितक्या संख्येंत आपलेसे करून घेऊं शकूं, तितक्या जास्त वेगानें व सुलभतेनें समाजाचें स्वरूप बदललें जाईल. प्रत्येक ठिकाणी भांडवलदारी

उत्पादनाचा विकास अगदीं अखेरची मजल गांठीपर्यंत वाट पाहणे, मोठ्या प्रमाणावरील भांडवलदारी उत्पादनपद्धतीला अखेरच्या छोट्या कारागिराचा आणि अखेरच्या छोट्या शेतकऱ्याचा बळी पडेपर्यंत वाट पहाणें, आणि त्यानंतरच समाजाचें स्वरूप पालटेल अशी अपेक्षा करणें, आमच्या फायद्याचें होऊं शकणार नाहीं. शेतकरीवर्गाच्या हितासाठीं या बाबतीत सार्वजनिक पैसा खर्च करून जो आर्थिक त्याग करावा लागेल तो केवळ भांडवलदारी अर्थव्यवस्थेच्या दृष्टीनें अपव्ययच ठरूं शकेल, पण वस्तुतः हा खर्च म्हणजे अत्यंत फायदेशीर रीतीनें पैसा गुंतविणेंच होय, कारण एकंदर सामाजिक पुनर्घटनेसाठीं द्याव्या लागणाऱ्या किमतींत त्यामुळें कदाचित दसपट बचत होईल. म्हणून या अर्थानें आम्हांला शेतकरीवर्गाच्या बाबतींत उदार धोरण स्वीकारणें परवडू शकेल."

पाश्चिमात्य शेतकरीवर्गाविषयीं बोलतांना एंगल्सनें हे उद्‌गार काढले. पण एंगल्सनें सांगितलेली गोष्ट कामगार हुकुमशाहीच्या देशांत जितक्या सुलभतेनें व जितक्या पूर्णांशानें अमलांत आणतां येईल तितकी दुसरीकडे कुठेंही आणतां येणार नाहीं, हें स्पष्ट नाहीं का? "स्वतःचें काम स्वतः करणारा छोटा शेतकरी आमच्या बाजूला" आतांच व पूर्णपणें येणें फक्त सोविएत रशियांतच शक्य आहे, त्यासाठी जरूर असलेला "आर्थिक त्याग" करणें सोविएत रशियालाच शक्य आहे, शेतकरीवर्गाच्या बाबतींत जरूर तें "उदार धोरण" स्वीकारणें सोविएत रशियालाच शक्य आहे, हें स्पष्ट नाहीं का? शेतकरीवर्गाच्या हिताच्या ह्या व अशाच इतर गोष्टी रशियामध्यें यापूर्वीच अमलांत येऊं लागल्या आहेत, हें स्पष्ट नाहीं का? आणि याचा परिणाम सोविएत भूमींतील आर्थिक रचनेचें कार्य अधिक सुकर होण्यांत व त्याची प्रगति होण्यात होणार, ही गोष्ट कशी नाकबूल करतां येईल?

**दुसरी गोष्ट**:—रशियांतील शेती आणि पाश्चिमात्य देशांतील शेती सारख्याच आहेत असा गैरसमज करून घेतां कामा नये. पाश्चिमात्य देशांमध्यें

शेतीचा विकास भांडवलशाहीच्या सामान्य मार्गानें होत आहे, शेतकरीवर्गांत निरनिराळे थर उत्पन्न होण्याचा क्रम (डिफरन्सिएशन) अत्यंत तीव्र स्वरूपांत चालू आहे, एका टोंकाला मोठ्या जमीनदारांची व खासगी भांडवलदारांची प्रचंड शेतें अस्तित्वांत येत आहेत तर दुसऱ्या टोंकाला दारिद्र्य, कंगालपणा, मजुरीची गुलामगिरी, यांचा सुळसुळाट होत आहे. या कारणांमुळें तेथील शेतकरीवर्ग विस्कळित होन जाणें व त्याचा अधःपात होणें अगदीं साहजिकच आहे. पण रशियांतील स्थिति तशी नाहीं. रशियामध्यें शेतीचा विकास असल्या मार्गानें होणें शक्यच नाहीं; सोविएत सत्तेचें अस्तित्व आणि मुख्य उत्पादनसाधनांची राष्ट्रीय मालकी यांमुळें तरी असल्या मार्गानें शेतीचा विकास होण्यास प्रतिबंध होतो. रशियामध्यें शेतीचा विकास निराळ्या मार्गानें होणें अपरिहार्य आहे; करोडों छोट्या व मध्यम शेतकऱ्यांना सहकारी संस्थांत संघटित करणें, खेड्यापाड्यांत प्रचंड प्रमाणावर सहकारी पद्धतीचा प्रसार करणें व त्याला मदत करण्यासाठीं सरकारनें हलक्या अटींवर कर्ज देणें, हाच रशियांतील शेतीच्या विकासाचा मार्ग आहे. सहकार्याच्या प्रश्नावर लेनिननें लिहिलेल्या लेखमालेंत असें दाखवून दिलें आहे की आपल्या देशांतील शेतीचा विकास नव्या मार्गानें झाला पाहिजे, सहकारी संस्थांच्या द्वारें शेतकरीवर्गाच्या बहुसंख्येला समाजसत्तावादी रचनेंत सामील करून घेतलें पाहिजे, शेतीच्या क्षेत्रांत सामुदायिक उत्पादनाचीं तत्त्वें क्रमशः लागू केलीं पाहिजेत, प्रथम शेतीच्या मालाच्या विक्रीच्या बाबतींत व नंतर त्याच्या उत्पादनाच्या बाबतींत ही तत्त्वें अमलांत आणलीं पाहिजेत. लेनिननें दाखविलेला हा मार्ग अगदी बरोबर होता.

शेतीच्या सहकारी संस्थांच्या कार्याच्या बाबतींत खेड्यापाड्यांमध्यें दिसून येणाऱ्या अनेक नव्या घटना या दृष्टीनें अत्यंत महत्वाच्या आहेत. 'सेल्सकोसोयूझ' (खेड्यांतील सहकारी संस्थांची मध्यवर्ती संघटना) या संस्थेच्या छत्राखालीं शेतीच्या निरनिराळ्या शाखांत, उदाहरणार्थ अंबाडी, बटाटे, लोणी, वगैरेंच्या उत्पादनासाठी, नव्या प्रचंड संघटना अस्तित्वांत आल्या असल्याचें प्रसिद्धच आहे. यांपैकीं एक उदाहरण द्यावयाचें तर अंबाडीच्या

मध्यवर्ती संघटनेंत अंबाडीचें पीक काढणाऱ्या अनेक शेतकरी संस्था एकत्रित करण्यांत आल्या आहेत. ही मध्यवर्ती संघटना शेतकऱ्यांना बीं व अवजारें पुरविते, नंतर त्यांनीं तयार केलेली सर्व अंबाडी ती विकत घेते व मोठ्या प्रमाणांत बाजारांत विकते, त्यावर मिळणाऱ्या नफ्यात शेतकऱ्यांना वांटा देते, व अशा रीतीनें छोट्या शेतकऱ्यांची शेती व सरकारी उद्योगधंदे या दोहोंची 'सेल्स्कोसोयूझ' मार्फत सांगड घालते. उत्पादनाच्या या संघटना-प्रकाराला कोणतें नांव द्यावें? माझ्या मतें ही शेतीच्या क्षेत्रांतील मोठ्या प्रमाणावरील सरकारी–समाजसत्तावादी उत्पादनाची घरगुती (डोमेस्टिक) पद्धत आहे. सरकारी-समाजसत्तावादी उत्पादनाच्या घरगुती पद्धतीविषयीं बोलतांना मी भांडवलशाहींतील घरगुती पद्धतीशीं तिचें साम्य सुचवीत आहे. उदाहरणार्थ कापडाच्या धंद्यांत हातमागावर काम करणारे कारागीर भांडवलदाराकडून कच्चा माल व उपकरणें घेतात व आपल्या श्रमानें उत्पन्न होणारा सर्व माल त्याच्या स्वाधीन करतात; अशा रीतीनें वस्तुतः ते स्वतःच्या घरीं काम करणारे मोल-मजूरच असतात असें म्हणण्यास हरकत नाहीं. आपल्या शेतीचा विकास कोणत्या मार्गानें झाला पाहिजे याचीं अनेक गमकें आहेत त्यांपैकीं हें एक होय. शेतीच्या इतर शाखांतील अशाच प्रकारच्या गमकांचा मी उल्लेख करीत नाही.

शेतकरीवर्गाची प्रचंड बहुसंख्या विकासाचा हा नवा मार्ग उत्साहानें स्वीकारील व खासगी भांडवलदारी शेतीचा आणि मजुरी-गुलामीचा जुना मार्ग—दारिद्र्याचा व सर्वनाशाचा मार्ग—टाकून देईल, हें सिद्ध करण्याची फारशी जरूरी नाही.

आपल्या शेतीच्या विकासमार्गाविषयी लेनिननें पुढील उद्गार काढले आहेत:—

"मोठ्या प्रमाणावरील सर्व उत्पादन-साधनांवर सरकारी सत्ता, कामगारवर्गाच्या हातीं राज्यसत्ता, करोडों छोट्या व चिमुकल्या शेतकऱ्यांशी कामगारवर्गाची दोस्ती, कामगारवर्गाच्या हातीं शेतकरी-

> वर्गाचें निश्चित पुढारीपण,——एवढ्या गोष्टी सहकारी संस्थांतून संपूर्ण समाजसत्तावादी समाजाची निर्मिति करण्यास पुरेशा नाहींत का? केवळ सहकारी संस्थांतूनच समाजसत्तावादी समाज निर्माण करतां येईल. सहकारी संस्था म्हणजे केवळ नफेबाजी करणाऱ्या व्यापारी संस्थाच होत, असें पूर्वीं आपण समजत असूं. सध्यां 'नव्या आर्थिक धोरणा'च्या काळांत त्यांच्याविषयीं असेंच समजण्याचा एका दृष्टीनें आपणांला हक्क आहे. संपूर्ण समाजसत्तावादी समाजाची रचना करण्यासाठीं आवश्यक असलेल्या गोष्टी एवढ्याच आहेत ना? एवढ्या गोष्टी असल्या कीं समाजसत्तावादी समाज अस्तित्वांत आला आहे असें समजावें, असें मुळींच नाहीं. परंतु तो अस्तित्वांत आणण्यासाठीं आवश्यक व पुरेशा असलेल्या गोष्टी ह्याच आहेत."

"जनतेची संघटना करण्याचें नवें तत्त्व" या नात्यानें व कामगार हुकुमशाहीच्या काळांतील नवी "समाज-पद्धति" या नात्यानें सहकारी संस्थांना आर्थिक व इतर प्रकारची मदत देणें आवश्यक आहे, असें लेनिन म्हणतो. याविषयीं बोलतांना लेनिननें पुढील उद्गार काढले आहेत :——

> "कोणतीही समाजपद्धति एका विशिष्ट वर्गाच्या आर्थिक साहाय्यानेंच उदयास येत असते. 'स्वतंत्र' भांडवलशाहीचा जन्म घडवून आणण्यासाठीं करोडों रुबल्स कसे खर्च करावे लागले, हें मुद्दाम सांगावयास नको. आतां आपण एक गोष्ट लक्षांत घेतली पाहिजे व प्रत्यक्ष व्यवहारांत आणली पाहिजे, व ती ही कीं, आपण ज्या समाज-पद्धतीला नेहमींपेक्षां जास्त मदत करणें आज आवश्यक आहे ती पद्धत म्हणजे सहकारी पद्धतच होय. मात्र तिला जी मदत करावयाची ती खरीखुरी मदत असली पाहिजे——म्हणजे वाटेल त्या प्रकारच्या सहकारी व्यापा-

> राला मदत करणें ही कांहीं खरीखुरी मदत नव्हे, ज्याच्यांत **जनतेचा खरोखरीं प्रचंड विभाग खराखुरा भाग घेतो** अशा सहकारी व्यापाराला मदत करणें हीच खरीखुरी मदत होय."

या सर्व गोष्टींवरून काय सिद्ध होतें ?

पहिली गोष्ट सिद्ध होते ती ही कीं संशयात्म्यांचे आक्षेप चुकीचे आहेत.

दुसरी गोष्ट सिद्ध होते ती ही कीं मेहनत करणाऱ्या शेतकरी जनतेला कामगारवर्गाची राखींव फौज समजणें हा लेनिनवादाचा दृष्टिकोण बरोबर आहे.

तिसरी गोष्ट सिद्ध होते ती ही कीं शेतीशीं उद्योगधंद्यांचीं सांगड घालण्यासाठीं, समाजसत्तावादी रचनेची प्रगति करण्यासाठीं, व समाजसत्तावादी अर्थव्यवस्थेची पायरी गांठणें ज्याच्या अभावीं शक्य नाहीं असा आवश्यक पाया कामगार हुकुमशाहीकरितां तयार करण्यासाठीं, सत्ताधारी कामगारवर्गानें या राखीव फौजेचा उपयोग केला पाहिजे, व त्याला हें शक्य आहे.

★

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

# [ ६ ]

# राष्ट्रीय प्रश्न

या विषयावर बोलतांना मी दोन मुख्य मुद्यांची चर्चा करणार आहें :— (१) राष्ट्रीय प्रश्नाचें स्वरूप; (२) गांजलेल्या राष्ट्रांची स्वातंत्र्य-प्राप्तीची चळवळ आणि कामगार क्रांति.

(१) **राष्ट्रीय प्रश्नाचें स्वरूप** :—गेल्या वीस वर्षांच्या अवधींत राष्ट्रीय प्रश्नामध्यें अनेक अत्यंत महत्वाचे बदल घडून आले आहेत. सेकंड इंटरनॅशनलच्या काळांतील राष्ट्रीय प्रश्न आणि लेनिनवादाच्या काळांतील राष्ट्रीय प्रश्न हे दोन्ही एकच नाहीत. त्यांची व्याप्ति अगदीं निराळी आहे, एवढेंच नव्हे तर त्यांचें मूलभूत स्वरूपही अगदीं भिन्न आहे.

पूर्वीच्या काळांत राष्ट्रीय प्रश्नाची व्याप्ति मुख्यतः 'सुसंस्कृत' राष्ट्र-गटांसंबंधींच्या प्रश्नांपुरतीच बहुधा मर्यादित असे. आयर्लंड, हंगेरी, पोलंड, फिनलंड, सर्बिया, व यूरपमधील इतर कैक राष्ट्रगट—या परतंत्र राष्ट्रगटांच्या भवितव्याचेंच सेकंड इंटरनॅशनलच्या बहादुर पुढाऱ्यांना महत्व वाटत असे. आशिया व आफ्रिका खंडांतील कोटयवधि जनता अत्यंत क्रूर व अमानुष राष्ट्रीय जुलुमशाहींत भरडून निघत आहे, परंतु तिच्याकडे सेकंड इंटरनॅश-नलच्या पुढाऱ्यांची नजर बहुधा जात नसे. गोरे व काळे लोक, 'सुसंस्कृत' व 'असंस्कृत' लोक, यांचा सारखेपणानें विचार करण्यास ते कचरत असत. दोनतीन अर्थशून्य व मिळमिळीत ठराव पास करण्यापलीकडे सेकंड इंटर-नॅशनलच्या पुढाऱ्यांची मजल गेली नाहीं, आणि या ठरावांतसुद्धां वसाहतींच्या स्वातंत्र्याच्या प्रश्नाला शिताफीनें बगल देण्यांत आली होती. राष्ट्रीय प्रश्नाच्या बाबतींतील हें दुटप्पी व सहानुभूतिशून्य धोरण आतां समाप्त झालें आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. लेनिनवादानें ही घोर विसंगति उघड करून दाखविली, गोरे व काळे यांच्या दरम्यानची भिंत तोडून टाकली, युरोपियन आणि आशि-

याटिक—साम्राज्यशाहीचे 'सुसंस्कृत' गुलाम आणि 'असंस्कृत' गुलाम—यांच्यांत भेद करण्याच्या प्रवृत्तीचा नायनाट केला, आणि वसाहतींच्या प्रश्नाशीं राष्ट्रीय प्रश्नाची सांगड घातली. अशा रीतीनें राष्ट्रीय प्रश्न हा पूर्वीप्रमाणे एकाद्या विशिष्ट देशाच्या अंतर्गत राज्यव्यवस्थेचा प्रश्न न राहातां सर्वसामान्य आंतरराष्ट्रीय प्रश्न बनला, परतंत्र देशांतील व वसाहतींतील गांजलेल्या जनतेला साम्राज्यशाहीच्या जोखडापासून मुक्त करण्याचा जागतिक प्रश्न बनला.

पूर्वीच्या काळांत राष्ट्रीय स्वयंनिर्णयाच्या तत्त्वाचा बहुधा चुकीचा अर्थ करण्यांत येत असे. राष्ट्रांना स्वायत्ततेचा (ऑटॉनॉमी) हक्क असावा, अशा संकुचित अर्थानेंच हें तत्त्व कैकदां मांडण्यांत येत असे. स्वयंनिर्णयाचा हक्क म्हणजे सांस्कृतिक स्वायत्ततेचा हक्क, गांजलेल्या राष्ट्रांना स्वतःच्या सांस्कृतिक संस्था असण्याचा हक्क आहे, सर्व राजकीय सत्ता मात्र सत्ताधारी राष्ट्राच्या हातींच असावी,—असें जाहीर करण्यापर्यंतही सेकंड इंटरनॅशनलच्या कांहीं पुढाऱ्यांची मजल गेली. वस्तुतः स्वयंनिर्णयाचें तत्त्व म्हणजे मुलुखगिरी-विरुद्ध लढण्याचें शस्त्रच होय, पण वरीलप्रमाणें भलताच अर्थ करण्यांत आल्या-मुळें तें मुलुखगिरीचें समर्थन करण्याचें साधन बनणार कीं काय असा धोका निर्माण झाला. हा गोंधळ आतां नाहीसा झाला आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. लेनिनवादानें स्वयंनिर्णयाच्या कल्पनेला अधिक व्यापक स्वरूप दिलें व त्याचा असा अर्थ केला कीं परतंत्र देशांतील व वसाहतींतील गांजलेल्या जनतेला पूर्णपणें विभक्त होण्याचा हक्क आहे, प्रत्येक राष्ट्राला आपलें स्वतंत्र राज्य अस्तित्वांत आणण्याचा हक्क आहे. स्वयंनिर्णयाचा हक्क म्हणजे स्वायत्त-तेचा हक्क असा अर्थ करून मुलुखगिरीचें समर्थन करणें अशा रीतीनें अशक्य झालें. स्वयंनिर्णयाचे तत्त्व पूर्वी जनतेला फसवण्याचें साधन म्हणून वापरण्यांत येत असे, साम्राज्यशाही युद्धाच्या काळांत सोशल-शोव्हिनिस्टांनीं (स्वतःला समाजसत्तावादी म्हणविणाऱ्या, परंतु वस्तुतः राष्ट्रीय दुरभिमानाचा पुरस्कार करणाऱ्या पुढाऱ्यांनीं) ह्या तत्त्वाचा असाच उपयोग केला यांत शंका नाहीं,

[ ६ ]

# राष्ट्रीय प्रश्न

या विषयावर बोलतांना मी दोन मुख्य मुद्यांची चर्चा करणार आहें :—
(१) राष्ट्रीय प्रश्नाचें स्वरूप; (२) गांजलेल्या राष्ट्रांची स्वातंत्र्य-प्राप्तीची चळवळ आणि कामगार क्रांति.

(१) **राष्ट्रीय प्रश्नाचें स्वरूप** :—गेल्या वीस वर्षांच्या अवधींत राष्ट्रीय प्रश्नामध्यें अनेक अत्यंत महत्वाचे बदल घडून आले आहेत. सेकंड इंटरनॅशनलच्या काळांतील राष्ट्रीय प्रश्न आणि लेनिनवादाच्या काळांतील राष्ट्रीय प्रश्न हे दोन्ही एकच नाहींत. त्यांची व्याप्ति अगदीं निराळी आहे, एवढेंच नव्हे तर त्यांचें मूलभूत स्वरूपही अगदीं भिन्न आहे.

पूर्वींच्या काळांत राष्ट्रीय प्रश्नाची व्याप्ति मुख्यत: 'सुसंस्कृत' राष्ट्र-गटांसंबंधींच्या प्रश्नांपुरतीच बहुधा मर्यादित असे. आयर्लंड, हंगेरी, पोलंड, फिनलंड, सर्बिया, व यूरपमधील इतर कैक राष्ट्रगट--या परतंत्र राष्ट्रगटांच्या भवितव्याचेंच सेकंड इंटरनॅशनलच्या बहादुर पुढाऱ्यांना महत्व वाटत असे. आशिया व आफ्रिका खंडांतील कोटयवधि जनता अत्यंत क्रूर व अमानुष राष्ट्रीय जुलुमशाहींत भरडून निघत आहे, परंतु तिच्याकडे सेकंड इंटरनॅश-नलच्या पुढाऱ्यांची नजर बहुधा जात नसे. गोरे व काळे लोक, 'सुसंस्कृत' व 'असंस्कृत' लोक, यांचा सारखेपणानें विचार करण्यास ते कचरत असत. दोनतीन अर्थशून्य व मिळमिळीत ठराव पास करण्यापलीकडे सेकंड इंटर-नॅशनलच्या पुढाऱ्यांची मजल गेली नाहीं, आणि या ठरावांतसुद्धां वसाहतीच्या स्वातंत्र्याच्या प्रश्नाला शिताफीनें बगल देण्यांत आली होती. राष्ट्रीय प्रश्नाच्या बाबतींतील हें दुटप्पी व सहानुभूतिशून्य धोरण आतां समाप्त झालें आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. लेनिनवादानें ही घोर विसंगति उघड करून दाखविली, गोरे व काळे यांच्या दरम्यानची भिंत तोडून टाकली, युरोपियन आणि आशि-

याटिक—साम्राज्यशाहीचे 'सुसंस्कृत' गुलाम आणि 'असंस्कृत' गुलाम—यांच्यांत भेद करण्याच्या प्रवृत्तीचा नायनाट केला, आणि वसाहतींच्या प्रश्नाशी राष्ट्रीय प्रश्नाची सांगड घातली. अशा रीतीनें राष्ट्रीय प्रश्न हा पूर्वीप्रमाणें एकाद्या विशिष्ट देशाच्या अंतर्गत राज्यव्यवस्थेचा प्रश्न न राहातां सर्वसामान्य आंतरराष्ट्रीय प्रश्न बनला, परतंत्र देशांतील व वसाहतींतील गांजलेल्या जनतेला साम्राज्यशाहीच्या जोखडापासून मुक्त करण्याचा जागतिक प्रश्न बनला.

पूर्वीच्या काळांत राष्ट्रीय स्वयंनिर्णयाच्या तत्त्वाचा बहुधा चुकीचा अर्थ करण्यांत येत असे. राष्ट्रांना स्वायत्ततेचा (ऑटॉनॉमी) हक्क असावा, अशा संकुचित अर्थानेंच हें तत्त्व कैकदां मांडण्यांत येत असे. स्वयंनिर्णयाचा हक्क म्हणजे सांस्कृतिक स्वायत्ततेचा हक्क, गांजलेल्या राष्ट्रांना स्वतःच्या सांस्कृतिक संस्था असण्याचा हक्क आहे, सर्व राजकीय सत्ता मात्र सत्ताधारी राष्ट्राच्या हातींच असावी,—असें जाहीर करण्यापर्यंतही सेकंड इंटरनॅशनलच्या कांहीं पुढाऱ्यांची मजल गेली. वस्तुतः स्वयंनिर्णयाचें तत्त्व म्हणजे मुलुखगिरी-विरुद्ध लढण्याचें शस्त्रच होय, पण वरीलप्रमाणें भलताच अर्थ करण्यांत आल्या-मुळें तें मुलुखगिरीचें समर्थन करण्याचें साधन बनणार कीं काय असा धोका निर्माण झाला. हा गोंधळ आतां नाहीसा झाला आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. लेनिनवादानें स्वयंनिर्णयाच्या कल्पनेला अधिक व्यापक स्वरूप दिलें व त्याचा असा अर्थ केला कीं परतंत्र देशांतील व वसाहतींतील गांजलेल्या जनतेला पूर्णपणें विभक्त होण्याचा हक्क आहे, प्रत्येक राष्ट्राला आपलें स्वतंत्र राज्य अस्तित्वांत आणण्याचा हक्क आहे. स्वयंनिर्णयाचा हक्क म्हणजे स्वायत्त-तेचा हक्क असा अर्थ करून मुलुखगिरीचें समर्थन करणें अशा रीतीनें अशक्य झालें. स्वयंनिर्णयाचे तत्त्व पूर्वी जनतेला फसवण्याचें साधन म्हणून वापरण्यांत येत असे, साम्राज्यशाही युद्धाच्या काळांत सोशल-शोव्हिनिस्टांनीं (स्वतःला समाजसत्तावादी म्हणविणाऱ्या, परंतु वस्तुतः राष्ट्रीय दुरभिमानाचा पुरस्कार करणाऱ्या पुढाऱ्यांनीं) ह्या तत्त्वाचा असाच उपयोग केला यांत शंका नाहीं,

परंतु आतां ही परिस्थिति बदलली व स्वयंनिर्णयाचें तत्त्व साम्राज्यवाद्यांच्या सर्व प्रकारच्या आकांक्षा चवाठ्यावर आणण्याचें साधन बनलें, राष्ट्रीय दुरभिमानवाद्यांचीं सर्व कारस्थानें उघडकीस आणण्याचें तें साधन बनलें, बहुजन-समाजाला आंतरराष्ट्रीयवाण्याच्या वाण्याचें राजकीय शिक्षण देण्यासाठीं त्याचा उपयोग होऊं लागला.

पूर्वीच्या काळांत गांजलेल्या राष्ट्रांचा प्रश्न हा केवळ कायद्याच्या पुस्तकांतील हक्कांचा (ज्युरिडिकल) प्रश्नच होय असें बहुधा समजण्यांत येत असे. 'राष्ट्रीय समते'विषयीं गंभीर जाहीरनामे काढणें, 'राष्ट्रांच्या समान दर्जा' विषयीं असंख्य फतवे काढणें,—एवढीच सेकंड इंटरनॅशनलमधील पक्षांची इति-कर्तव्यता होती. साम्राज्यशाहीच्या परिस्थितींत, म्हणजे राष्ट्रांचा एक (अल्पसंख्य) गट दुसऱ्या गटाच्या पिळणुकीवर जगत असतो अशा परिस्थितींत 'राष्ट्रांच्या समान दर्जा'विषयीं बडबड करणें म्हणजे गांजलेल्या राष्ट्रांची थट्टा करणेंच होय, ही गोष्ट त्या पक्षांनीं झांकून ठेवली. राष्ट्रीय प्रश्नाकडे पाहण्याचा हा कायदेबाजीचा भांडवलदारी दृष्टिकोण लबाडीचा असल्याचें आतां उघडकीस आलें आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. लेनिनवादानें हा राष्ट्रीय प्रश्न अगडबंब जाहीरनाम्यांच्या उच्च वातावरणांतून खालीं भूतलावर आणला. गांजलेल्या राष्ट्रांच्या स्वातंत्र्यलढ्याला कामगारपक्षांचा पाठिंबा असल्यासंबंधीचे जाहीरनामे अर्थशून्य व लबाडीचे आहेत हें त्यानें उघडकीस आणलें. राष्ट्रांना खरोखरीं समानदर्जा मिळण्यासाठीं, स्वतंत्र राज्य म्हणून जगतां येण्यासाठीं, साम्राज्यशाहीविरुद्ध गांजलेल्या राष्ट्रांनीं चालविलेल्या लढ्यांत त्यांना पाठिंबा देणें व खरेंखुरें आणि अव्याहत साहाय्य करणें, हाच गांजलेल्या राष्ट्रांच्या प्रश्नाचा अर्थ होय असें आतां स्पष्ट झालें.

पूर्वीच्या काळांत राष्ट्रीय प्रश्नाचा विचार सुधारणावादी दृष्टीनें करण्यांत येत असे, हा स्वतंत्र प्रश्न आहे असें समजण्यांत येत असे, भांडवलाची सत्ता, साम्राज्यशाहीचें उच्चाटन, कामगार-क्रांति, या सर्वसाधारण प्रश्नांशी त्याचा कांहींच संबंध नाहीं असें मानण्यांत येत असे. यूरपमधील कामगारवर्गाला

स्वतंत्रपणें विजय मिळवितां येईल, त्यासाठीं वसाहतींतील स्वातंत्र्यचळवळीशीं प्रत्यक्ष दोस्ती जोडण्याचें कांहीं कारण नाहीं, असें गृहीत धरण्यांत येत असे. राष्ट्रीय व वसाहतविषयक प्रश्न 'स्वतंत्रपणें' व शांतपणें सोडवितां येईल, त्यासाठीं कामगार-क्रांतीची कांहीं गरज नाहीं, साम्राज्यशाही विरुद्ध क्रांतिकारक लढा करण्याचें कांहीं कारण नाहीं, असें गृहीत धरण्यांत येत असे. या क्रांतिविरोधी दृष्टिकोणाचा खोटेपणा आतां उघडकीस आला आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. राष्ट्रीय प्रश्न कामगार-क्रांतीच्या आधारेंच सोडवितां येईल, कामगार-क्रांतीशीं सांगड घालूनच सोडवितां येईल, तसेंच पाश्चिमात्य देशांतील क्रांति साम्राज्यशाहीविरुद्ध वसाहत देशांनीं व परतंत्र देशांनीं चालविलेल्या स्वातंत्र्य-चळवळीशीं क्रांतिकारक दोस्ती जोडूनच विजयी होऊं शकेल,—ही गोष्ट लेनिनवादानें सिद्ध केली आहे, आणि साम्राज्यशाही युद्धांत व रशियांतील क्रांतींत तिचें प्रत्यंतर आलें आहे. राष्ट्रीय प्रश्न हा कामगार-क्रांतीच्या सर्वसामान्य प्रश्नाचाच एक भाग आहे, कामगार-हुकूमशाहीच्या प्रश्नाचाच एक भाग आहे.

हा प्रश्न पुढील स्वरूपांत आपणांपुढें येतो :—गांजलेल्या देशांच्या क्रांतिकारक स्वातंत्र्यचळवळीमध्यें क्रांतीला पोषक होण्याची जी शक्यता अंतर्भूत असते ती यापूर्वीच समाप्त होऊन चुकली आहे काय ? आणि ती जर समाप्त झाली नसेल, तर कामगार-क्रांतीसाठीं तिचा उपयोग करतां येण्याची कांहीं आशा आहे काय ? तिचा असा उपयोग करतां येईल अशी अपेक्षा करण्यास कांहीं आधार आहे काय ? परतंत्र देश व वसाहतदेश साम्राज्यवादी भांडवलदार वर्गाची राखीव फौज न राहातां क्रांतिकारक कामगारवर्गाची राखीव फौज बनतील अशी आशा आहे काय ? अशी अपेक्षा करण्यास कांहीं आधार आहे काय ?

या प्रश्नाला लेनिनवादाचें उत्तर 'होय' असेंच आहे. गांजलेल्या देशांच्या राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या चळवळींत क्रांतीला पोषक होण्याची शक्यता असते, व समान शत्रूंचें उच्चाटन करण्यासाठी—साम्राज्यशाहीचे उच्चाटन करण्या-

साठीं—या शक्यतेचा उपयोग करून घेतां येईल, ही गोष्ट लेनिनवाद मान्य करतो. या प्रश्नाच्या बाबतींत लेनिनवादानें दिलेला निर्णय बरोबर आहे ही गोष्ट साम्राज्यशाहीचा विकासक्रम, साम्राज्यशाही युद्ध, व रशियांतील क्रांति, यांच्या अनुभवानें पूर्णपणें प्रत्ययास आली आहे.

यावरून असा निष्कर्ष निघतो कीं गांजलेल्या व परतंत्र देशांतील जनतेच्या राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या चळवळीला कामगारवर्गानें पाठिंबा देणें आवश्यक आहे तिला कामगारवर्गानें खंबीरपणें सक्रिय पाठिंबा दिला पाहिजे.

मात्र याचा असा अर्थ नव्हे कीं कामगारवर्गानें प्रत्येक ठिकाणच्या राष्ट्रीय चळवळीला नेहमींच पाठिंबा दिला पाहिजे, मग तिचें विशिष्ट स्वरूप कोणतेंही असो. याचा अर्थ एवढाच कीं ज्या राष्ट्रीय चळवळीमुळे साम्राज्यशाहीचें सामर्थ्य वाढण्याऐवजीं खच्ची होतें, साम्राज्यशाही टिकून राहाण्याऐवजीं उलथून पाडण्यास मदत होते, अशा राष्ट्रीय चळवळींना पाठिंबा दिला पाहिजे. कांहीं गांजलेल्या देशांतील राष्ट्रीय चळवळी कामगार-चळवळीच्या प्रगतीला बाधक होत असल्याचीं उदाहरणें आहेत. अशा परिस्थितींत त्या राष्ट्रीय चळवळींना पाठिंबा देणें अर्थात् शक्य नाहीं. राष्ट्रांच्या हक्काचा प्रश्न हा अलग व स्वयंपूर्ण प्रश्न नाहीं, तो कामगार-क्रांतीच्या सर्वसामान्य प्रश्नाचा एक भाग आहे, कामगार-क्रांतीच्या समग्र प्रश्नाच्या मानानें त्याला गौण महत्व आहे, त्या समग्र प्रश्नाच्या दृष्टीनेंच त्याचा विचार केला पाहिजे. गेल्या शतकाच्या पांचव्या दशकांत मार्क्सनें पोलंड व हंगेरीमधील जनतेच्या राष्ट्रीय चळवळीला पाठिंबा दिला, परंतु झेक व दक्षिण स्लाव्ह जनतेच्या राष्ट्रीय चळवळीला विरोध केला. कां? कारण झेक व दक्षिण स्लाव्ह त्यावेळीं 'प्रतिगामी राष्ट्रें' बनले होते, ते रशियानें यूरपमध्यें स्थापन केलेले किल्ले होते, ते एकतंत्री राज्यसत्तेची राखणदारी करणारे किल्ले होते, उलटपक्षीं पोल व हंगेरियन हे 'क्रांतिकारक राष्ट्रें' होते, तें एकतंत्री राज्यसत्तेविरुद्ध लढत होते. त्यावेळीं झेक व दक्षिण स्लाव्ह जनतेच्या राष्ट्रीय चळवळीला पाठिंबा देणें यूरपमधील क्रांतिकारक चळवळीचा सर्वांत भयंकर दुष्मन असलेल्या झारशाहीला अप्रत्यक्षपणें पाठिंबा देण्यासारखेंच होतें.

लेनिन म्हणतो :--

> "लोकशाहीच्या निरनिराळ्या मागण्या--स्वयंनिर्णयाची मागणी-सुद्धां--परिस्थिति-निरपेक्ष (ॲब्सोल्यूट) नसतात, सर्वसाधारण लोकशाहीच्या **जागतिक** चळवळीचा एक **अल्प भाग** एवढेंच त्यांना महत्व असतें. (आजच्या परिस्थितींत 'सर्वसाधारण लोकशाहीची चळवळ' याऐवजीं 'सर्वसाधारण समाजसत्तावादी चळवळ' असें म्हणावें.) विशिष्ट प्रसंगीं समग्र मागणी व तिचा अंग असलेली मागणी यांच्यांत विरोध उत्पन्न होणें संभवनीय आहे, अशा वेळीं ती अंशात्मक मागणी टाकून दिली पाहिजे."

कांहीं राष्ट्रीय चळवळीच्या बाबतींत ही भूमिका घेणें प्राप्त होतें. त्या चळवळी प्रतिगामी स्वरूपाच्या असण्याचा संभव आहे, हें लक्षांत घ्यावें लागतें. केवळ औपचारिक दृष्टीनें त्या चळवळींकडे पाहून चालणार नाहीं, परिस्थिति-निरपेक्ष हक्कांच्या दृष्टीनें त्यांचें मूल्यमापन करणें योग्य होणार नाहीं, विशिष्ट परिस्थितीच्या दृष्टीनें त्यांचा विचार केला पाहिजे, क्रांतिकारक चळवळीच्या हिताच्या दृष्टीनें त्यांचा विचार केला पाहिजे

एकंदर राष्ट्रीय चळवळीच्या क्रांतिकारक स्वरूपाविषयीं बोलतांनासुद्धां हीच गोष्ट लक्षांत घेणें जरूर आहे. बहुसंख्य राष्ट्रीय चळवळीचें स्वरूप क्रांतिकारक असतें यांत शंका नाहीं; परंतु कांहीं विशिष्ट देशांतील राष्ट्रीय चळवळी सापेक्षतेनें पाहिल्यास ज्याप्रमाणें प्रतिगामी स्वरूपाच्या ठरणें संभवनीय असतें, त्याचप्रमाणें या बहुसंख्य राष्ट्रीय चळवळींचें क्रांतिकारक स्वरूप-सुद्धां सापेक्ष व परिस्थितिनिष्ठच असतें. साम्राज्यशाहीच्या जुलुमामुळें एकाद्या राष्ट्रीय चळवळीला क्रांतिकारक स्वरूप प्राप्त होण्यासाठीं त्या चळवळींत कामगारवर्गाचा भाग असणें आवश्यक आहे असें मुळींच नाहीं, त्या चळवळीचा कार्यक्रम क्रांतिकारक किंवा राजेशाहीविरुद्ध असला पाहिजे असें मुळींच नाहीं, त्या चळवळीला लोकसत्तावादाचा पाया असला पाहिजे असें मुळींच नाहीं. अफगाणिस्तानचा अमीर व त्याचे सहकारी राजेशाहीचे

पुरस्कर्ते आहेत खरे, पण अफगाणिस्तानच्या स्वातंत्र्यासाठीं अमीरानें सध्यां चालविलेला लढा वास्तविकदृष्टचा (ऑब्जेक्टिव्हली) **क्रांतिकारक** लढाच आहे, कारण या लढ्यामुळें साम्राज्यशाही विस्कळित होते, साम्राज्यशाहीचा पाया उखडला जातो. उलटपक्षीं केरेन्स्की आणि त्सेरेतेली, रेनॉडेल आणि श्चायडेमान, चेर्नोव आणि डॅन, हेंडरसन आणि क्लाइन्स, यांच्यासारख्या 'मायेफिरू' लोकसत्तावाद्यांनी, 'समाजसत्तावाद्यांनीं', 'क्रांतिकारकांनीं,' राजेशाहीविरोधकांनीं, साम्राज्यशाही युद्धाच्या काळांत जो लढा चालविला तो **प्रतिगामी** लढा होता, कारण त्यामुळें साम्राज्यशाहीचीं पापें झांकलीं गेली, साम्राज्यशाहीचें सामर्थ्य वाढलें, साम्राज्यशाहीला विजय मिळाला. त्याच-प्रमाणें ईजिप्तमधील राष्ट्रीय चळवळीचे पुढारी जन्मानें भांडवलदार वर्गांतले आहेत व त्यांचा पेशा भांडवलदारी आहे हें खरें व समाजसत्तावादाला ते विरोध करतात खरे, तरीसुद्धां ईजिप्तच्या व्यापाऱ्यांनीं व भांडवलदारी बुद्धिजीवींनी ईजिप्तच्या स्वातंत्र्यासाठीं चालविलेला लढा वास्तविकदृष्टचा **क्रांतिकारक** लढाच आहे. उलटपक्षीं इंग्लंडमधील मजूर पक्षाच्या सरकारांत असलेले लोक जन्मानें कामगारवर्गांतले आहेत व त्यांनीं स्वतःला कामगारवर्गाचा टिळा लावला आहे हें खरें व ते समाजसत्तावादाचा 'पुरस्कार' करतात खरे, तरीसुद्धां ईजिप्तचें पारतंत्र्य कायम ठेवण्यासाठीं या लोकांनीं चालविलेला लढा त्याच कारणास्तव **प्रतिगामी** लढा आहे. हिंदुस्थान व चीनसारख्या याहूनही मोठ्या वसाहतदेशांतील व परतंत्र देशांतील राष्ट्रीय चळवळी-विषयीं येथें विस्तारानें बोलण्याची गरज नाहीं. त्या राष्ट्रीय चळवळीनें स्वातंत्र्याच्या दिशेनें टाकलेलें प्रत्येक पाऊल म्हणजे साम्राज्यशाहीच्या छातीवर वज्रमुष्ठीचा प्रहारच होय, तें **क्रांतिकारक** कार्यच समजलें पाहिजे, मग औपचारिक लोकशाहीच्या मागण्यांशीं तें विसंगत कां असेना.

गांजलेल्या देशांतील राष्ट्रीय चळवळीचें मूल्यमापन औपचारिक लोक-शाहीच्या दृष्टीनें करतां कामा नये, साम्राज्यशाहीविरोधी लढा यशस्वी करण्यांत ती चळवळ कितपत परिणामकारक होत आहे हें लक्षांत घेऊनच तिचें

मूल्यमापन केलें पाहिजे, "अलगपणें नव्हे, तर जागतिक पार्श्वभूमीवरून" तिचें मूल्यमापन केलें पाहिजे, असें लेनिननें सांगितलें आहे व तें अगदीं बरोबर आहे.

**(२) गांजलेल्या राष्ट्रांची स्वातंत्र्यप्राप्तीची चळवळ व कामगार-क्रांति**:— राष्ट्रीय प्रश्न सोडविण्याच्या बाबतींत लेनिनवादाचीं मूलभूत प्रमेयें पुढील-प्रमाणें आहेत :—

(१) एकंदर जग दोन तटांत विभागलें गेलें आहे : एक मूठभर सुधार-लेल्या राष्ट्रांचा तट ; या राष्ट्रांजवळ बँक-भांडवल आहे व दुनियेंतील जनतेच्या प्रचंड बहुसंख्येला तीं पिळून काढतात. दुसरा वसाहतींतील व परतंत्र देशांतील गांजलेल्या व पिळल्या जाणाऱ्या जनतेचा तट ; यांत दुनियेंतील जनतेच्या प्रचंड बहुसंख्येचा समावेश होतो.

(२) बँक-भांडवलाकडून गांजले व पिळले जाणारे वसाहतदेश व परतंत्र देश म्हणजे साम्राज्यशाहीची प्रचंड राखीव शक्ति आणि साम्राज्यशाहीच्या ताकतीचा एक अत्यंत महत्वाचा झरा होत.

(३) परतंत्र देशांतील व वसाहत देशांतील गांजलेल्या जनतेनें साम्राज्य-शाहीविरुद्ध क्रांतिकारक लढा चालविणें हाच जुलूमशाहीपासून व पिळणुकी-पासून तिची मुक्तता करण्याचा एकमेव मार्ग आहे.

(४) अत्यंत महत्वाच्या वसाहतदेशांत व परतंत्र देशांत राष्ट्रीय स्वातं-त्र्याच्या चळवळीची सुरवात होऊन चुकली आहे, व त्यामुळें जागतिक भांडवल-शाहीचा अरिष्टप्रसंग निर्माण होणें अपरिहार्य झालें आहे.

(५) विकसित देशांतील कामगार चळवळ आणि वसाहतदेशांतील राष्ट्रीय स्वातंत्र्याची चळवळ हे क्रांतिकारक चळवळीचेच दोन प्रकार आहेत, व समान शत्रूविरुद्ध—साम्राज्यशाहीविरुद्ध—या दोन्ही चळवळींची एकजूट करून संयुक्त मोर्चा उभारणें उभयतांच्या हिताच्या दृष्टीनें आवश्यक आहे.

(६) संयुक्त क्रांतिकारक मोर्चा जर अस्तित्वांत आणला नाहीं व मजबूत केला नाहीं, तर विकसित देशांतील कामगारवर्गाला यश मिळणें शक्य नाहीं,

व साम्राज्यशाहीच्या जोखडापासून गांजलेल्या राष्ट्रांची मुक्तता होणेंही शक्य नाहीं.

(७) गांजलेल्या राष्ट्रांनीं साम्राज्यशाहीविरुद्ध चालविलेल्या स्वातंत्र्य-चळवळीला गांजणाऱ्या राष्ट्रांतील कामगारवर्गानें जर खंबीरपणें प्रत्यक्ष पाठिंबा दिला नाही, तर हा संयुक्त क्रांतिकारक मोर्चा अस्तित्वांत आणणें शक्य नाहीं, कारण मार्क्सच्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे "इतर राष्ट्रांवर जुलूम करणारें कोणतेंही राष्ट्र स्वतः स्वतंत्र होऊं शकणार नाहीं."

(८) अशा प्रकारें पाठिंबा द्यावयाचा म्हणजे राष्ट्रांना विभक्त होण्याचा व स्वतंत्र राज्य म्हणून जगण्याचा हक्क आहे या घोषणेचा प्रचार केला पाहिजे, तिचें समर्थन केलें पाहिजे, ती अमलांत आणली पाहिजे

(९) एकजिनसी जागतिक अर्थव्यवस्था अस्तित्वांत येणें हा समाज-सत्तावादाच्या विजयाचा भौतिक पाया आहे, पण वरील घोषणा जर अमलांत आणली नाहीं तर निरनिराळ्या राष्ट्रांची एकजूट व सहकार्य घडवून आणून अशी एकजिनसी जागतिक अर्थव्यवस्था अस्तित्वांत आणणें शक्य होणार नाहीं.

(१०) ही एकजूट केवळ स्वेच्छेनेंच घडून येऊं शकेल, राष्ट्रांराष्ट्रांच्या परस्पर विश्वासाच्या व स्नेहभावाच्या पायावरच तिची उभारणी होऊं शकेल.

यामुळें राष्ट्रीय प्रश्नाच्या क्षेत्रांत दोन बाजू नजरेस पडतात, दोन प्रवृत्ति आढळून येतात :—(१) साम्राज्यशाहीच्या बेड्या तोडून राजकीय स्वातंत्र्य मिळविण्याची व स्वतंत्र राष्ट्रीय राज्यसत्ता अस्तित्वांत आणण्याची प्रवृत्ति; ही प्रवृत्ति उदयास येणें हा साम्राज्यशाही जुलुमाचा व वसाहतींच्या पिळणुकीचा परिणाम होय. (२) राष्ट्राराष्ट्रांमध्यें आर्थिक स्नेहसंबंध जोडण्याची प्रवृत्ति; ही प्रवृत्ति उदयास येणें हा जागतिक बाजारपेठ व जागतिक अर्थव्यवस्था अस्तित्वांत येण्याचा परिणाम होय.

लेनिन म्हणतो :--

"भांडवलशाहीचा विकास होत असतांना राष्ट्रीय प्रश्नाच्या क्षेत्रांत दोन इतिहाससिद्ध प्रवृत्ति उदयास येतात. एक प्रवृत्ति म्हणजे राष्ट्रीय जीवनाची जाणीव जागृत होणें, राष्ट्रीय चळवळी अस्तित्वांत येणें, सर्व प्रकारच्या राष्ट्रीय जुलुमशाहीविरुद्ध लढा सुरू होणें, राष्ट्रीय राज्यसत्ता अस्तित्वांत आणणें. दुसरी प्रवृत्ति म्हणजे राष्ट्राराष्ट्रांमध्ये नानाप्रकारचें दळणवळण सुरू होणें व त्याची एकसारखी वाढ होणें, राष्ट्राराष्ट्रांना अलग ठेवणारे अडथळे कोसळून पडणें; भांडवल, सर्वसाधारण आर्थिक जीवन, राजकारण, विज्ञान, वगैरे बाबतींत आंतरराष्ट्रीय एकी निर्माण होणें. या दोन्ही प्रवृत्ति उदयास येणें हा भांडवलशाहीचा निरपवाद नियम आहे. भांडवलशाहीच्या विकासाच्या सुरवातीला पहिल्या प्रवृतीचें प्राबल्य असतें; आणि भांडवलशाही परिपक्व दशेला पोंचल्यावर, समाजसत्तावादी समाजव्यवस्थेंत तिचें रूपांतर होण्याचा क्षण जवळ येऊं लागल्यावर, दुसरी प्रवृत्ति तिचें लक्षण बनते."

साम्राज्यशाहीच्या दृष्टीनें पाहतां या दोन प्रवृत्ति म्हणजे बिनतोड अंतर्गत विरोधच होत. कारण वसाहतींची पिळणूक केल्याशिवाय आणि 'अखंड' साम्राज्याच्या चौकटींत त्यांना जबरदस्तीनें जखडून ठेवल्याशिवाय साम्राज्यशाही जगूंच शकत नाहीं, आणि निरनिराळ्या राष्ट्रांना एकत्र आणण्याचा साम्राज्यशाहीचा मार्ग मुलुखगिरी व वसाहती जिंकणें हाच असूं शकतो, साधारणपणें पाहतां तिला अन्य मार्गानें हें साधेल अशी कल्पनाच करता येत नाहीं.

उलटपक्षीं कम्युनिझमच्या दृष्टीनें पाहतां या दोन प्रवृत्ति म्हणजे एकाच कार्याची---साम्राज्यशाहीच्या जोखडापासून गांजलेल्या राष्ट्रांच्या जनतेची मुक्तता करण्याच्या कार्याची---दोन अंगें होत. कारण निरनिराळ्या राष्ट्रांची एकजूट करून एकजिनसी जागतिक अर्थव्यवस्था अस्तित्वांत आणावयाची

असेल तर ती परस्परविश्वासाच्या आणि राजीखुषीनें दिलेल्या संमतीच्या पायावरच अस्तित्वांत आणतां येईल, निरनिराळ्या राष्ट्रांची स्वेच्छेनें एकजट घडवून आणावयाची असेल तर अगोदर वसाहतींना साम्राज्यशाहीच्या 'अखंड' चौकटींतून विभक्त केलें पाहिजे व स्वतंत्र राज्यांत त्यांचें रूपांतर केलें पाहिजे ही गोष्ट कम्युनिझमला ठाऊक आहे.

या कारणास्तव सत्ताधारी राष्ट्रांतील (ब्रिटन, फरान्स, अमेरिका, इटली, जपान, वगैरे देशांतील) 'समाजसत्तावाद्यां'च्या साम्राज्यवादी राष्ट्रीय दुरभिमानाविरुद्ध निकरानें व खंबीरपणानें सतत लढा चालविणें आवश्यक आहे. हे 'समाजसत्तावादी' स्वतःच्या साम्राज्यवादी सरकारांविरुद्ध लढण्यास तयार नसतात, 'स्वतःच्या' वसाहतींतील गांजलेल्या जनतेनें जुलमशाहीपासून मुक्त होण्यासाठीं आणि विभक्त राज्य स्थापन करण्यासाठीं चालविलेल्या लढ्याला पाठिंबा देण्यास ते तयार नसतात.

त्यांच्याविरुद्ध हा लढा जर चालविला नाहीं तर सत्ताधारी राष्ट्रांतील कामगारवर्गाला खऱ्याखुऱ्या आंतरराष्ट्रीयवादाच्या बाण्याचें शिक्षण देणें शक्य होणार नाहीं, परतंत्र देशांतील व वसाहतदेशांतील राबणाऱ्या जनतेशीं स्नेहभाव जोडण्यास त्याला शिकवितां येणार नाहीं, कामगार-क्रांतीसाठीं खरीखुरी तयारी करण्याच्या बाण्यानें त्याला शिक्षण देणें अशक्य होईल. पूर्वीच्या रशियन साम्राज्यांतील गांजलेल्या राष्ट्रांच्या जनतेची सहानुभूति व पाठिंबा रशियन कामगारवर्गाला जर मिळाला नसता तर रशियामध्यें क्रांति यशस्वी झाली नसती, कोल्चाक व देनिकिन जमीनदोस्त झाले नसते. परंतु या जनतेची सहानुभूति व पाठिंबा मिळविण्यासाठीं रशियन कामगारवर्गाला प्रथम रशियन साम्राज्यशाहीच्या बेड्या तोडणें व राष्ट्रीय जुलुमशाहीच्या जोखडांतून या जनतेची मुक्तता करणें प्राप्त झालें. हें जर रशियन कामगारवर्गानें केलें नसतें तर सोविएत सत्तेचा पाया मजबूत करणें अशक्य झालें असतें, खऱ्याखुऱ्या आंतरराष्ट्रीयवादाची प्रतिष्ठापना करणें अशक्य झालें असतें, निरनिराळ्या राष्ट्रांची एकजूट करून जी एकजिनसी जागतिक

अर्थव्यवस्था अस्तित्वांत आणावयाची आहे तिचा जिवंत नमुना असलेलें व राष्ट्राराष्ट्रांचें सहकार्य घडवून आणण्यासाठी स्थापन केलेली अपूर्व संघटना म्हणून आज नजरेस पडणारें सोविएत यूनियन अस्तित्वांत आणणें अशक्य झालें असतें.

गांजल्या जाणाऱ्या देशांतील ज्या समाजसत्तावाद्यांना आपल्या राष्ट्राच्या चौकटीबाहेरचें कांहीं दिसूं शकत नाहीं, आपल्या देशांतील स्वातंत्र्याची चळवळ व सत्ताधारी देशांतील कामगार चळवळ यांचा परस्परसंबंध कळत नाही त्यांच्या राष्ट्रीय संकुचितपणाविरुद्ध, कूपमंडुकवृत्तीविरुद्ध, आणि अलगपणा विरुद्ध लढा चालविणें हें सुद्धां याच कारणास्तव जरूरीचें आहे.

हा लढा जर चालविला नाहीं तर गांजल्या जाणाऱ्या राष्ट्रांतील कामगार-वर्ग आपलें स्वतंत्र धोरण आंखूं शकणार नाहीं, समान शत्रूचें---साम्राज्य-शाहीचें---उच्चाटन करण्याच्या लढ्यांत सत्ताधारी देशाच्या कामगारवर्गाशीं वर्गीय एकजूट करणें त्याला शक्य होणार नाहीं. हा लढा जर चालविला नाहीं तर आंतरराष्ट्रीयवाद अशक्य होऊन बसेल.

सत्ताधारी राष्ट्रांतील व गांजल्या जाणाऱ्या राष्ट्रांतील राबणाऱ्या जनतेला क्रांतिकारक आंतरराष्ट्रीयवादाच्या बाण्याचें जे शिक्षण द्यावयाचें तें याच रीतीनें दिलें पाहिजे.

कामगारांना आंतरराष्ट्रीयवादाच्या बाण्यानें शिक्षण देण्याचें जें दुहेरी कार्य कम्युनिझमनें पार पाडले पाहिजे त्याविषयीं लेनिननें पुढील उद्‌गार काढले आहेत :—

> "जुलुम करणाऱ्या बड्या राष्ट्रांत आणि गांजल्या जाणाऱ्या छोट्या राष्ट्रांत, मुलुखगिरी करणाऱ्या राष्ट्रांत आणि पादाक्रांत झालेल्या राष्ट्रांत, या शिक्षणाचें **विशिष्ट** स्वरूप **एकच** असूं शकेल काय ?

"अर्थात् नाहीं. ध्येय एकच आहे,—संपूर्ण समता, अत्यंत निकट स्नेहभाव, व त्यानंतर **सर्व राष्ट्रांचें एकीकरण** हेंच तें ध्येय होय; परंतु हें ध्येय गांठण्याचा प्रत्येक राष्ट्राचा रस्ता मात्र अर्थात् निराळा असतो. उदाहरणार्थ पुस्तकांतील पानांच्या मध्यबिंदूकडे एका कडेकडून जावयाचें असल्यास डाव्या दिशेनें गेलें पाहिजे व दुसऱ्या कडेकडून जावयाचें असल्यास उजव्या दिशेनें गेलें पाहिजे. जुलूम करणाऱ्या व मुलुखगिरी करणाऱ्या बड्या राष्ट्रांतील समाजसत्तावाद्यानें सर्व-साधारणपणें राष्ट्राराष्ट्रांचें एकीकरण करण्याच्या कल्पनेचा पुरस्कार करतांना एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे व ती ही कीं, झार निकोलस, कैसर विल्हेम, जॉर्ज बादशहा, प्वांकारे, वगैरे 'त्याच्या' राज्यकर्त्यांना-सुद्धां ही राष्ट्राराष्ट्रांच्या एकीकरणांची कल्पना पसंत आहे, लहान राष्ट्रें स्वतःच्या घशांत घालावी व अशा रीतीनें त्यांचें एकीकरण करावें ही गोष्ट त्यांना एकदम कबूल आहे! गॅलीशियाशीं 'एकीकरण' करण्यास झार निकोलस तयार आहे' आणि बेल्जियमशी 'एकीकरण' करण्यास कैसर विल्हेम तयार आहे. ज्या समाजसत्तावाद्याला या गोष्टीचा क्षणभरही विसर पडतो तो तात्विकदृष्टया विक्षिप्त ठोकळे-बाजीवाला ठरेल व प्रत्यक्ष व्यवहाराच्या दृष्टीनें तो साम्राज्यशाहीचा साथीदार ठरेल.

"गांजणाऱ्या देशांतील कामगारांना आंतरराष्ट्रीयवादाचें शिक्षण देतांना मुख्य भर द्यावयाचा तो गांजलेल्या राष्ट्रांना विभक्त होण्याचें स्वातंत्र्य असावें या मागणीच्या प्रचारावरच दिला पाहिजे, ही मागणी मांडण्यास त्या कामगारांना प्रवृत्त करण्यावरच या शिक्षणाचा भर असला पाहिजे, हें क्रमप्राप्तच होय. हें जर केलें नाहीं तर आंतर-राष्ट्रीयवादाचें नांवच काढावयास नको. गांजणाऱ्या देशांतील जो कोणी समाजसत्तावादी अशा प्रकारचा प्रचार **करीत नाहीं** तो साम्राज्य-वादीच आहे, तो बदमाश आहे, असें समजण्याचा आपणांला पूर्ण हक्क पोहोंचतो, त्याला असें समजणें हें आपलें कर्तव्यच होय. समाज-

सत्तावाद स्थापन होण्याच्या पूर्वीच्या काळांत या गांजलेल्या राष्ट्रांना विभक्त होतां येण्याचा **संभव** अत्यंत अल्प--हजारांत एक इतकाच-- असेल; तरीसुद्धां त्यांना विभक्त होण्याचें स्वातंत्र्य असलें पाहिजे या मागणीचा प्रचार करणें केव्हांही आवश्यकच होय .........

"उलटपक्षीं छोटया राष्ट्रांतील समाजसत्तावाद्यानें प्रचार करतांना 'राजीखुशीची **एकजूट**' या सर्वसामान्य घोषणेंतील **दुसऱ्या** शब्दावर (एकजुटीवर) भर दिला पाहिजे. आपल्या राष्ट्राला राजकीय स्वातंत्र्य असावें, किंवा शेजारच्या एकाद्या राज्यांत त्याचा समावेश करण्यांत यावा, या दोहोंपैकीं **कोणत्याही** मागणीचा त्यानें पुरस्कार केल्यास हरकत नाहीं, त्यामुळें त्यानें आंतरराष्ट्रीयवादी या नात्यानें आपलें कर्तव्य सोडलें असें होत नाहीं. परंतु कोणत्याही परिस्थितींत त्यानें छोटया राष्ट्राच्या कूपमंडूकवृत्तीला मात्र **विरोध** केला पाहिजे, राष्ट्रीय संकुचितपणाला व अलगपणाला विरोध केला पाहिजे, समग्र व सर्व-साधारण चळवळीचे हितसंबंध लक्षांत घेतले जावे यासाठीं त्यानें झगडलें पाहिजे, संकुचित हितसंबंधांपेक्षां व्यापक हितसंबंधांना प्राधान्य देण्यांत यावें यासाठीं त्यानें झगडलें पाहिजे.

"या प्रश्नाचा ज्यांनीं सांगोपांग विचार केला नाहीं अशा लोकांना वाटतें कीं गांजणाऱ्या राष्ट्रांतील समाजसत्तावाद्यांनीं '**विभक्त** होण्याच्या स्वातंत्र्याचा' आग्रह धरणें, आणि गांजलेल्या राष्ट्रांतील समाजसत्तावाद्यांनीं '**एकजूट** करण्याच्या स्वातंत्र्याचा' आग्रह धरणें, या दोन गोष्टी 'परस्परविरोधी' आहेत. पण थोडासा विचार केल्यास ही गोष्ट पटेल कीं **विशिष्ट** परिस्थितीतून आंतरराष्ट्रीयवादाकडे जाण्याचा व राष्ट्रांचें एकीकरण घडवून येण्याचा **दुसरा** कोणताही मार्ग नाहीं, हें ध्येय दुसऱ्या कोणत्याही मार्गानें गांठतां येणार नाहीं."

★

# [ ७ ]
# व्यूहरचना व डावपेंच

या विषयावर बोलतांना मी सहा प्रश्न चर्चेसाठीं घेणार आहे :—(१) कामगारवर्गाच्या वर्गलढ्यांतील नेतृत्वाचें शास्त्र या नात्यानें व्यूहरचना (स्ट्रॅटेजी) व डावपेंच (टॅक्टिक्स्) यांचा विचार; (२) क्रांतीच्या अवस्था, आणि व्यूहरचना; (३) चळवळीची प्रगति व पीछेहाट, आणि डावपेंच, (४) व्यूहरचनेंतील नेतृत्व, (५) डावपेंचांतील नेतृत्व; (६) सुधारणावाद व क्रांतिवाद.

**(१) कामगारवर्गाच्या वर्ग-लढ्यांतील नेतृत्वाचें शास्त्र या नात्यानें व्यूहरचना व डावपेंच याचा विचार**—एकंदरीनें शांतताभय विकासाच्या परिस्थितींत कामगारांच्या सेना अस्तित्वांत आणणें व त्यांना शिक्षण मिळणें, हें सेकंड इंटरनॅशनलच्या वर्चस्वाच्या काळाचें मुख्य लक्षण होतें. या काळांत पार्लमेंटरी लढा हाच वर्गलढ्याचा मुख्य प्रकार होता. प्रचंड वर्गसंघर्ष, क्रांतिकारक संग्रामांसाठीं कामगारवर्गाला तयार करणें, कामगार हुकुमशाही स्थापन करण्याचा मार्ग, वगैरे प्रश्न त्यावेळीं प्रस्तुत वाटत नव्हते. कामगारांच्या सेना अस्तित्वांत आणण्यासाठीं व शिकवून तयार करण्यासाठीं कायदेशीर विकासाच्या सर्व मार्गांचा उपयोग करावयाचा, कामगारवर्ग हा त्यावेळीं पार्लमेंटमधील सरकारविरोधी (सध्यां अधिकारारूढ नसलेला) पक्ष होता (व तो नेहमींच तसा राहाणार असा त्यावेळीं समज होता) ही गोष्ट लक्षांत घेऊन पार्लमेंटरी लढ्याचा उपयोग करून घ्यावयाचा,—एवढेंच त्यावेळचें कार्य होतें. अशा काळांत, व कामगारवर्गापुढील कार्याच्या स्वरूपाविषयीं अशी कल्पना प्रचलित असतांना, एकजिनसी व्यूहरचना आणि सविस्तर डावपेंच या गोष्टी अर्थात् शक्यच नव्हत्या. डावपेंचाविषयीं आणि व्यूहरचनेविषयीं अर्धवट व तुटक कल्पना अस्तित्वांत होत्या, पण खऱ्याखुऱ्या अर्थानें व्यूहरचना व डावपेंच या गोष्टी अस्तित्वांत नव्हत्या.

सेकंड इंटरनॅशनलनें लढ्याच्या पार्लमेंटरी प्रकारांचा उपयोग करण्याचे डावपेंच अमलांत आणले, हा कांहीं तिचा मुख्य गुन्हा नव्हे. तिच्या आत्म-नाशास कारणीभूत होणारा मुख्य गुन्हा म्हणजे तिनें लढ्याच्या या प्रकारांना फाजील महत्व दिलें, या व्यतिरिक्त लढ्याचे दुसरे प्रकार जवळ-जवळ कोणतेच नाहींत असा तिनें समज करून घेतला, प्रकट क्रांतिकारक संग्रामांचा काळ सुरू झाल्यानंतर व पार्लमेंटबाहेरील लढ्याचा प्रश्न उपस्थित झाल्यानंतर सेकंड इंटरनॅशनलमधील पक्षांनीं या नव्या कार्याकडे पाठ फिरविली व तीं हाती घेण्याचें नाकारलें.

त्यानंतरचा काळ कामगारवर्गाच्या प्रत्यक्ष लढ्याचा काळ होता, तो कामगार-क्रांतीचा काळ होता, भांडवलदारवर्गाचें उच्चाटन करण्याचा प्रश्न त्यावेळीं ताबडतोब प्रत्यक्ष कृति करण्याचा प्रश्न झाला, कामगारवर्गाच्या राखीव फौजेचा प्रश्न (व्यूहरचनेचा प्रश्न) एक अत्यंत निकडीचा प्रश्न झाला, लढ्याचे व संघटनेचे सर्व प्रकार––पार्लमेंटरी व बिनपार्लमेंटरी––(‘डावपेंच’) पूर्णपणें व्यक्त झाले व त्यांना सुनिश्चित स्वरूप आलें. कामगारवर्गाच्या लढ्यासाठीं एकजिनसी व्यूहरचना व सविस्तर डावपेंच आंखणें याच काळांत शक्य झालें. मार्क्स व एंगल्स यांनीं डावपेंच व व्यूहरचना यांविषयीं जे प्रतिभा-शाली विचार मांडले होते ते याच काळांत लेनिननें जगाच्या निदर्शनास आणले. सेकंड इंटरनॅशनलच्या संधिसाधूंनीं हे विचार आतांपर्यंत दडवून ठेवले होते. पण लेनिनचें कार्य मार्क्स व एंगल्स यांनीं डावपेंचांच्या बाबतीत मांडलेल्या कांहीं प्रमेयांचें पुनरुज्जीवन करण्यापुरतेंच मर्यादित नव्हतें. त्यानें या प्रमेयांना अधिक विकसित स्वरूप दिलें, त्यांत नव्या विचारांची व प्रमेयांची भर घातली, व त्या सर्वांचें संकलन केलें. अशा रीतीनें त्यानें कामगारवर्गाच्या वर्गलढ्याचें नेतृत्व करण्याच्या बाबतींतील नियमांचा व मार्गदर्शक तत्त्वांचा पद्धतशीर आराखडा तयार केला. ‘काय केलें पाहिजे ?’, ‘दोन डावपेंच’, ‘साम्राज्य-शाही’, ‘राज्यसत्ता आणि क्रांति’, ‘कामगार-क्रांति आणि तत्त्वभ्रष्ट कौट्स्की’, ‘जहाल साम्यवाद’, वगैरे लेनिनच्या पुस्तकांनीं मार्क्सवादाच्या सर्वसाधारण

भांडारांत—मार्क्सवादाच्या क्रांतिकारक शस्त्रागारांत—अमूल्य भर घातली. या दृष्टीनें या पुस्तकांना अमूल्य धन म्हणून नेहमीं महत्व दिलें जाईल यांत शंका नाहीं.

(२) **क्रांतीच्या अवस्था आणि व्यूहरचना:**—क्रांतीच्या विशिष्ट अवस्थेंत कामगारवर्गानें कोणत्या दिशेनें मुख्य हल्ला चढवावयाचा हें निश्चित करणें, त्याला अनुसरून क्रांतीची सेना ( मुख्य व दुय्यम राखीव फौज ) विशिष्ट ठिकाणीं खडी करण्याची सविस्तर योजना आंखणें, क्रांतीच्या त्या विशिष्ट अवस्थेंत ही योजना अमलांत आणण्यासाठीं झटणें,—यालाच व्यूहरचना म्हणतात.

आपल्या क्रांतीच्या दोन अवस्था पार पडल्या आहेत व ऑक्टोबर क्रांतीच्या वेळेपासून तिसरी अवस्था सुरू झाली आहे. या निरनिराळ्या अवस्थांस अनुसरून आपल्या व्यूहरचनेंतही बदल झाला.

**पहिली अवस्था** (१९०३ ते फेब्रुआरी १९१७) :—

उद्दिष्ट : झारशाही उलथून पाडणें व मध्ययुगीन समाजपद्धतीचे सर्व अवशेष नाहींसे करणें.

क्रांतीची मुख्य शक्ति : कामगारवर्ग.

अगदीं जवळची राखीव फौज : शेतकरीवर्ग.

मुख्य हल्ल्याची दिशा : राजेशाहीचा पुरस्कार करणाऱ्या उदारमतवादी भांडवलदारवर्गाला अलग पाडणें. हा भांडवलदारवर्ग शेतकरीवर्गाला स्वतःच्या वजनाखालीं आणण्याचा प्रयत्न करीत होता व झारशाहीशीं **समेट** करून क्रांति नष्ट करूं पहात होता.

सैन्याच्या मांडणीची योजना : शेतकरीवर्गाशीं कामगारवर्गाची दोस्ती जोडणें.

"एकतंत्री सत्तेचा प्रतिकार बळजबरीनें हाणून पाडण्यासाठीं व भांडवलदारवर्गाचा अस्थिरपणा निष्फळ करण्यासाठीं कामगारवर्गानें शेतकरी बहुजनसमाजाशीं दोस्ती जोडून लोकसत्तावादी क्रांतीचें कार्य पूर्ण केलें पाहिजे." (लेनिन).

**दुसरी अवस्था** (मार्च ते ऑक्टोबर १९१७) :—

उद्दिष्ट : रशियांतील साम्राज्यशाही उलथून पाडणें व साम्राज्यशाही युद्धांतून अंग काढून घेणें.

क्रांतीची मुख्य शक्ति : कामगारवर्ग.

अगदीं जवळची राखीव फौज : गरीब शेतकरी. शेजारच्या देशांतील कामगारवर्ग हा सुद्धां राखीव फौज म्हणून उपयोगी पडण्याचा बराच संभव. युद्ध लांबल्यामुळें व अरिष्टाच्या भोंवऱ्यांत साम्राज्यशाही सांपडल्यामुळें अनुकूल परिस्थिति निर्माण झाली.

मुख्य हल्ल्याची दिशा : मध्यमवर्गीय लोकसत्तावाद्यांना (मेन्शेविक व सोशालिस्ट-रेव्होल्यूशनरी पक्षांना) अलग पाडणें. हे पक्ष राबणाऱ्या शेतकरी जनतेला स्वतःच्या वजनाखालीं आणण्याचा प्रयत्न करीत होते व साम्राज्यशाहीशीं **समेट** करून क्रांति समाप्त करूं पहात होते.

सैन्याच्या मांडणीची योजना : गरीब शेतकऱ्यांशीं कामगारवर्गाची दोस्ती जोडणें.

"भांडवलदारवर्गाचा प्रतिकार बळजबरीनें हाणून पाडण्यासाठीं व शेतकरीवर्गाचा आणि मध्यमवर्गाचा अस्थिरपणा निष्फळ करण्यासाठीं कामगारवर्गानें अर्ध-मजूर जनतेशीं दोस्ती जोडून समाजसत्तावादी क्रांति घडवून आणली पाहिजे." (लेनिन).

**तिसरी अवस्था** (ऑक्टोबर क्रांतीपासून सुरू) :—

उद्दिष्ट : एका देशांतील कामगार हुकुमशाहीचा पाया भक्कम करणें व सर्व देशांतील साम्राज्यशाही उलथून पाडण्यासाठीं मुख्य तळ म्हणून या कामगार

हुकुमशाहीचा उपयोग करणें. एका देशाची मर्यादा ओलांडून क्रांति दूरवर फैलावत आहे; जागतिक क्रांतीचा काळ सुरू झाला आहे.

क्रांतीची मुख्य शक्ति : एका देशांतील कामगार हुकुमशाही व सर्व देशांतील कामगारवर्गाची क्रांतिकारक चळवळ.

मुख्य राखीव फौज : विकसित देशांतील अर्ध-मजूर व छोटे शेतकरी; वसाहतदेशांतील व परतंत्र देशांतील स्वातंत्र्य चळवळ.

मुख्य हल्ल्याची दिशा मध्यमवर्गीय लोकसत्तावाद्यांना अलग पाडणें, सेकंड इंटरनॅशनलमधील पक्षांना अलग पाडणें. हे पक्ष साम्राज्यशाहीशी **समेट** करण्याच्या धोरणाचे मुख्य आधारस्तंभ असतात.

सैन्याच्या मांडणीची योजना : वसाहतदेशांतील व परतंत्र देशांतील स्वातंत्र्य चळवळीशी कामगारक्रांतीची दोस्ती जोडणें.

क्रांतीच्या मुख्य शक्ति कोणत्या व राखीव फौजा कोणत्या हे निश्चित करणें व्यूहरचनेचें कार्य आहे. क्रांतीची एक अवस्था संपून दुसरी अवस्था सुरू झाली म्हणजे व्यूहरचनेंत बदल होतो, पण कोणतीही विशिष्ट अवस्था चालू असतांना मात्र तिच्यांत मूलभूत बदल होत नाही.

(३) **चळवळीची प्रगति व पीछेहाट, आणि डावपेंचः**—चळवळीमध्यें तात्पुरती प्रगति किंवा पीछेहाट होत असतांना, क्रांतीची लाट तात्पुरती उसळत किंवा ओसरत असतांना, कामगारवर्गानें या अल्प काळापुरतें कोणतें विशिष्ट धोरण अमलांत आणावयाचें हें निश्चित करणें, हें धोरण अमलांत आणण्यासाठीं झटणें व त्यासाठीं लढ्याचे व संघटनेचे जुने प्रकार टाकून देऊन नवे प्रकार योजणें, जुन्या घोषणांऐवजीं नव्या घोषणांचा पुरस्कार करणें, या निरनिराळ्या प्रकारांची एकमेकांशीं सांगड घालणें व इतर उपाय योजणें, —यालाच डावपेंच म्हणतात.

व्यूहरचनेचें उद्दिष्ट झारशाहीविरुद्ध किंवा भांडवलदारवर्गाविरुद्ध चालविलेला लढा यशस्वी करणें, या लढ्याची परिपूर्ति करणें, हें आहे असें आपण

समजू; अशा वेळीं डावपेंचांचें जें उद्दिष्ट असतें तें गौण महत्वाचें असतें, डावपेंचांचें उद्दिष्ट समग्र युद्धांत विजय मिळविणें हें नसून विशिष्ट लढाईंत किंवा विशिष्ट चकमकींत जय मिळविणें हेंच असतें. क्रांतीच्या भरती-ओहोटीच्या विशिष्ट काळांतील परिस्थितीस अनुसरून विशिष्ट मोहीम पार पाडणें, विशिष्ट कार्य साधणें, हेंच डावपेंचांचें उद्दिष्ट असतें. डावपेंच म्हणजे व्यूहरचनेचा एक भाग होय. व्यूहरचनेच्या मानानें डावपेंचांना गौण महत्व असतें, डावपेंच व्यूहरचनेला पोषक असावे लागतात.

चळवळीची लाट तात्पुरती पुढें किंवा मागें सरकली कीं त्याप्रमाणें डावपेंच बदलतात. क्रांतीच्या पहिल्या अवस्थेंत (१९०३ ते फेब्रुआरी १९१७ पर्यंतच्या काळांत) व्यूहरचनेचा आराखडा एकच होता, त्यांत बदल झाला नाहीं, परंतु त्या काळांत डावपेंच मात्र अनेकदां बदलले. १९०३ ते १९०५ पर्यंतच्या काळांत पार्टीनें चढाईचे डावपेंच अमलांत आणले, कारण त्यावेळीं क्रांतीची लाट उंचावत होती, चळवळीची चढती कमान होती, आणि या परिस्थितीला अनुरूप असलेले डावपेंच योजणेंच क्रमप्राप्त होतें. म्हणून त्यावेळीं लढ्याच्या क्रांतिकारक प्रकारांचा अवलंब करण्यांत आला; क्रांतीची लाट उसळत असतांना हेंच योग्य होतें. स्थानिक राजकीय संप, राजकीय निदर्शनें, सार्वत्रिक राजकीय संप, दूमा-सभेवर बहिष्कार, बंडाचा उठाव, क्रांतिकारक लढाऊ घोषणा—असे लढ्याचे प्रकार त्यावेळीं एकामागून एक उपयोगांत आणण्यांत आले. लढ्याच्या प्रकारांत हे बदल करतांना संघटनेच्या प्रकारांतही तदनुरूप बदल करण्यांत आले. फॅक्टरी कमिट्या, क्रांतिकारक शेतकरी कमिट्या, संप कमिट्या, कामगार-प्रतिनिधींचीं सोविएतें, कमीजास्त उघडपणें कार्य करणारा कामगारपक्ष—असे त्या काळांतले संघटना-प्रकार होते.

१९०७ ते १९१२ च्या काळांत पार्टीला पीछेहाटीच्या डावपेंचांचा अवलंब करणें भाग पडलें; कारण त्यावेळीं आपणांला आढळून आलें कीं क्रांतिकारक चळवळीची लाट ओसरूं लागली आहे, क्रांतीचा जोर कमी होऊं लागला आहे. त्यावेळचे डावपेंच आंखतांना ही परिस्थिति लक्षांत घेतल्याशिवाय गत्यंतर

नव्हतें. या परिस्थितीस अनुसरून लढ्याचे प्रकार बदलले आणि संघटनेचे प्रकारही बदलले. दूमा-सभेवर बहिष्कार घालण्याऐवजीं दूमा-सभेंत भाग घेण्यांत आला. दूमा-सभेच्या बाहेर प्रकट व प्रत्यक्ष क्रांतिकारक लढे करण्याऐवजीं दूमा-सभेंत पार्लमेंटरी पद्धतीनें भाषणें व इतर कार्य करण्यांत आलें; सार्वत्रिक राजकीय संपांऐवजीं दैनंदिन मागण्यांसाठीं आर्थिक संप करण्यांत आले, किंबहुना संपाची चळवळ अजिबात थंडावली. त्या काळांत पार्टीला अर्थात् गुप्तपणें काम करणें आवश्यक झालें, आणि क्रांतिकारक जनसामुदायिक संघटनांच्या ऐवजीं सांस्कृतिक संघटना, शिक्षणसंस्था, सहकारी संस्था, कामगारविम्याच्या संस्था, वगैरे कायदेशीर संस्थांचा उपयोग करावा लागला.

क्रांतीच्या दुसऱ्या अवस्थेंत व तिसऱ्या अवस्थेंतसुद्धां हीच गोष्ट घडून आली. प्रत्येक अवस्थेंत व्यूहरचनेच्या योजनेमध्यें बदल झाला नाहीं, पण डावपेंचांत मात्र कैक वेळां बदल करावे लागले.

कामगारवर्गाच्या लढ्याचे व संघटनेचे कोणते प्रकार अमलांत आणावयाचे, त्यांच्यांत कोणते बदल करावयाचे, निरनिराळ्या प्रकारांची सांगड कशी घालावयाची, हें निश्चित करणें डावपेंचांचें कार्य आहे. क्रांतीची कोणतीही विशिष्ट अवस्था चालू असतांना कैक वेळां डावपेंच बदलावे लागण्याचा संभव असतो. क्रांतीची लाट तात्पुरती ओसरत आहे कीं वर उसळत आहे यावर हे बदल अवलंबून असतात.

(४) **व्यूहरचनेंतील नेतृत्व**:—क्रांतीची राखीव फौज दोन प्रकारची असूं शकते—प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष.

**प्रत्यक्ष राखीव फौज**—(१) शेतकरी वर्ग आणि सर्वसाधारणपणें देशांतील लोकसंख्येचे मधले थर; (२) शेजारच्या देशांतील कामगारवर्ग; (३) वसाहतदेशांतील व परतंत्र देशांतील क्रांतिकारक चळवळ; (४) कामगार हुकुमशाहीनें साध्य केलेलें यश (प्रबळ शत्रूबरोबर तडजोड करून तात्पुरती उसंत मिळविण्यासाठीं कामगारवर्गाला या यशाच्या थोड्याशा अंशांवर

पाणी सोडणें शक्य होतें, व तसें केलें तरी कामगारवर्गाचें सामर्थ्याधिक्य कायम रहातें).

**अप्रत्यक्ष राखीव फौज**—(१) देशांतील कामगारेतर वर्गांचे आपापसांतील विरोध व झगडे (शत्रूचें बळ खच्ची करण्यासाठीं व स्वतःचें राखीव बळ वाढविण्यासाठीं कामगारवर्ग या झगड्यांचा उपयोग करूं शकतो); (२) कामगार राज्याशीं वैर करणाऱ्या भांडवलदारी राज्यांचे आपापसांतील विरोध व झगडे व त्यांचीं युद्धें (उदाहरणार्थ साम्राज्यशाही युद्धें). कामगारवर्ग चढाईच्या वेळीं त्यांच्यांतील या झगड्यांचा उपयोग करूं शकतो, व नाइलाजास्तव पीछेहाटीचा प्रसंग आल्यास त्यावेळीं सोइस्कर हालचाल करण्यासाठीं सुद्धां कामगारवर्ग या झगड्यांचा उपयोग करूं शकतो.

यांपैकीं पहिल्या प्रकारच्या राखीव फौजेविषयीं विस्तारानें बोलण्याची गरज नाहीं, कारण तिचें महत्व सर्वांना ठाऊक आहे. पण दुसऱ्या प्रकारच्या राखीव फौजेचें महत्व मात्र नेहमींच तितकें स्पष्ट नसतें, म्हणून तिच्याविषयीं हें सांगणें जरूर आहे कीं या अप्रत्यक्ष राखीव फौजेला क्रांतीच्या दृष्टीनें कधीं कधीं अव्वल दर्जाचें महत्व प्राप्त होतें. उदाहरणार्थ पहिल्या क्रांतीच्या वेळीं व त्यानंतरच्या काळांत मध्यम-वर्गीय लोकसत्तावादी (सोशालिस्ट-रेव्होल्यूशनरी पक्ष) व राजेशाहीचा पुरस्कार करणारा उदारमतवादी भांडवलदार वर्ग (कॉंस्टिटयूशनल-डेमोक्रॅटिक पक्ष) यांच्यांत झगडा सुरू होता, व हा झगडा फारच महत्वाचा होता हें नाकबूल करतां येणार नाहीं. शेतकऱ्यांवरील भांडवलदारवर्गाचें वजन नाहींसें करण्यास हा झगडा कारणीभूत झाला, यांत शंका नाहीं. तसेंच ऑक्टोबर क्रांतीच्या वेळीं साम्राज्यवाद्यांच्या मुख्य गटांमध्यें भीषण युद्ध सुरू होतें, व ही घटना आत्यंतिक महत्वाची होती हें नाकबूल करणें तर त्याहूनही अशक्य आहे. आपापसांत युद्ध चालविण्यांत गुंतल्यामुळें साम्राज्यवाद्यांना आपली सर्व शक्ति नवोदित सोविएत राज्याविरुद्ध केन्द्रित करतां आली नाहीं व याच कारणामुळें कामगारवर्गाला आपल्या शक्तींची संघटना करण्याचें, आपल्या सत्तेचा पाया भक्कम करण्याचें, व कोल्चाक

आणि देनिकिन यांच्या संपूर्ण पराभवाची तयारी करण्याचें कार्य स्वस्थपणानें हातीं घेतां आलें. आज तर साम्राज्यवादी गटांचे आपापसांतील विरोध अधिक तीव्र होत चालले आहेत व त्यांच्यांत नवें युद्ध सुरू होणें अपरिहार्य झालें आहे. अशा वेळीं कामगारवर्गाच्या दृष्टीनें या अप्रत्यक्ष राखीव फौजांना याहून जास्त महत्व प्राप्त होईल असें गृहीत धरण्यास हरकत नाहीं.

क्रांतीच्या विशिष्ट विकासावस्थेंत तिचें मुख्य उद्दिष्ट साध्य करण्यासाठीं या सर्व राखीव फौजांचा योग्य उपयोग करणें हें व्यूहरचनेंतील नेतृत्वाचें कार्य आहे.

राखीव फौजांचा योग्य उपयोग करावयाचा म्हणजे काय करावयाचें ?

राखीव फौजांचा योग्य उपयोग करावयाचा म्हणजे कांहीं विशिष्ट आवश्यक गोष्टी अमलांत आणावयाच्या. यांपैकीं पुढील गोष्टी मुख्य समजल्या पाहिजेत:-

**पहिली गोष्ट** : क्रांति परिपक्व होऊन चुकली आहे, चढाई तुफान वेगानें चालू आहे, बंडाच्या उठावाचा क्षण येऊन ठेपला आहे, व पिछाडीवरील राखीव फौजा आघाडीवरील फौजेच्या तोडीला आणून बसविणें ही विजयाची आवश्यक अट झाली आहे,—अशा निर्णायक क्षणीं शत्रूच्या सर्वांत नाजूक मर्मस्थानावर क्रांतीच्या मुख्य शक्ति केंद्रित केल्या पाहिजेत.

राखीव फौजेचा उपयोग करण्याच्या या पद्धतीचें उत्तम उदाहरण एप्रिल ते ऑक्टोबर १९१७ पर्यंतच्या काळांत पार्टीनें योजलेल्या व्यूहरचनेमध्यें आढळतें. त्यावेळीं युद्ध हें शत्रूचें सर्वांत नाजूक मर्मस्थान होतें, यांत शंका नाहीं. युद्धाचा प्रश्न हाच मूलभूत प्रश्न समजून या प्रश्नाच्या आधारेंच पार्टीनें जनतेच्या विस्तृत विभागांना आघाडीवरील कामगारवर्गाभोंवतीं एकत्र आणलें, हें निर्विवाद होय. आघाडीवरील कामगारवर्गाला निदर्शनांच्या द्वारें रस्त्यांतील लढ्यांचें शिक्षण द्यावयाचें, आणि त्याचवेळीं पिछाडीवरील राखीव फौजांना सोविएतांच्या द्वारें व रणांगणावरील सैनिक-कमिट्यांच्या द्वारें आघाडीवरील (कामगार) फौजेच्या जोडीला आणून बसवावयाचें,—हीच त्या काळांतील पार्टीची व्यूहरचना होती. राखीव फौजांचा योग्य उपयोग करण्यांत आला ही गोष्ट क्रांतीच्या फलनिष्पत्तीवरून दिसून येतेच.

व्यूहरचनेच्या दृष्टीनें क्रांतीच्या शक्तींचा योग्य उपयोग करण्याच्या बाबतींत लेनिननें पुढील उद्‌गार काढले आहेत. बंडाच्या बाबतींत मार्क्स व एंगल्स यांनीं नमूद केलेल्या सुप्रसिद्ध सिद्धांतांच्या आधारेंच लेनिननें हे उद्‌गार काढले आहेत. लेनिन म्हणतो :--

"बंड म्हणजे एक **खेळ** समजूं नका. बंड सुरू करतांना पक्कें लक्षांत ठेवा कीं **अखेरचा टप्पा गांठीपर्यंत** तुम्हांला पुढें सरसावलें पाहिजे. निर्णायिक स्थानीं व निर्णायिक क्षणीं शत्रूपेक्षां पुष्कळ जास्त शक्ति एकवटली पाहिजे, नाहींतर शत्रु बंडवाल्यांना चिरडून टाकील, कारण त्याची तयारी व संघटना जास्त चांगली असते व या अनुकूलतेचा तो फायदा घेऊं शकतो. एकदां का बंड सुरू झालें, म्हणजे मग तुम्हीं जास्तींत जास्त **निर्धारानें** पुढील प्रत्येक पाऊल टाकलें पाहिजे, व कसेंही करून **चढाईचा** पवित्रा घेतला पाहिजे, त्यांत मुळींच कुचराई करतां कामा नये. 'बचावाचें धोरण म्हणजे कोणत्याही सशस्त्र उठावाचें **मरणच** होय.' शत्रु बेसावध असतांना त्याच्यावर अचानक हल्ला केला पाहिजे, त्याचें सैन्य विखुरलेलें आहे असें दिसतांच त्या संधीचा झटकन उपयोग केला पाहिजे. **दर दिवसागणिक** विजय मिळविण्यासाठीं तुम्हीं झटलें पाहिजे, मग हे विजय स्वल्प असले तरी हरकत नाहीं. ( किंबहुना दर तासागणिक विजय मिळविण्यासाठीं झटलें पाहिजे, मग हा विजय एका शहरापुरता कां असेना.) आणि वाटेल तें करून आपलें '**नैतिक श्रेष्ठत्व**' कायम राखलें पाहिजे."

**दुसरी गोष्ट** : निर्णायिक प्रहार करण्यासाठीं, बंडाचा उठाव सुरू करण्यासाठीं, योग्य क्षण निवडला पाहिजे. तो अशा रीतीनें निवडला पाहिजे कीं त्यावेळीं अरिष्टप्रसंग अगदीं कमालीच्या अवस्थेला जाऊन पोहोंचला असेल, आघाडीवरील सेना (कामगारवर्ग) अखेरपर्यंत लढण्यास तयार आहे व तिला पाठिंबा देण्यास राखीव फौजा तयार आहेत हें अगदीं स्पष्टपणें दिसत असेल व शत्रूच्या गोटांत जास्तींत जास्त घाबरगुंडी पसरली असेल.

लेनिन म्हणतो कीं पुढील परिस्थिति अस्तित्वांत असेल तर निर्णायक लढा सुरू करण्याचा क्षण येऊन ठेपला असें समजावें :—

> "आपणांला विरोध करणारे सर्व वर्ग एकमेकांचीं डोकीं फोडण्यांत पुरेसे गढून गेले आहेत, त्यांचे हातपाय पुरेसे जखडले गेले आहेत, स्वतःच्या आवांक्याबाहेर असलेल्या लढ्यामुळें त्यांचें सामर्थ्य पुरेसें क्षीण झालें आहे;
>
> "डळमळीत व अस्थिर वृत्तीचे मधल्या थरांतील लोक—म्हणजे भांडवलदार नव्हे, तर मध्यमवर्गीय लोक व मध्यमवर्गीय लोकसत्तावादी —पुरेसे बदनाम झाले आहेत, त्यांचें खरें स्वरूप जनतेला कळून चुकलें आहे, प्रत्यक्ष व्यवहारांत त्यांचा दिवाळखोरपणा उघडकीस आल्यामुळें त्यांची नाचक्की झाली आहे;
>
> "भांडवलदारवर्गाविरुद्ध अत्यंत निर्धारानें व धिटाईनें क्रांतिकारक उठाव झाल्यास त्याला पाठिंबा दिला पाहिजे अशी भावना एकंदर कामगारवर्गांत निर्माण झाली आहे व ती झपाट्यानें वाढत आहे;
>
> "ही परिस्थिति जर अस्तित्वांत असेल तर क्रांति परिपक्व झाली असें खात्रीनें समजावें. वर निर्देश केलेल्या परिस्थितीचें आपण जर बिनचूक मोजमाप घेतलें असेल व आपण जर योग्य क्षण निवडला असेल, तर आपला विजय नक्कीच आहे असें समजावें."

ऑक्टोबरचा उठाव ज्या पद्धतीनें तडीस नेण्यांत आला ती या व्यूहरचनेचें एक नमुनेदार उदाहरणच होय, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

ही गोष्ट जर अमलांत आणली नाहीं तर एक भयंकर प्रमाद केल्यासारखें होईल. या प्रमादाला 'वेग चुकणें' असें नांव आहे. ही चूक केल्यास चळवळीच्या मानानें पार्टी एक तर मागें तरी पडते, किंवा फार पुढें निघून जाते, व त्यामुळें अपयश पदरीं येण्याचा धोका उत्पन्न होतो. सप्टेंबर १९१७ मध्यें सोविएत-संस्थांत अजून डळमळीपणा बोकाळला होता, आघाडीवरील सेनेनें (कामगार-वर्गानें) अजून आपला मार्ग निश्चित केला नव्हता, राखीव फौजा अजून

अग्रदलाच्या जोडीला आणून पोहोंचविल्या नव्हत्या, आणि अशा वेळीं आपल्या कांहीं कॉम्रेड्सनीं 'लोकसत्तावादी परिषदे'च्या सभासदांना अटक करून, बंडाचा झेंडा उभारण्याचा प्रयत्न केला; 'वेग चुकण्याच्या' प्रमादाचेंच हें एक उदाहरण होय, बंड सुरू करण्याच्या क्षणाची निवड केव्हां चुकीची ठरते याचेंच हें एक उदाहरण होय.

**तिसरी गोष्ट** : एकदां जो मार्ग पत्करला त्या मार्गानें सरळ पुढें सरसावलें पाहिजे, कुठेंही आडवळणें घेतां कामा नये, मग ध्येय गांठण्यापूर्वी या मार्गांत वाटेल तीं विघ्नें येवोत व वाटेल ते गुंतागुंतीचे प्रसंग निर्माण होवोत. लढ्याचें मुख्य ध्येय अग्रदलानें कधींच दृष्टीआड करतां कामा नये, व त्या ध्येयाकडे जातांना आणि अग्रदलाच्या जोडीला जाऊन पोहोंचण्याचा प्रयत्न करतांना जनतेनें आपल्या मार्गापासून मुळींच बाजूला सरकतां कामा नये; आणि हें जर साधावयाचें तर वरील गोष्ट अमलांत आणलीच पाहिजे. ती जर अमलांत आणली नाहीं तर एक गंभीर प्रमाद केल्यासारखें होईल. या प्रमादाला 'दिशा चुकणें' असें नांव आहे. 'लोकसत्तावादी परिषद' समाप्त झाल्यानंतर थोड्याच वेळानें आपल्या पार्टीनें 'प्री-पार्लमेंट' मध्यें भाग घेण्याचा ठराव केला होता. हा ठराव चुकीचा होता. 'दिशा चुकण्याच्या' प्रमादाचेंच हें एक उदाहरण होतें. प्री-पार्लमेंट म्हणजे देशाला सोविएतांच्या मार्गापासून परावृत्त करून भांडवलदारी पार्लमेंटरी चळवळीच्या मार्गावर आणून सोडण्याचा भांडवलदार-वर्गाचा प्रयत्नच होय, असल्या संस्थेंत पार्टीनें भाग घेतल्यास कामगार व शेतकरी गोंधळून जातील, 'सोविएतांच्या हातीं सर्व सत्ता' ही घोषणा पुकारून क्रांतिकारक लढा चालविणाऱ्या कामगारांना त्या प्री-पार्लमेंटचें खरें स्वरूप कळेनासें होईल,—या गोष्टीचा आपल्या पार्टीला क्षणभर जणूंकाय विसरच पडला होता. प्री-पार्लमेंटमध्यें गेलेल्या बोल्शेविकांना तेथून काढून घेऊन ही चूक दुरुस्त करण्यांत आली.

**चवथी गोष्ट** : जर शत्रु प्रबळ असेल, माघार घेणें अपरिहार्य झालें असेल, शत्रु आपणांवर लढाई लादत असेल व त्यावेळीं लढाई करणें आपणांला

नुकसानीचें असेल, त्यावेळच्या बलाबलाचा विचार करतां अग्रदलावरील हल्ला परतविण्याचा आणि राखीव फौज कायम ठेवण्याचा एकमेव मार्ग माघार घेणें हाच असेल,—तर योग्य प्रकारें माघार घेण्यासाठीं राखीव फौजांची कौशल्यानें हालचाल केली पाहिजे.

लेनिन म्हणतो :—

> "क्रांतिकारक पक्षांनीं आपलें शिक्षण पूर्ण केलें पाहिजे. हल्ला कसा करावा हें ते शिकले आहेत. माघार कशी घ्यावी हेंही शिकून घेण्याची जरूरी त्यानीं आतां लक्षांत घेतली पाहिजे. हल्ला कसा करावा आणि माघार कशी घ्यावी ह्या दोन्हीं गोष्टी शिकल्याशिवाय विजय मिळविणें अशक्य आहे, हें त्यांनीं लक्षांत घेतलें पाहिजे. क्रांतिकारकवर्ग ही गोष्ट स्वतःच्या कटु अनुभवानें शिकतोच."

या व्यूहरचनेचा उद्देश जादा अवसर मिळविणें, शत्रूला बेहिंमत करणें, आणि मागाहून पुनः चढाई सुरू करण्यासाठीं शक्तीची जमवाजमव करणें, हा असतो.

ब्रेस्त-लितोव्स्कचा तह या व्यूहरचनेचें नमुनेदार उदाहरण समजतां येईल. या तहामुळें पार्टीला जादा अवसर मिळू शकला, साम्राज्यवाद्यांच्या गोटांतील झगड्यांचा फायदा घेतां आला, शत्रुसैन्याची हिंमत खच्ची करतां आली, शेतकरीवर्गाचा पाठिंबा टिकवून ठेवतां आला, आणि कोल्चाक व देनिकिन विरुद्ध चढाईची तयारी करण्यासाठीं शक्तीची जमवाजमव करणें शक्य झालें

त्यावेळीं लेनिननें पुढील उद्गार काढले होते :—

> "निराळा तह केल्यानें आपण आपणांला विरोध करणाऱ्या दोन्ही साम्राज्यवादी गटांपासून **सध्यांच्या क्षणीं जितक्या अंशानें शक्य आहे तितक्या अंशानें** मुक्त होतों, त्यांच्या आपापसांतील वैराचा व युद्धाचा आपणांला फायदा मिळतो, त्या आपापसांतील वैरामुळें त्यांना आपणांविरुद्ध सहकार्यानें लढण्यांत अडथळा येतो, आणि समाजसत्तावादी

क्रांतीची प्रगति करण्यास व तिचा पाया मजबूत करण्यास कांहीं काळपर्यंत आपणांला मोकळीक मिळते."

ब्रेस्त-लितोव्स्क तहानंतर तीन वर्षांनीं लेनिननें पुढील उद्गार काढले :—

"ब्रेस्त तहाच्या 'तडजोडी'मुळें आपलें सामर्थ्य वाढलें आणि आंतरराष्ट्रीय साम्राज्यशाहीच्या गोटांत फूट पडून तिची दाणादाण उडाली, हें आज एकाद्या मूर्खशिरोमणीलासुद्धां समजण्यासारखें आहे."

व्यूहरचनेच्या बाबतींत बिनचूक नेतृत्व करण्यासाठीं आवश्यक असलेल्या मुख्य गोष्टी ह्या होत.

(५) **डावपेंचांतील नेतृत्व** : डावपेंचांतील नेतृत्व हा व्यूहरचनेंतील नेतृत्वाचा एक भाग आहे. व्यूहरचनेंतील नेतृत्वाचीं जीं कार्यें असतात व त्यासाठीं जी परिस्थिति आवश्यक असते, त्या कार्याला व त्या परिस्थितीला डावपेंचांतील नेतृत्व पोषक असावें लागतें. कामगारवर्गाच्या लढ्याचे व संघटनेचे सर्व प्रकार आत्मसात् करणें, व्यूहरचनेच्या दृष्टीनें विजय मिळविण्याची तयारी करण्यासाठीं आवश्यक असलेलें कार्य विशिष्ट परिस्थितींत जास्तींत जास्त प्रमाणांत साधेल अशा रीतीनें या लढ्याच्या प्रकारांचा व संघटना-प्रकारांचा योग्य उपयोग करणें,—हें डावपेंचांतील नेतृत्वाचें कार्य आहे.

कामगारवर्गाच्या लढ्याच्या प्रकारांचा व संघटना-प्रकारांचा योग्य उपयोग करावयाचा म्हणजे काय करावयाचें ?

त्यांचा योग्य उपयोग करावयाचा म्हणजे कांहीं विशिष्ट आवश्यक गोष्टी अमलांत आणावयाच्या. यांपैकीं पुढील गोष्टी मुख्य समजल्या पाहिजेत :—

**पहिली गोष्ट** : चळवळीची प्रगति किंवा पीछेहाट होत असतांना एकाद्या विशिष्ट क्षणीं जी परिस्थिति अस्तित्वांत असेल, तिला सर्वांत जास्त अनुरूप होणाऱ्या लढ्यांच्या प्रकारांना व संघटनाप्रकारांनाच प्राधान्य दिलें पाहिजे. बहुजनसमाजाला क्रांतीच्या आखाड्यांत खेंचणें, करोडों लोकांना क्रांतीच्या

आघाडीवर आणणें, व तेथें त्यांना निरनिराळीं कामें नेमून देणें ज्यांमुळें अशा रीतीनें सुकर व निश्चित होईल, अशा लढ्यांच्या प्रकारांना व संघटनाप्रकारांनांच प्रमुख स्थान दिलें पाहिजे.

जुनी समाजव्यवस्था टिकवून ठेवणें अशक्य आहे, ती उलथून पाडणें अपरिहार्य आहे, याची नुसत्या अग्रदलालाच (कामगारवर्गाला) जाणीव होऊन भागणार नाहीं. बहुजनसमाजालासुद्धां—करोडों लोकांनासुद्धां—याची जाणीव झाली पाहिजे व अग्रदलाला पाठिंबा देण्याची आपली तयारी त्यांनीं निदर्शनास आणली पाहिजे. मुद्याची गोष्ट आहे ती हीच. पण बहुजनसमाजाला ही जाणीव स्वतःच्या अनुभवाच्या द्वारेंच होऊं शकेल. जुन्या राजवटीच्या उच्चाटनाची अपरिहार्यता स्वतःच्या अनुभवाच्या आधारें पटवून घेण्यास प्रचंड बहुजनसमाजाला मदत केली पाहिजे. लढ्याचे व संघटनेचे असे प्रकार योजिले पाहिजेत कीं त्यांमुळें स्वतःच्या अनुभवाच्या आधारें बहुजनसमाज क्रांतिकारक घोषणांची सत्यता मान्य करण्यास सहज शिकेल.

पार्टीनें दूमा-सभेंत भाग घेण्याचें ठरविलें, दूमा-सभेंतील कार्यावर आपली शक्ति केन्द्रित करण्याचें ठरविलें, या कार्यावर लढ्याची उभारणी करण्याचें ठरविलें; हेतु असा कीं दूमा-सभा निरुपयोगी आहे याची जनतेला स्वतःच्या अनुभवावरून जाणीव होणें सुकर व्हावें, कॉन्स्टिटयूशनल डेमॉक्रॅटिक पक्षानें दिलेलीं अभिवचनें लबाडीचीं आहेत हें जनतेला स्वतःच्या अनुभवावरून समजून येणें सोपें व्हावें, झारशाहीशीं समेट करणें शक्य नाहीं व कामगारवर्ग आणि शेतकरीवर्ग यांची दोस्ती घडून येणें अपरिहार्य आहे ही गोष्ट जनतेला स्वतःच्या अनुभवाच्या आधारें सहज पटावी. पार्टीनें जर त्यावेळीं हें ठरविलें नसतें तर कामगारवर्गापासून त्याचें अग्रदल (पार्टी) अलग पडलें असतें, व बहुजनसमाजापासून कामगारवर्ग अलग पडला असता. दूमा-सभेच्या काळांत बहुजनसमाजाला जर प्रत्यक्ष अनुभव मिळाला नसता, तर कॉन्स्टिटयूशनल डेमोक्रॅटिक पक्षाचें खरें स्वरूप उघडकीस आणणें अशक्य झालें असतें, कामगारवर्गाचें पुढारीपण स्थापन करणें अशक्य झालें असतें.

'बहिष्कारवाद्यां'च्या (ओत्झोविस्त) डावपेंचांत धोका होता तो हाच, कीं त्यामुळें राखीव फौज असलेल्या कोटयवधि जनतेपासून अग्रदलाची ताटातूट झाली असती.

'जहाल साम्यवादी' गटानें एप्रिल १९१७ मध्यें बंडाच्या उठावाची घोषणा पुकारली होती. मेन्शेविक व सोशालिस्ट-रेव्होल्यूशनरी पक्ष युद्धाचे व साम्राज्यशाहीचे पुरस्कर्ते आहेत हें त्यावेळीं उघडकीस आलें नव्हतें. युद्ध-समाप्ति, जमीन, स्वातंत्र्य, यांविषयीं मेन्शेविकांनीं व सोशालिस्ट-रेव्होल्यश-नरींनीं केलेलीं भाषणें लबाडीचीं आहेत हें बहुजनसमाजाला स्वतःच्या अनु-भवानें पटणें शक्य झालें नव्हतें. अशा वेळीं कामगारवर्गानें जर 'जहाल साम्य-वाद्यां'चें धोरण अनुसरलें असतें, तर पार्टी कामगारवर्गापासून अलग पडली असती' व शेतकऱ्यांच्या आणि सैनिकांच्या विस्तृत बहुजनसमाजावरील कामगारवर्गाचें वजन नाहीसें झालें असतें. बहुजनसमाजाला केरेन्स्कीच्या काळांत हा अनुभव जर मिळाला नसता, तर मेन्शेविक व सोशालिस्ट-रेव्हो-ल्यूशनरी पक्ष जनतेपासून अलग पडले नसते व कामगार हुकुमशाही अशक्य झाली असती. म्हणून मध्यमवर्गीय पक्षांच्या चुका 'धिमेपणानें समजावून देणें' आणि सोविएत संस्थांत उघडपणें लढणें, हेच योग्य डावपेंच होते.

'जहाल साम्यवाद्यां'च्या डावपेंचांमुळें पार्टी कामगार-क्रांतीचें नेतृत्व करणारी संघटना न राहातां, कसलाही भक्कम आधार नसतांना नुसते कट रचणाऱ्या मूठभर बावळटांचा गट बनली असती.

लेनिन म्हणतो :—

> "नुसत्या अग्रदलाचा उपयोग करून विजय मिळविणें अशक्य आहे. अग्रदलाला प्रत्यक्ष पाठिंबा देण्यास किंवा निदान त्याच्या बाबतीत सदिच्छायुक्त तटस्थता स्वीकारण्यास सबंध वर्ग—विस्तृत बहुजन-समाज—तयार होण्याच्या अगोदरच जर एकटया अग्रदलाला निर्णा-यक लढा सुरू करण्यास लावलें, तर तो मूर्खपणाच होईल. एवढेंच नव्हे तर तो गुन्हा होईल. सबंध वर्गाला—श्रम करणाऱ्या व भांडवल-

शाहीकडून गांजल्या जाणाऱ्या विस्तृत बहुजनसमाजाला—ही भूमिका जर प्रत्यक्ष घेण्यास लावावयाचें, तर नुसता प्रचार करून भागणार नाहीं; त्यासाठीं बहुजनसमाजाला स्वतःचा राजकीय अनुभव मिळाला पाहिजे. सर्व थोर क्रांत्यांचा मूलभूत नियम हाच आहे व त्याची सत्यता रशियातच नव्हे तर जर्मनींतसुद्धां विलक्षण जोरानें व स्पष्टपणानें प्रत्ययास आली आहे. सेकंड इंटरनॅशनलचे शिलेदार अगदींच पुचाट व भेकड आहेत, भांडवलदारवर्गापुढें ते अगदीं लाचारपणानें व बंद्या गुलामाप्रमाणे लोटांगण घालतात, त्यांचें सरकार अगदींच किळसवाणें आहे, जर कामगार हुकुमशाही स्थापन केली नाहीं तर अत्यंत प्रतिगामी लोकांची (रशियांत कोर्निलोवची, जर्मनीत कॅप् कंपूची) हुकुमशाहीच स्थापन होणें अपरिहार्य आहे, त्याखेरीज गत्यंतर नाहीं,—हें सर्व स्वतःच्या कटु अनुभवाच्या आधारें समजून घेणें रशियांतील असंस्कृत व बहुतांशी निरक्षर जनतेलाच नव्हे तर जर्मनीतील अत्यंत सुसंस्कृत व शंभर टक्के साक्षर जनतेलासुद्धां आवश्यक झालें आहे, हें समजून घेतल्यानंतरच ती जनता कम्युनिझमकडे निर्धारानें वळते.''

**दुसरी गोष्ट**. निरनिराळ्या घटनांच्या सांखळींत असा एक दुव्वा असतो कीं तो हातीं आल्यावर सबंध सांखळी हातांत ठेवणें आपणांला शक्य होते आणि व्यूहरचनेच्या दृष्टीनें विजय मिळविण्यासाठीं अनुकूल परिस्थिति तयार करतां येते; विशिष्ट क्षणी हा विशिष्ट दुव्वा कोणता, हें ओळखतां आलें पाहिजे

मुद्दा असा कीं पार्टीपुढें जे अनेक प्रश्न असतात त्यांपैकीं असा एक निकडीचा विशिष्ट प्रश्न निवडला पाहिजे कीं ज्याच्या उत्तरावरच इतर सर्व गोष्टी अवलंबून आहेत व जो सोडविल्यानेंच इतर निकडीचे प्रश्न यशस्वी रीतीनें सोडवितां येतात.

या सिद्धांताचें महत्व दोन उदाहरणें देऊन पटवितां येईल. एक उदाहरण बऱ्याच वर्षांपूर्वीचें (पार्टीच्या स्थापनेच्या काळांतलें) आहे, व दुसरें उदाहरण अलिकडचें (नव्या आर्थिक धोरणाच्या काळांतलें) आहे.

पार्टीची स्थापना करण्यांत येत होती त्या काळांत असंख्य मंडळें व संस्था अस्तित्वांत होत्या व त्यांचा एकमेकांशीं संबंध जोडला गेला नव्हता. या मंडळांच्या बिनधंदेवाईक व संकुचित दृष्टिकोणामुळें वरपासून खालपर्यंत पार्टी गंजत चालली होती. विचारसरणीच्या बाबतींत गोंधळ हें त्या वेळीं पार्टीच्या अंतर्गत जीवनाचें खास लक्षण होतें. अशा परिस्थितींत पार्टीपुढील कार्यमालिकेंतील मुख्य कार्य—पार्टीपुढील प्रश्नांच्या सांखळींतील मुख्य दुव्वा—अखिल-रशियन बेकायदेशीर वर्तमानपत्र सुरू करणें हाच होता असें आढळून आलें. कां ? कारण असंख्य मंडळांचा व संस्थांचा एकमेकांशीं संबंध जोडण्यास व त्यांची एक संयुक्त संघटना बनविण्यास समर्थ असलेलें पार्टीचें एकमुखी केंद्र अस्तित्वांत आणणें, विचारसरणीच्या व व्यवहाराच्या बाबतींत एकवाक्यता स्थापन करण्यासाठीं अनुकूल परिस्थिति निर्माण करणें, व अशा रीतीनें खरीखुरी पार्टी अस्तित्वांत आणण्याची पूर्वतयारी करणें, त्यावेळच्या परिस्थितींत अखिल-रशियन बेकायदेशीर वर्तमानपत्राच्या द्वारेंच शक्य होतें.

युद्धकालांतून आर्थिक रचनेच्या काळांत संक्रमण करण्याच्या वेळीं उद्योगधंदे कोसळून पडले होते व शहरांत तयार होणाऱ्या मालाच्या तुटवड्यामुळें शेतीचेंही नुकसान होत होतें. सरकारी उद्योगधंदे व वैयक्तिक शेतकऱ्यांची अर्थव्यवस्था या दोहोंचें सहकार्य घडवून आणणें ही त्यावेळीं समाजसत्तावादी रचनेच्या विजयाची एक मूलभूत अट बनली होती. अशा परिस्थितींतल्या कार्यमालिकेंतील मुख्य कार्य—विविध घटनांच्या सांखळींतील मुख्य दुव्वा—व्यापाराची वाढ करणें हाच असल्याचें आढळून आलें. कां ? कारण नव्या आर्थिक धोरणाच्या ('नेप'च्या) परिस्थितींत उद्योगधंदे व वैयक्तिक शेतकऱ्यांची अर्थव्यवस्था या उभयतांचें सहकार्य घडवून आणणें केवळ व्यापाराच्या द्वारेंच शक्य असतें, दुसऱ्या कोणत्याही मार्गानें तें शक्य होत नाहीं; उद्योगधंद्यांची वाढ करावयाची तर मालाचा खप वाढविल्याशिवाय गत्यंतर नाहीं, आणि मालाचा खप वाढवावयाचा तर व्यापार वाढविला पाहिजे; व्यापाराच्या क्षेत्रांत आपलें पाऊल पक्कें रुजल्यानंतरच, व्यापाराचें नियंत्रण आपल्या हातीं

आल्यानंतरच, हा दुव्वा भक्कमपणें आपल्या मुठींत आल्यानंतरच, उद्योगधंदे व शेतकरी-बाजारपेठा यांची सांगड घालण्याची कांहींतरी आशा निर्माण होईल, इतर निकडीचीं कार्यें पार पाडणें शक्य होईल, व अशा रीतीनें समाज-सत्तावादी अर्थव्यवस्थेचा पाया रचण्यासाठीं आवश्यक असलेलीं परिस्थिति अस्तित्वांत आणतां येईल.

लेनिन म्हणतो :—

> "क्रांतीचा, समाजसत्तावादाचा, किंवा कम्युनिझमचा सर्वसाधारण-पणें पुरस्कार करणें पुरेसें नाहीं. कोणत्याही विशिष्ट क्षणीं आपणांला सांखळींतील असा विशिष्ट दुव्वा शोधून काढतां आला पाहिजे, कीं जो घट्ट पकडल्यानें सबंध सांखळी हातांत ठेवतां येईल व पुढच्या दुव्व्यापर्यंत पोहोंचण्याची पक्की तयारी करतां येईल." ... ...
> "योग्य सरकारी मार्गदर्शनाखालीं अंतर्गत व्यापाराचें पुनरुज्जीवन करणें, हाच सध्यांच्या क्षणीं या प्रकारचा मुख्य दुव्वा होय. विविध घटनांच्या सांखळींतील जो 'दुव्वा'—१९२१-२२ सालामधील आपल्या समाजसत्तावादी रचनेच्या संक्रमणात्मक प्रकारांच्या मालि-केंतील जो 'दुव्वा'—आपण 'घट्ट पकडला पाहिजे', तो व्यापार हाच होय."

डावपेंचांच्या बाबतींत बिनचूक नेतृत्व करण्यासाठीं आवश्यक असलेल्या मुख्य गोष्टी ह्या होत.

**(६) सुधारणावाद व क्रांतिवाद**:—क्रांतिकारक डावपेंच व सुधारणा-वादी डावपेंच यांत कोणता भेद आहे ?

कांहींचा असा समज आहे कीं लेनिनवाद सुधारणांना, तडजोडींना व एकंदरींत कोणत्याही समेटांना विरोध करतो. हा समज अगदीं चुकीचा आहे. विशिष्ट अर्थानें 'प्रत्येक स्वल्प गोष्ट उपयुक्तच असते,' विशिष्ट परिस्थितींत सर्वसाधारणतः सुधारणा व विशेषतः तडजोडी व समेट आवश्यक व उपयुक्त

असतात, ही गोष्ट इतर सर्व लोकांप्रमाणें बोल्शेविकसुद्धां जाणून आहेत.

लेनिन म्हणतो :—

"आंतरराष्ट्रीय भांडवलदारवर्गाला उलथून पाडण्यासाठीं चालविण्यांत येणारें युद्ध राष्ट्रांराष्ट्रांमध्यें सामान्यपणें होणाऱ्या अत्यंत निकराच्या युद्धापेक्षांही जास्त कठिण व गुंतागुंतीचें, व जास्त काळ टिकणारें असतें. हें युद्ध चालवावयाचें तर परिस्थितीप्रमाणें आपल्या सैन्याची निरनिराळ्या रीतीनें हालचाल केली पाहिजे, शत्रूंच्या आपापसांतील झगडयांचा उपयोग करून घेतला पाहिजे (मग ते झगडे तात्पुरते कां असेनात), जे आपले दोस्त होण्यासारखे आहेत त्यांच्याबरोबर करार व तडजोड केली पाहिजे (मग ते तात्पुरते व अस्थिर दोस्त कां असेनात, ते डळमळीत कां असेनात, विशिष्ट अटीवरच दोस्ती करण्यास ते तयार कां असेनात). या गोष्टी करावयाचें नाकारणें अगदीं हास्यास्पदच नव्हे का ? समजा कीं आपणांला कठीण चढाव असलेल्या डोंगरावर जावयाचें आहे, यापूर्वी कुणीही तेथें गेलेला नाहीं आणि तेथें जाणें अशक्यच समजलें जातें. अर्थात् आपणांला पुष्कळदां वळसे घ्यावे लागतील, मधूनमधून परत फिरावें लागेल, कधींकधीं एकदां निवडलेली वाट सोडून देऊन दुसऱ्या वाटांनीं जाण्याचा प्रयत्न करून पाहावा लागेल. यापैकीं कोणतीही गोष्ट करणार नाहीं असा जर आपण अगोदर निश्चय करून ठेवला तर तें हास्यास्पदच होईल. पण याच्यांत आणि वरील गोष्टी करण्याचें नाकारण्यांत फरक तो कोणता ?"

सुधारणा, तडजोड आणि समेट पाहिजेत कीं नकोत हा सवाल नसून सुधारणांचा व तडजोडींचा कोणता उपयोग करावयाचा हाच सवाल आहे, हें उघड होय.

सुधारणावाद्याच्या मतें सुधारणा हेंच सर्वस्व असतें आणि क्रांतिकारक कार्य आनुषंगिक असतें. क्रांतिकारक कार्याविषयीं फार तर गप्पा माराव्या, लोकांच्या डोळ्यांत धूळ फेंकण्यासाठीं त्यांचा उपयोग करावा, असें तो समजतो.

म्हणूनच भांडवलदारी राजवटींत सुधारणावादी डावपेंचांचा अवलंब केल्यास, सुधारणा हें त्या राजवटीला बळकटी आणण्याचें साधनच होणें क्रमप्राप्त असतें, सुधारणा हें क्रांतीच्या चिंधड्या उडविण्याचें साधनच होणें अपरिहार्य असतें.

उलटपक्षीं क्रांतिवाद्याच्या मतें क्रांतिकारक कार्य हेंच मुख्य कार्य असतें. सुधारणा हें मुख्य कार्य नसतें. सुधारणा म्हणजे क्रांतीचें आनुषंगिक फळ (बाय्-प्रॉडक्ट), असें तो समजतो. म्हणूनच भांडवलदारी राजवटींत क्रांतिकारक डावपेंचांचा अवलंब केल्यास, सुधारणा हें त्या राजवटीच्या चिंधड्या उडविण्याचें साधन होणें साहजिकच असतें, सुधारणा हें क्रांतीला बळकटी आणण्याचें साधन बनतें, त्यांच्या आधारें क्रांतिकारक चळवळीचा आणखी विकास करणें शक्य होतें.

सुधारणांचा स्वीकार करण्यांत क्रांतिवाद्याचा असा हेतु असतो कीं, बेकायदेशीर कामाशीं कायदेशीर कामाची सांगड घालण्यास मदत व्हावी, या कायदेशीर कामाचा आडोसा घेऊन बेकायदेशीर काम जास्त जोरानें करतां यावें, भांडवलदार वर्गाला उलथून पाडण्यासाठीं जनतेची क्रांतिकारक तयारी करतां यावी

साम्राज्यशाहीच्या परिस्थितींत सुधारणांचा व समेटाचा क्रांतिकारक उपयोग करणें याचा अर्थ हाच होय.

उलटपक्षीं सुधारणांचा स्वीकार करण्यांत सुधारणावाद्याचा असा हेतु असतो कीं, सर्व बेकायदेशीर काम सोडून द्यावें, क्रांतीसाठीं जनतेची तयारी करण्याच्या कामांत अडथळा आणावा, आणि 'दान' म्हणून मिळालेल्या सुधारणांच्या थंड सावलींत आराम घेत पडावें.

सुधारणावादी डावपेंचांचा अर्थ हाच होय.

साम्राज्यशाहीच्या परिस्थितींत सुधारणांचें व समेटांचें स्वरूप असें असतें.

पण साम्राज्यशाही उलथून पाडल्यानंतर व कामगार हुकुमशाही स्थापन झाल्यानंतर मात्र परिस्थिति किंचित् बदलते. एकाद्या विशिष्ट परिस्थितीमध्यें कामगार-सत्तेला सर्वांच्या समाजव्यवस्थेच्या क्रांतिकारक पुनर्घटनेचा

मार्ग तात्पुरता सोडून देणें व तिच्यांत क्रमशः बदल घडवून आणण्याचा ‘ सुधारणा वादी मार्ग ’ स्वीकारणें भाग पडेल, असा संभव असतो. ‘ सोन्याचें महत्व ’ या सुप्रसिद्ध लेखांत लेनिननें हें दाखवून दिलें आहे. कामगारेतर वर्गांचें सामर्थ्य क्षीण करण्यासाठी, विश्रांतिकाळ मिळवून त्या योगें क्रांतीचें सामर्थ्य पुनः वाढविण्यासाठीं, आणि नव्या चढाईला अनुकूल परिस्थिति निर्माण करण्यासाठीं त्या कामगारेतर वर्गांना सवलती देणें, बगलेवर हल्ला करण्याचा मार्ग स्वीकारणें, कामगारसत्तेला कधीं कधीं भाग पडतें. एका अर्थानें हा सुधारणावादी मार्गच होय, हें नाकबूल करतां येत नाहीं. पण यांत एक मूलभूत भेद आहे हें लक्षांत ठेवलें पाहिजे, व तो हा कीं या सुधारणा कामगारसत्तेकडून करण्यांत येतात, त्यांमुळें कामगार-सत्तेला बळकटी येते, त्यांमुळें कामगार-सत्तेला जरूर ती विश्रांति मिळते, त्यांचा उद्देश क्रांतीच्या चिंधड्या उडविणें हा नसून कामगारेतर वर्गाचें सामर्थ्य क्षीण करणें हाच असतो.

अशा परिस्थितींत सुधारणा ही नुसती सुधारणा न राहातां तिच्या अगदीं उलट असलेली गोष्ट बनते.

कामगार-सत्तेला हें धोरण स्वीकारणें शक्य होतें याचें कारण हेंच कीं पूर्वीच्या काळांत क्रांतीचा व्याप फार दूरवर पसरला होता व म्हणून माघार घेण्याला पुरेसें क्षेत्र उपलब्ध होतें, चढाईचे डावपेंच सोडून देऊन तात्पुरत्या माघारीचे व बगलेवरील हालचालीचे डावपेंच स्वीकारणें शक्य होतें.

अशा रीतीनें, पूर्वीच्या काळांत——म्हणजे भांडवलदारी राजवटींत—— सुधारणा म्हणजे क्रांतीचें आनुषंगिक फळ होतें, पण आतां कामगार हुकुमशाहीच्या काळांत सुधारणांचा उगम कामगारवर्गानें मिळविलेल्या क्रांतिकारक विजयांत——म्हणजे कामगारवर्गाला उपलब्ध झालेल्या राखीव फौजांत—— असतो.

लेनिन म्हणतो :——

> “ सुधारणा व क्रांति यांचा परस्परसंबंध काय, हें फक्त मार्क्स-वादानेंच स्पष्टपणें व बिनचूकपणें दाखवून दिलें आहे. परंतु मार्क्सला

फक्त एकाच बाजूनें हा परस्परसंबंध दिसू शकला, कामगारवर्गाला—एकाच देशांत कां होईना—जो बराचसा कायमचा व चिरकालिक विजय प्रथमच मिळाला त्याच्या पूर्वीच्या काळांतील परिस्थितीच्या दृष्टीनेंच मार्क्सला हा परस्परसंबंध दिसू शकला. सुधारणा म्हणजे कामगारवर्गाच्या क्रांतिकारक वर्गलढ्याचें आनुषंगिक फळ होय, या सूत्राच्या आधारेंच त्या परिस्थितींत हा परस्परसंबंध योग्य रीतीनें व्यक्त करतां येत होता. ......कामगारवर्गाला—एकाच देशांत कां होईना—विजय मिळाल्यानंतर सुधारणा व क्रांति यांच्या परस्परसंबंधांत थोडेंसें नाविन्य निर्माण होतें. तत्त्वतः हा परस्परसंबंध पूर्वीसारखाच असतो, पण त्याचें बाह्य स्वरूप मात्र बदलतें. स्वतः मार्क्सला या बदलाचें भाकित करणें शक्य नव्हतें खरें, पण मार्क्सवादी तत्त्वज्ञानाच्या व राजकारणाच्या आधारेंच हा बदल लक्षांत येणें शक्य आहे ..... कामगारवर्गाच्या विजयानंतर (आंतरराष्ट्रीय क्षेत्रांत सुधारणा हें अजून 'आनुषंगिक फळ'च असलें तरी) त्या विजयी देशाच्या बाबतींत सुधारणा हें जरूर ती विश्रांति मिळण्याचें साधन बनतें. (कामगारवर्गानें) आपली सारी शक्ति खर्च केल्यानंतर क्रांतिकारक मार्गानें पुढील पायरी गांठण्याचें त्राण त्याच्या अंगीं राहिलें नाहीं असें आढळून येतें व अशा वेळीं त्याला या विश्रांतीची आवश्यकता असते. कामगारवर्गानें विजय मिळविला असल्यामुळें त्याला 'राखीव ताकत' उपलब्ध होते, व सक्तीच्या माघारीच्या वेळींसुद्धां या ताकतीचा उपयोग करून भौतिक व नैतिकदृष्ट्या आपलें अस्तित्व टिकवून धरणें त्याला शक्य होतें."

★

[ ८ ]

# पार्टी

क्रांतिपूर्व काळांत, म्हणजे थोड्याफार शांततेनें विकास होण्याच्या काळांत ज्यावेळी सेकंड इंटरनॅशनलमधील पार्ट्यांचें कामगार-चळवळींत वर्चस्व होतें व पार्लमेंटरी लढा हा लढ्याचा मुख्य प्रकार समजण्यांत येत होता अशा काळांत, पार्टीला फारसें मोठें व निर्णायक स्वरूपाचें महत्व प्राप्त झालें नव्हतें व प्राप्त होणें शक्य नव्हतें; पुढील काळांतच, प्रकट क्रांतिकारक संग्रामाच्या परिस्थितींतच, तिला हें महत्व प्राप्त झालें. सेकंड इंटरनॅशनलवरील टीकेला उत्तर देतांना कौट्स्की असें म्हणतो कीं सेकंड इंटरनॅशनलमधील पार्ट्या युद्धाचीं साधनें नसून शांततेचीं साधनें आहेत व म्हणून युद्धकाळांत, कामगारवर्गाच्या क्रांतिकारक लढ्याच्या काळांत, त्या कोणतेंही महत्वाचें कार्य करूं शकत नाहींत. हें विधान अगदीं बरोबर आहे, पण त्याचा अर्थ काय होतो? त्याचा अर्थ असा कीं सेकंड इंटरनॅशनलमधील पार्ट्या कामगारवर्गाच्या क्रांतिकारक लढ्याला नालायक आहेत, त्या कामगारवर्गाच्या लढाऊ पार्ट्या नाहींत, त्या कामगारांना सत्ता काबीज करण्याच्या दिशेनें पुढें नेऊं शकत नाहींत, त्या केवळ निवडणुकीचीं यंत्रें आहेत, पार्लमेंटच्या निवडणुकी लढविणें व पार्लमेंटरी लढा चालविणें एवढीच त्यांची लायकी आहे. सेकंड इंटरनॅशनलच्या संधिसाधूंचें ज्यावेळीं वर्चस्व होतें त्या काळांत पार्टीऐवजीं पार्लमेंटरी गट हीच कामगारवर्गाची प्रमुख राजकीय संस्था होती, व त्याचें कारण हेंच होय. त्या काळांत पार्टी वस्तुतः कामगारवर्गाचें शेपूटच होती, हें सर्वांना ठाऊक आहे. अशा परिस्थितींत व अशा पार्टीच्या नेतृत्वाखालीं क्रांतीसाठीं कामगारवर्गाची तयारी करण्याचा प्रश्नच उद्भवूं शकत नव्हता, हें मुद्दाम सांगण्याची गरज नाहीं.

परंतु नव्या काळाचा अरुणोदय झाल्यापासून परिस्थिति मूलतःच बदलली आहे. नवा काळ हा प्रकट वर्गसंग्रामांचा काळ आहे, हा कामगारवर्गाच्या क्रांतिकारक लढयांचा काळ आहे, हा कामगार-क्रांतीचा काळ आहे. या काळांत साम्राज्यशाही उलथून पाडण्यासाठीं व कामगारवर्गानें सत्ता काबीज करण्या-साठी आवश्यक असलेल्या शक्तींची प्रत्यक्ष जमवाजमव करण्यांत येत आहे. या काळांत कामगारवर्गापुढें नवीं कार्ये उपस्थित झालीं आहेत व तीं म्हणजे —नव्या क्रांतिकारक पद्धतीस अनुसरून पार्टीच्या सर्व कार्याची पुनर्घटना करणें, कामगारांना सत्तेसाठीं क्रांतिकारक लढा करण्याचें शिक्षण देणें, राखीव फौजा तयार करणें व रणक्षेत्रांत आणणें, शेजारच्या देशांतील कामगारांशीं दोस्ती करणें, वसाहतींतील व परतंत्र देशांतील स्वातंत्र्याच्या चळवळीशी निकट स्नेहसंबंध जोडणें, वगैरे, वगैरे. जुन्या सोशल-डेमोक्रॅटिक पार्ट्या पार्लमेंटरी चळवळीच्या शांततामय वातावरणांत वाढल्या होत्या, व त्या पार्ट्यांना हीं कामें पार पाडतां येतील असें समजणें म्हणजे आत्यंतिक निराशेची व अपरिहार्य पराभवाची खात्री करून ठेवणेंच होय. अशी कार्ये शिरावर असतांना जर कामगार वर्गाला जुन्या पार्ट्यांच्या पुढारी-पणाखालींच राहावें. लागलें, तर तो पूर्णपणें निःशस्त्र बनेल, आपलें संरक्षण करण्यास असमर्थ होईल. कामगारवर्ग अशीआपत्ति ओढवून घेण्यास तयार होणार नाहीं हें सांगणें नकोच.

म्हणूनच नवी पार्टी, लढाऊ पार्टी, क्रांतिकारक पार्टी, सत्ता काबीज कर-ण्याच्या लढयांत कामगारवर्गाचें पुढारीपण घेण्याचें धैर्य दाखविणारी पार्टी, क्रांतिकारक प्रसंगाच्या गडबडींत आपलें स्थान अचूकपणें ओळखण्याइतका अनुभव असलेली पार्टी, आपल्या मार्गातील सर्व लपलेले खडक टाळून सुर-क्षितपणें पुढें जाऊं शकण्याइतकी लवचिक पार्टी, आवश्यक असते.

अशी पार्टी जर अस्तित्वांत नसेल, तर साम्राज्यशाही उलथून पाडण्याचा व कामगार-हुकुमशाही स्थापन करण्याचा विचारसुद्धां मनांत आणणे व्यर्थ होय.

ही नवी पार्टी म्हणजेच लेनिनवादी पार्टी.

या नव्या पार्टीचीं खास लक्षणें कोणतीं आहेत ?

(१) **पार्टी म्हणजे कामगारवर्गाचें अग्रदल.** अगदीं पहिला मुद्दा म्हणजे पार्टी ही कामगारवर्गाचें **अग्रदल** असली पाहिजे. कामगारवर्गातील सर्व उत्तमोत्तम माणसें पार्टीनें आत्मसात् केलीं पाहिजेत; त्यांचा अनुभव, त्यांचा क्रांतिकारक बाणा, कामगारवर्गाच्या कार्यावरील त्यांची निःस्वार्थ भक्ति, या साऱ्या गोष्टी तिनें आत्मसात् केल्या पाहिजेत. पण पार्टीला जर खरोखरींच अग्रदल बनावयाचें असेल तर तिच्या हातीं क्रांतिकारक तत्त्वज्ञानाचें शस्त्र असणें आवश्यक आहे, तिला चळवळीच्या नियमांचें––क्रांतीच्या नियमांचें–– ज्ञान असणें जरूर आहे. तें जर नसेल तर कामगारवर्गाच्या लढ्याचें मार्गदर्शन करण्यास, कामगारवर्गाचें पुढारीपण घेण्यास, पार्टी असमर्थ होईल. सर्वसामान्य कामगार-जनतेच्या भावना व्यक्त करण्यापुरतेंच तिचें कार्य जर मर्यादित असेल, स्वयंस्फूर्त चळवळीच्या शेंपटालाच धरून ती जर फरफटत जाईल, गतिशून्यता व राजकारणाविषयीं उपेक्षावृत्ति हे स्वयंस्फूर्त चळवळीचे दोष तिला जर काढून टाकतां येणार नाहींत, कामगारवर्गाच्या क्षणिक हितसंबंधांची मर्यादा तिला जर ओलांडतां येणार नाहीं व व्यापक दृष्टिकोण स्वीकारतां येणार नाहीं, सामान्य कामगार जनतेला कामगारवर्गाच्या वर्गहिताची जाणीव करून देऊन वरच्या पातळीवर आणणें तिला जर शक्य होणार नाहीं,–तर ती खरीखुरी पार्टी बनूंच शकणार नाहीं. पार्टी कामगार वर्गाच्या अग्रभागीं असली पाहिजे; तिची नजर कामगारवर्गापेक्षां अधिक दूरवर पोंचली पाहिजे, तिनें कामगारवर्गाला पुढें नेलें पाहिजे, स्वतःच स्वयंस्फूर्त चळवळीच्या पाठोपाठ जातां कामा नये. 'पुच्छवादा'चा प्रचार करणाऱ्या सेकंड इंटरनॅशनलच्या पार्ट्या भांडवलदारी धोरणाच्या प्रचाराचीच साधनें असतात. भांडवलदारांच्या मुठींतील हत्यार बनण्याची भूमिकाच कामगारवर्गावर लादणें, हें भांडवलदारवर्गाचें धोरण आहे. जी पार्टी कामगारवर्गाच्या अग्रदलाचा दृष्टिकोण स्वीकारते व कामगारजनतेला वरच्या पातळीवर आणून

कामगारवर्गाच्या वर्गहिताची जाणीव करून देऊं शकते, अशी पार्टीच कामगार-वर्गाला ट्रेड-युनियनवादाच्या चाकोरींतून बाहेर काढण्यास व त्याला स्वतंत्र राजकीय शक्ति बनविण्यास समर्थ होईल. कामगारवर्गाचें राजकीय नेतृत्व करणें हें पार्टीचें कार्य आहे.

कामगारवर्गाच्या लढ्यांतील अडचणींविषयीं मी मागें सांगितलें आहेच. लढ्याची गुंतागुंतीची परिस्थिति, व्यूहरचना व डावपेंच, राखींव फौजा व रणांगणावरील हालचाली, हल्ला व माघार,––या गोष्टींविषयीं मी सांगितलें आहेच. या गोष्टी युद्धाच्या परिस्थितीपेक्षां कमी गुंतागुंतीच्या नाहींत, असल्या तर जास्तच गुंतागुंतीच्या आहेत. अशा परिस्थितींत आपली दिशा नेमकी ओळखणें कुणाला शक्य असतें? लाखों कामगारांचें बिनचूक मार्गदर्शन करणें कुणाला शक्य असतें? युद्धांत गुंतलेल्या कोणत्याही सैन्याचें अनुभवी सेनापति-मंडळाशिवाय (जनरल स्टाफ) चालण्यासारखें नसतें, जर हें मार्ग-दर्शक सेनापति-मंडळ नसेल तर त्या सैन्याचा पराभव होणार हें निश्चित समजावें. कामगारवर्गाला आपल्या कट्टर शत्रूंच्या मृत्युदाढेंत आपण होऊन शिरावयाचें नसेल तर त्याचेंसुद्धां अशा मार्गदर्शक सेनापतिमंडळाशिवाय चालण्यासारखें नाहीं, हें स्पष्ट नाहीं का? पण हें मार्गदर्शक सेनापति-मंडळ कोणतें? कामगारवर्गाची क्रांतिकारक पार्टीच या मार्गदर्शक सेनापति-मंडळाची भूमिका पार पाडूं शकेल. कामगारवर्गाची क्रांतिकारक पार्टी जर नसेल तर त्याची स्थिति मार्गदर्शक सेनापति-मंडळ नसलेल्या फौजेप्रमणें होईल. पार्टी म्हणजे कामगारवर्गाचें मार्गदर्शक सेनापति-मंडळ होय.

पण पार्टी नुसती आघाडीवरची तुकडी––**अग्रदल**––असून चालणार नाहीं. ती त्याच वेळीं आपल्या **वर्गाची** तुकडी असली पाहिजे, आपल्या वर्गाचा भाग असली पाहिजे, आपल्या वर्गाशीं तिचें सारें जीवनसर्वस्व निगडित झालेलें असलें पाहिजे जोंपर्यंत वर्गभेद नष्ट झाले नाहींत तोंपर्यंत अग्रदल व सर्वसाधारण कामगार जनता यांमधील भेद नष्ट होऊं शकणार नाहीं, पार्टी सभासद व पार्टीबाहेरील जनता यांमधील भेद नाहींसा होऊं शकणार नाहीं.

जोंपर्यंत कामगारवर्गाच्या संख्येंत इतर वर्गांतून येणाऱ्या नव्या लोकांची भर पडत राहील, जोंपर्यंत एकंदर कामगारवर्गाला अग्रदलाइतक्या वरच्या दर्जाला चढण्याची शक्यता नसेल, तोंपर्यंत हा भेद कायम रहाणारच. पण या भेदामुळें जर पार्टी व वर्ग यांमधील अंतर वाढून ते एकमेकांपासून अलग पडतील, जर पार्टी स्वतःला आपल्याच घरकुलांत कोंडून घेईल व पार्टीबाहेरील जनतेपासून तिची फारकत होईल, तर ती खरीखुरी पार्टीच राहणार नाहीं. पार्टीबाहेरील जनतेशीं जर पार्टीचा संबंध नसेल, पार्टी व पार्टीबाहेरील जनता यांना जोडणारें जर कांहींच नसेल, जर ही जनता पार्टीचें पुढारीपण मान्य करीत नसेल, जर पार्टीला जनतेंत नैतिक व राजकीय पत नसेल, तर ती पार्टी आपल्या वर्गाचें नेतृत्व करूं शकणार नाहीं. सामान्य कामगारांतून आपल्या पार्टींत नुकतेच दोन लाख नवे सभासद दाखल करण्यांत आले आहेत. या बाबतींत विशेष लक्षांत घेण्यासारखी गोष्ट म्हणजे हे सभासद पार्टींत नुसते आपण होऊन आले असें नाहीं, तर त्यांना पार्टीबाहेरील कामगार जनतेनें पार्टींत पाठविलें. नवे सभासद दाखल करून घेण्याच्या कार्यांत पार्टीबाहेरील सामान्य कामगारांनीं सक्रिय भाग घेतला व त्यांच्या संमतीशिवाय एकही नवा सभासद दाखल केला नाहीं. यावरून सिद्ध होतें कीं पार्टीबाहेरील विस्तृत कामगार जनतेला आमची पार्टी ही **स्वतःची** पार्टी वाटते, पार्टीविषयीं त्यांना **आपुलकी व जिव्हाळा** वाटतो, पार्टीची वाढ करणें व तिचा पाया मजबूत करणें त्यांना स्वतःच्या हिताच्या दृष्टीनें अत्यंत महत्वाचें वाटतें, पार्टीचें पुढारीपण मान्य करून त्यांनीं तिच्या हातीं आपलें भवितव्य स्वेच्छेनें सोंपविलें आहे. पार्टी व पार्टीबाहेरील जनता यांना जोडणारे हे अदृश्य धागेदोरे जर नसते, तर पार्टी आपल्या वर्गाची निर्णायक शक्ति होऊं शकली नसती. पार्टी कामगारवर्गाचा अविच्छेद्य भाग आहे.

लेनिन म्हणतो :—

" आपली पार्टी ही एका वर्गाची पार्टी आहे व म्हणून **या वर्गांतील बहुतेक सर्व लोकांनीं** (युद्धाच्या व स्वकीय युद्धाच्या काळांत तर या

वर्गांतील सर्वच लोकांनीं) आपल्या पार्टीच्या पुढारीपणाखालीं चालावें, पार्टीला शक्य तितकें करून चिकटून रहावें. पण जोंपर्यंत भांडवलशाही कायम आहे तोंपर्यंत या वर्गांतील सर्व लोक, किंवा बहुतेक सर्व लोक, जाणिवेच्या बाबतींत व कार्याच्या बाबतींत या वर्गाच्या अग्रदलाच्या दर्जाला—म्हणजे आपल्या समाजसत्तावादी पार्टीच्या दर्जाला—येऊन पोहोंचतील अशी अपेक्षा करणें, ही शुद्ध आंधळी स्वयंतुष्टता (मॅनिलोविझम) व पुच्छप्रवृत्ति (ख्वोस्तिझम) होय. ट्रेड युनियन संस्था अधिक प्राथमिक स्वरूपाच्या असतात व मागासलेल्या कामगारांना त्यांचें कार्य अधिक सहज समजूं शकतें, परंतु या ट्रेड युनियन संस्थांतसुद्धां कामगारवर्गांतील सर्व लोक किंवा बहुतेक सर्व लोक सामील होणें भांडवलशाहीच्या काळांत शक्य नसतें. कोणत्याही सूज्ञ समाजसत्तावाद्याला याबद्दल आजपावेतों कधींही शंका वाटलेली नाहीं. अग्रदल व त्याच्या झेंड्याखालीं जमा होणारा सबंध लोकसमुदाय यांमधील भेद विसरून जाणें, विस्तृत जनतेच्या अधिकाधिक विस्तृत विभागांना या उच्चतम दर्जाला आणण्याचें हें अग्रदलाचें नित्य कर्तव्य विसरणें, म्हणजे खरोखरीं स्वतःची फसवणूक करून घेणें होय. आपल्या कार्याच्या अवाढव्य स्वरूपाकडे डोळेझांक करणें व त्या कार्याला मर्यादित स्वरूप देणें हाच त्याचा अर्थ होतो."

(२) **पार्टी म्हणजे कामगारवर्गाची संघटित तुकडी.** पार्टी म्हणजे कामगारवर्गाची आघाडीवरील तुकडी—**अग्रदल**—एवढेंच म्हणून चालणार नाही. आपल्या वर्गाच्या लढ्याचें खरोखरीं मार्गदर्शन करण्यास ती जर उत्सुक असेल, तर ती आपल्या वर्गाची **संघटित** तुकडी बनणें हें सुद्धां आवश्यक आहे. भांडवलशाहीच्या परिस्थितींत पार्टीचीं कार्ये अत्यंत विविध व गंभीर स्वरूपाचीं असतात. अंतर्गत व बाह्य विकासाच्या अत्यंत कठीण परिस्थितीत पार्टीला कामगारवर्गाच्या लढ्याचें मार्गदर्शन करावें लागतें; एकाद्या परिस्थितींत चढाईचें धोरण जर आवश्यक असेल, तर या चढाईत पार्टीनें कामगारवर्गाचें नेतृत्व केलें पाहिजे, एकाद्या परिस्थितींत बलिष्ट शत्रूचा तडाखा चुकविण्या-

साठी माघारीचें धोरण जर आवश्यक असेल, तर ही माघार घेतांना पार्टीनें कामगारवर्गाचें नेतृत्व केलें पाहिजे; पार्टीबाहेरील लाखों असंघटित कामगारांत तिनें लढ्यांतील शिस्तीचा व पद्धतशीरपणाचा बाणा निर्माण केला पाहिजे, संघटित कार्याची व काटकपणाची वृत्ति त्यांच्या अंगीं बाणली पाहिजे. परंतु जर पार्टी स्वतःच शिस्तीचें मूर्त स्वरूप असेल, जर ती स्वतःच कामगारवर्गाची **संघटित** तुकडी असेल, तरच तिला हीं कार्यें पार पाडतां येतील. तसें नसेल तर पार्टीनें लाखों कामगारांचें खरोखरी नेतृत्व करण्याची गोष्टच बोलावयास नको. पार्टी म्हणजे कामगारवर्गाची संघटित तुकडी होय.

पार्टीचे स्वरूप संघटित व एकजिनसी असलें पाहिजे, या कल्पनेला आपल्या पार्टी नियमांपैकीं पहिल्या नियमाच्या लेनिननें सुचविलेल्या सुप्रसिद्ध मांडणींत मूर्त स्वरूप देण्यांत आलें आहे. पार्टी ही निरनिराळ्या पार्टी घटकांचा **समवाय** असते, प्रत्येक पार्टी सभासद यांपैकीं कोणत्या ना कोणत्या पार्टी घटकाचा सभासद असतो, असें या नियमांत मान्य करण्यांत आलें आहे. या मताला १९०३ सालापासूनच मेन्शेविकांचा विरोध होता. त्याऐवजीं त्यांनीं अशी 'पद्धत' सुचविली कीं कुणालाही स्वतःला पार्टी सभासद समजण्याचा अधिकार असावा; पार्टीला या ना त्या प्रकारें जो पाठिंबा देतो, पण एकाद्या पार्टी-संस्थेंत मात्र काम करीत नाहीं व करूं इच्छित नाही, अशा कोणत्याही 'प्रोफेसराला' व 'हायस्कूल विद्यार्थ्याला', कोणत्याही 'हितचिंतकाला' व 'संपवाल्याला,' पार्टी सभासदाची 'पदवी' अर्पण करावी. ही विचित्र 'पद्धत' जर आपल्या पार्टींत रुजली असती तर प्रोफेसरांची व् हायस्कूल विद्यार्थ्यांची खोगीरभरती होऊन पार्टीचा अधःपात झाला असता, ती विस्कळित व आकारहीन आणि असंघटित संस्था बनली असती, 'हितचिंतकां'च्या अफाट समुद्रांत तिचें वैशिष्टच नाहींसें झालें असतें व पार्टी आणि वर्ग यांमधील भेदरेषा पुसून गेली असती, आणि असंघटित बहुजनसमाजाला अग्रदलाच्या दर्जापर्यंत आणण्याचें पार्टीचें कार्य त्यामुळें कोलमडून पडलें असतें,—हें मुद्दाम सिद्ध करण्याची गरज नाहीं. आपल्या क्रांतीच्या काळांत कामगारवर्गाचें संघटित केन्द्र बन-

ण्याची भूमिका पार पाडणें असल्या संधिसाधु 'पद्धतीं'त आपल्या पार्टीला अशक्य झालें असतें, हें अगदीं उघड आहे.

लेनिन म्हणतो :—

> "मार्तोवचा दृष्टिकोण स्वीकारल्यास पार्टीची सीमारेषा अगदीं अनिश्चित बनते, कारण 'प्रत्येक संपवाल्याला' आपण पार्टी सभासद असल्याचें जाहीर करण्याचा अधिकार असतो. असल्या शिथिलपणापासून फायदा तो काय? (पार्टीच्या) 'नांवाचा' जिकडे तिकडे प्रसार होणार एवढाच. पण त्यापासून नुकसान होईल तें हें, कीं वर्ग आणि पार्टी या दोहोंमधील फरक झांकून ठेवण्याच्या व अशा रीतीनें गोंधळ माजविण्याच्या कल्पनेस यामुळें वाव मिळतो. ही कल्पना **संघटणेवर घाला घालणारी** आहे."

पण पार्टी म्हणजे निरनिराळ्या पार्टी घटकांचा **समवाय** एवढेंच म्हणून चालणार नाहीं. त्याचवेळीं दुसरी गोष्ट लक्षांत घेतली पाहिजे व ती ही कीं पार्टी ही या सर्व घटकांची **एकजिनसी संघटणा** (सिस्टिम) असते, या सर्व घटकांचें औपचारिकरीत्या एकीकरण करून बनविलेली एकजिनसी संस्था असते, तिच्यांत खालच्या व वरच्या पुढारी संस्था असतात, अल्पसंख्याकांना बहुसंख्याकांचे निर्णय मान्य करावे लागतात, प्रत्यक्ष अमलांत आणावयाचे सर्व निर्णय सर्व पार्टी सभासदांना बंधनकारक असतात. तसें जर नसेल तर कामगारवर्गाच्या लढ्यांत पद्धतशीर व संघटित नेतृत्व करण्यास समर्थ असलेली एकजिनसी व संघटित संस्था बनणें पार्टीला शक्य होणार नाहीं.

लेनिन म्हणतो :—

> "**पूर्वीच्या काळांत** आपल्या पार्टीला औपचारिकरीत्या संघटित व एकजिनसी स्वरूप नव्हतें, अनेक निरनिराळ्या गटांचा समवाय एवढेंच तिचें स्वरूप होतें, व एकमेकांवर आपल्या विचारसरणीची छाप पाडण्याव्यतिरिक्त या निरनिराळ्या गटांना एकमेकांशीं दुसऱ्या कोणत्याही प्रकारचा संबंध ठेवतां येत नव्हता. **आतां** आपली सुसंघटित

> पार्टी अस्तित्वांत आली आहे, व त्यामुळें पार्टीला विशिष्ट अधिकार प्राप्त झाला आहे, केवळ विचारसरणीच्या प्रभावानें काम करून घेण्याऐवजीं अधिकारानें काम करून घेणें शक्य झालें आहे, पार्टीच्या खालच्या घटकांवर वरच्या घटकांचें नियंत्रण स्थापन झालें आहे."

अल्पसंख्याकांनीं बहुसंख्याकांचें निर्णय मान्य करणें, मध्यवर्ती केन्द्रानें पार्टीच्या कार्याचें मार्गदर्शन करणें, हीं पार्टी–संघटनेचीं तत्त्वें असल्यामुळें डळमळीत वृत्तीचे लोक पुष्कळदां असा आरोप करतात कीं ही 'नोकरशाही' आहे, हें 'औपचारिकपणाचें स्तोम' (फॉर्मलिझम) आहे, वगैरे वगैरे. पण हीं तत्त्वें जर कडकपणानें अमलांत आणलीं नसतीं, तर पार्टीचें एकंदर कार्य पद्धतशीरपणानें पार पाडणें अशक्य झालें असतें व कामगारवर्गाच्या लढ्याचें मार्गदर्शन करतां आलें नसतें, हें मुद्दाम सिद्ध करण्याची गरज नाहीं. हीं तत्त्वें कांटेकोरपणानें अमलांत आणणें हाच संघटनात्मक प्रश्नाच्या बाबतींतील लेनिनवाद होय.

या तत्त्वांना विरोध करण्याच्या वृत्तीला लेनिननें 'रशियन निहिलिझम' व 'उमरावी थाटाचा अराजकवाद' अशीं नांवें दिलीं आहेत, व ही वृत्ति नुसती टर उडविण्याच्या व लाथाडून देण्याच्याच लायकीची आहे असें त्यानें म्हटलें आहे.

**'एक पाऊल पुढें, दोन पावलें मागें'** या पुस्तकांत लेनिननें या डळमळीत वृत्तीच्या लोकांविषयीं पुढील उद्‌गार काढले आहेत :—

> "उमरावी थाटाचा अराजकवाद (ॲरिस्ट्रोक्रॅटिक अनार्किझम) हें रशियन निहिलिस्टाचें खास वैशिष्ट्य आहे. पार्टी म्हणजे एक अजस्र 'कारखाना'च आहे असें त्याला वाटत असतें; अल्पमतवाल्यांनीं बहु-मताचे निर्णय मान्य करणें, पार्टीच्या एका विभागानें सबंध पार्टीचे निर्णय मान्य करणें, ही केवळ 'भूदासपद्धति' (सर्फडम) होय असा त्यांचा समज असतो; ..... मध्यवर्ती संस्थेच्या नेतृत्वाखालीं निर-निराळ्या कामांची वांटणी करून देणें म्हणजे लोकांना 'यंत्राचीं चाकें'

बनविणेंच होय, असा कारुण्य-हास्य-पूर्ण आक्रोश तो करीत असतो, .....
पार्टी संघटनेच्या नियमांचा उल्लेख कानीं पडतांच तो तोंड वांकडें करतो व नियमांची कांहींच गरज नाहीं असें तुच्छतेनें म्हणतो ...."

"नोकरशाहीविषयीं ही जी बडबड करण्यांत येत आहे व तिच्या-विरुद्ध ही जी आरडाओरड करण्यांत येत आहे तिचा उद्देश या मध्य-वर्ती केन्द्रांत सध्यां असलेल्या सभासदांविषयींचा आपला असंतोष लपवून ठेवणें हाच असल्याचें स्पष्ट आहे, असें मला वाटतें. ही केवळ स्वत:चें व्यंग झांकून ठेवण्याची क्लृप्ति आहे...... माझ्या इच्छेप्रमाणें नव्हे तर माझ्या इच्छेविरुद्ध पार्टी कॉंग्रेसनें तुम्हांला मध्यवर्ती कमिटींत निवडलें, अर्थात् तुम्हीं नोकरशहा आहांत ! माझें मत विचारण्याऐवजी तुम्ही पार्टी कॉंग्रेसचे औपचारिक निर्णय अमलांत आणतां, अर्थात् तुम्हीं औपचारिकपणाचें स्तोम माजविणारे आहांत ! पार्टी कॉंग्रेस-मधील 'यांत्रिक' बहुमताचे निर्णय तुम्हीं प्रमाण मानतां, अर्थात् तुम्हीं निर्बुद्ध यांत्रिकपणानें वागणारे आहांत ! मला को-ऑप्ट करून घ्यावें अशी माझी इच्छा आहे, पण तुम्हीं ती लक्षांत घेत नाहीं, जुन्या कंपूच्या हातीं अधिकार देऊन टाकण्यास तुम्हीं तयार नाहीं, अर्थात् तुम्हीं एकतंत्री सुलतान आहांत ! "

(३) **पार्टी म्हणजे कामगारवर्गाच्या वर्ग-संघटनेचा उच्चतम प्रकार.** पार्टी ही कामगारवर्गाची संघटित तुकडी असते. पण ही कामगारवर्गाची एकमेव संघटना नव्हे. कामगारवर्गाच्या कैक इतर संघटनाही असतात, व त्या नसतील तर कामगारवर्गाला भांडवलाविरुद्ध योग्य रीतीनें लढा चालवितां येणार नाहीं. उदाहरणार्थ, ट्रेड युनियन्स, सहकारी संस्था, कारखान्यांतील संघटना, पार्लमेंटरीगट, पार्टीबाहेरील स्त्रियांच्या संस्था, वर्तमानपत्रें, सांस्कृतिक व शैक्षणिक संस्था, युवक संघ, (उघड क्रांतिकारक उठावाच्या काळांत) क्रांतिकारक लढाऊ संघटना, (कामगारवर्ग सत्तारूढ झाला असल्यास) राज्यसत्तेच्या संघटनेचा प्रकार असलेलीं सोविएतें (प्रतिनिधि-मंडळें), वगैरे, वगैरे. यांपैकीं बहुतेक सर्व संस्था पार्टीबाहेरच्या असतात, व त्यांच्यांतील

कांहीं संस्थाच प्रत्यक्षपणें पार्टीला अनुसरतात किंवा पार्टीतूनच उदयास आलेल्या असतात. विशिष्ट परिस्थितीमध्यें या सर्व संघटना कामगारवर्गाला अगदीं आवश्यक असतात, कारण त्या जर नसतील तर लढ्याच्या विविध क्षेत्रांतील कामगारवर्गाची वर्गविशिष्ट भूमिका बळकट करणें अशक्य होईल. भांडवल-दारी समाजपद्धति नष्ट करून तिच्या ऐवजीं समाजसत्तावादी समाजपद्धति अस्तित्वांत आणणें हें कामगारवर्गाचें इतिहाससिद्ध कार्य आहे व हें कार्य पार पाडणारी शक्ति या नात्यानें कामगारवर्गाला कणखर बनविणें जर वरील संघटना अस्तित्वांत नसतील तर अशक्य होऊन बसेल. पण अशा अनेक संघटना अस्तित्वांत असतांना एकजिनसी पुढारीपण कसें अमलांत आणावयाचें ? संघटना अनेक असल्या तरी पुढारीपणांत निरनिराळेपणा दिसून येणार नाहीं, याची खात्री काय ? कुणी म्हणतील कीं यांपैकीं प्रत्येक संस्था स्वतःच्या विशिष्ट क्षेत्रांत काम करीत असल्यामुळें एकमेकींच्या कार्यांत त्या अडथळा करूं शकणार नाहींत. ही गोष्ट अर्थात् खरी आहे, पण त्याचवेळीं असें म्हणणेंही योग्य होईल कीं या सर्व संस्थांनीं एकाच दिशेनें कार्य करावें. याचें कारण असें कीं त्या सर्व संस्था **एकाच** वर्गासाठीं––कामगारवर्गासाठीं––कार्य करीत असतात. यावरून पुढील प्रश्न उपस्थित होतो :—या सर्व संस्थांचें कार्य ज्या सर्वसाधारण दिशेनें, ज्या धोरणानें, चाललें पाहिजे, ती दिशा, तें धोरण, कोण ठरवणार ? एकजिनसी पुढारीपण अस्तित्वांत आणण्यासाठी व परस्परविरोधी कार्याची शक्यता टाळण्यासाठीं हें सर्वसाधारण धोरण ठरविणें जरूर तो अनुभव असल्यामुळें जिला शक्य होतें, इतकेंच नव्हे तर या सर्व संस्थांना हें धोरण अमलांत आणण्यास प्रवृत्त करणें जिला पुरेसें वजन असल्यामुळें शक्य होतें, अशी मध्यवर्ती संस्था कुठें आहे ?

अशी संस्था कामगारवर्गाची पार्टी हीच होय.

हें कार्य पार पाडण्यास पार्टीला जरूर ती सर्व लायकी असते. कारण एकतर कामगारवर्गातील उत्तमोत्तम माणसें पार्टींत एकत्रित होतात, पार्टीबाहेरील कामगार-संस्थांशीं त्यांचा प्रत्यक्ष संबंध असतो व पुष्कळदां त्या संस्थांचें नेतृत्वही त्यांच्या हातीं असतें. दुसरी गोष्ट म्हणजे कामगारवर्गातील उत्त

मोत्तम माणसांना एकत्र आणणारी संस्था या नात्यानें पार्टी म्हणजे कामगार-वर्गाचें पुढारी शिकवून तयार करण्याची, व कामगारवर्गाच्या प्रत्येक प्रकारच्या संस्थेचें मार्गदर्शन करण्यास त्यांना समर्थ करण्याची, उत्कृष्ट शाळाच असते. तिसरी गोष्ट म्हणजे कामगारवर्गाचे पुढारी शिकवून तयार करणारी उत्कृष्ट शाळा या नात्यानें पार्टी ही कामगारवर्गाच्या लढ्याच्या नेतृत्वाचें केन्द्रीकरण करू शकणारी एकमेव संस्था असते, कामगारवर्गाच्या इतर प्रत्येक संस्थेला आपली मदतनीस संस्था बनविणें––इंजिनचें चाक व सांच्याचें चाक यांना जोडणाऱ्या पट्ट्याप्रमाणेंच पार्टी व वर्ग यांना जोडणारी संस्था बनविणें––केवळ पार्टीलाच शक्य होतें. हें कार्य साध्य करण्यासाठीं तिला जरूर तो अनुभव असतो, जरूर तें वजन असतें. पार्टी म्हणजे कामगारवर्गाच्या वर्गसंघटनेचा उच्चतम प्रकार होय.

परंतु ट्रेड युनियन्स, सहकारी संस्था, वगैरे पार्टी-बाहेरील संस्थांवर अधिकृत रीत्या पार्टीच्या पुढारीपणाचें नियंत्रण घालावें, असा मात्र याचा मुळींच अर्थ करतां कामा नये. त्याचा अर्थ एवढाच कीं या संस्थांत जे पार्टी सभासद असतील त्यांचें त्यांत नक्की वजन असणारच व या सभासदांनीं या पार्टीबाहेरील संस्थांना आपल्या कार्याच्या बाबतींत कामगारवर्गाच्या पार्टीकडे आकर्षित करून घेण्याचा, आणि पार्टीचें राजकीय मार्गदर्शन राजीखुशीनें मान्य करण्यास प्रवृत्त करण्याचा, शक्य तो सर्व प्रयत्न करावा.

"पार्टी म्हणजे कामगारांच्या वर्गसंघटनेचा **उच्चतम** प्रकार होय," व इतर सर्व प्रकारच्या कामगार-संघटनांत पार्टीचें राजकीय पुढारीपण स्थापन झालें पाहिजे, असें लेनिननें याच कारणास्तव सांगून ठेवलें आहे.

पार्टीबाहेरील संस्था 'स्वतंत्र' व 'तटस्थ' असल्या पाहिजेत असें प्रतिपादन करणारा संधिसाधु सिद्धांत याच कारणास्तव लेनिनवादाच्या तत्त्वाशी व व्यवहाराशीं पूर्णपणें विसंगत आहे. पार्लमेंटचे **स्वतंत्र** सभासद, पार्टीपासून **अलग** असलेले वृत्तपत्रलेखक, संकुचित दृष्टिकोणाचे ट्रेड युनियन कार्यकर्ते, आणि सहकारी संस्थांचे उथळ व आत्मसतुष्ट अधिकारी, या संधिसाधु सिद्धांतांतून निर्माण होत असतात.

(४) **पार्टी म्हणजे कामगारवर्गाच्या हुकुमशाहीचें साधन.** पार्टी हा कामगारवर्गाच्या संघटनेचा उच्चतम प्रकार आहे. पार्टी ही कामगारवर्गामधील व त्या वर्गाच्या संघटनांमधील प्रमुख मार्गदर्शक शक्ति आहे. परंतु यावरून पार्टी हेंच साध्य आहे असें अनुमान काढतां कामा नये, पार्टी ही एक स्वयंपूर्ण शक्ति आहे असें समजतां कामा नये. पार्टी म्हणजे कामगारांच्या वर्गसंघटनेचा उच्चतम प्रकार तर खराच, पण त्याचवेळीं पार्टी हें कामगारवर्गाच्या हातांतील **साधन** असतें हेंही लक्षांत ठेविलें पाहिजे; जेथें कामगार-हुकुमशाही स्थापन झालेली नसेल तेथें ती स्थापन करण्यासाठीं, व जेथें ती स्थापन झालेली असेल तेथें तिचा पाया बळकट करण्यासाठीं व विस्तार वाढविण्यासाठीं, पार्टी हें साधन म्हणून वापरण्यांत येतें. कामगारवर्गापुढें सत्तेचा प्रश्न उपस्थित झाला आहे; साम्राज्यशाहीची परिस्थिति, युद्धांची अपरिहार्यता, व अरिष्टाचें अस्तित्व, या गोष्टींमुळें कामगारवर्गाच्या सर्व शक्ति एकाच ठिकाणीं केन्द्रित करणें आवश्यक झालें आहे. भांडवलदारवर्गाचें उच्चाटन करण्यासाठीं व कामगारवर्गाची हुकुमशाही स्थापन करण्यासाठीं क्रांतिकारक चळवळीचे सर्व धागेदोरे एकत्र जुळवून त्यांची गांठ बांधणें जरूर झालें आहे. ही परिस्थिति जर नसती तर पार्टीला इतकें उच्च महत्व प्राप्त होऊं शकलें नसतें, कामगार-वर्गाच्या इतर सर्व संघटना-प्रकारांपेक्षां तिला जो श्रेष्ठ दर्जा आहे तो तिला मिळूं शकला नसता. सत्ता काबीज करण्यांत यश मिळविण्यासाठीं कामगार-वर्गाला मार्गदर्शक सेनापति-मंडळाची जरूरी असते व मुख्यतः मार्गदर्शक सेनापति-मंडळ म्हणूनच पार्टी कामगारवर्गाला आवश्यक होते. कामगार-वर्गाच्या जनसामुदायिक संस्थांना आपल्या झेंड्याखालीं आणण्यास आणि लढा चालू असतांना समग्र चळवळीच्या नेतृत्वाचें केंद्रीकरण करण्यास समर्थ असलेली पार्टी जर अस्तित्वांत नसती, तर रशियांतील कामगारवर्ग आपली क्रांतिकारक हुकुमशाही कधींच स्थापन करूं शकला नसता, हें मुद्दाम सिद्ध करण्याची गरज नाहीं.

पण केवळ हुकुमशाही स्थापन करण्यासाठीच कामगारवर्गाला पार्टीची गरज असते असें नाहीं; हुकुमशाही कायम ठेवणें, तिचा पाया बळकट करणें

व समाजसत्तावाद पूर्णपणें विजयी करण्यासाठीं या हुकुमशाहीचा विस्तार वाढविणें, हे उद्देश तडीस नेण्यासाठीं तर कामगारवर्गाला पार्टीची त्याहूनही जास्त गरज असते.

लेनिन म्हणतो :—

> "आपल्या पार्टींत जर अत्यंत कडक व खरोखरीं लोखंडासारखी शिस्त नसती, कामगारवर्गाच्या साऱ्या जनतेनें—म्हणजे मागासलेल्या विभागांना आकर्षून घेण्यास किंवा त्यांचें पुढारीपण घेण्यास समर्थ असलेल्या सर्व विचारी, प्रामाणिक, स्वार्थत्यागी व वजनदार कामगारांनीं —जर आपल्या पार्टीला अगदीं पूर्ण व अगदीं बिनशर्त पाठिंबा दिला नसता, तर बोल्शेविकांना आपली सत्ता अडीच महिनेसुद्धां टिकवून धरतां आली नसती, मग अडीच वर्षांची तर गोष्टच नको. आज बहुतेक साऱ्या जणांना ही गोष्ट पटली आहे यांत शंका नाहीं."

हुकुमशाही 'कायम ठेवणें' व तिचा 'विस्तार वाढविणें,' याचा अर्थ काय होतो ? याचा अर्थ हाच कीं करोडों कामगारांत शिस्तीचा व संघटनेचा वाणा निर्माण केला पाहिजे, मध्यमवर्गीय लोकांच्या वजनामुळें व मध्यमवर्गीय संवयीमुळें कामगारांचा जो अधःपात होत असतो तो टाळण्यासाठीं कामगार-वर्गाची एकजूट कायम ठेवणारी एक जबरदस्त शक्ति निर्माण केली पाहिजे; वर्गभेद नष्ट करण्यास व समाजसत्तावादी उत्पादनासाठीं आवश्यक असलेली परिस्थिति तयार करण्यास समर्थ असलेली शक्ति, या नात्यानें स्वतःला शिक्षण देऊन तयार करण्यास कामगार जनतेला मदत केली पाहिजे. पण एकजूट व शिस्त यांच्यायोगें जोरदार बनलेली पार्टी जर अस्तित्वांत नसेल, तर हें सर्व कार्य अशक्यच होय.

लेनिन म्हणतो :—

> "कामगार-हुकुमशाही म्हणजे जुन्या समाजपद्धतीच्या शक्तीविरुद्ध व परंपरेविरुद्ध सतत चालविण्यांत येणारी झुंजच होय. हा लढा कधीं रक्तानें रंगलेला असेल, तर कधीं रक्तहीन असेल; कधीं हिंसात्मक

असेल, तर कधीं शांतिमय असेल; कधीं लष्करी स्वरूपाचा असेल तर कधीं आर्थिक स्वरूपाचा असेल, कधी शिक्षणाच्या क्षेत्रांत असेल, तर कधीं राज्यकारभाराच्या क्षेत्रांत असेल. करोडों कामगारांच्या अंगीं जडलेल्या संवयीचा प्रभाव फार भयंकर असतो. लढ्यांत तावून सुलाखून कणखर बनलेली लोखंडी पार्टी जर अस्तित्वांत नसेल, कामगार-वर्गांतील सर्व प्रामाणिक लोकांचा जिच्यावर विश्वास आहे अशी पार्टी जर अस्तित्वांत नसेल, तर हा लढा यशस्वी रीतीनें चालविणें अशक्यच होईल."

कामगारवर्गाला आपली हुकुमशाही स्थापन करण्यासाठीं व कायम ठेवण्यासाठीं पार्टीची गरज असते. पार्टी म्हणजे कामगार-हुकुमशाहीचें साधन होय.

पण यावरून असें अनुमान निघतें कीं जेव्हां वर्गभेद नष्ट होतील व कामगार-हुकुमशाही लय पावेल, त्यावेळीं पार्टीसुद्धां लय पावेल.

(५) **पार्टी म्हणजे संकल्पाच्या बाबतींतील एकवाक्यतेचें मूर्तस्वरूप होय व म्हणून तिला गटबाजी मुळींच मानवणार नाहीं.** भक्कम एकजूट व लोखंडी शिस्त यांच्यायोगें जोरदार बनलेली पार्टी जर अस्तित्वांत नसेल, तर कामगार-वर्गाची हुकुमशाही स्थापन करणें आणि टिकवून धरणें अशक्यच होय. पण पार्टींत लोखंडी शिस्त निर्माण होण्यासाठीं तिच्या सर्व सभासदांचा संकल्प एकच असला पाहिजे, त्यांच्या कृतींत संपूर्ण व बिनशर्त एकोपा असला पाहिजे मात्र याचा अर्थ असा मुळींच नव्हे कीं पार्टीमध्यें मतामतांचा झगडा उत्पन्नच होऊं शकत नाहीं. लोखंडी शिस्त म्हणजे पार्टींत टीकेला व मतांमतांच्या झगड्याला मनाई नव्हे; उलट टीका व मतांमताचा संघर्ष यांच्या आधारेंच लोखंडी शिस्त अस्तित्वांत येते. तसेंच, शिस्त 'आंधळी' असली पाहिजे असाही याचा अर्थ नव्हे. सुजाणपणानें व स्वेच्छेनेंच पार्टीचें नियंत्रण मान्य करणें हें लोखंडी शिस्तीशीं विसंगत नाहीं; उलट त्याच्या आधारेंच लोखंडी शिस्त अस्तित्वांत येते, कारण सुजाणपणानें अमलांत आणलेली शिस्त हीच खरी लोखंडी शिस्त होऊं शकेल. परंतु मतभेदांवरील चर्चा समाप्त झाल्यानंतर,

टीकाकारांनीं आपलें म्हणणें पूर्णपणें मांडल्यानंतर, व त्यावर निर्णय घेतल्या-नंतर, सर्व पार्टी सभासदांच्या संकल्पांत व कृतींत एकवाक्यता असली पाहिजे. ती जर नसेल, तर पार्टींत एकजूट व लोखंडी शिस्त निर्माण करण्याची गोष्टच नको.

लेनिन म्हणतो :—

> "सध्यांचें युग निकराच्या स्वकीय युद्धांचें युग आहे, या वेळी कम्युनिस्ट पार्टी जर अत्यंत केंद्रित रीतीनें संघटित झाली असेल, तिच्यांत जवळ जवळ लष्करी शिस्तीसारखी लोखंडी शिस्त असेल, तिचें मध्यवर्ती पुढारी-मंडळ जर प्रबळ व वजनदार असेल, त्याच्या हातीं व्यापक अधिकार असतील व सर्व पार्टी सभासदांचा त्याच्यावर संपूर्ण विश्वास असेल, तरच त्या कम्युनिस्ट पार्टीला आपलें कर्तव्य पार पाडतां येईल; एरव्हीं तें शक्य नाहीं."

कामगार-हुकुमशाही स्थापन करण्यापूर्वीच्या लढ्याच्या काळांत पार्टींत शिस्त कां असली पाहिजे हें आतांपावेतों सांगितलें.

कामगार-हुकुमशाही स्थापन झाल्यानंतरही पार्टी शिस्तीच्या बाबतींत हेंच म्हणणें लागू पडतें, इतकेंच नव्हे तर पूर्वीपेक्षां जास्तच प्रमाणांत लागू पडतें.

लेनिन म्हणतो :—

> " (विशेषत: कामगार-हुकुमशाहीच्या काळांत) कामगारवर्गाच्या पार्टीची लोखंडी शिस्त जो कुणी अगदीं थोड्या प्रमाणांत कां होईना कमजोर करतो, तो वस्तुत: भांडवलदारवर्गालाच कामगारांविरुद्ध मदत करीत आहे असें समजावें."

पण यावरून असें अनुमान निघतें कीं पार्टीमध्यें गटबाजी असणें हें पार्टीच्या एकजुटीशीं व लोखंडी शिस्तीशीं अगदीं विसंगत आहे. पार्टींत जर अनेक गट (फॅक्शन) असतील तर त्याचा परिणाम अर्थात् असा होतो कीं अनेक मध्यवर्ती केंद्रें अस्तित्वांत येतात, आणि अनेक मध्यवर्ती केंद्रें अस्तित्वांत असण्याचा अर्थ

हाच कीं सर्वांवर सारखा अधिकार चालविणारें एक मध्यवर्ती केंद्र पार्टीत नाहीं, पार्टीच्या संकल्पांत एकवाक्यता नाहीं, पार्टीची शिस्त शिथिल झाली आहे व कोलमडून पडत आहे, कामगार हुकुमशाही कमजोर बनली आहे व गडगडूं लागली आहे. पार्टीत गटबाजीला मोकळीक देण्याचें औदार्य सेकंड इंटरनॅशनलच्या पार्ट्यांना अर्थातच परवडेल, कारण त्या पार्ट्यांना लोखंडी शिस्तीची कांहींच गरज नसते; त्या पार्ट्या कामगार-हुकुमशाहीला विरोध करीत आहेत. व कामगारांचें पुढारीपण घेऊन त्यांना सत्ता प्राप्त करून देण्याची त्या पार्ट्यांना मुळींच इच्छा नाहीं. पण कामगार-हुकुमशाही स्थापन करणें व बळकट करणें हाच कम्युनिस्ट इंटरनॅशनलमधील पार्ट्यांच्या सर्व कार्याचा पाया आहे, आणि म्हणून या पार्ट्यांना 'उदार' बनणें व गटबाजीला परवानगी देणें मुळींच परवडणार नाहीं. पार्टी म्हणजेच संकल्पाच्या बाबतींत एकवाक्यता, अर्थात् तिथें कोणत्याही गटबाजीला मुळींच स्थान नाहीं व अधिकाराच्या बाबतींत पार्टीत सवते सुभे स्थापन करण्यास परवानगी देतां येत नाहीं.

"पार्टीतील एकजूट व कामगारवर्गाच्या अग्रदलांत संकल्पाच्या बाबतींत एकवाक्यता, ही कामगार-हुकुमशाहीच्या विजयाची मूलभूत अट आहे, व या एकजुटीच्या व एकवाक्यतेच्या दृष्टीनें पाहतां गटबाजी अत्यंत धोक्याची असते," असा इशारा याच कारणास्तव लेनिननें देऊन ठेवला आहे, 'पार्टीतील एकजूट' या विषयावर आपल्या पार्टीच्या दहाव्या कॉंग्रेसनें जो खास ठराव केला, त्यांत लेनिनचा हा इशारा नमूद केलेला आहे.

याच कारणास्तव लेनिननें अशी मागणी केली कीं "सर्व प्रकारच्या गटबाजीचें पूर्ण उच्चाटन" केलें पाहिजे, "निरनिराळ्या कार्यक्रमांच्या आधारें स्थापन केलेले एकूणएक गट ताबडतोब बरखास्त केले पाहिजेत," व तसें न करणारांस "पार्टीतून ताबडतोब बिनशर्त हांकून" लावण्यांत आलें पाहिजे

**(६) पार्टींतून संधिसाधूंची घाण धूवून काढल्यानें पार्टीचें सामर्थ्य वाढतें**

पार्टीतील संधिसाधु लोकांतच तिच्यांतील गटबाजीचें मूळ असतें कामगारवर्ग

म्हणजे कांहीं इतर वर्गांपासून अगदीं अलग राहाणारा वर्ग नव्हे. भांडवलशाहीचा जसजसा विकास होतो तसतसे अनेक शेतकरी, मध्यमवर्गीय लोक व बुद्धिजीवी लोक निर्धन कामगारवर्गाच्या दशेस जाऊन पोहोंचतात, व अशा रीतीनें कामगारवर्गाच्या संख्येंत सतत भर पडत असते. त्याचवेळीं कामगार वर्गांतील वरच्या विभागाचा अधःपात सुरू झालेला असतो; या विभागांत मुख्यत्वेंकरून ट्रेड युनियन पुढारी व पार्लमेंटचे मजूरपक्षीय पुढारी असतात, व वसाहतींची पिळणूक करून मिळणाऱ्या गडगंज नफ्यांतून भांडवलदारवर्ग या लोकांना चंदी देतो. लेनिनच्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे——

> "भांडवलदारी वृत्तीचे बनलेल्या कामगारांचा हा विभाग, 'कामगारांतील उमरावांचा' हा विभाग, सेकंड इंटरनॅशनलचा मुख्य आधारस्तंभ म्हणून उपयोगीं पडतो, आणि आपल्या काळांत तो **भांडवलदारवर्गाचा मुख्य सामाजिक** (लष्करी नव्हे) **आभारस्तंभ बनला आहे.** या विभागांतील लोकांची जीवनपद्धति, पगाराचें मान, व विचारसरणी, अगदी मध्यमवर्गाला साजेशीच असते. कामगार चळवळींत भांडवलदारांचे दलाल म्हणून खरोखरीं वावरणारे लोक हेच होत. भांडवलदारवर्गाचे कामगार-चळवळींतील हस्तक हेच होत. सुधारणावाद व राष्ट्रीय दुरभिमान यांचा प्रसार खरोखरीं या लोकांच्या द्वारेंच होत असतो."

हे सर्व मध्यमवर्गीय गट या ना त्या प्रकारें पार्टींत शिरकाव करून घेतात, व तिच्यांत डळमळीतपणा व संधिसाधुवाद घुसडवितात, नैराश्याची व संशयवादाची वृत्ति निर्माण करतात. गटबाजीचा व फाटाफुटीचा उगम मुख्यतः या लोकांतूनच होतो. पार्टीची संघटना आंतून विस्कळित करणें व तिचीं शकलें पाडणें या कार्याचा उगम या लोकांतूनच होतो. साम्राज्यशाहीविरुद्ध आपण लढत असतांना आपल्या पिछाडीला जर असले 'दोस्त' असतील, तर दोन आगींच्या वेढ्यांत सांपडण्याची आपत्ति आपणांवर ओढवेल, पुढून व पाठीकडून अशा दोन्हींकडून होणाऱ्या हल्ल्याला आपणांला तोंड द्यावें लागेल. म्हणून

साम्राज्यशाहीविरुद्ध यशस्वी रीतीनें लढण्यासाठीं अगोदर असल्या लोकांविरुद्ध निर्दयपणें लढलें पाहिजे, त्यांना पार्टीतून हांकून लावलें पाहिजे.

पार्टीतच तात्विक लढा चालवून या संधिसाधु लोकांवर 'मात' करतां येईल, एकाच पार्टीच्या चौकटींत या लोकांना राहूं दिल्यास ते आपोआप 'मरून' जातील, असा सिद्धांत कांहींजण मांडीत असतात. पण हा सिद्धांत साफ चुकीचा व अत्यंत धोक्याचा आहे. हा सिद्धांत मान्य केल्यास पार्टी अगदीं निष्क्रिय व कायमची पंगु बनेल, ती पूर्णपणें संधिसाधुवादाच्या आहारीं जाईल, कामगारवर्गाला आपली क्रांतिकारक पार्टी उरणार नाहीं, साम्राज्यशाही-विरोधी लढ्यांतील कामगारवर्गाचें मुख्य शस्त्र त्याच्या हातांतून हिरावून घेतलें जाईल. मार्तोव, दान, पोत्रेसोव, व अक्सेलरोद, यांच्यासारखे लोक जर आपल्या पार्टीत असते तर तिला आपला सरळ मार्ग चोखाळतां आला नसता, सत्ता काबीज करतां आली नसती, कामगार-हुकुमशाहीची संघटना करतां आली नसती, स्वकीय युद्धांत विजय मिळवितां आला नसता. आपल्या पार्टीला अंतर्गत एकजूट व अपूर्व सहकार्य अस्तित्वांत आणण्यांत यश आलें याचें मुख्य कारण असें कीं, तिनें योग्य वेळींच आपल्यांतील संधिसाधूंची घाण काढून टाकली, तिनें विसर्जनवाद्यांची व मेन्शेविकांची हकालपट्टी केली. संधिसाधु व सुधारणावादी, स्वतःला समाजसत्तावादी म्हणविणारे पण वस्तुतः साम्राज्यवादाचा व राष्ट्रीय दुरभिमानाचा पुरस्कार करणारे किंवा देशाभिमानाचा व शांततावादाचा पुरस्कार करणारे, अशा लोकांची हकालपट्टी केल्यानें कामगार पाटर्यांचा विकास होतो व त्यांचें बळ वाढतें. संधिसाधूंची हकालपट्टी केल्यानें पार्टी प्रबळ बनते.

लेनिन म्हणतो :—

'आपल्या पार्टीत जोंपर्यंत सुधारणावादी लोक, मेन्शेविक लोक, वावरत आहेत, तोंपर्यंत कामगार-क्रांतींत विजय मिळविणें **अशक्य** आहे, व तो विजय टिकविणें **अशक्य** आहे. तात्विकदृष्ट्या हें सहज लक्षांत येण्यासारखें आहे, व रशियाच्या आणि हंगेरीच्या अनुभवानें

हें स्पष्टपणें प्रत्ययास आलें आहे .....रशियामध्यें **अनेकदां** असे बिकट प्रसंग आले कीं जेव्हां आपल्या पार्टीत मेन्शेविक, सुधारणावादी व मध्यमवर्गीय लोकसत्तावादी जर कायम राहिले असते, तर सोविएत सत्ता **अगदीं खात्रीनें** उलथून पडली असती. .....इटलीमध्यें आज कामगारवर्ग व भांडवलदारवर्ग यांच्या दरम्यान राज्यसत्तेसाठीं निर्णायक स्वरूपाचे लढे सुरू होण्याचा क्षण जवळ येऊन ठेपला आहे; हें सर्वजणांना मान्य आहेच. अशा वेळीं मेन्शेविकांना, सुधारणावाद्यांना, तुरांतिस्टांना, पार्टीतून काढून टाकणें अत्यंत आवश्यक आहेच, पण त्याखेरीज जे डळमळण्याचा संभव आहे, सुधारणावाद्यांशीं 'एकी' करण्याच्या दिशेनें डळमळीत जाण्याची ज्यांची प्रवृत्ति दिसून येते, अशा उत्कृष्ट कम्युनिस्टांनासुद्धां जबाबदारीच्या सर्व जागांवरून काढून टाकणें कदाचित् उपयुक्त होईल. ......क्रांति जवळ येऊन ठेपली आहे अशा वेळीं, व क्रांतीच्या विजयासाठीं अत्यंत निकराचा लढा चालू आहे अशा क्षणीं, पार्टीसभासदांमध्यें अत्यंत अल्प प्रमाणांतही डळमळीतपणा उत्पन्न झाल्यास सर्वनाश होण्याचा संभव असतो, क्रांति निष्फळ ठरण्याचा संभव असतो, कामगारवर्गाच्या हातांतून सत्ता हिरावून घेतली जाण्याचा संभव असतो; कारण ह्या सत्तेचा पाया अजून बळकट झालेला नाहीं, तिच्यावर करण्यांत येणारा हल्ला अजून फार जोराचा आहे. अशा वेळीं डळमळणारे पुढारी बाजूला सरल्यास त्यामुळें पार्टीचें, कामगार चळवळीचें व क्रांतीचें बळ कमी होणार नाहीं, तर उलट तें जास्तच वाढेल."

★

[ ९ ]

# कामांतील शैली

मला येथें साहित्यांतील शैलीची चर्चा करावयाची नाहीं. कार्यांतील शैली-चाच विचार करावयाचा आहे. लेनिनवाद कृतींत आणण्याच्या क्रियेचें असें कोणतें खास लक्षण आहे, कीं ज्यांमुळें लेनिनवादी कार्यकर्ता म्हणून एक विशेष नमुना अस्तित्वांत येतो,—याचा आपण विचार करूं. लेनिनवाद म्हणजे सिद्धांत व व्यवहार शिकविण्याची एक शाळाच होय; या शाळेंत एक विशेष प्रकारचा पार्टी कार्यकर्ता व कामगार सरकारचा कार्यकर्ता शिकवून तयार करण्यांत येतो. कामांतील एक विशेष शैली—लेनिनवादी शैली—निर्माण करण्यांत येते, या शैलीचीं विशेष लक्षणें कोणतीं ?

या शैलीचीं दोन विशेष लक्षणें आहेत :—(१) रशियन पद्धतीचा क्रांति-कारक उत्साह, आणि (२) अमेरिकन पद्धतीचें व्यवहारकौशल्य (एफीशन्सी). पार्टीचें व कामगार सरकारचें कार्य पार पाडतांना या दोन गोष्टींची सांगड घालणें हीच लेनिनवादाची शैली होय.

सुस्तपणा, चाकोरींतूनच जाण्याची संवय, सुधारणांना विरोध, डोक्याला त्रास न देण्याची प्रवृत्ति, जुन्यापुराण्या रूढींना लाचारपणानें चिकटून राहणें,—या सर्व दोषांवर रशियन क्रांतिकारक उत्साह हा रामबाण उपाय आहे रशियन क्रांतिकारक उत्साह म्हणजे एक चैतन्य देणारी शक्तीच होय, त्याच्या योगें विचाराला चालना मिळते, कृतीला प्रोत्साहन मिळतें, जीर्ण भूतकाळाच्या कोंडींतून सुटका होते, व भविष्यकाळाचे नवे मार्ग खुले होतात. हा क्रांतिकारक उत्साह जर नसेल, तर प्रगति शक्यच होणार नाही. परंतु या रशियन क्रांति-कारक उत्साहाची अमेरिकन व्यवहार-कौशल्याची सांगड घालणें जरूर आहे, नाहीतर त्याला नुसतें पोकळ 'क्रांतिकारक' शब्दावडंबराचें (मानिलोविझम) स्वरूप येण्याचा फारच संभव असतो. असल्या विकृतीची उदाहरणें कैक

सांपडतील. कोणतेंही काम पार पाडावयाचें असल्यास व कोणत्याही सुधारणा-घडवून आणावयाच्या असल्यास नुसते फतवे काढले म्हणजे पुरे, असा कांहीं-जणांचा समज आहे, आणि या समजाच्या आधारें नाना प्रकारच्या 'क्रांति-कारक' योजना आणि 'क्रांतिकारक' कार्यक्रम आंखण्याचा त्यांना रोगच जडलेला असतो, ही गोष्ट कुणाला ठाऊक नाहीं ? एऱ्हेनबुर्ग या रशियन लेख-कानें 'उस्कोम्चेल' नांवाच्या गोष्टींत अशा प्रकारच्या रोगानें पछाडलेल्या एका 'बोल्शेविका'चें नमुनेदार चित्र रंगविलें आहे. सर्वांगपरिपूर्ण आदर्श माणूस कसा असावा हें निश्चित करण्याच्या कामाला सदरहू बोल्शेविकानें स्वत:ला वाहून घेतलेलें असतें. या 'कामांत' तो अगदीं 'रंगून' जातो. या गोष्टींत कांही ढोबळ अतिशयोक्ति आहे खरी, परंतु एकंदरीनें तिच्यांत या रोगाचें यथातथ्य चित्र दिलें आहे यांत शंका नाहीं. पण या रोगानें पछाडलेल्या लोकांची लेनिननें जितक्या निर्दयपणानें व कठोरपणानें थट्टा केली आहे तितकी दुसऱ्या कुणीही केली असेलसें मला वाटत नाहीं. योजनांवर व फतव्यांवर विश्वास ठेवण्याच्या या रोगाला लेनिननें 'कम्युनिस्ट आढयता' असें बोंचक नांव दिलें आहे. लेनिन म्हणतो :—

> "कम्युनिस्ट फतवे काढून कोणतेही प्रश्न सोडवितां येतील अशी कांहींजणांची कल्पना असते. हे लोक कम्युनिस्ट पार्टीचे सभासद असतात याचें कारण एवढेंच, कीं अजून पार्टींतून त्यांची हकालपट्टी केलेली नसते. कम्युनिस्ट आढयता हें असल्या लोकांचें वैशिष्टय असतें."

**पोकळ 'क्रांतिकारक' शब्दावडंबर** आणि साधेंसुधें दैनंदिन कार्य यांमधील भेद लेनिन नेहमी दाखवून देत असे. पोकळ 'क्रांतिकारक' योजना आंखणें खऱ्याखुऱ्या लेनिनवादाच्या बाण्याशीं व कार्यपद्धतीशीं अगदीं विसंगत आहे, हें यावरून स्पष्ट होतें.

लेनिन म्हणतो :—

> " भपकेबाज शद्वावडंबर जरा आवरतें घ्या, साधेंसुधें **दैनंदिन** कार्य जास्त प्रमाणांत करा. राजकीय आतषबाजी कमी करा, कम्युनिस्ट समाजरचनेच्या अगदीं साध्यासुध्या पण जिव्हाळ्याच्या मुद्यांकडे अधिक लक्ष द्या."

उलटपक्षीं 'क्रांतिकारक' शब्दावडंबर (मानिलोविझम) व भरमसाट योजना आंखण्याची प्रवृत्ति यांवर अमेरिकन व्यवहार-कौशल्य हा रामबाण उपाय आहे. अमेरिकन व्यवहार-कौशल्य म्हणजे एक अजिंक्य शक्तीच होय; कोणत्याही अडथळ्यांची पर्वा करावयाची नाहीं, ते जमेसम्न धरावयाचे नाहींत, सर्व प्रकारचे अडथळे पद्धतशीर चिकाटीनें बाजूला सारावयाचे, एकदां काम हातीं घेतलें कीं तें पुरें होईपर्यंत थांबावयाचें नाहीं (मग तें अगदीं क्षुल्लक काम कां असेना),—याचेंच नांव अमेरिकन व्यवहार-कौशल्य. हें व्यवहार-कौशल्य जर नसेल तर कोणतेंही महत्वाचें रचनात्मक कार्य पार पाडतां येणार नाहीं. परंतु या अमेरिकन व्यवहार-कौशल्याची रशियन क्रांतिकारक उत्साहाशीं सांगड घालणें जरूर आहे; नाहींतर त्याला संकुचित व तत्त्वशून्य व्यापारी वृत्तीचें स्वरूप येण्याचा फारच संभव असतो. संकुचित व्यवहारदृष्टि व तत्त्व-शून्य व्यापारी वृत्ति या रोगांनीं पछाडल्यामुळें कांहीं 'बोल्शेविकां'चा अधःपात होऊन त्यांनीं क्रांतिकार्याला रामराम ठोकला, हें कुणाला ठाऊक नाहीं? बी. पिल्न्याक या लेखकाच्या 'दुष्काळी वर्ष' नांवाच्या गोष्टींत या विलक्षण रोगाचें प्रतिबिंब आढळतें. या गोष्टींत एका विशिष्ट नमुन्याच्या रशियन 'बोल्शेविकां'चें चित्र रंगविलें आहे. हे बोल्शेविक फार करारी असतात, कार्य पार पाडण्याचा त्यांचा निर्धार जबरदस्त असतो, ते आपली कामगिरी अतिशय 'उत्साहानें बजावतात',—पण त्यांना दूरवर दृष्टि टाकण्याचें मात्र कळत नाहीं, आपण चालविलेल्या कार्याचा 'उद्देश' तरी काय हेंच त्यांना ठाऊक नसतें, व म्हणून ते क्रांतिकारक कार्याचा मार्ग सोडून भलतीकडे वाहावत जातात. संकुचित व्यापारी वृत्तीच्या या रोगाची थट्टा करून लेनिननें

त्याचे जितके वाभाडे काढले आहेत तितके दुसऱ्या कोणीही काढलेले नाहींत. या रोगाला त्यानें 'संकुचित व्यवहारवाद' व 'बिनडोक व्यापारी वृत्ति' अशीं बोंचक नांवें दिलीं आहेत. एकीकडे असली वृत्ति, व दुसरीकडे खरेखुरें क्रांतिकारक कार्य आणि आपल्या प्रत्येक दैनंदिन कामांत दूरवर नजर टाकून क्रांतीच्या भवितव्याची जाणीव ठेवण्याची आवश्यकता, या दोहोंमधील भेद लेनिन नेहमीं दाखवून देत असे. ही तत्त्वशून्य व्यापारी वृत्ति पोकळ 'क्रांति-कारक' योजना आंखण्याच्या रोगाइतकीच खऱ्याखुऱ्या लेनिनवादाशीं विसंगत आहे, हें यावरून स्पष्ट होतें.

रशियन क्रांतिकारक उत्साह आणि अमेरिकन व्यवहार-कौशल्य यांची सांगड घालणें, हें पार्टी कार्याच्या व कामगार–सरकारच्या कामाच्या क्षेत्रांत लेनिनवादाचें सारसर्वस्व होय.

अशी सांगड घातली म्हणजेच लेनिनवादी कार्यकर्त्यांचा आदर्श नमुना तयार होतो, लेनिनवादाची विशिष्ट कार्यशैली निर्माण होते.

REFBK-0006487

क्र. ६८८

मुद्रक:—शराफ अतहर अली, न्यू एज प्रिंटिंग प्रेस,
१९० बी, खेतवाडी मेन रोड, मुंबई ४
प्रकाशक—शराफ अतहर अली, लोक-प्रकाशन गृह,
राजभवन, सँढर्स्ट रोड, मुंबई ४